'विंग्ज ऑफ फायर'नंतरचा स्फूर्तिदायक भाग

ए.पी.जे. अब्दुल कलाम

टर्निंग पॉइंट्स

आव्हाने पेलत केलेली वाटचाल...

VISIT…

‘विंग्ज ऑफ फायर’नंतरचा स्फूर्तिदायक भाग

टर्निंग पॉइंट्स

आव्हाने पेलत केलेली वाटचाल...

ए.पी.जे. अब्दुल कलाम

अनुवाद

अंजनी नरवणे

मेहता पब्लिशिंग हाऊस

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House**, 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030. ✆ +91 020-24476924 / 24460313

Email : info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

TURNING POINTS by A. P. J. ABDUL KALAM
© Copyright A.P.J. Abdul Kalam 2012
Published by Arrangement with by HarperCollins Publishers India Limited
Translated into Marathi Language by Anjani Naravane

टर्निंग पॉइंट्स / अनुवादित अनुभवकथन

अनुवाद : अंजनी नरवणे एफ १/१, नेस्ट, एच.डी.एफ.सी. कॉलनी, चिंचवड (पू.), पुणे – ४११०१९.

मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११०३०.

मुखपृष्ठ : हार्परकॉलिन्स पब्लिशर्स इंडिया लिमिटेड यांच्या सौजन्याने

संपादन सहाय्य : मिलिंद बोरकर

प्रकाशनकाल : नोव्हेंबर,२०१२ / एप्रिल, २०१३ / जानेवारी, २०१४ / पुनर्मुद्रण : जुलै, २०१५

ISBN for Printed Book 9788184984408
ISBN for E-Book 9788184988024

मनोगत

आपल्या सर्वांना ज्यांच्याबद्दल अत्यंत आदर, आपुलकी व अभिमान आहे; असे आपले भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ह्यांच्या ह्या एकविसाव्या पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्यास मिळावा, अशी खूप इच्छा होती. पुस्तकाबद्दल किंवा डॉ. कलाम यांच्याबद्दल मी लिहावे, असे काहीच नाही! तेव्हा हे चार शब्द केवळ धन्यवाद देण्यासाठी. मी हे काम करु शकेन, असा विश्वास माझ्यावर टाकून हा अनुवाद करण्याची संधी मला दिल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. सुनील मेहता ह्यांना मन:पूर्वक धन्यवाद. त्यांनी टाकलेला विश्वास मी सार्थ केला असेल आणि वाचकांच्या पसंतीची मोहोर ह्यावर उमटेल, अशी आशा आहे. घरच्यांचे प्रकट आभार मानायचे नसतात; परंतु मला वाटते, घरच्यांची मदत आपण नेहमीच गृहीतच धरुन चालतो, हेही बरोबर नाही. माझे पती जयंत ह्यांची शक्य ती सर्व मदत व प्रोत्साहन नेहमीच असते; परंतु ह्या वेळी विशेषत: आमचा मुलगा श्रवण व स्नुषा सौ. लीलावती ह्यांनी हे पुस्तक शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करण्यास सर्वतोपरी जी मदत केली, त्याबद्दल त्यांना प्रकट धन्यवाद! मेहता पब्लिशिंग हाऊसमधील मला नेहमीच उत्तम सहकार्य देणाऱ्या सर्वांनाही धन्यवाद. जाणकार वाचकांच्या उत्तम प्रतिसादाच्या अपेक्षेत –

– अंजनी नरवणे

अनुक्रम

प्रस्तावना

१. भारताचे गुणगान मी केव्हा गाऊ शकेन?

२. अण्णा युनिव्हर्सिटीमधील नववे भाषण

३. माझ्या आयुष्यात बदल घडविणारे सात महत्त्वाचे टप्पे

४. सर्वांशी संवाद साधणारे राष्ट्रपती

५. मी देशाला काय देऊ शकतो?

६. इतरांकडून शिकणे

७. स्पर्धक राष्ट्र होण्याचा मार्ग...

८. मेणबत्ती आणि पतंग

९. माझी गुजरात भेट

१०. परदेशात घरचा अनुभव

११. भारताच्या गाभ्याला नवजीवन देणे

१२. उद्यानामध्ये...

१३. विवादास्पद निर्णय

१४. राष्ट्रपतिपदानंतर...

उपसंहार

...आणि नंतर

परिशिष्ट १ – मुलाखत

परिशिष्ट २ – ध्येयसिद्धीसाठी अंमलबजावणी

प्रस्तावना

'विंग्ज ऑफ फायर' ह्या पुस्तकात १९९२पर्यंतच्या माझ्या आयुष्याबद्दल लिहिले आहे. ते १९९९मध्ये प्रकाशित झाले, तेव्हापासून त्याला अत्यंत आश्चर्यकारक प्रतिसाद मिळाला आणि त्या पुस्तकाच्या दहा लाखांहून जास्त प्रती विकल्या गेल्या. हजारो लोकांवर त्याचा चांगला प्रभाव पडलेला दिसतो, ज्यामुळे त्यांच्या आयुष्यात चांगला बदल घडवून आणण्यास त्यांना मदत झाली, ही विशेष समाधान देणारी गोष्ट.

'टर्निंग पॉइंट्स' लिहीत असताना माझ्या मनात असा विचार आला की, मी हे पुस्तक का लिहीत आहे? असे म्हणता येईल की, माझ्या आयुष्याबद्दलच्या लेखनातून अनेक भारतीयांच्या चिंता, अडचणी आणि आकांक्षा ह्यांचा प्रतिध्वनी उमटतो. मीही त्यांच्यासारखेच शिडीच्या अगदी खालच्या पायरीपासून आयुष्य सुरु केले. माझी पहिली नोकरी वरिष्ठ सहायक शास्त्रज्ञ म्हणून होती. हळूहळू मला जास्त मोठ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आणि शेवटी मी भारताचा राष्ट्रपती झालो. गेल्या दशकामध्ये नक्कीच बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत आणि त्यांपैकी सांगण्यासारख्या बऱ्याच आहेत. असे म्हणता येईल की, हे सर्व अतिशय चित्तथरारक अनुभव होते.

परंतु, 'टर्निंग पॉइंट्स' लिहिण्यामागे माझी कारणे जरा वेगळी होती. 'विंग्ज ऑफ फायर'ला जो प्रतिसाद मिळाला; तो बघून मला असे वाटले की, ह्या पुस्तकानेही काही थोड्या लोकांना जरी फायदा झाला, तरी हे पुस्तक लिहिण्याचे चीज होईल. खरे तर अगदी एका माणसाला किंवा एका कुटुंबाला जरी असे वाटले की, ह्या पुस्तकातील काही भागाने त्यांचे आयुष्य त्यांना जास्त चांगले बदलता आले, तरी मला कृतकृत्य वाटेल. म्हणून प्रिय वाचकहो, हे पुस्तक तुमच्यासाठीच!

३० मे, २०१२
नवी दिल्ली

–ए.पी.जे.अब्दुल कलाम

१
भारताचे गुणगान मी केव्हा गाऊ शकेन?

'Keep loving nature and care for its blessings
Then you can see divinity all over'

'निसर्गावर प्रेम करत राहा आणि त्याने जे इतके काही दिले आहे,
त्याची जाणीव ठेवा....
तर तुम्हाला ती दैवी शक्ती सर्वत्र दिसेल.'

तो होता, २४ जुलै, २००७... हा माझा राष्ट्रपतिपदाचा शेवटचा दिवस. तो अत्यंत भरगच्च कार्यक्रमांचा दिवस होता. माझ्या वैयक्तिक कामात सकाळ गेली. त्यानंतर दुपारी ३.२५ला 'सीएनएन-आयबीएन'चे राजदीप सरदेसाई आणि दिलीप वेंकटरामन ह्यांनी माझी एक छोटी मुलाखत घेतली. मग छत्तीसगडचे राज्यपाल ई. एस. एल. नरसिंहन भेटायला आले. त्यानंतर उत्तराखंडचे आरोग्य व कुटुंबकल्याण तसेच विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री डॉ. रमेश पोखरियाल – 'निशांक', ह्यांना भेटायचे होते. मग दिल्लीच्या हिंदू कॉलेजची विद्यार्थिनी करिष्मा थंकप्पन व तिचे माता-पिता तसेच इतर पाच जण ह्यांना भेटायचे होते. चार वाजता परराष्ट्र मंत्रालयाचे 'प्रोटोकॉल-प्रमुख' सुनील लाल, त्यांच्या पत्नी गीतांजली आणि कन्या नितिका ह्यांना भेटायचे होते. तसेच निरोपाच्या बऱ्याच भेटी-गाठी रात्री आठ वाजेपर्यंत चालल्या. त्यानंतर माझ्यातर्फे नवनिर्वाचित राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचे सदस्य ह्यांच्यासाठी 'खाना' आयोजित केला होता.

निरोपसमारंभ व इच्छुकांना भेटणे, स्नेह्यांशी बोलणे आणि माझे जे थोडे सामान होते, ते बांधून घेणे – तसे तर मी सांगितले होतेच की, मी फक्त दोन सूटकेसेस बरोबर घेऊन जाणार आहे – याचबरोबर एक अव्यक्त विचार तेथील वातावरणात मला जाणवत होता. जे कोणी मला भेटत होते किंवा माझ्याशी बोलत होते, त्यांच्या मनामध्ये एक मुख्य विचार हा होता की, 'मी पुढे काय करणार आहे? मी ह्याबद्दल ठरवले आहे का? मी अध्यापनाकडे परत वळेन का? मी सार्वजनिक आयुष्यातून निवृत्त होईन का?' जे मला ओळखत होते, त्यांच्या मनात हा शेवटचा प्रश्न असण्याची शक्यता कमी होती! आत्ताच्या घटकेला तरी राष्ट्रपती भवनातली गेली पाच वर्षे माझ्या मनात अगदी ताजी होती. जेथे 'उस्ताद बिस्मिला खाँ'चा शेवटचा कार्यक्रम झाला आणि संगीताच्या दुनियेतील कलाकारांचे इतरही अनेक कार्यक्रम झाले; त्या मुघल गार्डनमधील सुंदर स्वागत करणारी फुले, औषधी वनस्पतींच्या उद्यानातील गंध, नृत्य करत हिंडणारे मोर, उन्हाळ्यातल्या कडक उन्हात आणि हिवाळ्यातल्या बोचऱ्या थंडीत ताठ उभे राहणारे सतर्क रक्षक... हे सर्व माझ्या दैनंदिन आयुष्याचा भाग होऊन गेले होते. ह्या पाच वर्षांचा केवढा समृद्ध अनुभव होता!

प्रत्येक क्षेत्रातील आणि समाजाच्या प्रत्येक स्तरातील लोकांनी देशाच्या प्रगतीसाठीच्या त्यांच्या कल्पना मला भरभरुन पाठवल्या होत्या. एकमेकांशी जणू स्पर्धा करत, आपण देशासाठी काय योगदान दिले, हेही ते सांगत असत. प्रत्येक पातळीवरील राजकारणी लोक त्यांच्या मतदारसंघाची प्रगती करण्यासाठीचे त्यांचे विचार मांडत असत. महत्त्वाचे, तातडीचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत करायला शास्त्रज्ञ आसुसलेले होते. कलाकार आणि लेखक त्यांचेदेशावरचेप्रेम सुंदर तऱ्हेने व्यक्त करत असत. धर्मगुरु एकाच व्यासपीठावर येऊन आध्यात्मिक सौहार्द्र आणि मानसिक ऐक्य ह्यावर बोलत असत. ज्ञानसमृद्ध समाज निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील विशेषज्ञ त्यांचे विचार मांडत होते. सर्व नागरिकांना समान कायदेशीर व न्याय्य वागणूक मिळावी, खटल्यांचा जलद गतीने निकाल लागावा, ई-न्यायतंत्र असावे, अशा सध्या चर्चेत असणाऱ्या मुद्द्यांवर कायदेपंडित आणि न्यायालयीन क्षेत्रातील तज्ज्ञ त्यांच्या कल्पना पुढे ठेवत असत. जेव्हा-जेव्हा अनिवासी भारतीय मला भेटत असत, तेव्हा त्यांच्या मातृभूमीची प्रगती व सुधारणा होण्यासाठी त्यांना शक्य असेल, ते करण्याची इच्छा दर्शवत असत.

आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रांतांना मी भेटी दिल्या; तेव्हा मला त्या-त्या ठिकाणचे खास अद्वितीय विलक्षण असे अनुभव मिळत गेले आणि त्या अनुभवांमधून मला लोकांच्या आकांक्षा समजल्या, अनेकांनी केलेल्या चांगल्या कामांची माहिती मिळाली; सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, तरुण पिढीच्या शक्तीची कल्पना आली.

वैद्यकीय क्षेत्रातल्या लोकांशी माझा वेगवेगळ्या विषयांवर संवाद होत असे. त्यात ग्रामीण भागातील नागरिकांना परवडेल अशी वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे असे, वैद्यकीय संशोधनाला उत्तेजन देणे असे, कुठल्याही तऱ्हेचे शारीरिक-मानसिक अपंगत्व असणाऱ्यांचे आयुष्य जास्त सुकर करणे असे, ज्येष्ठ नागरिकांचा नीट सांभाळ व्हावा ह्यासाठीची योजना असे वा रोगराई पसरु न देता आरोग्य सुधारण्यासाठी जीवनपद्धती सुधारावी, ह्या संदेशाचा प्रसार करणे – अशांचा समावेश असे. भारतात व परदेशात ज्या परिचारिका मला भेटल्या, त्यांनी उच्च दर्जाच्या आरोग्यसुविधा देणारी केंद्रे – विशेषत: ग्रामीण भागातील जनतेसाठी – उघडण्याची आपण होऊन तयारी दाखवली.

अडचणीत असणारे, कापसाची शेती करणारे यांच्यासह इतरही शेतकऱ्यांशी चर्चा करण्याने त्यांचे प्रश्न समजण्यास, तसेच त्यांच्यापुढे असणाऱ्या आव्हानांचा विचार करण्यास व आढावा घेऊन ते शब्दबद्ध करुन माझ्या कल्पना कृषिशास्त्रज्ञांपुढे मांडण्यात मदत झाली.

पोस्टमनमंडळींना भेटल्याने माझ्या मनात असा विचार आला की, ज्ञानप्रसाराच्या कामात देशाच्या ग्रामीण विभागात ते माहिती अधिकारी म्हणून मोलाची भूमिका बजावू शकतील.

पोलीस खात्यातील कर्मचारी मला भेटले व त्यांच्या खात्यात काय सुधारणा करता

येतील, ह्याबद्दलच्या त्यांच्या कल्पना त्यांनी मला सांगितल्या. उदाहरणार्थ : पोलीस स्टेशनच्या पायाभूत सुविधा सुधारणे, माहिती तंत्रज्ञानाचा पोलिसांच्या कामासाठी उपयोग करुन घेणे. ह्या त्यांच्या कल्पना पोलीस खात्यातील सुधारणांविषयी विचार करणाऱ्या समितीला मी सांगितल्या.

ग्रामपंचायतींच्या प्रमुखांनी – विशेषत: महिला सरपंचांनी – त्यांना कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते, ह्याबद्दल आणि त्यांचे गाव सुधारण्यासाठी त्यांनी आखलेल्या योजना व तयार केलेले कार्यक्रम ह्यांविषयी सांगितले.

मी जेथे-जेथे गेलो तिथे-तिथे शिक्षाकांनी मला हमी दिली की, राष्ट्राच्या उभारणीसाठी तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन करणे, हे त्यांचे ध्येय होते. तरुणांना सुसंस्कृत व सुबुद्ध नागरिक बनवण्यासाठी त्यांना योग्य मूल्यांचे शिक्षण देण्याचा ते प्रयत्न करतील, असे त्यांनी सांगितले.

ह्या सर्व समृद्ध करणाऱ्या अनुभवांमधून पुढे आम्ही समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्यांनी ज्या प्रतिज्ञा घ्याव्यात, असे आम्हाला वाटले; त्या तयार केल्या. लहान मुले, त्यांचे आई-वडील, शिक्षक, सेवाक्षेत्रातील लोक, व्यवस्थापक, वकील, डॉक्टर्स, परिचारिका आणि इतर क्षेत्रांतील लोकांसाठी ह्या प्रतिज्ञा आम्ही शब्दबद्ध केल्या. वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोकांशी बोलताना ही प्रतिज्ञा हा एक अविभाज्य भागच बनून गेला. त्या प्रतिज्ञेत त्या क्षेत्राशी संलग्न असे पाच-सात किंवा दहा मुद्दे असत. साधारणपणे अशा सभांमध्ये उपस्थिती बरीच असे आणि अशा प्रतिज्ञा एकत्र घेण्याने सर्व उपस्थित समुदायाला एका ध्येयासाठी एकत्र आणले जाई आणि तो संदेश ते आयुष्यभर पाळू शकतील, असा विचार मनात घोळवत ते घरी जात असत.

एका गोष्टीचे मला कायमच आश्चर्य वाटत आले. ती म्हणजे, मी राष्ट्रपती असताना मला येणारी पत्रे, ई-मेल्स आणि इतर पत्रव्यवहार ह्यांची प्रचंड संख्या! लहान मुले, तरुणवर्ग, प्रौढ नागरिक, शिक्षक, शास्त्रज्ञ... जवळजवळ सर्वच क्षेत्रांतील लोक लिहीत असत. विश्वास बसणार नाही इतकी – हजारो पत्रे रोजच्या रोज येत असत. सर्व पृच्छांना उत्तरे लिहिणे अशक्य होते किंवा जी मदत मागितली गेली असेल, ती देणेही; परंतु आम्ही त्यासाठी प्रयत्न मात्र करत असू. बऱ्याचदा संबंधित क्षेत्रांतील अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी आम्ही ती पाठवून देत असू. वैद्यकीय उपचारांविषयी पत्र असेल, तर योग्य ते रुग्णालय आम्ही सुचवत असू. कधी-कधी आम्ही स्वत:च सल्ला-सूचना देत असू; तर कधी-कधी थोडीफार आर्थिक मदतही. आपल्या देशातील काही लोकांच्या पत्रांमध्ये इतकी सकारात्मक दृष्टी, श्रद्धा आणि आशा असलेली बघायला मिळे; तर दुसरीकडे प्रचंड प्रमाणात दु:ख, यातना, अनाथ-एकटेपणाही दिसून येई, हे बघून आश्चर्य वाटे. ज्या एका लहान मुलीचे पत्र माझ्या मनाला भिडले, ती मुलगी कठीण परिस्थितीत असलेल्या कुटुंबातील होती. त्या पुन:पुन्हा आठवत राहणाऱ्या पत्रात आयुष्य सुधारण्याची तिची प्रबळ इच्छा आणि कुवत मला जाणवली. तिला जे मदत करु शकतील, असे आम्हाला वाटले, त्यांच्याकडे आम्ही ते पत्र

पाठवून दिले आणि त्याचे आश्चर्यकारक परिणाम झाले.

'माझे कुटुंब कठीण परिस्थितीत आहे. गेली तेवीस वर्षे माझे कुटुंब अनेक समस्यांना तोंड देत आहे. मला आणि माझ्या कुटुंबाला सुखाचा एखादा क्षण एकही दिवस मिळालेला नाही. मी अभ्यासात हुशार होते. पाचवीच्या परीक्षेत माझ्या केंद्रात मी पहिली आले. मला डॉक्टर व्हायचे आहे. पण नंतर कधीच मला पहिला नंबर मिळाला नाही. नेहमी दुसरा किंवा तिसरा नंबरच आला. बी.ए.च्या परीक्षेत मला फक्त ५०टक्के मार्क मिळाले. मला मेडिकलला जाता आले नाही, कारण मी नेहमी मानसिक तणावात असे. गेली चौदा वर्षे मी सतत या तणावातच आहे –'

अशी बरीच पत्रे असायची. राष्ट्रपतींच्या ऑफिसमधून नक्की मदत मिळेल, ही त्यांना वाटणारी श्रद्धा मनाला स्पर्शून जात असे; तसाच त्यांच्या लिहिण्यातला सरळ-साधेपणा आणि प्रामाणिकपणाही.

ह्याच्या विरोधाभासात वेगवेगळी मंडळे, संस्था ह्यांची पत्रे असत. ''प्रिय राष्ट्रपती कलाम, आम्ही प्रगत नॅनोटेक्नॉलॉजीवर परिषद घेत आहोत... (किंवा आणखी इतर विशेष प्रावीण्याचे विषय – उदाहरणार्थ : बायोडायव्हर्सिटी, कार्बन काम्पोझिट्स, रॉकेट प्रॉपल्शन टेक्नॉलॉजी, कार्डिओथोरॅसिक सर्जरी, संसर्गजन्य रोग, कोर्टातील खटल्यांचे निकाल लवकर लागण्याचे मार्ग किंवा ई-गव्हर्नन्स इत्यादी)... आणि प्रमुख वक्ते म्हणून भाषण देण्यास आपण यावे, अशी आमची इच्छा आहे.'' – अर्थातच अशा पत्रांना उत्तरे लिहिणे जास्त सोपे असे. फक्त तारीख सोइस्कर असण्याचा आणि मला त्या विषयात असलेल्या ज्ञानाचा प्रश्न असे. परंतु, ती जी लहान मुलगी आयुष्यात प्रगती करण्याची संधी शोधत होती, ती आणि अतिप्रगत तंत्रज्ञानातील विषयांवरच्या ह्या परिषदा ह्या आपल्या देशातील दोन बाजूंचा 'इंडिया २०२०'संदर्भात विचार करायला हवा होता.

मी पुढे काय करावे, हे मी स्वत:ला विचारत होतो. मी फक्त माझ्या आठवणी लिहाव्यात का, दुसरे काही तरी करावे; हे ठरवणे सोपे नव्हते. पण त्या दिवशीच्या एका महत्त्वाच्या कार्यक्रमामुळे माझे हे ठरवण्याचे काम जरा सोपे झाले. ते म्हणजे, देशाचा राष्ट्रपती म्हणून निरोप घेताना देण्याच्या भाषणाची तयारी.

मी असे ठरवले की, माझ्या भाषणात मी नागरिकांचे आभार मानावेत आणि भारताच्या प्रगतीसाठीच्या आराखड्याबद्दल त्यांच्याशीच बोलावे – जो आराखडा गेल्या पाच वर्षांत त्यांच्या संपर्कात राहून मी त्यांच्याचसाठी तयार केला होता.

थोडक्यात सांगायचे तर मी म्हणालो, ''माझ्या प्रिय देशबांधवांनो... जो देश भरभराटीला आलेला, निरोगी, सुरक्षित, शांततापूर्ण व सुखी असेल आणि जो सतत प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत राहील... जेथे ग्रामीण व शहरी भागातील दरी अगदी बारीक रेघेसारखी झालेली असेल आणि जेथे राज्यकारभार स्वच्छ, पारदर्शक, जनतेच्या

मागण्या पुऱ्या करणारा आणि लाचलुचपतमुक्त असेल... अशा आपल्या देशाचे उद्दिष्ट सफल करण्यासाठी काम करत राहण्याचा निश्चय आपण करु या.''

मी प्रगत भारतासाठी जो दहा मुद्द्यांचा आराखडा तयार केला होता व त्यात इतरही काही मुद्दे होते, ते मी ह्या पुस्तकात पुढे दिले आहेत.

तेव्हा, म्हणून माझ्या आयुष्याचे ध्येय हेच राहिले आहे –

प्रगतीच्या दहा मुद्द्यांमधून अनेक संस्कृती एकत्र नांदत असलेल्या अशा आपल्या समाजाच्या भारतातील एक अब्ज जनतेची हृदये व मने जोडू या आणि त्यांच्यामध्ये हा आत्मविश्वास रुजवू या की, 'होय, आम्ही हे करु शकतो.' माझ्या प्रिय देशबांधवांनो, २०२० येण्यापूर्वीच भारताला प्रगत देश करण्याच्या ह्या महान कार्यात मी नेहमीच तुमच्याबरोबर असेन.

ज्या काही प्रसंगांनी माझे क्षितिज उजळले, माझ्या ओठांवर स्मित आणले, मला काही धडे शिकवले आणि मला माझ्या देशबांधवांच्या प्रेमाने बद्ध केले... असे काही प्रसंग पुढे देत आहे.

२
अण्णा युनिव्हर्सिटीमधील नववे भाषण

'The ignited mind of the youth is
the most powerful resource
on the earth, above the earth
and under the earth'

'तरुणांचे प्रज्वलित झालेले मन,
हा सर्वांत शक्तिशाली स्त्रोत आहे –
पृथ्वीवर, पृथ्वीच्या वर अंतराळात
आणि पृथ्वीच्या आतही

जाभळाच्या झाडावर बसून एक पिवळा पक्षी गातो आणि माझे सकाळचे चालणे जास्त आनंदाचे करतो. माझ्या बागेत कधी-कधी डोकावणाऱ्या हॉर्नबिल पक्ष्यांची जोडी कुठे दिसते आहे का, म्हणून मी लक्ष ठेवून आहे. राष्ट्रपती भवनानंतर '१०, राजाजी मार्ग' हे माझे निवासस्थान आहे. मला सांगण्यात आले की, 'नवी दिल्ली'चे रचनाकार एडविन ल्युटेन्स हे एके काळी येथे राहत असत.

भारतात आणि परदेशात शिकवण्याचं, तसंच संशोधनाचे काम करण्यात मी स्वत:ला व्यग्र ठेवतो; तेव्हा वेळ वाऱ्यासारखा भुर्रकन उडून जातो. वर्गांमध्ये दिसणाऱ्या तरुण चेहऱ्यांवरचा उत्साह आणि ठाम निश्चय बघून मलाही जोममिळतो.

विकसित-प्रगत भारत घडविण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी शक्य आहे, ते सर्व योगदान देण्याची लोकांची असलेली दृढ इच्छा मला गेल्या काही वर्षांमध्ये दिसून आली आहे. माझे राष्ट्रपतिपदावरचे दिवस मी आठवतो, तेव्हा काही महत्त्वाच्या घटना माझ्या मनात उमटतात. त्या घटना ह्या विविधतेने भरलेल्या, वैभवशाली भूतकाळ आणि आव्हानात्मक वर्तमानकाळ असलेल्या देशाच्या भिन्न-भिन्न वैशिष्ट्यांच्या प्रातिनिधिक आहेत. परंतु त्यातून एक संदेश निश्चित आहे – २०२०पर्यंत भारत नक्कीच एक प्रगत राष्ट्र होईल.

अण्णा युनिव्हर्सिटीत मी डिसेंबर २००१पासून कार्यरत होतो. त्या सुंदर परिसरातली १० जून २००२ची सकाळ इतर सगळ्या दिवसांसारखीच होती. त्या विस्तीर्ण-शांत आवारामध्ये प्रोफेसरांबरोबर आणि जिज्ञासू विद्यार्थ्यांबरोबर संशोधन-प्रकल्पांवर व शिकवण्याच्या कामात माझे दिवस मजेत जात होते. माझ्या वर्गाची अधिकृत क्षमता साठ विद्यार्थ्यांची होती, पण शिकवण्याच्या प्रत्येक तासाला वर्गाच्या त्या खोलीत तीनशे-पन्नासहून जास्त विद्यार्थी जमत आणि ती संख्या कमी करण्याचा कोणताही उपाय नव्हता.

तरुणांच्या आकांक्षा समजून घेण्याचा, राष्ट्रीय लक्ष्य असलेल्या बऱ्याच कामांमधले माझे विशेष अनुभव त्यांना सांगणे, हाही हेतू होता आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी तंत्रज्ञान वापरुन पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नवे, वेगळे, नव्या पद्धतीचे दहा लेक्चर्सचे अभ्यासक्रम कसे सुरु करावेत, त्याचाही विचार करायचा होता.

राष्ट्रीय लक्ष्य असलेली बरीच विशेष कामे म्हणजे कोणती? SLV- 3 हा अवकाशयान प्रक्षेपक, IGMDP (इंटिग्रेटेड गाइडेड मिसाइल डेव्हलपमेंट प्रोग्राम), १९९८च्या अणुचाचण्या, इंडिया २०२०'चा TIFAC (टेक्नॉलॉजी इन्फर्मेशन, फोरकास्टिंग अॅन्ड अॅसेसमेंट कौन्सिल)ने तयार केलेला अहवाल, ह्या कामांकडे मी निर्देश करीत आहे. ह्या सर्वांचा देशाच्या ह्या विषयांमधील प्रगतीवर आणि पुढील प्रगतीचे ध्येय ठरवण्यासाठी खूपच उपयोग झाला होता. एसएलव्ही-३ कार्यक्रमाचाहेतू ४० किलो वजनाचा रोहिणी उपग्रह आपल्याच ज्ञानच्या आधारावर पृथ्वीच्याजवळच्या कक्षेत सोडण्याचा होता. रोहिणीचा हेतू 'आयनीभवना'ची (अणूतील इलेक्ट्रॉन वा प्रोटॉनची संख्या कमी-जास्त होणे.) मोजणी करण्याचा होता. (आयन = विद्युतभारित कण) आय.जी.एम.डी.पी.चा हेतू राष्ट्रीय संरक्षणाचे डावपेच व व्यूहरचनेच्या दृष्टीने एकात-एक अशा अनेक क्षेपणास्त्रे असलेल्या पद्धतीची गरज पूर्ण करणे, हा होता. 'अग्नी ५' हे क्षेपणास्त्र ही त्यातली अगदी अलीकडची यशस्वी कामगिरी. अणुचाचण्या ११ व १३ मे, १९९८ला करण्यात आल्या आणि त्यामुळे भारत हा अण्वस्त्रसंपन्न देश झाला. टी.आय.एफ.ए.सी.मुळे भारताला २०२०पर्यंत आर्थिकदृष्ट्या प्रगत होऊ शकण्याची योजना तयार करता आली.

हे माझे नववे भाषण होते. विषय होता – 'व्हिजन टू मिशन' आणि त्यात अनेक प्रत्यक्ष अनुभवांबद्दल, कार्याभ्यासाबद्दल बोलायचे होते. माझे भाषण संपल्यावर बऱ्याच प्रश्नांना मला उत्तरे द्यावी लागली आणि माझा एक तासाचा वर्ग दोन तास चालला. त्यानंतर मी माझ्या ऑफिसमध्ये परत आलो आणि माझ्या नेहमीच्या प्रघाताप्रमाणे काही संशोधक विद्यार्थ्यांबरोबर दुपारचे जेवण झाले. प्रसंगम ह्याआमच्या स्वयंपाक्याने आम्हाला छान चविष्ट जेवण हसतमुखाने वाढले. जेवणानंतर मी माझ्या पुढच्या अध्यापन-तासाची तयारी केली आणि संध्याकाळी माझ्या खोलीवरपरतलो.

मी चालत-चालत खोलीवर जात असताना अण्णा युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु प्रो. ए. कलानिधी वाटेत भेटले. ते म्हणाले की, 'दिवसभरात माझ्या ऑफिसमध्ये माझ्यासाठी बरेच फोन आले होते, कोणाला तरी तातडीने माझ्याशी बोलायचे होते.' मी खोलीवर पोहोचलो, तर टेलिफोन वाजतच होता. मी फोन घेतला, तेव्हा कोणी तरी दुसरीकडून म्हणाले, "पंतप्रधानांना आपल्याशी बोलायचे आहे." त्यांनी माझा फोन पंतप्रधानांना जोडून देईपर्यंत माझ्या मोबाइलवर आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडूंचा फोन आला. त्यांनी सांगितले, "पंतप्रधान तुम्हाला एका महत्त्वाच्या कामासाठी फोन करतील." मग ते पुढे म्हणाले, "कृपया, नाही म्हणू नका."

मी नायडूंशी बोलत असताना अटलबिहारी वाजपेयींचा फोन जोडला गेला. त्यांनी

विचारले, ‘‘कलाम, कसे चालले आहे तुमचे शिक्षणक्षेत्रात?’’

‘‘फारच उत्तम!’’ मी सांगितले.

वाजपेयी पुढे म्हणाले, ‘‘तुम्हाला एक खूप महत्त्वाची बातमी मी सांगणार आहे. मी आत्ताच आमच्या आघाडीमधील सर्व पक्षांचे पुढारी उपस्थित असलेल्या अशा विशेष बैठकीहून परत आलो. आम्ही एकमताने ठरवले आहे की, आपल्या देशाला राष्ट्रपती म्हणून तुमची जरुरी आहे. आज रात्री मला ही बातमी जाहीर करायची आहे. तुम्ही होकार द्यावा, अशी माझी इच्छा आहे. मला फक्त ‘हो’ हेच उत्तर हवे आहे, ‘नाही’ असे नको.’’ हे नमूद करतो की, वाजपेयी त्या वेळी जवळजवळ चोवीस पक्षांच्या बनलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ)चे प्रमुख नेते होते आणि ह्या सर्वांमध्ये एकमत होणे, फारसे सोपे नसते.

हे सर्व बोलणे चालू असताना मला खोलीत आल्यावर खाली बसायलाही वेळ मिळाला नव्हता! भविष्यकाळाच्या विविध प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. एकात माझ्याभोवती विद्यार्थी व शिक्षक ह्यांचा सदैव घोळका होता. दुसऱ्यामध्ये मी राष्ट्राच्या प्रगतीच्या माझ्या मनातील कल्पनेविषयी संसदेमध्ये बोलत होतो. निर्णयाबद्दल माझ्या मनात घालमेल चालू होती. मी म्हणालो, ‘‘वाजपेयीजी, (मी त्यांना नेहमी असेच संबोधित असे.) आपण मला निर्णय घ्यायला दोन तासांचा अवधी देऊ शकाल? शिवाय हेही आवश्यक आहे की, मी राष्ट्रपतिपदाचा उमेदवार म्हणून जाहीर करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांमध्ये एकमत हवे.’’

वाजपेयी म्हणाले, ‘‘तुम्ही होकार दिल्यावर आम्ही एकमत करण्याच्या दृष्टीने पावले उचलू.’’

पुढील दोन तासांत मी माझ्या जवळच्या साधारण तीस मित्रांना फोन केले असतील. ज्यांना फोन केले; त्यांत शिक्षणक्षेत्रातील मंडळी, नागरी सेवेतील आणि राजकारणातलेही माझे स्नेही होते. एक मत असे पुढे आले की, शिक्षणक्षेत्रात मी आनंद उपभोगत होतो; ते क्षेत्र माझ्या अतिशय आवडीचे आहे आणि म्हणून मी ते सोडून जाऊ नये. दुसरे मत असे होते की, ‘इंडिया २०२०’चे माझे स्वप्न देशापुढे आणि संसदेपुढे ठेवण्याची ही संधी होती आणि मी ती घ्यावीच घ्यावी. बरोबर दोन तासांनी मी पंतप्रधानांशी बोलण्यासाठी फोन केला. मी सांगितले, ‘‘वाजपेयीजी, मी हे काम अत्यंत महत्त्वाचे समजतो आणि मला सर्व पक्षांचा उमेदवार असण्यास आवडेल.’’

ते म्हणाले, ‘‘होय, आम्ही त्यासाठी प्रयत्न करुच. धन्यवाद!’’

बातमी खूपच झपाट्याने पसरली. राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार म्हणून माझी निवड झाली असल्याची बातमी पंधरा मिनिटांतच देशात सर्वत्र पसरली. मग लगेचच माझ्यावर टेलिफोन कॉल्सचा इतका वर्षाव सुरु झाला की, सर्व फोन घेणे अशक्य झाले. माझ्या

सुरक्षेत वाढ करण्यात आली आणि कित्येक लोक मला भेटायला माझ्या खोलीत जमले.

त्याच दिवशी विरोधी पक्षनेत्या सोनिया गांधी ह्यांच्याशी उमेदवाराच्या निवडीविषयी वाजपेयी बोलले. सोनिया गांधींनी जेव्हा विचारले की, रालोआचा निर्णय अंतिम आहे का? तेव्हा वाजपेयींनी होकारार्थी उत्तर दिले. नंतर त्यांच्या पक्षातील व रालोआच्या इतर पक्षांच्या नेत्यांशी बोलून दि. १७ जून, २००२ला सोनिया गांधींनी माझ्या उमेदवारीला 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चा पाठिंबा जाहीर केला. मला डाव्या पक्षांचाही पाठिंबा मिळाला असता, तर फार आवडले असते, परंतु त्यांनी त्यांचा उमेदवार उभा करण्याचे ठरवले. मी राष्ट्रपतिपदासाठी होकार दिल्याबरोबर माझ्याबद्दल माहिती देणारे कित्येक लेख छापून येऊ लागले. प्रसारमाध्यमांनी अनेक प्रश्नही उभे केले. त्यांना मुख्यत: असे विचारायचे होते की, बिगर राजकारणी आणि त्यातही पुन्हा शास्त्रज्ञ असलेली व्यक्ती देशाचा राष्ट्रपती कशी होऊ शकते?

राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार म्हणून १८ जूनला नाव दाखल केल्यावर झालेल्या माझ्या पहिल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी बरेच प्रश्न गुजरातप्रकरणासंबंधी विचारले (त्या प्रांतात मोठ्या प्रमाणात दंगे झाले होते आणि ते ज्या तऱ्हेने हाताळले गेले, ह्याबद्दल लोकांमध्ये काळजी, अस्वस्थता होती.) तसेच अयोध्या प्रश्नासंबंधी, (रामजन्मभूमीचा वाद नेहमीच बातम्यांमध्ये असे.), अणुचाचणीसंबंधी आणि मग राष्ट्रपती भवनातील माझ्या भावी योजनांसंबंधी. मी म्हटले की, भारताला अशा सुशिक्षित राजकारणी लोकांची जरुर आहे, जे सर्वांबद्दल सहानुभूती ह्या विचाराला मुख्य प्राधान्य देऊनच निर्णय घेतील. अयोध्या प्रश्नाबद्दल मी सांगितले की, शिक्षण, आर्थिक प्रगती आणि माणसांना एकमेकांबद्दल आदर असणे अत्यंत जरुरीचे आहे. सर्वांची आर्थिक प्रगती झाली की, सामाजिक भेदभावही आपोआप कमी होतील. मी हेही ठामपणे सांगितले की, राष्ट्रपती भवनातील भपका व वैभव ह्यामध्येही मी माझा नेहमीचा साधेपणा जपेन. राष्ट्रपती म्हणून कुठल्याही गुंतागुंतीच्या प्रश्नावर निर्णय घेताना मी राज्यघटनेसंबंधीच्या अग्रगण्य तज्ज्ञांचा सल्ला घेईन. राष्ट्रपती शासन लागू करण्यासारख्या निर्णयात काही मोजक्या लोकांना काय हवे आहे, यापेक्षा तेथील लोकांना तेव्हा गरज कशाची आहे, ह्याचा विचार केला जाईल.

मी चेन्नईहून दिल्लीच्या एशियाड व्हिलेजमधील माझ्या फ्लॅटमध्ये १० जुलैला आलो, तेव्हा तयारी जोरात सुरु होती. भारतीय जनता पक्षाचे प्रमोद महाजन हे माझे निवडणूक प्रतिनिधी होते. माझ्या फ्लॅटमध्ये मी तात्पुरते कार्यालय थाटले. फ्लॅट मोठा नव्हता, पण त्यात सामानाची इकडे-तिकडे व्यवस्था करुन वावरण्याजोगा होता. मी एक 'व्हिजिटर्स रुम' तयार केली, कॉन्फरन्स हॉल वापरण्यासारखा केला आणि नंतर एक इलेक्ट्रॉनिक सुविधांचे ऑफिसही तयार करण्यात आले. त्यानंतर सर्व माहिती इलेक्ट्रॉनिकपद्धतीने देण्यात येऊ लागली. लोकसभेतील व राज्यसभेतील सदस्यांसाठी एक पत्र तयार करण्यात आले, ज्यात राष्ट्रपती म्हणून माझा दृष्टिकोन काय असेल ते नमूद केले व मला मत देण्याची

विनंती करण्यात आली. अशा पत्रांची संख्या सुमारे आठशे होती. प्रत्येक प्रांतातील मतदारसंघातील मतदारांना व्यक्तिश: भेटण्यापेक्षा अशी पत्रे पाठवावीत, ही सूचना महाजनांची होती. मी निवडणुकीत भरघोस मतांच्या फरकाने निवडून आल्याचे १८ जुलैला जाहीर करण्यात आले.

भेटू इच्छिणाऱ्यांसाठी भेटीच्या वेळा ठरवल्या गेल्या. अशा लोकांची दिवसभर रांग लागलेली होती. त्याखेरीज प्रसारमाध्यमांना मुलाखती घ्यायच्या होत्या आणि शिवाय माझा स्वत:चा पत्रव्यवहार व प्रवासही होताच. मला लहान मुलांशी संवाद साधायला खूप आवडत असे आणि जेव्हा वेळ असेल तेव्हा मी वेगवेगळ्या विषयांवरील त्यांच्या प्रतिक्रिया ऐकून घेत असे. एशियाड व्हिलेजमधील फ्लॅट नं. ८३३ जणू सदैव कार्यरत असलेल्या मधमाश्यांचे पोळेच बनला! दि. २५ जुलैच्या शपथग्रहण समारंभासाठी निमंत्रितांची यादी तयार करणे, हे एक जिकिरीचे काम होतेच. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये फक्त एक हजार लोक बसू शकतात. संसदेचे सदस्य, दोन्ही सभागृहांतील अधिकारी, गृह व इतर मंत्रालयांमधील वरिष्ठ अधिकारी, निवृत्त होणार असलेले राष्ट्रपती के. आर. नारायणन ह्यांचे निमंत्रित पाहुणे – हे सर्व झाल्यावर फक्त शंभर निमंत्रितांसाठी जागा उरणार होती. ती वाढवून आम्ही सुमारे दीडशे केली. मग ह्या दीडशेमध्ये कोणाकोणाला बोलावता येईल, हा मोठाच प्रश्न उभा राहिला. कुटुंबातल्या लोकांची संख्याच सदतीस झाली. त्याखेरीज माझे भौतिक शास्त्राचे माजी शिक्षक प्रो. चिन्नादुराई होते, 'मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'चे प्रो. के. व्ही. पंडलाई, रामेश्वरम मंदिराचे मुख्य पुरोहित पाक्षी वेंकटसुब्रम्हण्यम शास्त्रीगळ, रामेश्वरम मशिदीचे इमाम नुरुल खुदा, रामेश्वरम चर्चचे धर्मगुरु रेव्हरंड ए. जी. लिओनार्ड आणि ज्यांनी अरविंद आय इन्स्टिट्यूट सुरु केली, ते सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. जी. वेंकटस्वामी हे सर्व होते. पाहुण्यांमध्ये सुप्रसिद्ध नर्तिका सोनल मानसिंग होत्या; तसेच उद्योगपती, पत्रकार आणि माझे वैयक्तिक स्नेहीही होते. विशेष म्हणजे, निमंत्रितांच्या यादीत देशाच्या प्रत्येक प्रांतातून निवडलेली शंभर लहान मुले होती, ज्यांच्यासाठी बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती आणि एका वयाने मोठ्या जबाबदार व्यक्तीला त्यांच्याकडे लक्ष देण्यास नेमले होते. तो दिवस कडक उन्हाचा असूनही सर्व जण खास पोशाखात ह्या समारंभासाठी ऐतिहासिक सेंट्रल हॉलमध्ये उपस्थित होते.

माझ्या देशातील साध्यासुध्या लोकांच्या निष्पाप वागण्यात जी जन्मजात बुद्धिमत्ता वा उमज आहे, त्याने मला नेहमी विश्वास वाटतो की, माझा देश जगाला शांततेच्या आणि भरभराटीच्या मार्गावर घेऊन जाईल.

३
माझ्या आयुष्यात बदल घडविणारे सात महत्त्वाचे टप्पे

'You become the captain of the problems, Defeat the problem and succeed.'

'समस्यांविरुद्धच्या लढाईत नेते व्हा; समस्यांवर कुरघोडी करा, त्यांचा पराभव करा आणि यशस्वी व्हा.'

मला शिकवायला आणि संशोधन करायला फार आवडते, हे वारंवार सांगताना मी थकत नाही. माझ्या विचारांमध्ये, नवे प्रयोग करुन बघण्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील 'काम' हाच केंद्रबिंदू असतो. तरुणांना आणि त्यांच्या शिक्षकांना भेटून परस्परसंवाद साधणे, हे माझ्या अंतरात्म्याचे खाद्य आहे. म्हणून पूर्ण विचारांती मी शैक्षणिक आणि संशोधनकक्षेत्रात परत जायचे ठरवले.

मी पूर्णतया शैक्षणिक क्षेत्रात गुंतायचे ठरवले होते, तरी अचानकपणे ज्याघडामोडीघडत गेल्या, त्यामुळे मला राष्ट्रपतिपद कसे स्वीकारावे लागले, हे मी मागील प्रकरणातसांगितले आहेच. ह्या सर्वांमुळे मला त्या सहा प्रसंगांची आठवण होते, ज्यांनी माझ्या आयुष्याचीदिशा बदलली. ह्यामध्येच माझी राष्ट्रपतिपदाची मुदत संपल्यावर देशातल्याआणि परदेशातल्या शैक्षणिक क्षेत्रात माझा पुन्हा एकदा प्रवेश करण्याचा अलीकडचा प्रसंगही घालता येईल.

माझ्या आयुष्यातला पहिला बदल १९६१मध्ये झाला. मला अजून आठवते की, एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट (ए.डी.ई.) मध्ये वरिष्ठ शास्त्रीय सहायक म्हणून काम करत असताना मी एका हॉवरक्राफ्टचा मुख्य रचनाकार होतो. 'नन्दी' नावाचे हॉवरक्राफ्ट तयार झाले होते, आणि येणाऱ्या बऱ्याच पाहुण्यांना आम्ही त्याच्या उड्डाणाची प्रात्यक्षिके दाखवत होतो. ही प्रात्यक्षिके लोकप्रिय झाली होती. एक दिवस ए.डी.ई.चे संचालक गोपिनाथ मेडिरट्टा एका पाहुण्याला घेऊन आले. उंच, देखण्या आणि दाढी ठेवलेल्या त्या पाहुण्याने हॉवरक्राफ्टच्या यंत्राबद्दल मला बरेच प्रश्न विचारले. त्यांची स्वच्छ समजून घेऊ शकणारी विचारशक्ती माझ्या विशेष लक्षात आली. "ह्या हॉवरक्राफ्टमधून तुम्ही मला फेरी मारुन आणू शकाल का?" त्यांनी विचारले.

आम्ही हॉवरक्राफ्टमधून दहा मिनिटे फिरुन आलो. त्याच्या 'हॉवर' ह्या नावानुसार ते जमिनीपासून काही सेंटिमीटर उंचीवरुन घिरट्या घालत होते. मलाच ते चालवताना बघून पाहुण्यांना आश्चर्य वाटलेले दिसले. त्यांनी माझी थोडी माहिती विचारली. फेरी

मारुन आणल्याबद्दल माझे आभार मानले आणि ते गेले; पण जाण्यापूर्वी त्यांनी स्वत:ची ओळख करुन दिली. ते 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे संचालक प्रो. एम. जी. के. मेनन होते. एक आठवड्यानंतर मला इंडियन कमिटी फॉर स्पेस रिसर्च (आय.सी.एस.आर. – ज्याचे पुढे इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन – 'इस्त्रो' असे नामकरण झाले.) कडून रॉकेट इंजिनीअरच्या जागेसाठी मुलाखत द्यायला बोलावण्यात आले.

मी मुलाखत देण्यास मुंबईला गेलो, तेव्हा तेथे प्रो. मेनन व अणुशक्ती आयोगाचे उपसचिव सराफ ह्यांच्याबरोबर मुलाखत घेणाऱ्यांमध्ये आय. सी. एस. आर.चे अध्यक्ष स्वत: प्रो. विक्रम साराभाईंना बघून मला आश्चर्य वाटले. प्रो. साराभाईंची स्नेहपूर्ण वागणूक माझ्या मनाला स्पर्शून गेली. मला तेव्हा किती ज्ञान होते किंवा कशात कौशल्य होते, ह्याबद्दल त्यांनी प्रश्न विचारले नाहीत. त्यांचे प्रश्न माझ्यामधील ज्ञान व कौशल्याच्या शक्यता शोधून काढण्याचा प्रयत्न करणारे होते. एका मोठ्या कामाच्या संबंधात मी काय करु शकेन, ह्याचा विचार जणू ते करत होते. तो संपूर्ण प्रसंग हा माझ्यासाठी एक सत्याचा क्षण होता, ज्यामध्ये एका खूप मोठ्या व्यक्तीच्या, खूप मोठ्या स्वप्नात, माझे स्वप्न सामावलेले होते.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी माझी निवड झाली, असल्याचे मला सांगण्यात आले. सन १९६२मध्ये नव्याने साकार करण्यात आलेल्या इस्त्रोमध्ये 'रॉकेट इंजिनीअर' म्हणून माझी नेमणूक करण्यात आली होती. ह्याच ठिकाणी नंतर माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठी घटना घडली – प्रो. सतीश धवन ह्यांनी भारताचा पहिला उपग्रह अंतराळात पाठवण्यासाठीचा प्रक्षेपक बनवण्याच्या प्रकल्पाचा संचालक म्हणून मला नेमले.

दुसरा मोठा बदल १९८२मध्ये भारताच्या क्षेपणास्त्र प्रकल्पात माझ्या प्रवेशाने झाला. तत्पूर्वी, मसुरी येथे 'डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ वर्क स्टडी'मध्ये (डी. आय. डब्ल्यू. एस. – आता 'इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट') मी डॉ. राजा रामण्णांना भेटलो होतो. ही संस्था संरक्षणदलांच्या अधिकाऱ्यांना संरक्षणप्रणालींचे व्यवस्थापन शिकवते. संरक्षणप्रणाली व्यवस्थापनाचे क्षेत्र खूपच व्यापक असून त्यासाठी विशेष कौशल्य आवश्यक असते. मी पूर्वी 'SLV-3'चा प्रकल्प संचालक होतो, म्हणून मला डी. आय. डब्ल्यू. एस.मध्ये बरीच लेक्चर्स देण्यास सांगण्यात आले. भारताचा पहिला 'रोहिणी' हा उपग्रह प्रक्षेपकाने अंतराळातील ठरवलेल्या कक्षेत कसा सोडला, ते मी स्लाइड्सच्या मदतीने समजावून सांगितले. भारताची पहिली अणुचाचणी १९७४मध्ये करण्यात कसे यश मिळवले, ह्या विषयावर डॉ. रामण्णांनी भाषण दिले.

आमच्या लेक्चर्सनंतर आम्ही दोघे डेहराडूनला गेलो. तिथे आणखी काही शास्त्रज्ञांबरोबर चहापान झाले. आम्ही डेहराडूनमध्ये असताना डॉ. रामण्णांनी मला हैदराबादच्या 'डिफेन्स रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी'च्या (डी.आर.डी.एल.) संचालकपदाची ऑफर दिली. क्षेपणास्त्रांची कार्यपद्धती विकसित करण्यासाठीची ही मुख्य

प्रयोगशाळा आहे व ती 'डिफेन्स रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन' (डी.आर.डी.ओ.) ह्या संस्थेच्या अंतर्गत कार्यरत आहे. त्यांनी देऊ केलेले पद मी ताबडतोब स्वीकारले, कारण मला क्षेपणास्त्र तंत्रज्ञानामध्ये अवकाशकीय अग्निबाण तंत्रज्ञानाचा उपयोग करावा, असे नेहमी वाटत असे. परंतु, माझ्यासाठी इस्त्रोचे अध्यक्ष व माझे वरिष्ठ प्रो. धवन ह्यांचा होकार मिळवणे, हे दुसरं अवघड काम होते.

बरेच महिने गेले, इस्त्रो आणि डी.आर.डी.ओ. संस्थांमध्ये बराच पत्रव्यवहार झाला आणि संरक्षण संस्था सचिव व अवकाश विभाग ह्यांच्यामध्ये दोघांनाही सोईचा मार्ग काढण्यासाठी बऱ्याच बैठका झाल्या. संरक्षणमंत्री आर. वेंकटरामन ह्यांचे शास्त्रीय विषयांचे सल्लागार डॉ. व्ही. एस. अरुणाचलम ह्यांनी मग संरक्षणमंत्री व प्रो. धवन हांच्यामध्ये चर्चा घडवून आणली. ह्या चर्चेनंतर झालेल्या निर्णयाप्रमाणे फेब्रुवारी, १९८२मध्ये डी.आर.डी.एल. चा संचालक म्हणून माझी नेमणूक झाली.

जुलै, १९९२मध्ये डॉ. अरुणाचलमकडून मी संरक्षणमंत्र्यांचा शास्त्रीय विषयांचा सल्लागार आणि 'डिपार्टमेंट ऑफ डिफेन्स रिसर्च अॅन्ड डेव्हलमेंटचा सचिव म्हणून कार्यभार स्वीकारला. माझ्या आयुष्यातला हा तिसरा मोठा बदल होता. तामिळनाडूचे तत्कालीन राज्यपाल डॉ. चेन्ना रेड्डी ह्यांनी मला मद्रास युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु पद स्वीकारावे, असे आमंत्रण १९९३मध्ये दिले. माझ्या ह्या नेमणुकीला मान्यता द्यावी, अशी मी केंद्र सरकारला विनंती केली. माझा असा विचार होताच की, वयाची बासष्ट वर्षे पूर्ण झाल्यावर शिक्षणक्षेत्रात परत जावे. परंतु पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव – जे संरक्षणमंत्रीही होते – यांनी स्पष्टपणे सांगितले की, बऱ्याच राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमांवर मी काम करत असल्याने शास्त्रीय विषयांवरील सल्लागार म्हणून राहिलेच पाहिजे. येथे मला नमूद करावेसे वाटते की, मी नरसिंह राव ह्यांच्याबरोबर बरीच वर्षे काम केले आणि माझ्या असे लक्षात आले की, संरक्षण प्रश्नांविषयी त्यांना खूपच चांगली जाण होती – विशेषत: संरक्षण-सामर्थ्यात स्वयंपूर्ण होण्याबद्दल. संरक्षणाबाबतीत दीर्घकालीन दृष्टीने मजबूत व्यवस्था वा प्रणाली तयार करण्याचे त्यांचे बेत होते. अशा तऱ्हेने मी जवळजवळ सत्तर वर्षांचा होईपर्यंत संरक्षणमंत्र्यांचा शास्त्रीय विषयांवरील सल्लागार म्हणून काम करत राहिलो.

चौथा बदल होता १९९८मधील अणुचाचण्या. ह्या चाचण्यांपूर्वीची हकिगत सांगण्यासारखी आहे. त्यासाठी १९९६च्या मे महिन्यापर्यंत मागे गेले पाहिजे. त्या वर्षी सार्वत्रिक निवडणुका झाल्या. निकाल जाहीर होण्याच्या थोडेच दिवस आधी मी नरिंसह राव यांना भेटलो होतो. ते मला म्हणाले, "कलाम, तुमचे सहकारी आणि तुम्ही अणुचाचण्यांसाठी तयार राहा. मी तिरुपतीला जात आहे. प्रत्यक्ष चाचण्या अमलात आणण्यासाठी माझ्या अधिकृत परवानगीची वाट पाहा. डी.आर.डी.ओ. आणि डी.ए.ई.तील सर्व जण या चाचण्या पार पाडण्याच्या तयारीत असले पाहिजेत."

त्यांची तिरुपतीला भेट ही अर्थातच निवडणुकांमध्ये चांगला निकाल मिळावा, म्हणून

परमेश्वराचे आशीर्वाद मागण्यासाठीच होती. परंतु १९९६चे निकाल त्यांच्या अपेक्षेपेक्षा खूपच वेगळे लागले. काँग्रेसच्या जागा एकदम कमी होऊन त्या फक्त १३६वर आल्या. वाजपेयींच्या नेतृत्वाखाली भाजप आणि त्यांची आघाडी – रालोआ सत्तेवर आली; परंतु केवळ दोन आठवड्यांसाठी आणि मग एच. डी. देवेगौडा ह्यांच्या नेतृत्वाखालील तिसरी आघाडी सत्तेवर आली. परंतु सत्तेवर होतेत्या दोन आठवड्यांत वाजपेयी सरकारने अणुचाचण्या पार पाडण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

रात्रीचे नऊ वाजले होते. 'सात, रेसकोर्स रोड'वरुन मला फोन आला की, "नवे पंतप्रधान व सत्ता सोडत असलेले नरसिंह राव ह्यांना ताबडतोब भेटावे." रावनी मला सांगितले, "मी वाजपेयींना अण्वस्त्राच्या कार्यक्रमाची पूर्ण माहिती द्यावी, म्हणजे नव्या सरकारला हे महत्त्वाचे काम सुरळीत पार पाडता येईल."

सुमारे दोन वर्षांनंतर वाजपेयी पुन्हा पंतप्रधान झाले. दि. १५ मार्च, १९९८ला मध्यरात्रीच्या सुमारास मला वाजपेयींचा फोन आला. ते म्हणाले की, ते मंत्रिमंडळाची यादी तयार करत होते आणि मला मंत्रिमंडळात घेण्याची त्यांची इच्छा होती. मी म्हटले की, त्यांनी मला विचार करायला थोडा वेळ द्यावा. तेव्हा 'मी सकाळी नऊ वाजता त्यांना भेटावे', असे त्यांनी सांगितले. म्हणून मग मध्यरात्री मी माझ्या थोड्या मित्रांना बोलावून घेतले आणि मी मंत्रिमंडळात सामील व्हावे का नाही, ह्याबद्दल आम्ही पहाटे तीन वाजेपर्यंत चर्चा केली. बहुतेकांचे मत असे होते की, मी राष्ट्रीय महत्त्वाच्या अशा दोन कामांमध्ये पूर्णपणे गुंतलेलो होतो, ह्या कामांमध्ये बरीच प्रगती झालेली होती आणि चांगले निकाल अपेक्षित होते; तेव्हा ते सोडून मी राजकारणाच्या क्षेत्रात पडू नये.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी पंतप्रधानांचे निवासस्थान '७ सफदरजंग रोड'ला गेलो. ते त्यांच्या बैठकीच्या खोलीत मला भेटले आणि प्रथम त्यांनी घरी बनवलेली मिठाई मला दिली. मग मी त्यांना सांगितले, "मी आणि माझे सहकारी दोनमहत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये खूप व्यग्र आहोत. एक आहे 'अग्नी' क्षेपणास्त्र तयार करणे, आणि दुसरे आहे अण्वस्त्रांवरील काम पूर्ण करुन डी.ए.ई.च्या (डिपार्टमेंट ऑफ अॅटॉमिक एनर्जी) सहकार्याने मालिकारुप चाचण्या करणे. मला असे वाटते की, ह्या दोन कार्यक्रमांमध्येच मी पूर्णवेळ लक्ष घातले, तर देशासाठी माझ्या हातून जास्त चांगले काम पार पडेल. म्हणून कृपा करुन तेच काम चालू ठेवण्याची मला परवानगी द्या."

"मी तुमच्या भावनांचा आदर करतो. हरकत नाही, तेच काम करत राहा. देव तुमचे कल्याण करो!" वाजपेयी म्हणाले. त्यानंतर बऱ्याच घटना घडल्या. अग्नी क्षेपणास्त्र सोडण्याची तयारी झाली. पाच अण्वस्त्रांच्या चाचण्या लागोपाठ पार पडल्या आणि भारत एक 'अण्वस्त्र'संपन्न राष्ट्र झाले. मंत्रिमंडळात मंत्री होण्याचे नाकारल्यामुळे राष्ट्राला डोळे दिपवायला लावणाऱ्या अशा दोन महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये मला सहभागी होता आले.

पाचवा महत्त्वाचा बदल १९९९च्या अखेरीस झाला; जेव्हा माझी नेमणूक भारत

सरकारचा शास्त्रीय विषयांचा प्रमुख सल्लागार (पी.एस.ए.) म्हणून, कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देऊन करण्यात आली. माझ्या पथकामध्ये डॉ. वाय. एस. राजन हे इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञानक्षेत्रातील निष्णात आणि माझ्याबरोबर ज्यांनी टी.आय.एफ.ए.सी.मध्ये काम केले होते, असे डॉ. एम. एस. विजयराघवन; तसेच मी शास्त्रीय विषयातील सल्लागार होतो, तेव्हा माझे स्टाफ ऑफिसर आणि स्वीय सचिव असलेले एच. शेरिडन हे होते. मी हे काम सुरु केले, तेव्हा आम्हाला कार्यालयच नव्हते! पण डी.आर.डी.ओ.ला धन्यवाद दिले पाहिजेत की, त्यांनी आम्हाला ऑफिस बांधून दिले. त्यातही डी.आर.डी.ओ.च्या सिव्हिल वर्क्स अॅन्ड इस्टेट्सचे प्रमुख के. एन. राय. आणि डी.आर.डी.ओ.च्या रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंटचे मुख्य नियंत्रक मेजर जनरल स्वामिनाथन ह्या दोघांनी विशेष मेहनत घेतली. मला असे वाटले की, 'इंडिया-२०२०' ह्या कार्यक्रमाचा केंद्र सरकारने स्वीकार केला होता, तेव्हा शास्त्रीय विषयावरील प्रमुख सल्लागारांचे कार्यालय हे व्यासपीठ त्या कार्यक्रमातील अमलात आणता येतील, अशा तरतुदींना प्राधान्य मिळावे म्हणून त्यांचे काम हाती घ्यायला योग्य ठरेल. तो कार्यक्रम प्रथम देवगौडा सरकारसमोर ठेवण्यात आला होता, त्यानंतर इंद्रकुमार के. गुजराल हे पंतप्रधान झाले व नंतर १९९८मध्ये पुन्हा वाजपेयी आले. तीनही पंतप्रधानांनी त्या कार्यक्रमातील सूचना अमलात आणाव्यात म्हणून सरकारतर्फे पाठिंबा दिला होता. आमचे कार्यालय विज्ञान भवनला जोडून बांधलेल्या इमारतीत होते. ही एक मोठी इमारत आहे आणि वेगवेगळ्या चौकशी समित्यांची कार्यालये आणि काही सरकारी खाती तेथे आहेत. ही जागा शांत आहे. शेजारीच असलेले विज्ञान भवन अर्थातच मोठाल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांसाठी प्रसिद्ध असलेली जागा आहे. आमची जोडइमारत उपराष्ट्रपतींच्या निवासस्थानाच्या शेजारी आहे आणि साउथ व नॉर्थ ब्लॉकमधील धावपळीच्या, गडबडीच्या वातावरणापासून दूर, काम करायला चांगली अशी जागा आहे.

प्रवास हा माझ्या कामाच्या वेळेचा नेहमीप्रमाणे मोठा भाग असे. दि. ३० सप्टेंबर, २००१ला हेलिकॉप्टर अपघातून मी थोडक्यात बचावलो. झारखंडमधील बोकारो स्टील प्रकल्पाच्या जागेत हेलिकॉप्टर उतरतच होते, तेव्हा अपघात झाला. आम्ही वाचलो, हा चमत्कारच म्हणायचा! मी हेलिकॉप्टरमधून उडी मारुन बाहेर पडल्याबरोबर माझे पायलट आणि को-पायलट ह्यांच्याजवळ धावतच गेलो आणि त्यांना म्हणालो, "मला तुम्ही वाचवलेत, त्याबद्दल खूप धन्यवाद! देव तुमचं कल्याण करो!" दोघेही अगदी रडू फुटण्याच्या बेतात होते, पण मी त्यांना म्हटले, "अशा गोष्टी घडतात. काय झाले हे शोधून काढून तो दोष दुरुस्त करायचा, एवढंच आपण करु शकतो." त्या संध्याकाळी मला पाच काम करायची होती. बोकारो स्टील प्रकल्पाचे अधिकारी, इंजिनीअर्स आणि कर्मचारी; तसंच तेथील काही शाळांचे विद्यार्थी ह्या सगळ्यांसमोर मी भाषणे द्यायची होती. अपघाताची बातमी सगळीकडे त्वरित पसरली होती. देशातल्या दूरचित्रवाहिन्यांवरही येत होती. मी जेव्हा शाळेच्या मुलांना भेटलो, तेव्हा ती हादरलेली दिसली. मी त्या सगळ्यांशी हस्तांदोलन केले आणि 'धैर्य' ह्या विषयावरच एक गाणे त्यांना म्हणून दाखवले, मग त्यांच्या कळया खुलल्या. गाणे साधंच, कळकळीने धीर देणारं होते.

COURAGE
Courage to think different,
Courage to invent,
Courage to travel on an unexplored path,
Courage to discover the impossible,
Courage to combat the problems and succeed,
are the unique qualities of youth.
As a youth of my nation,
I will work and work with courage to achieve success in all the missions.

धैर्य
वेगळा विचार करण्याचं धैर्य,
नवा शोध लावण्याचं धैर्य,
कोणी गेले नसेल अशा मार्गानं,
जाण्याचं धैर्य,
अशक्य वाटणारं शोधून,
काढण्याचं धैर्य,
अडचणींचा सामना करुन,
यश मिळवण्याचं धैर्य....
हे तरुण पिढीमधले विशेष
गुण असतात,
माझ्या राष्ट्राचा एक तरुण म्हणून
मी काम करेन आणि धैर्याने काम करुन,
सर्व ध्येयांमध्ये यश मिळवेन

त्याच दिवशी विमान कोसळण्याचा एक अतिशय दु:खद अपघात झाला, ज्यात माधवराव शिंदे आणि त्यांचे सहकारी, विमानातील चालक व कर्मचारी आणि पत्रकार अशा सात जणांचा मृत्यू झाला. ह्या दोन्ही बातम्या रामेश्वरमला माझ्या कुटुंबीयांनी आणि देश-परदेशातल्या माझ्या स्नेह्यांनी ऐकल्या. मी ठीक तर आहे ना, ह्याची त्या सर्वांना खूपच काळजी वाटत होती. बातम्या ऐकून घाबरलेल्या माझ्या कुटुंबीयांची 'सगळं काही ठीक आहे' असे माझ्या भावाशी बोलून मला खातरी करुन द्यावी लागली.

त्या संध्याकाळी उशिराने दिल्लीला पोहोचलो, तर पंतप्रधानांच्या कार्यालयातून तातडीचा निरोप आलेला होता की, मी वाजपेयींना भेटावे. त्यांनी माझे स्वागत करुन अपघाताबद्दल चौकशी केली. मी अगदी ठीक असलेला बघून त्यांना आनंद झाला. मग त्यांनी सांगितले की, त्यांनी 'इंडिया २०२०'च्या कल्पनेच्या अहवालाबद्दल अग्रण्य उद्योगपती, मंत्रिमंडळाशी चर्चा केली होती आणि त्यावर पुढे कार्यवाही करण्याचे पार्लमेंटमध्ये जाहीरही केले होते. मी त्यांना सांगितले की, परंतु कार्यवाही करण्यात बरेच अडथळे आहेत. मी गेले काही दिवस त्याबद्दलच विचार करत होतो.

अपघाताचा परिणाम म्हणून दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. माझ्या मनात ज्या विचारांचे बीज पडून होते, त्याचे 'इग्नायटेड माइंड्स' ('Ignited Minds') हे पुस्तक लिहून तयार झाले. पुस्तकाचा उद्देश 'मी हे करु शकेन' अशी हिंमत बाळगण्याची स्फुर्ती तरुणांना देण्याचा होता. आणि दुसरी घटना – मी रांचीहून क्विलॉनपर्यंत प्रवास करुन माझ्या स्वत:च्या आध्यात्मिकतेत पुन्हा चैतन्य आणायला, अम्मांना – माता अमृतानंदमयींना – भेटायला जाणे. योगायोगाने 'इग्नायटेड माइंड्स' हे पुस्तक मी राष्ट्रपती होण्याच्या थोडे दिवस आधी प्रकाशित झाले होते. पुस्तकाचे शीर्षक हे प्रसारमाध्यमांचे आवडते शब्द झाले आणि मी राष्ट्रपती होणार असल्याच्या बातम्यांमध्ये बऱ्याच वेळा त्याचा उल्लेख होत राहिला. पुस्तकाला अभूतपूर्व यश मिळाले आणि अजूनही त्याचा खप कायमच होत असतो. अम्मा साधुवृत्तीच्या आहेत आणि समाजकल्याण – विशेषत: शिक्षण व आरोग्यसेवा ह्यांमध्ये; तसेच अनाथ मुले आणि बेघर लोक ह्यांना मदत करणे – अशा कामांमध्ये गढलेल्या असतात. मी भेटायला गेलो, तेव्हा माझ्याबरोबर दोन स्नेही होते. त्या दोघांना मी सांगितले की, मी शास्त्रीय प्रमुख सल्लागार (पी.एस.ए.) ह्या पदाचा राजीनामा देण्याचे ठरवून माझा राजीनामा पंतप्रधानांना पाठवून दिला होता. त्यानंतर निश्चिंत मनाने मी अम्मांना भेटलो. अम्मांशी मी माझ्या 'इंडिया २०२०' ह्या कल्पनेबद्दल आणि 'मूल्याधिष्ठित शिक्षणा'बद्दल बोललो.

हे सर्व नोव्हेंबर, २००१मध्ये घडले. तोपर्यंत मी पी.सी.ए. म्हणून दोन वर्षे काम केले होते. पंतप्रधान वाजपेयींना लिहिलेल्या पत्रात मी लिहिले होते की, 'मला शिक्षणक्षेत्रातील माझ्या कामासाठी परत जायची इच्छा आहे.' खरे कारण अर्थातच जास्त सखोल होते. मला असे वाटत होते की, प्रोव्हाइडीग अर्बन अॅमिनिटीज इन रुरल एरियाज' (PURA) – (ग्रामीण भागात शहरी सुविधा उपलब्ध करुन देणे.) ह्या कार्यक्रमाला आणि जे 'इंडिया २०२०'चे व्यवस्थापन मी सांभाळत होतो, त्याही कार्यक्रमाला आवश्यक ते प्राधान्य दिले जात नव्हते. अडचण कुठे येत होती? कुठलेही ध्येय किंवा हाती घेतलेले काम ठरलेल्या वेळात, पुरेशी आर्थिक मदत देऊन आणि हाती घेतलेली योजना म्हणून जबाबदारीने अमलात आणणे मला आवडते. सरकारी कामकाजाच्या एकूण पद्धतीत वर म्हटले आहे, तसे वातावरण मिळवणे अवघड होते; कारण येथे अनेक मंत्रालये व खाती ह्यांनी मिळून कुठलेही एक ध्येय वा काम पुरे करायचे असते आणि त्या प्रत्येक मंत्रालयाचे किंवा खात्याचे त्यांचे आपापले कार्यक्रम व ध्येये असतात. उदाहरणार्थ – शेतीच्या कामात जर आपण वर्षाला चार टक्क्यांनी उत्पादन वाढवायचे लक्ष्य ठेवले; तर त्याला पाणीपुरवठा, ऊर्जा, खते, रसायने, ग्रामीण विकास, पंचायतराज, रेल्वे इत्यादी सर्व मंत्रालयांची मदत व पाठिंबा लागतो आणि ह्या सर्वांचे व्यवस्थित आखलेले समान ध्येय नसते. दुसरे म्हणजे, पी.एस.ए.चे काम सर्वांना एकत्र आणणे व सल्ला देणे असे बराच मोठा आवाका असलेले आहे; परंतु प्रत्यक्ष अधिकार काही नाहीत, त्यामुळे कुठलेही काम पूर्ण करणे अवघड होते. या सर्व परिस्थितीमुळे मी अण्णा युनिव्हर्सिटीत सामाजिक परिवर्तनासाठी 'तंत्रज्ञान' ह्या विषयाचा प्रोफेसर होणे स्वीकारले. माझ्या आयुष्यातील हा सहावा बदल होता.

राष्ट्रपतिपदाच्या शेवटच्या तीन महिन्यांत दुसऱ्यांदा राष्ट्रपतिपदासाठी मी उमेदवार असेन का, असा प्रश्न विचारला जात होता. मी मनाशी ठामपणे ठरवले होते की, शिक्षणक्षेत्रात परत जायचे आणि 'इंडिया २०२०'च्या कल्पनेचा प्रसार करायचा. जुलैजवळ आल्यावर एकाएकी सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस पक्षाने काही उमेदवारांची नावे सुचवली. विरोधी पक्षाचे मत वेगळे होते. देशाच्या राजकरणात बऱ्याच घडामोडी चालू झाल्या होत्या. बऱ्याच वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी मला भेटून मी पुन्हा उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी, असे सुचवले. जनतेकडूनही बरीच विनंतीपत्रे आली. प्रसिद्ध व्यक्ती, देशातील तरुणवर्ग सर्वांनी प्रत्यक्ष भेटून किंवा ई-मेलने दुसऱ्यांदा हे पद स्वीकारावे, अशा विनंत्या केल्या. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख येण्यापूर्वी थोडेच दिवस आधी काही राजकीय नेते एकत्रितपणे मला भेटायला आले आणि म्हणाले की, मी निवडणुकीला उभे राहण्यास होकार दिला, तर ते सत्ताधारी पक्षांसकट सर्व पक्षांकडून पाठिंबा मिळवतील.

मी त्यांना सांगितले की, बहुसंख्य पक्षांचे एकमत असेल, तर मी ह्या शक्यतेचा विचार करेन. त्या नेत्यांनी परत येऊन सांगितले की, सत्ताधारी पक्षाची माझ्या उमेदवारीला संमती नाही. तरीही मी उभे राहावे; मी नक्की जिंकेन, असा ह्या नेत्यांचा विश्वास होता. मुळीच द्विधेत न पडता मी त्यांना सांगितले की, असे असेल तर मी निवडणुकीला उभा राहणार नाही. कारण मला वाटते की, राष्ट्रपती भवन पक्षांच्या राजकरणात ओढले जाऊ नये. त्यांना ते पटत नव्हते, पण त्यांनी माझे म्हणणे नाइलाजास्तव मान्य केले. प्रसारमाध्यमांना कळविण्यात आले की, मी राष्ट्रपतिपदाचा उमेदवार असणार नाही. मी विचारपूर्वक निर्णय घेतला की, मी शिक्षण व संशोधनक्षेत्रात परत जाईन आणि भारताला '२०२०पर्यंत' आर्थिक दृष्ट्या प्रगत राष्ट्र बनवण्यासाठी मनापासून आवडीने काम करत राहीन.

> माझा ठाम विश्वास आहे की, भ्याड लोक इतिहास घडवत नाहीत; धैर्यवान आणि शहाणे लोक इतिहास घडवतात. धैर्य हे उपजत असते, शहाणपण अनुभवाने येते.

४
सर्वांशी संवाद साधणारे राष्ट्रपती

'Empowerment comes from within
Nobody else can give it, except the Almighty.'

'क्षमता ही आतून येते;
परमेश्वर सोडून कोणीही ती देऊ शकत नाही.'

राष्ट्रपतिपद हे माझ्यासाठी एक आव्हान होते. 'इंडिया २०२०'ची सुरुवात करायला मला ते व्यासपीठ मिळाले. माझ्या मते, देशाचे सर्व नागरिक – त्यात निवडून आलेले पंचायतस्तरापासून ते संसदेपर्यंतचे सर्व जण, व्यवस्थापन क्षेत्रातील सर्व जण, सर्व विविध क्षेत्रांतील कलावंत, लेखक आणि विशेषत: देशाची तरुण पिढी या सर्वांचा समावेश आहे – ह्या सर्वांच्या सक्रिय सहभागानेच हे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल. ह्या विशेष ध्येयाचे महत्त्व इतरांना पटवून देण्यासाठी समोरासमोर चर्चा हाच उत्तम मार्ग आहे, कारण त्यामुळे त्या सर्वांचे विचार, दृष्टिकोन आणि मतेही लक्षात घेता येतील.

राष्ट्रपतिपदामुळे मला ही संधी मिळाली. देशासाठी प्रत्यक्षात उतरवले पाहिजे असे ध्येय-स्वप्न असण्याचे महत्त्व – विशेषत: तरुण पिढीशी आणि राजकीय नेत्यांशी, तसेच समाजाच्या सर्व क्षेत्रांमधील लोकांशीही – याबद्दल मला प्रत्यक्ष बोलता येत असे.

'राष्ट्रपती' म्हणून माझ्या भूमिकेला त्यामुळे अधिक अर्थ प्राप्त झाला. आपल्या देशाच्या राज्यघटनेनुसार राष्ट्रपतींनी सरकारने आणि विधिमंडळांनी केलेले प्रत्येक काम वा कृती भारताच्या राज्यघटनेला धरुन आहे ना, ह्याची खातरी करुन घ्यायची असते. सरकारने केलेली प्रत्येक कृती भारताच्या राष्ट्रपतींच्या नावाने –'In the name of the President of India.' – केलेली असते. संसदेने आणि सरकारने मंजूर केलेली विधेयके व काढलेले वटहुकूम राष्ट्रपतींकडे त्यांच्या संमतीसाठी येतात आणि ही विधेयके व वटहुकूम समाजाच्या व्यापक हितासाठी आहेत, ह्याची त्यांनी खातरी करुन घ्यायची असते. त्यांनी हेही बघायचे असते की, एखादे काम पक्षपाती झाले आहे, असे होऊ शकण्याचा पायंडा ह्यामुळे नंतर पडणार नाही ना? राष्ट्रपतिपदाची सध्या प्रस्थापित झालेली तत्त्वे आणि कार्यपद्धती ह्यांबद्दल मी विस्ताराने लिहिणार नाही; परंतु घटनेने, परंपरेने आणि प्रघाताने ठरवल्या गेलेल्या प्रणालींप्रमाणे केवळ सरकारचा 'नामधारी प्रमुख' असणे, ह्याखेरीज हे पद बरेच काही प्रदान करु शकते.

समाजातील विविध घटकांशी संवाद साधून, विकासाच्या आघाडीवर ध्येय गाठण्यासाठी त्यांना उद्युक्त करता येते. राजकारणाच्या बाबतीत सत्तारुढ पक्ष किंवा

संयुक्त आघाडी ह्यांच्या शक्तीचा स्वत: अंदाज घेत राहावे लागते, म्हणजे त्यांच्या पक्षाला पुरेशा संख्येचे पाठबळ नसताना ते एखादा निर्णय घेऊ शकणार नाहीत. तसेच राज्यपालांशी सुज्ञपणे सल्ला-मसलत करुन त्यांच्या राज्यातील कामकाज कसे चालले आहे, हे जाणून घेणे आणि सैन्यदलाचे 'सरसेनापती' म्हणून त्यांना शत्रुला जरब बसविणारी कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणे.

ह्याखेरीज 'राष्ट्रप्रमुख' म्हणून जनतेची दृष्टी त्यांच्यावर केंद्रित असते. राष्ट्रपती भवनात येणे, लोकांना जास्त सुकर-सुलभ व्हावे व तशा तऱ्हेने त्यांच्याशी संपर्क साधावा, असा माझा विचार होता. देशाची होत असलेली प्रगती व उत्कर्ष ह्यात त्यांच्याही सहभाग आहे आणि राज्यकारभारात त्यांनाही हक्क आहे असे त्यांना वाटावे, या हेतूने मी हा मार्ग निवडला होता. अशा रीतीने राष्ट्रपती असल्याने मी लोकांच्या आयुष्याचा भाग झालो आणि राष्ट्रपतिपद ही यंत्रणा किंवा संस्था म्हणा, सर्वांशी जास्त संवाद असणारी झाली.

राष्ट्रपती भवनात मी सर्वप्रथम केलेली गोष्ट म्हणजे ई-गव्हर्नन्स प्रणाली सुरु केली. कॉम्प्युटर्स वापरात होते; पण ही व्यवस्था बरीच जास्त सुधारली पाहिजे, असे मला वाटले. आम्ही अशी कार्यप्रणाली अमलात आणली – ज्यात राष्ट्रपतींच्या सचिवालयात येणाऱ्या सर्व फाइल्स, कागदपत्रे आणि पत्रे प्रथम डिजिटाइझ्ड होऊन त्यांना बारकोड दिला जाई. मग कागदांच्या फाइल्स दफ्तरखान्यात ठेवल्या जायच्या. तेथून पुढे कुठलीही फाइल ही फक्त इलेक्ट्रानिकपद्धतीने वेगवेगळे अधिकारी, संचालक, वेगवेगळे सरकारी सचिव आणि राष्ट्रपती यांपैकी ज्यांच्याकडे जाणे महत्त्वाचे असेल, त्याप्रमाणे त्यांच्याकडे जात असे.

पंतप्रधानांचे कार्यालय, राज्यपालांची कार्यालये आणि मंत्र्यांची कार्यालये ह्यांच्याशी सुरक्षित संदेशव्यवस्थेने आणि डिजिटल स्वाक्षरी करण्याच्या पद्धतीने 'राष्ट्रपती भवन' जोडले जाईल, अशी पद्धती वा प्रणाली तयार करण्याचे माझे स्वप्न होते. म्हणजे (जी टू जी) 'ई-गव्हर्नन्स' कार्यपद्धती शक्य होईल. आम्ही ह्या प्रणालीची चाचणी केली होती, व ती उपयोगात आणण्यासाठी सज्ज होती. मला आशा आहे की, एक दिवस माझे हे स्वप्न साकार होईल. राष्ट्रपतींच्या सचिवालयाच्या नऊ विभागांमध्ये आम्ही जेव्हा 'ई-गव्हर्नन्स' सुरु केले; तेव्हा यातून काम जास्त जलद होते का, हे बघितले. आत्तापर्यंत नागरिकांकडून आलेले अर्ज-विनंत्या जनता-विभाग नं-१मध्ये पोहोचत असत, तेव्हा अशा वीस अर्जांवर निर्णय घेण्यास सात दिवस लागत असत. 'ई-गव्हर्नन्स' चालू केल्यावर चाळीस अर्जांचे काम केवळ पाच तासांत होऊ लागले. मला आशा आहे की, अशा कार्यपद्धती केंद्र व राज्य सरकारच्या जास्तीत जास्त कार्यालयांत बसवल्या जातील.

माझ्या राष्ट्रपतिपदाच्या सुरुवातीच्या काळातल्या महत्त्वाच्या कार्यक्रमांपैकी, वेगवेगळ्या राज्यांमधल्या आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या संसद-सदस्यांना एकामागून एक, अशा सकाळच्या नाश्त्याबरोबरच्या वेगवेगळ्या बैठकांना राष्ट्रपती भवनमध्ये बोलावणे, हा एक होता. हेतू हा होता की, त्यांच्या प्रदेशाचा विकास कुठपर्यंत आला आहे,

हे त्यांच्याकडून प्रत्यक्षच समजून घेता यावे. ह्या बैठका २००३मध्ये ११ मार्च ते ६ मे, अशा सुमारे तीन महिने चालल्या व त्यांचा माझ्या मनावर पुसून न टाकता येणारा प्रभाव पडला.

प्रत्येक बैठकीचा हेतू व्यवस्थित आखणी करुन ठरवला जाई. मी व माझे सहकारी त्यासाठी किती तरी आठवडे तयारी करत असू. प्रत्येक राज्याच्या विशेष जमेच्या बाजू आणि त्यांच्या भावी विकासासाठीच्या गरजा काय असतील, ह्यांचा आम्ही अभ्यास करत असू. नियोजन आयोग, राज्य व केंद्र सरकारी खाती, प्रत्येक राज्याबद्दलचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निकष, तसेच इतर संबंधित कागदपत्रे ह्यांमधून जरुर ती माहिती गोळा केली जाई.

गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करुन आलेख, आकृत्या व संगणक माध्यमाच्या मदतीने तिला व्यवस्थित आकार दिला जाई. बैठकीच्या वेळी संसद-सदस्यांपुढे महत्त्वाच्या मुद्द्यांचे संगणकातील 'पॉवर पॉइंट' प्रोग्रामद्वारे सादरीकरण केले जाई, ज्यात तीन विभागांवर भर दिला जाई : १. विकसित भारतासाठीचे संकल्पचित्र, २. प्रत्येक राज्याचा किंवा केंद्रशासित प्रदेशाचा भूतकाळातील वारसा वा गौरवशाली इतिहास, ३. त्यांच्या कळीच्या (खूप महत्त्वाच्या) जमेच्या बाजू. राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी राष्ट्रातील प्रत्येक प्रदेशाचा विकास झाला पाहिजे, ह्या मुद्द्यावर भर देण्याचा त्याचा हेतू होता.

म्हणून एक चौथा विभागही तयार केला गेला – प्रत्येक प्रदेशासाठी विकासाचे त्या मुद्द्यांसाठी निवडक निदर्शक तयार केले. ही सर्व तयारी करताना त्यातून आणि सर्व पक्षांमधून आलेल्या संसद-सदस्यांकडून मिळालेल्या माहितीमधून माझे स्वत:चे ज्ञान किती तरी वाढले! त्यांना भेटल्यामुळे आपल्या देशाच्या अगदी भिन्न-भिन्न प्रदेशांमधले विपुल वैविध्य समजून घ्यायला मला मदत झाली.

पहिली बैठक बिहारमधल्या संसद-सदस्यांची झाली. सादरीकरणामध्ये जे-जे दाखवणार होतो, त्याबद्दलचा त्यांचा उत्साह आम्हाला उत्तेजन देणारा होता. त्यामध्ये देशाच्या विकासासंदर्भात बिहारची भूमिका, बिहारच्या जमेच्या बाजू आणि बिहारला विकसित राज्य कसे करता येईल, ह्याचा विचार – हे मुद्दे होते. बिहारमधील संसद-सदस्यांना बैठक फारच थोड्या वेळाची झाली असे वाटले, म्हणून मग आम्ही बैठकीची वेळ एक तासाऐवजी दीड तास केली. परंतु आमच्या आनंदायी अनुभवाची बाब म्हणजे, बैठकीचा वेळ संपल्यानंतर आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे झाल्यावरही बरेच सदस्य त्यांच्या राज्याच्या केलेल्या सादरीकरणाबद्दल खूप उत्सुकता दाखवत राहिले. ह्या सर्व बैठकांची माहिती देणारे, इतिवृत्तही आम्ही तयार केले.

व्यक्तिश: मला ह्या बैठकांच्या प्रत्येक क्षणाने आनंद मिळाला. प्रत्येक राज्याच्या गरजा समजून घेण्याचे खरोखर चांगले शिक्षण मला मिळाले. आम्ही केलेल्या सादरीकरणात

संबंधित क्षेत्रात असणाऱ्या संसद-सदस्यांनी दिलेल्या माहितीने मोलाची भर पडली. बऱ्याच सदस्यांनी मला सांगितले की, अशी सर्वंकष माहिती त्यांना उपयोगी पडत होती आणि ही माहिती व चर्चा ह्यांतून संसदसदस्य आणि माझ्यामध्ये जी वैचारिक देवाणघेवाण झाली, ती माझ्या राष्ट्रपतिपदाच्या काळात आणि नंतरही एक दुवा बनून राहिली. अजूनही मी जेव्हा-जेव्हा त्यांना भेटतो, तेव्हा-तेव्हा आमचा संवाद आणि चर्चा 'विकास' ह्या विषयावरच मुख्यत: होते.

'इंडिया २०२०'च्या विकासामध्ये बऱ्याच विशेषज्ञांनी पुरविलेल्या आणखी काही माहितीमुळे सामजिक परिवर्तनासाठीच्या वेगवेगळ्या बाजूंवर लक्ष केंद्रित करण्यास मला उद्युक्त केले. आमच्या ब्रेकफास्ट मीटिंग्जमधील चर्चांमधून वेगवेगळ्या राज्यांमधील जी माहिती मला मिळाली, त्यावरुन प्रगतीसाठी मार्गावर अग्रेसर होण्याचा विश्वास वाढला. संसद-सदस्यांनी मला खूप चांगल्या कल्पना दिल्या. 'इंडिया २०२०'च्या कल्पनेवर मी संसदेत कमीतकमी नऊ वेळा भाषणे दिली आणि बारा राज्यांच्या विधिमंडळांमध्ये त्या-त्या राज्याच्या भरभराटीच्या मार्गाबद्दल बोललो. ब्रेकफास्ट मीटिंग्जमध्ये ज्या तऱ्हेचे प्रश्न मला विचारले गेले किंवा सूचना दिल्या गेल्या; त्यांमधून त्या-त्या राज्याच्या ज्या गरजा होत्या, त्यांची माझ्या गोळा केलेल्या माहितीत भर घालता आली. उदाहरणार्थ : कालवे, पाण्यातून वाहतुकीचे मार्ग, नोकऱ्यांच्या संधी उभ्या करणे, सार्वजनिक आरोग्यसुविधा केंद्रे सुरु करणे, ग्रामीण विभागातील दळणवळण सुधारणे आणि शिक्षणपद्धतीचा दर्जा उच्च करणे. जेव्हा मी राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय 'चेम्बर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री, मॅनेजमेंट असोसिएशन्स' आणि 'टेक्निकल इन्स्टिट्युशन्स'समोर भाषणे दिली. तेव्हा 'भारत २०२०ची कल्पना साकार कशी करता येईल, हे सांगायला 'संदर्भ' ह्या दृष्टीने मी गोळा केलेल्या माहितीचा आणि संसद-सदस्यांना ते सांगितल्याचा मला खूप उपयोग झाला. नंतर त्या कल्पनेचा भाग म्हणून विकासाचे दहा स्तंभ किंवा मुख्य मुद्दे विकसित होणे, हा तर्कसंगत परिणाम झाला. हे महत्त्वाचे दहा पैलू यशस्वी करण्यासाठी व्यावसायिक मंडळी, उद्योगक्षेत्रातील अग्रणी आणि संशोधक आपल्या नवनव्या कल्पना पुढे आणून त्यात कसा सहभाग देऊ शकतील, ह्या विषयांवर त्यांच्यापुढे मी आज भाषणे देतो.

ते दहा मुद्दे किंवा स्तंभ पुढीलप्रमाणे :

1. जेथे ग्रामीण व शहरी भागांतील दरी अगदी बारीक रेषेएवढीच असेल, असा देश.
2. जेथे ऊर्जा व चांगले पाणी ह्यांची वाटणी समान प्रमाणात झालेली आणि पुरेशी असेल, असा देश.
3. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रे हे सर्व जण एकजुटीने काम करतात, असा देश.
4. जेथे मूल्याधिष्ठित शिक्षण कुठल्याही लायक विद्यार्थ्यांना सामाजिक किंवा आर्थिक भेदभावामुळे नाकारले जात नाही, असा देश.
5. जो अत्यंत बुद्धिवान विद्वान, शास्त्रज्ञ आणि गुंतवणूकदार ह्यांच्यासाठी उत्तम ठिकाण असेल, असा देश.

6. जेथे सर्वांना उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध आहे, असा देश.
7. जेथील राज्यकारभार मदत करणारा, पारदर्शक आणि लाचलुचपतमुक्त असेल – असा देश.
8. जेथे गरिबीचे समूळ उच्चाटन झाले असेल, निरक्षरता राहिली नसेल, स्त्रिया व मुलांवर अत्यावर होत नसतील आणि समाजातल्या कोणालाही परके असल्यासारखे वाटणार नाही – असा देश.
9. जो संपन्न असेल, निरोगी असेल, सुरक्षित असेल; जेथे शांतता असेल, लोक सुखी असतील आणि शाश्वत प्रगतीच्या मार्गावरुन जात असेल – असा देश.
10. जो जगण्यासाठी जगातील एक सर्वोत्तम स्थान असेल आणि जेथील नेत्यांचा लोकांना अभिमान असेल – असा देश.

'ब्रेकफास्ट मीटिंग्ज'मध्ये हेही दिसून आले की, देशातील नेते नि:पक्षपातीपणे विकासाची चर्चा करु शकतात. जिथे राजकीय पक्षांमधले परस्परविरोधी सूर मावळून जातात आणि प्रत्येक संसद-सदस्य 'आपला देश' म्हणून दृष्टी ठेवतो – अशी 'राष्ट्रपती भवन' ही खरोखर एकमेव जागा आहे.

संसद-सदस्यांशी राष्ट्रपती भवनात झालेल्या माझ्या बैठकांखेरीज संसदेच्या दोन्ही सदनांसमोर बोलण्याची संधी मला दहाहून जास्त वेळा मिळाली.

ही भाषणे हे परंपरागत रुढीबद्ध समारंभ असतात आणि भरुन ओसंडणाऱ्या सेंट्रल हॉलमध्ये टाचणी पडली तरी ऐकू येईल, इतक्या शांततेत माझी ही भाषणे ऐकली गेली. संसदेबरोबर माझा दोन प्रकारचा संबंध आला. एक पूर्णतया सरकारच्या निर्देशाप्रमाणे असे. उदाहरणार्थ : मी अर्थसंकल्पपूर्व जी पाच भाषणे दिली, ती. दुसरा संवाद माझे विचार व कल्पना मांडण्यासाठी. मला ज्यांवर चर्चा करायची असेल, असे विचार मी सरकारी भाषणांमध्ये घालत असे. वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग या दोघांनीही माझ्या सूचना-विचार समाविष्ट करण्यास हरकत घेतली नाही.

राष्ट्राच्या बाबतीत संसद-सदस्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या त्यांच्या मनांवर ठसविण्यासाठी मी ह्या व्यासपीठाचा उपयोग केला. आपल्या स्वातंत्र्य चळवळीची एकशे-पन्नासावी जयंती २००७मध्ये साजरी करण्याच्या समारंभात संसद-सदस्यांना उद्देशून बोलताना मी त्यांच्या मतदारसंघाप्रति, त्यांच्या राज्याप्रति आणि देशाप्रति त्यांच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्यांबद्दल सल्ला दिला. मी म्हणालो, "खरे स्वातंत्र्य, स्वाधीनता, स्वायत्तता मिळवण्यासाठीची आपली चळवळ अजून अपूर्ण आहे... आपली कथा अजून उलगडायची आहे. संसद व विधिमंडळे ह्यांनी नव्या कल्पनांनी आणि नेतृत्वाने आपल्या राष्ट्राला प्रबुद्ध, एकजुटीने राहणारे, एकसुराचे, संपन्न व भरभराट झालेले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुरक्षित, आक्रमणे व सीमारेषापलीकडून होणाऱ्या घुसखोरीला रोखणारे असे, 'राष्ट्र' निर्माण करायचे आहे.

''राष्ट्रीय नेतृत्वाने लोकांमध्ये विश्वास निर्माण केला पाहिजे आणि राष्ट्रीय स्तरावर नवी कामे हाती घेऊन ती धडाक्याने पार पाडली पाहिजेत, तीही विशिष्ट कालमर्यादेत. गेल्या साठ वर्षांमध्ये भारताने आर्थिक, सामाजिक आणि राजकारणाच्या क्षेत्रांमध्ये जे करुन दाखवले आहे; ते सर्व निश्चितच अभिमानास्पद आहे. परंतु, जे आत्तापर्यंत मिळवून दाखवले आहे, तेवढ्याने संतुष्ट न राहता सध्या झालेल्या घडामोडींमुळे तंत्रज्ञान, उद्योगधंदे आणि शेती सर्वांमध्ये बदल घडवून आणण्याकडे दुर्लक्ष करणे आपल्याला परवडणारे नाही. बऱ्याच आव्हानांना तोंड देण्याची जरुर आहे. त्यासाठी अनेक लहान पक्षांची मिळून एक संयुक्त आघाडी बनवून त्यांचे सरकार बनवण्यापेक्षा, जास्त टिकून राहणारी दोन पक्ष असणारी राज्यपद्धती 'लवकरात लवकर' निर्माण झाली पाहिजे. जागतिक दहशतवादाला, तसेच देशातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत तोंड काढू लागलेल्या नव्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी अंतर्गत सुरक्षा जास्त बळकट केली पाहिजे. आर्थिक वाढ झपाट्याने होत असताना समाजातल्या वाढत्या आर्थिक दरीचे कारण नुसत्या 'जी.डी.पी.'वर अवलंबून न राहता, सर्वंकष असा राष्ट्रीय विकासदराचा निर्देशांक वाढता असला पाहिजे. झपाट्याने कमी होत असलेल्या भूगर्भातील तेलाच्या साठ्यांचा प्रश्न सोडवण्यास ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा कार्यक्रम आखण्याचे काम सुरु केले पाहिजे. नव्या प्रकारची युद्धे करणाऱ्यांच्या विरोधात आवश्यक असणारी नवी युद्धतंत्रे वापरुन आपल्या सीमाभागाच्या सुरक्षिततेला असणाऱ्या या वाढत्या धोक्याला तोंड दिले पाहिजे.''

मी पुढे असेही म्हणालो, ''माननीय संसद-सदस्यहो – मी जेव्हा तुमच्याकडे – विशेषत: तरुण सदस्यांकडे बघतो; तेव्हा मला तुमच्यामध्ये महात्मा गांधी, डॉ. राजेन्द्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस, डॉ. आंबेडकर, अबुल कलाम आझाद, राजाजी आणि आपल्या देशातील अशा अनेक द्रष्ट्या नेत्यांचे चिरंतन चैतन्य दिसते. स्वत:पेक्षा देश महत्त्वाचा मानून तुम्हीही असे द्रष्टे नेते होऊ शकाल? भारताच्या महान व्यक्तींपैकी तुम्ही एक होऊ शकाल? होय, तुम्ही होऊ शकाल. तुम्ही भारताला २०२०पूर्वीच आर्थिकदृष्ट्या भरभराट झालेला, सुखी, सशक्त आणि सुरक्षित देशामध्ये बदलू शकण्याचे महान कार्य करण्यासाठीचे नेतृत्व देऊन ह्या संसदेत चैतन्य आणू शकाल; तर तुम्हीही द्रष्टे नेते होऊ शकाल. तसे होण्यासाठी माननीय सदस्यहो, तुमचे ध्येय मोठे असले पाहिजे आणि संसदेत व संसदेबाहेर देशासाठी तुम्ही काम करत राहिले पाहिजे. जे काम लहानसहान तुकड्यांमध्ये केलेल्या कामांपेक्षा वेगळे असेल – अशा एका महान, धाडसाच्या आणि त्वरेने पार पाडण्याच्या कामाला आपल्या देशासाठी सुरुवात करणारे म्हणून इतिहासात तुमचे नाव कायम राहील.

संसद आणि विधिमंडळ सदस्यांबरोबर मी 'इंडिया २०२०'ची कल्पना मूर्त स्वरुपात आणण्याचे प्रयत्न करत राहण्यासाठी सतत काम करतच होतो. परंतु, माझ्यादृष्टीने हेही महत्त्वाचे होते की, आपल्या घटनेनुसार महत्त्वाच्या असलेल्या 'राज्यपाल' ह्या पदावर असलेल्या व्यक्तींचा ह्या कामासाठी उपयोग करुन घ्यायचा. त्यामुळे ह्या बाबतीत २००३

आणि २००५मध्ये राष्ट्रपती भवनामध्ये भरवलेल्या राज्यपाल परिषदा महत्त्वाच्या ठरल्या.

तत्कालीन पंतप्रधान वाजपेयींनी लाल किल्ल्यावरुन आणि संसदेतही दिलेल्या भाषणांमध्ये २०२०पर्यंत भारत हे एक 'विकसित राष्ट्र' होईल, असे काम करण्यास कटिबद्ध असल्याची जी ग्वाही दिली होती, तिची पार्श्वभूमी २००३च्या परिषदेला होती. पंतप्रधान मनमोहनसिंग ह्यांनी त्यांचे सरकारही हे काम तडीस नेण्यास कटिबद्ध असल्याचे २००५मध्ये राज्यपालांच्या परिषदेत सांगितले.

परिषदांमध्ये केलेली परिणामकारक वाटणारी भाषणे विसरली जातात; परंतु जे बोलले गेले आणि जलद विकासासाठी गंभीरपणे कटिबद्ध राहून ते लक्षात ठेवण्याला मी महत्त्व देतो. वाजपेयी म्हणाले होते की, राज्यव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने विकास करण्याची गरज समजून घेऊन हे काम पुढे नेले पाहिजे, तर आपली ध्येये लवकर साध्य होतील. वेगवेगळ्या खात्यांना एक ध्येय साध्य करण्यास एकत्र येऊन सुसूत्रपणे काम करण्यास उद्युक्त करण्यातील अडचणी मी अनुभवल्या होत्या, म्हणून त्यांच्या वक्तव्याचे मी अभिनंदन केले. परिषदेत भाग घेतलेल्या राज्यपालांनी ह्या संधीचा फायदा घेऊन नि:संदिग्ध शब्दांत त्यांचे विचार ऐकवले. एकूण असे वातावरण निर्माण केले गेले, ज्यामध्ये प्रत्येक उपस्थित व्यक्ती प्रश्न आणि त्यांवरील उपाय ह्यांवर चर्चा करु शकली.

डॉ. मनमोहनसिंग आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्री २००५मधील परिषदेला उपस्थित होते. शिक्षण, दहशतवाद, आपत्कालीन संकटांच्या घटनांचे व्यवस्थापन आणि राष्ट्रपतींच्या कार्यालयाने तयार केलेल्या मसुद्याप्रमाणे 'व्हॅट' (व्हॅल्यू अॅडेड टॅक्सेशन) अमलात आणणे – ह्या सर्व प्रश्नांवर त्यात सखोल चर्चा झाली. व्यवस्थापनाच्या विकासात बऱ्याच क्षेत्रांमध्ये राज्यपालांनी केलेल्या कामाचे कौतुक करुन पंतप्रधानांनी असा विश्वास दिला की, ते आणि त्यांचे सहकारीही राष्ट्रपतींकडून मिळालेल्या प्रेरणेने हे काम पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील. राष्ट्रपतींचे कार्यालय हे माझ्या मनापासून आवडत्या योजनेसाठी फार परिणामकारक व्यासपीठ कसे ठरले, हे निदर्शनास आणून देण्यासाठी मी या सगळ्याचा उल्लेख केला आहे.

प्राथमिक न्यायालये, उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयांमधील अनिर्णित असलेल्या खटल्यांची संख्या अत्यंत आश्चर्य वाटेल एवढी मोठी आहे. नवनवे खटले रोज नोंदवले जातच असतात हे खरे असले, तरी ही संख्या लाखोंमध्ये जाते. ज्यांचे असे खटले चालू आहेत; त्यांना प्रचंड खर्च, वेळेचा अपव्यय व मानसिक त्रास ही फार मोठी किंमत मोजावी लागते.

न्यायक्षेत्रातील सुधारणा – विशेषत: अनिर्णित राहिलेले खटले' ह्या विषयावरील अखिल भारतीय चर्चासत्रात बोलण्याची मला २००५मध्ये संधी मिळाली, तेव्हा मी 'नॅशनल लिटिगेशन पेन्डन्सी क्लीअरन्स मिशन' स्थापन करण्याविषयी बोललो.

न्यायदानामध्ये उशीर होण्याच्या कारणांचे मी विश्लेषण केले, ती कारणे अशी – १. न्यायालयांची अपुरी संख्या, २. न्यायाधीशांचे काम करणाऱ्यांची अपुरी संख्या, ३. न्यायधीशांना काही खटल्यांच्या बाबतीत आवश्यक असलेले विशेष ज्ञान नसणे, ४. फिर्यादी व त्यांचे वकील ह्यांनी निकाल लांबवण्यासाठी कागदपत्रे सादर करण्यास विलंब लावणे व कामामध्ये वरचेवर स्थगिती मागणे आणि ५. न्यायालयामधील कामकाज बघणाऱ्या मदतनीसांची भूमिका.

ह्या माझ्या विश्लेषणावर आधारित मी अशा सूचना दिल्या की – १. लोकांना परस्परसमजुतीने वादविवाद सोडवण्यास प्रोत्साहन द्यावे. २. लोकअदालती जास्त मजबूत कराव्यात. ३. 'नॅशनल लिटिगेशन पेन्डन्सी क्लीअरन्स मिशन' स्थापून वादविवाद सोडवण्याच्या वैकल्पिक व्यवस्था कराव्यात. उदाहरणार्थ : मध्यस्थी करणारी पद्धती, लवादपद्धती इत्यादी. ४. जलद निकाल देणारी (फास्ट ट्रॅक) न्यायालये सुरु करावीत.

विशेषत: उच्च न्यायालयामध्ये फार काळ पडून राहणाऱ्या कामांच्या बाबतीत अमलात आणता येतील, अशा बऱ्याच सूचना मी दिल्या. त्यांमध्ये फिर्यादींची वये लक्षात घेऊन त्याप्रमाणे खटल्यांचे वर्गीकरण करावे – म्हणजे असे खटले निवडून काढणे – जे निरर्थक झाले असतील, कारण पुढील पिढ्यांना ते चालू ठेवण्याची इच्छा नसेल.

माझ्या शिफारशींमध्ये 'ई-ज्युडिशिअरी'साठी पुढाकार घ्यावा, ही एक मुख्य शिफारस होती. ह्याचाच एक भाग म्हणून चालू खटल्यांच्या फाइल्सचे संगणकीकरण करावे व त्यांतील फिर्यादींच्या वयाचा विचार लक्षात घ्यावा; ज्यामुळे अजूनही अनिर्णित असलेल्या खटल्यांची संख्या नक्की घटेल. त्यासाठी खटला केव्हा दाखल केला गेला तिथपासून त्याच्यावरचा निकाल केव्हा जाहीर झाला इथपर्यंतची माहिती ठेवणे आवश्यक होते. माहिती शोधून काढण्याच्या ह्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीमुळे संबंधित माहिती शोधणे, मिळवणे, एकत्र करणे, माहिती व्यवस्थित लावणे, न्यायालयीन नोंदी व्यवस्थित लावणे आणि पारदर्शक पद्धतीने खटले निकाली काढणे शक्य होईल. सर्व काम खूपच वेगाने होईल. फिर्यादीला आपला खटला कुठपर्यंत आला आहे हे केव्हाही बघता येईल, कुठल्या कोर्टात व केव्हा सुनावणी होईल आणि त्या दिवशी कोणत्या मुद्द्यावर वा टप्प्यावर आपला खटला आहे, हे कळेल आणि त्यामुळे त्याची खटल्यासाठी त्याची पूर्ण तयारी झालेली असेल. याद्वारे पूर्णतया पारदर्शकता तर येईलच; पण न्यायाधीशांनाही खटला कोणत्या प्रक्रियेपर्यंत आला आहे हे बघता येईल, किती वेळा स्थगिती मागण्यात आली हे बघता येईल; तसेच स्थगितीची कारणे क्षुल्लक होती का, गंभीर अन् खरी होती का, आणखीही काही आहे का, अशा सर्व प्रकारची माहिती मिळू शकेल. याची मदत खटल्याचा निकाल देण्यास होईल.

ह्याशिवाय 'व्हिडीओ कॉन्फरन्सिंग' या प्रकाराचा आणखीही मोठ्या कामासाठी उपयोग करता येईल. कारण त्यामुळे प्रचंड खर्च वाचेल आणि ज्यांच्यावर खटले चालू असतील, त्यांची ने-आण करण्यासाठी पोलिसांचा विनाकारण इकडून-तिकडे जाण्याचा

त्रासही वाचेल.

ज्या खटल्यात बरेच आरोपी आहेत, अशा खटल्यांमध्येही 'व्हिडीओ कॉन्फरन्सिंग'चा खूप उपयोग होईल. गुन्हेगारांची ओळखपरेड आणि गुन्हा घडला असेल, त्या जागी तसे दृश्य उभे करणे (क्राइम रिकन्स्ट्रक्शन) ह्या कामांसाठी आय.सी.टी.चा (इन्फर्मेशन अॅन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) खूपच फायदा झाला आहे.

सिंगापूर, ऑस्ट्रेलिया यांसारख्या बऱ्याच देशांमध्ये इंटरनेट कोर्ट्स, तसेच ज्यांना खटला भरायचा असेल, त्यांना कायद्यांचा सल्ला देणारी सेवा देण्याचे प्रयोग सुरु आहेत. त्यांच्या मदतीने संभाव्य फिर्यादीला जो खटला करायचा आहे, तो कायद्याच्या दृष्टीने बरोबर आहे की नाही, ह्याचा सल्ला मिळू शकतो. सर्वच खटल्यांचा निकाल जलद होणे व खोट्या फिर्यादी टाळणे, ह्यांसाठी आय.सी.टी.चा उपयोग होत आहे. त्यामुळे आपलीही न्यायदानाची पद्धत जास्त जलद होण्यास मदत होईल.

शेवटी मी नऊ सूचना दिल्या, ज्यांच्यामुळे आपल्या न्यायसंस्था नागरिकांना योग्य कालावधीत न्याय देऊ शकतील –

1. न्यायाधीश आणि बार कौन्सिलचे सभासद ह्यांनी स्थगिती मागण्याचा आकडा सीमित कसा ठेवता येईल, ह्याचा विचार करावा.
2. आपल्या न्यायालयांमध्ये ई-ज्युडिशिअरीचा वापर सुरु करावा.
3. मिळालेले पुरावे आणि त्यांना संबंधित कायदे ह्यांवर आधारित खटल्यांचे वर्गीकरण आणि गट करावेत.
4. कायद्यांच्या क्षेत्रांमधील खास तज्ज्ञांना न्यायाधीश नेमावे. उदाहरणार्थ : लष्करासाठीचे कायदे, सेवांसंबधी कायदे, करासंबधी कायदे आणि सायबर गुन्ह्यासंबंधी कायदे.
5. कायद्याचे शिक्षण देणाऱ्या सर्व विद्यापीठांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारुन तो कायद्याच्या शाळांच्या धर्तीवर करावा.
6. विनाकारण स्थगिती मागणे आणि क्षुल्लक कारणांसाठी खटले भरणे, अशा गोष्टींसाठी जरब बसेल असा दंड ठोठवावा.
7. उच्च आणि जिल्हा न्यायांलयांमधील न्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयासाठी सुचवलेली पद्धती अमलात आणून त्यांनी कामकाज पूर्ण केलेल्या खटल्यांची संख्या वाढवावी व त्यासाठी आपण होऊन जास्त तास काम आठवड्याभरात व शनिवारीही करावे.
8. वेगवेगळे खटले वेगवेगळया वेळी एकापेक्षा अधिक सत्रे अमलात आणून न्यायालयांमध्ये चालू ठेवावेत; ज्यामुळे मनुष्यबळ आणि व्यवस्थापन अधिकारी ह्यांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेता येईल.
9. 'प्रलंबित खटले उरकण्यासाठीची राष्ट्रीय मोहीम' (नॅशनल लिटिगेशन पेन्डसी क्लीअरन्स मिशन') दोन वर्षांच्या अवधीसाठी उभे करावे व त्यातून ठरावीक

अनिर्णित खटल्यांचा निकाल लावण्याचे काम करावे.

गेल्या काही काळात मला असे दिसून आले की, आपल्या न्यायसंस्थेने वरील सूचनांकडे लक्ष दिले आहे आणि टप्प्या-टप्प्याने त्या स्वीकारल्या जात आहेत. उदाहरणार्थ – मला हे ऐकून आनंद झाला की, बरीच वर्षे चाललेला घटस्फोटाच्या खटल्याचाही व्हिडीओ कॉन्फरन्सिंगने परस्परसंमतीने निवाडा करण्यात आला. यामधील पती भारतात होता आणि पत्नी अमेरिकेत होती!

भारताचे लष्कर हे जगातल्या सर्वोत्तम लष्करांपैकी एक आहे – राष्ट्रनिष्ठ, शूर आणि कडक शिस्त असलेले. 'राष्ट्रपती हे सरसेनापती' असतात. त्या पदावर मी होतो, म्हणून आपले सैनिक कशा वातावरणात काम करतात, त्यांची कुठल्याही क्षणी लढाईसाठी किती तयारी असते, त्यांच्या काय अडचणी असतात, त्यांच्या समोर काय आव्हाने असतात, हे सर्व समजून घ्यायची मला खूप उत्सुकता होती. हे समजून घेण्याचा एक भाग म्हणून मी भूसेना, नौदल, हवाईदल ह्या सर्वांच्या अनेक तुकड्यांना जाऊन भेटलो. दुर्गम आणि अडचणीच्या जागी असलेले अधिकारी आणि जवानांशी संवाद साधण्याची मला इच्छा झाली. म्हणून मी सियाचिन ग्लेशियरवरील 'कुमार' हे आपले लष्करी ठाणे भेटीसाठी निवडले. जगातील ती सर्वांत जास्त उंचीवर असलेली युद्धभूमी आहे. अत्यंत कडाक्याच्या थंडीत आपल्या लष्करी तुकड्या तेथे काम करतात. विशाखापट्टणमच्या समुद्रकिनाऱ्यापासून जरा दूर असलेल्या आपल्या पाणबुडीलाही मी भेट दिली आणि सुखोई-३० एम.के.ई मधून ध्वनीच्या जवळजवळ दुप्पट वेगाने उड्डाणही केले. मला हे सर्व अनुभव उत्तेजित करणारे वाटले आणि त्यांबद्दल तुम्हालाही सांगायला मला आवडेल.

सियाचिन ग्लेशियरच्या 'कुमार' ह्या ठाण्यावर मी २ एप्रिल, २००४ला जाऊन पोहोचलो. हे ठाणे समुद्रसपाटीपासून ७००० मीटर उंचीवर आहे. बर्फ पडत होते आणि तापमान उणे ३५ अंश सेल्सिअस होते! खूप वाराही होता. मी ठाण्यावर पोहोचलो; तेव्हा कर्नाटकचा नाईक, पश्चिम बंगालचा विलियम्स आणि उत्तर प्रदेशातला सलीम ह्या तीन सैनिकांनी माझ्याशी हस्तांदोलन केले. त्यांच्या उबदार हस्तांदोलनाने तिथली थंडी जणू नाहीशी झाली. मला विश्वास वाटला की, आपला देश ह्या सैनिकांच्या हातांत सुरक्षित आहे, जे इतक्या अडचणींच्या अवघड प्रदेशात राहून देशाचे रक्षण करत आहेत! अशा ठिकाणी राहून इतका विश्वास सैनिकांमध्ये आणण्यासाठी त्यांच्यात असामान्य नेतृत्वगुण पाहिजेत.

नौदलाच्या आयएनएस सिंधुरक्षक' ह्या पाणबुडीतून पाण्याच्या खालून प्रवास करण्याचा अनुभव मी १३ फेब्रुवारी, २००६ला घेतला. ही पाणबुडी सुमारे ३० मीटर पाण्याखाली गेली आणि मग प्रवास सुरु झाला. मी नियंत्रण कक्षामध्ये गेलो. तेथील कामावर असलेल्या जवानांनी मला खूप उत्साहाने ती कशी चालते ते समजावून सांगितले, चालवतात कशी ते दाखवले आणि ती तरंगत ठेवण्याची यंत्रे कशी चालतात तेही दाखवले. नौदलाचे प्रमुख अॅडमिरल अरुण प्रकाश आणि पाणबुडीचे तरुण खलाशी व अधिकारी

त्यांच्याबरोबर जलनौकेचा प्रवास हा माझ्यासाठी एक चित्तथरारक अनुभव होता. सर्व बघत असताना त्यांनी मला पाण्यात असताना पाण्याबाहेरच्या जगाशी संपर्क कसा ठेवायचा, आपले लक्ष्य कोणते व ते कुठे हे कसे ओळखायचे आणि हल्ला करण्याची पद्धत दाखवली. मग आपल्या युद्धनौकेची-पाणबुडीची युद्धक्षमता दाखवण्यासाठी टॉर्पेडोने (जलतीर) हल्ला कसा करायचा ह्याचे एक लुटुपुटीचे प्रात्यक्षिक करण्यात आले. 'टॉर्पेडो' अचूकपणे लक्ष्यावर जाऊन आपटले! पाणाखालच्या युद्धातील अडचणी आणि गुंतागुंतीच्या गोष्टी मला जाणवल्या.

युद्धनौकेवर सगळे मिळून नव्वद खलाशी व अधिकारी होते, त्या सर्वांना मी भेटलो. प्रत्येक जण आपापल्या कामात मग्न होता. काम सोपं नाही, परंतु त्यांच्या या आव्हानात्मक कामाचा त्यांना अभिमान वाटतो. मला चविष्ट शाकाहारी जेवण देण्यात आले आणि पुढील तीस वर्षांसाठी नौदलाचे जे बेत आहेत, त्यांचे एक सादरीकरण माझ्यासाठी करण्यात आले. पाण्याखाली तीन तास घालवून आम्ही पाण्याच्या वर आलो आणि मग बंदरावर. सर्वच बाबतींत लक्षात राहील असा तो प्रवास होता.

दि. ८ जून, २००६ला मी सुखोई-३० ह्या लढाऊ विमानातून प्रवास केला. आदल्या रात्री विंग कमांडर अजय राठोड ह्यांनी मला सुखोईचे उड्डाण कसे करायचे, हे शिकवले. विमान कसे चालवायचे आणि शस्त्र-नियंत्रणपद्धती कशी हाताळायची, तेही शिकवले. मी १९५८मध्ये इंजिनीअर झाल्यापासून ही एक गोष्ट शिकण्याची माझी इच्छा होती. आम्ही आत बसून पट्टे बांधल्यावर सुखोई सुरु झाले आणि त्याने ७५०० मीटर (२५००० फुट) उंच भरारी घेतली. वेग होता ताशी १२०० कि.मी. पेक्षा जास्त. विंग कमांडर राठोडने सुखोई वळवायचे कसे आणि इतर काही हिकमती सांगितल्या. लढाऊ विमानातून उड्डाण करणे, हा एक खूप तीव्र तणावाचा अनुभव आहे. मूर्च्छा येऊ नये म्हणून मी 'जी' सूट चढवला होताच, पण मी श्री जी गुरुत्वाकर्षणाच्या जोरदार प्रभावाचा अनुभव घेतला. आतील वेगवेगळ्या कामांसाठीची जी उपकरणे भारतीय शास्त्रज्ञांनी संशोधन करुन तयार केली आहेत आणि सुखोईच्या मूळ यंत्रणेत जी बसवली आहेत, ती समजून घेण्याचा मी उड्डाण चालू असताना प्रयत्न केला. विशिष्ट कामासाठी बनवलेले संगणक, धोक्याची सूचना देणारे रडार, बाहेरची परिस्थिती दाखविणारी उपकरणे आणि इतरही काही आपल्याच देशात निर्मिलेली उपकरणे बघून मला खूप आनंद झाला. कृत्रिम छिद्राच्या रडारच्या मदतीने हवेतील आणि जमिनीवरील लक्ष्य शोधून त्यावर नेम कसा धरायचा, हे त्यांनी मला दाखवले. उडाण छत्तीस मिनिटांहून जास्त वेळ चालले. बरीच वर्षे ज्याची इच्छा होती, ते स्वप्न पुरे झाल्यासारखे मला वाटले.

आपले पॅरामिलिटरी सैन्यातील लोक, केंद्रीय व प्रांतीय पोलीस अधिकारी आणि अंतर्गत सुरक्षा दलाचे सैनिक व अधिकारी यांच्याशी संवाद साधण्याच्या संधीही मला मिळाल्या. त्यांची समर्पण वृत्ती आणि शौर्य ह्यांचा माझ्या मनावर खोलवर ठसा उमटला.

राष्ट्रपती ह्या नात्याने समाजातल्या सर्व स्तरांमधील लोकांना भेटण्याची संधी मला मिळाली. ह्या भेटींचा, त्यांच्याशी साधलेल्या संवादाचा उपयोग मी लोकांना समजून घेण्यास; तसेच त्यांच्या आकांक्षा, त्यांच्यापुढील आव्हाने समजून घेण्यास केला. तितकेच महत्त्वाचे म्हणजे, एका समान राष्ट्रीय ध्येयासाठी मी लोकांना एकत्र आणू शकलो.

५
मी देशाला काय देऊ शकतो?

'Vision elevates the nation'

'संकल्प देशाची उन्नती करतो.'

मी देशाला काय देऊ शकतो? दुसऱ्या देशांच्या दृष्टीतून त्याला सन्मान आणि आदर मिळवून देऊ शकतो. माझे शंभर कोटी देशबांधव आणि भगिनी ह्यांच्या चेहऱ्यांवर हास्य आणू शकतो. आर्थिक विकास आणि शिक्षण ह्यांमधूनच आपण ते साध्य करु शकतो. प्रतिष्ठा मिळवण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. इतरांना देण्याची (जे आपल्याकडे आहे ते.) सवय आत्मसात केली, तर आपल्या देशबांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास आपल्याला त्यामुळे मदत होईल.

देशाला उद्देशून स्वातंत्रदिनाच्या आदल्या संध्याकाळी आणि प्रजाकसत्ताकदिनाच्या दिवशी भाषण देण्याचा मान भारताच्या राष्ट्रपतींना मिळतो. ते मधल्या काळात देशाचा किती विकास झाला आहे, तसेच देशापुढे कोणती आव्हाने आहेत, हे सांगण्यास ह्या दोन प्रसंगांचा उपयोग करतात.

हे भाषण प्रथम इंग्रजीत व नंतर हिंदीत असते. परंतु, जरा बदल करुन मी प्रत्येक भाषणाच्या सुरुवातीला हिंदीत अभिवादन करुन भाषणाचा सारांशही हिंदीत सांगायला सुरुवात केली.

मी राष्ट्रपती झालो, तेव्हा माझे हिंदीचे ज्ञान अगदीच जुजबी होते. तरीही मला वाटले की, सुरुवातीला बोललेल्या तेवढ्या हिंदी शब्दांनी निदान भाषणाचा मथितार्थ जास्तीत जास्त श्रोत्यांना समजेल.

प्रजाकसत्ताकदिनाच्या भाषणाला नेहमी एक विषय ठरवला जात असे. या भाषणाची तयारी नेहमीच बऱ्याच आधीपासून सुरु होत असे. आम्ही एक विषय ठरवत असू, नंतर वेगवेगळ्या खात्यांकडून त्यांसंबंधी माहिती मागवत असू आणि त्या विषयाबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावर काय परिस्थिती आहे, तेही समजून घेत असू. संबंधित विषयातील तज्ज्ञांना आम्ही एक प्रश्नावली पाठवत असू. एवढे झाल्यावर आम्ही ती सर्व माहिती पडताळून पाहत असू. भाषणाचे अनेक कच्चे मसुदे तयार होत असत. अगदी दहा किंवा त्यापेक्षाही जास्त मसुदे होणे, ही सर्वसामान्य बाब होती. मुख्य महत्त्व मूल्यांना दिले जाई. दि. १४ ऑगस्ट, २००५च्या भाषणाचा विषय होता, ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे. भाषणाचे तब्बल पंधरा मसुदे केले गेले. अर्थात, मी युरोपियन संसदेसमोर २५ एप्रिल,

२००७ला जे भाषण दिले, त्याचे ३१ मसुदे झाले होते! हा उच्चांक होता.

माझ्या कार्यकालात मी राष्ट्राला उद्देशून दहा भाषणे दिली. ह्या भाषणांचे विषय अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांमध्ये आपल्या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ध्येयात परिवर्तन करणे, हा एक होता. दुसरे असेही विषय होते. उदाहरणार्थ : आपली आठवण कुठल्या कार्यासाठी यावी, मानवी आयुष्याच्या प्रतिष्ठेसाठी शिक्षणाची जरुरी, नोकरीच्या संधी निर्माण करण्यासाठी नेमके काय करावे ह्याचा आराखडा तयार करणे, ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे, शंभर कोटी जनतेचे एक स्वप्न – एक संकल्प, राष्ट्रामध्ये चेतना जागवणे आणि मी माझ्या देशाला काय देऊ शकतो? ह्या सर्व विषयांचा उगम भारताला एक विकसित राष्ट्र घडवणे ह्या एकाच कल्पनेतून झाला होता. हा संदेश सामान्य नागरिक, सुशिक्षित व्यावसायिक ह्या सर्वांपर्यंत पोहोचला होता. त्यांच्या-त्यांच्या वर्तुळांमध्ये त्यावर चर्चा व कृती सुरु झाल्या होत्या. उदाहरणार्थ – नोक़ऱ्या निर्माण करणे, ह्या विषयी बोलताना मी जॅट्रोफा करकॅस ह्या झाडांची लागवड देशात करण्याबद्दल बोललो, तेव्हा बऱ्याच राज्यांनी हे एक विशेष काम म्हणून हाती घेतले आणि आज लाखो हेक्टर जमिनीवर जॅट्रोफाची लागवड झालेली आहे. शिवाय जॅट्रोफाची झाडे वाढवणारे आपले तज्ज्ञ आफ्रिकेतल्या काही देशांमध्ये आपल्या शेतक़ऱ्यांना पाठवून जॅट्रोफा लागवड करण्यास शिकवत आहेत, म्हणजे त्यांनाही ह्या झाडांपासून तेलाचे उत्पादन (बायोफ्युएल – जैव इंधन) करता येईल. जॅट्रोफा पडीक जमिनीतही लावता येते. एकदा लावल्यावर झाडाचे आयुष्य पन्नास वर्षांचे असते आणि दर वर्षी त्यांना येणाऱ्या फळांच्या बियांमधून जे तेल काढता येते, ते डिझेलमध्ये मिसळता येते.

शिक्षणाच्या क्षेत्रात मुख्य परीक्षेच्या पद्धतीला बाध येऊ न देता, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती ठेवाव्यात, असा एक विचार पुढे आला. त्याप्रमाणे 'सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन'ने (सी.बी.एस.ई.) गुण देण्याच्या ज्या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या मनावर अतिशय ताण येतो, ती बंद केली आणि 'श्रेणी' देण्याची पद्धत सुरु केली; त्यामुळे स्पर्धा निकोप झाली.

ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या प्रश्नावर मी असे सुचवले की, ५५,००० मेगावॉट क्षमता असेल, एवढे सौरऊर्जेचे यंत्रसंच वा प्रकल्प उभे करावेत, म्हणजे २०३०पर्यंत ऊर्जेच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होईल. भारताला ऊर्जेकडे सर्वसमावेशक दृष्टीने बघणे आवश्यक आहे. भारताला जितक्या कोळशाची गरज आहे, त्यांपैकी फक्त ऐंशी टक्के कोळसा आपल्याकडे आहे. ऊर्जेची मागणी दर वर्षी पाच टक्क्यांनी वाढते आणि कोळशाचे उत्पादन एक टक्क्याने. देशभरातल्या बऱ्याच राज्यांमध्ये रोज आठ तास भारनियमन असते. तेव्हा वैकल्पिक मार्गांनी ऊर्जा मिळवण्याचे मार्ग विकसित करणे भागच आहे.

शिवाय पर्यावरण शुद्ध राहण्याच्या दृष्टीनेही आपण कोळसा, तेल, गॅस ह्यांवर अवलंबून राहणे कमी केले पाहिजे आणि सौर, पवन व जलशक्तिपासून प्रदूषणमुक्त ऊर्जा उत्पन्न करण्यावर भर दिला पाहिजे. सरकारने २०२०पर्यंत २०,००० मेगावॉट इतकी सौरऊर्जा

मिळवण्याची योजना 'सौरऊर्जा मिशन' अंतर्गत जाहीर केली आहे. 'सौरऊर्जा' तयार करण्यामध्ये दुसरेही मुद्दे-समस्या आहेत. उदाहरणार्थ – सध्याच्या १५ टक्के क्षमतेच्या फोटोव्होल्टेक सेलऐवजी बरेच संशोधन करुन जास्त योग्य असे पर्याय वापरुन ही क्षमता कमीत कमी ५० टक्क्यांनी वाढवली पाहिजे. शिवाय दिवसा सौरऊर्जेचा स्त्रोत वापरायचा आणि रात्री बायोफ्युएल (जैव इंधन) वापरायचे – ही पद्धत अवलंबली, तर खंड न पडता सलग ऊर्जा मिळत राहील. गुजरातमध्ये खासगी कंपनीच्या सहकार्याने सौरऊर्जा मिळवण्यासाठी ६०० मेगावॉट क्षमतेचे यंत्रसंच बसवून प्रकल्प उभे केले आहेत. त्यांतून रोज ३० दशलक्ष युनिट्सचे उत्पादन होते आणि गुजरात सरकार प्रतियुनिट १५ रुपये दराने ती ऊर्जा विकत घेते.

आज राज्य व केंद्र सरकारपुढे भारताला 'आर्थिक दृष्ट्या विकसित राष्ट्र' म्हणून पुढे आणणे, हा एकच संकल्प आहे आणि तो देशभर सर्व नागरिकांपर्यंत पोहोचला आहे.

ह्या सर्व उदाहरणांमधून सर्वांच्या एवढे लक्षात येईल की, राष्ट्रपतींना नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा अधिकार असतो आणि ते देशाला फायद्याचा होईल, असा प्रभाव पाडू शकतात.

देशाला उद्देशून दिलेल्या भाषणांसारखीच मी संसदेच्या सदस्यांसमोरही भाषणे दिली होती. सन १९९९, २०००, २००१ आणि २००२ ह्या वर्षांसाठी 'विशेष उत्तम संसद-सदस्य' ठरलेल्यांना २१ मार्च, २००५ रोजी पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या समारंभात मी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले होते.

मी म्हणालो, ''स्वातंत्र्य आणि लोकशाही हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग नेहमीच राहिले आहेत. खरे तर ह्या बाबतीत अतिप्राचीन काळी आपल्या ग्रामीण स्वराज्य संस्थांमध्ये 'सभा' आणि 'समिती' ह्या खूप मान असलेल्या संस्था असत, तिथपर्यंत आपल्या इतिहासाचा माग काढता येतो. आता लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या संस्था करतात, तशा तऱ्हेची कामे त्या संस्था करत असत. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीवर आधारित राज्यव्यवस्थेची आपण स्वीकारलेली पद्धत म्हणजे भारतीय संस्कृतीत पूर्वापार चालत आलेली सामान्य राज्यनीतीच आपोआप पुढे चालू राहिली.

''अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक संस्कृती असलेला भारत हा जगातील सर्वांत मोठी संसदीय लोकशाही असलेला अद्वितीय देश आहे; त्याचा आपल्याला अभिमान आहे. भारतीय मतदारांची परिपक्वता आणि चातुर्य बघून जगाला कदाचित कमालीचे आश्चर्य वाटत असेल, कारण आपले मतदार नेहमी विचार करुन आपला मतदानाचा हक्क बजावण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी हे दाखवून दिले आहे की, आपल्या घटनेमध्ये विचारपूर्वक म्हटल्याप्रमाणे जनता ही सार्वभौम आहे व सत्ता त्यांच्याकडून मिळते. अशा जनतेला विकसित भारतात जगण्याचा अधिकार आहे. ह्या संदर्भात विकासाचे राजकारण महत्त्वाचे ठरते.

राजकरणाचे दोन पैलू आहेत. एक आपल्याला सर्वांना परिचित असलेली राजकीय पक्षांची पद्धत – जी स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीच्या वेळी असणे गरजेचे होते. परंतु, आज भारताला कशाची जरुर आहे? सव्वीस कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खालचे जीवन जगत असताना आणि निरक्षरतेचे प्रमाण चौतीस टक्के असताना, तीन कोटी साठ लाखांहून जास्त लोक नोकऱ्यांच्या शोधात असताना भारताला दारिद्र्य, निरक्षरता आणि बेरोजगारी ह्यांमधून मुक्त झालेले विकसित राष्ट्र करणे – हे आपले मुख्य लक्षय असले पाहिजे. अशा परिस्थितीत गरज आहे, ती विकासाच्या राजकारणाची.

''मला अशा परिस्थितीचे दृश्य पाहायला आवडेल, ज्यामध्ये आपल्या देशातील राजकीय पक्ष 'विकासासाठी राजकारण' अशा वातावरणात काम करतील आणि त्यांच्या निवडणूक प्रचाराच्या जाहीरनाम्यात त्यांच्या राजकारणातील संकल्पना पुढे मांडण्यात एकमेकांशी स्पर्धा करतील. मी यासंदर्भात काही उदाहरणे देतो –

1. ''समजा – 'अ' पक्ष म्हणतो की, आमच्या नेतृत्वाखाली आम्ही भारताला पंधरा वर्षांच्या आत विकसित राष्ट्र करु आणि दर पाच वर्षांत किती प्रगती होईल याचा आराखडा करुन तो कृतीत उतरवू. 'ब' पक्ष म्हणतो की, – नेमकी, खातरीची अशी योजना करुन आम्ही बारा वर्षांमध्ये आमच्या नेतृत्वाखाली भारताला विकसित राष्ट्र बनवू. 'क' पक्ष कदाचित राष्ट्राच्या विकासासाठीची एक नवी कल्पना पुढे ठेवेल, ज्यात प्रगतीचे निर्देशक वेगळे असतील आणि जागतिक पटावर भारत आपली भूमिका काय साकारेल, ह्याबद्दल त्यांच्या सुंदर कल्पना असतील. भारत अमुक इतक्या वर्षांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा सदस्य कसा होईल, ह्यासाठीचे त्यांना खातरी असलेल्या मार्गाचे आराखडे ते पुढे मांडतील.
2. ''माझ्या कल्पनेतील दुसऱ्या उदाहरणात – 'अ' पक्ष म्हणतो की, आम्ही असा भारत घडवू, जिथे बेरोजगारी अजिबात नसेल. हे करण्यासाठी नोकऱ्या मागणाऱ्यांपेक्षा नोकऱ्या देणारे जास्त असतील, अशी परिस्थिती आम्ही निर्माण करु. 'ब' पक्ष सांगतो की, आम्ही असे वातावरण आणि व्यवस्था उभी करु, जिथे न्यायालयांमध्ये अनिर्णित खटले राहणारच नाहीत, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न खूपच कमी होतील असे आम्ही बघू आणि हेही बघू की, जनता एकात्मतेच्या वातावरणात जगेल. 'क' पक्ष म्हणतो की, एकही भारतीय उपाशी झोपी जाणार नाही, असे आमचे धोरण असेल. त्यांच्या कल्पनेत बुद्धिमान नेतृत्व देणारा, शांतता नांदणारा, स्वच्छ आणि सुंदर जग बनवू शकणारा देश म्हणून भारताकडे जगातील इतर सर्व देश बघतील. जागतिक शांतता हे भारताचे लक्षय असेल.
3. ''तिसऱ्या उदाहरणातील संकल्पचित्रात 'अ' पक्ष सांगेल की, येत्या दहा वर्षांच्या आत सर्व सीमावर्ती देशांशी आपले होत असलेले सीमांसंबंधीचे वाद खात्रीने संपवले जातील. 'ब' पक्ष म्हणेल की, सीमासंबंधी सर्व वाद मिटवून शेजारच्या देशांशी शांततापूर्ण नाते आम्ही येत्या पाच वर्षांत प्रस्थापित करु. 'क' पक्ष कदाचित असे सांगेल की, त्यांनी पुढाकार घेतल्यामुळे सीमालगतच्या देशांबरोबर सीमाहीन मुक्त

व्यापार करता येईल. व्यापाराने समृद्धी येते आणि समृद्धी आली की शांतता येते.

‘‘जनता जेव्हा कुठल्याही एका पक्षाला त्यांच्या विकासासंबंधीच्या योजना प्रत्यक्षात आणायला संधी देते आणि संसद-सदस्यांच्या पूर्ण पाठिंब्याने त्या प्रत्यक्षात उतरतात; तेव्हा संसद-सदस्यांच्या उमद्या कामाने जनतेचे कल्याण होईल. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला – तो किंवा ती – देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी किती जास्त चांगले काम करु शकतो, हे स्वत:लाही सिद्ध करुन दाखवण्याची संधी मिळते.

‘‘आपल्या देशातील गरिबी समूळ नष्ट करण्याची गरज, ज्ञानावर आधारित व अटीतटीची स्पर्धा असलेल्या आजच्या जगात आपल्या सर्व जनतेला पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याची गरज आणि आजच्या गुंतागुंतीच्या जागतिक परिस्थितीत जनतेला व देशाला सुरक्षा पुरवण्याची गरज आहे. ह्या अनेक गरजांमुळे आपल्याला आत्तापर्यंत माहीत असलेल्या ‘राजकीय’ राजकारणाच्या बाहेर पडून विकासाच्या राजकारणाकडे वळणे आवश्यक ठरणार आहे.

‘‘राजकीय व आर्थिक असलेल्या पक्षीय तत्त्वांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण संसदेने बऱ्याच राष्ट्रीय प्रश्नांकडे लक्ष द्यावे लागेल. एक विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करणे, पिण्यासाठी शुद्ध पाण्याचा पुरवठा, खंडित न होणारा वीजपुरवठा, देशाच्या प्रत्येक नागरिकाला राहायला घर व आरोग्यसेवा पुरविणे, संदेशवहन व संगणक शिक्षण सर्वदूर पोहोचवणे ह्यांबद्दलच्या योजना आणि राष्ट्रीय सुरक्षा हे या सर्व प्रश्नांत अंतर्भूत होते. सर्वांनी चर्चा करुन, मते मांडून ह्या सर्व ध्येयांच्या बाबतीत एकमताने, संसदीय पद्धतीने धोरण आखले; तर त्यामुळे भारत खचितच त्वरेने विकसित दर्जाला पोहोचण्याच्या मार्गाला लागेल. म्हणून निरोगी स्पर्धेची वृत्ती ठेवून, देशाला पुढे जाण्याला मदत करण्यात संसदेने आपली शक्ती खर्च करावी.

‘‘यासाठी संसद-सदस्यांच्या कामाचे महत्त्व प्रचंड आहे आणि हे अत्यंत जरुरीचे आहे की, प्रत्येक संसद-सदस्य ज्या आकांक्षा आणि आदर्शांसाठी निवडून दिला गेला असेल, त्या तो पुऱ्या करेल.’’

तरी पण, मी संसद-सदस्यांना सांगितले त्याप्रमाणे, अशी काही नग्न सत्ये आहेत, जी आपल्याला सर्वांना ठाऊक आहेत; पण ती कबूल करायचे आपण नाकारतो. त्यांबद्दल तुमच्याशी बोलण्यास मी बिचकणार नाही, कारण मी तुमच्यापैकीच आहे; तुमच्याइतकाच मीही संसदेचाच भाग आहे आणि संसदीय राज्यपद्धती यशस्वी व्हावी, याची मलाही तुमच्याइतकीच काळजी वाटते. आपल्या निवडणुकांची पद्धत अलीकडे कमालीच्या तणावाखाली आलेली आहे. आपण स्वत:शी प्रामाणिकपणे विचार करु या. आपल्या पक्षाची विधिमंडळातील सदस्यांची संख्या वाढण्यासाठीचा दबाव असल्याने ज्या विधिमंडळातील जागा कदाचित शंकास्पद आणि लोकशाहीच्या तत्त्वांच्या विरोधी पद्धतींनी (घोडेबाजार) जिंकल्या जातात असा आरोप केला जातो, त्यामुळे अनेक वेळा

जनतेच्या मनात आपल्या लोकशाहीपद्धतीबद्दल शंका उभ्या होत आहेत. राजकारण जेव्हा राजकारणी गुंडगिरीच्या नीच स्तराला जाऊन पोहोचते, तेव्हा 'राष्ट्र' अटळ अशा अनर्थाच्या आणि विनाशाच्या संकटाच्या रस्त्यावर जाऊन पोहोचते. हा धोका आपण पत्करु नये. आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे आणि आपल्या घटनेमध्ये तिचा पाया घालणाऱ्या संस्थापकांनी इतक्या मेहनतीने व आशापूर्वक काम करुन ज्या अपेक्षा बाळगल्या, त्या जाणू या. अशासाठी की – भारत स्वबळावर टिकून राहील आणि एक परिपक्व, स्फूर्तिवान आणि लोकशाही असलेले राष्ट्र होईल.

आपला सांस्कृतिक वारसा, मूल्ये आणि भारतीय संस्कृतीचा स्थायिभाव कायम ठेवून जीवनशैली बदलता यावी, अशी लोकांची अतिशय मनापासून इच्छा आहे. जरुर त्या योग्य योजना आणि कायदे करुन, ते अमलात आणून सामाजिक परिवर्तन घडवून संसद-सदस्य नागरिकांच्या चेहऱ्यावर हसू आणू शकतील. आपल्या योजना आणि त्या अमलात आणण्याच्या पद्धती ह्या बहुतेक वेळा अविश्वासावर आधारित असतात. त्यामुळे काम करण्याची इच्छा आणि अधिकार असणाऱ्यांचा विरस होऊन ते दबलेले राहतात. ह्याउलट, जेथे काम करण्यास भरपूर वाव मिळतो आणि विश्वास टाकला जातो, अशा वातावरणात भारतीय लोक प्रचंड यश मिळवून दाखवतात.

विकासाच्या दिशेने जात असलेल्या अर्थव्यवस्थेत ज्यांच्यामुळे अडथळे येतात, असे जुने किचकट कायदे आणि व्यवस्थापनपद्धती संसदेने एक योजना तयार करुन रद्द करावी. असे केले तर प्रामाणिकपणाने धडपड करुन प्रगती करु बघणारे जे अनेक लोक आहेत, त्यांना संधी मिळेल आणि त्यांच्या आशा पल्लवित होतील. भारताने परस्पर विश्वासावर आधारित कार्यपद्धतीकडे वळले पाहिजे आणि ह्या श्रेष्ठ संसदेचे सदस्यच हा बदल घडवून आणू शकतील, असे मी त्यांना आग्रहाने सांगितले.

ह्या योजनेत यशस्वी होण्यासाठी पाच प्रमुख क्षेत्रे – ज्यांमध्ये भारताकडे ही कामे करण्यासाठी जरुर ते मूलभूत सामर्थ्य आहे, त्यांत एकत्रच काम सुरु केले पाहिजे – ती अशी – १. शेती आणि खाद्य पदार्थांवर प्रक्रिया करणे, २. शिक्षण आणि आरोग्य, ३. पायाभूत सुविधा. उदाहरणार्थ : विश्वासार्ह आणि उत्तम दर्जाचा वीजपुरवठा, चांगले रस्ते आणि इतरही पायाभूत सुविधा देशातील सर्व भागात पुरविणे, ४. माहिती आणि संदेश-संफर्व ह्यांसाठीचे तंत्रज्ञान, ५. गुंतागुंतीच्या महत्त्वाच्या तंत्रज्ञानात आत्मनिर्भरता.

ही पाच क्षेत्रे एकमेकांशी खूप संलग्न आहेत आणि त्यांचा परस्परसमन्वयाने विकास केला; तर अन्न, आर्थिक बाजू आणि राष्ट्रीय सुरक्षा ह्या तीनही गोष्टींमध्ये आपण अग्रेसर होऊ. ह्या पाच क्षेत्रांपैकी सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास करुन प्रोव्हाइडिंग अर्बन अॅमिनिटीज इन रुरल एरियाजच्या (PURA) उपयोगाने ग्रामीण भागांत संपन्नता आणण्यासाठी रस्ते, इलेक्ट्रॉनिक साधने व ज्ञान पुरवणे. ह्या तीन सुविधा जोडल्या गेल्या, तर आर्थिक दृष्ट्याही ग्रामीण भाग इतर देशाशी जोडला जाईल. संपूर्ण देशात PURAचे सात हजार समूह होतील, असा अंदाज आहे.

आपली आर्थिक स्थिती सुधारते आहे आणि दरडोई ढोबळ उत्पन्न (ग्रॉस डोमोस्टिक प्रॉडक्ट – GDP) वर्षाला नऊ टक्क्यांनी वाढत आहे, ही आनंदाची गोष्ट असली; तरी उघडपणे दिसते आहे की, बहुसंख्य लोकांची जीवनशैली सुधारण्यात ही आर्थिक वाढ दिसून येत नाही – विशेषत: ग्रामीण भागात आणि काही शहरी भागातही. म्हणून आम्ही राष्ट्रीय विकासदर (नॅशनल प्रॉस्पेरिटी इन्डेक्स – एन.पी.ए.) तयार केला, म्हणजे एन.पी.आय. – ज्यात खालील गोष्टींची गोळाबेरीज होते – १. दरडोई ढोबळ उत्पन्नातील वार्षिक वाढ, २. लोकांच्या – विशेषत: दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या – जीवनशैलीत झालेली सुधारणा, आणि ३. प्रत्येक तऱ्हेच्या जीवनशैलीत आपल्या सांस्कृतिक वारशातून भारताचे वैशिष्ट्य असलेली जी जीवनमूल्ये दर पिढीकडे येत असतात, त्यांचा अंगीकार. म्हणजेच, एन.पी.आय. = १+२+३. विशेषत: नं.२चे कार्य प्रत्येकाला निवाऱ्याची उपलब्धता, चांगले पाणी, चांगला आहार, योग्य ती स्वच्छता, सांडपाणी-व्यवस्था, चांगले शिक्षण, चांगल्या आरोग्यसुविधा आणि नोकऱ्या मिळण्याच्या शक्यता हे सर्व यात आहे. नं. ३चे कार्य – एकत्र कुटुंबपद्धतीला प्रोत्साहन देणे, एकजुटीने काम करण्याचा उत्साह सर्वांमध्ये आणणे, चांगले प्रामाणिक आयुष्य जगणे, समाजातील भेदभाव दूर करणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तंटे-बखेडे नसलेला मैत्रीपूर्ण समाज निर्मिण्यास प्रोत्साहन देणे. हे झाले आहे की नाही हे कळण्याचा मार्ग म्हणजे कौटुंबिक व जातीय शांतता नांदणे, लाचलुचपतखोरी कमी होणे, कोर्टकज्जे कमी होणे, मुले व स्त्रिया ह्यांच्यावरील अत्याचार बंद होणे आणि जातीय तणाव नसणे. तसेच दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या लोकांच्या संख्येत घट होत गेली पाहिजे; इतकी की, २०२०पर्यंत ही संख्या शून्याच्या जवळपास पोहोचली पाहिजे. राष्ट्रीय आर्थिक सुधारणांचे आकडे वाढवण्याचे काम कुठल्याही वर्षी देशाच्या राष्ट्रीय विकासदराचा आकडा बघून झाले पाहिजे.

ही संकल्पना प्रत्यक्षात कशी आणता येईल? तशी ती आणण्यासाठी ताबडतोब केल्या पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या?

माझा तुमच्यापैकी बऱ्याच जणांशी झालेला संवाद आणि मी वेगवेगळ्या राज्य व केंद्र स्तरावरील कार्यक्रमांमधून जे समजू शकलो, ते असे – खासगी आणि बिनसरकारी संस्थांनी घेतलेला पुढाकार, तसेच राष्ट्राच्या विकासाच्या कामात सहभागी होण्याची नागरिकांची तीव्र इच्छा, ह्या सर्वांमुळे मला विश्वास वाटतो की, ह्या संकल्पनांचे ध्येय गाठण्यासाठी काम करण्यास आपला समाज तयार आहे. तुम्ही सर्वांनी पुढाकार घेऊन दोन गोष्टी करता येण्यासारख्या आहेत, त्या मी सुचवू का?

1. ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे विधेयक – ऊर्जेसाठी तीन अंगांनी विचार करावा, ज्यामुळे पर्यावरण स्वच्छ राहण्यास मदत होईल.
2. व्हिजन-२०२० : एक ठराव संमत करावा की, राष्ट्रीय विकासदराचा मापदंड धरुन २०२० येण्यापूर्वीच भारत हा सुरक्षित, संपन्न, सुखी आणि आर्थिक दृष्ट्या विकसित देश आपण केला असेल.

ही विधेयके ठरवलेल्या मुदतीत प्रत्यक्षात उतरवण्याचे महत्त्व आहे, हे माझ्यासारखेच तुम्हालाही पटेल.

मी ह्या प्रश्नांना वा मुद्द्यांना इतके महत्त्व देतो की, ह्या पुस्तकात त्यांविषयी मी जास्त विस्ताराने पुढेही लिहिले आहे.

राष्ट्रपती भवनात मला लक्षात राहण्यासारखा विलक्षण अनुभव आला. एखाद्या राज्याबद्दल किंवा संस्थेबद्दल मी संदर्भासाठी लागणारी माहिती, आकडेवारी इत्यादी एखाद्या मंत्रालयाकडून किंवा सरकारच्या एखाद्या खात्याकडून अथवा नियोजन आयोगाकडून किंवा थेट त्या राज्य सरकारकडून मागवली; तर अत्यंत बिनचूक आणि अगदी ताजी माहिती, राष्ट्रपतींच्या सचिवालयातून स्मरणपत्र न पाठवताही तत्परतेने पाठवली जात असे. राष्ट्राला, संसदेला, विविध राज्य विधिमंडळांमध्ये किंवा खासगी कंपन्यांमध्ये, विद्यापीठे इत्यादींना उद्देशून करायची असणारी माझी भाषणे तयार करण्यासाठी हा माहितीचा स्त्रोत अत्यंत उपयोगी पडत असे. ही उपलब्ध असणारी सोय अत्यंत उपयोगी पडणारी होती, जी पूर्वी अशा प्रकारे वापरली गेली नव्हती.

दुसरी एक मूलभूत महत्त्वाची कार्यक्षमता आम्ही राष्ट्रपती भवनामध्ये तयार केली होती. ती होती, इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या साह्याने कॉम्प्युटरवर परिषदा किंवा बैठका (व्हर्च्युअल कॉन्फरन्स किंवा मीटिंग) घेण्याची सुविधा. ह्या सुविधेमुळे लांबलांबच्या प्रदेशांमधल्या, वेगवेगळ्या संस्थांमधल्या तज्ज्ञांशी एखाद्या मुद्द्यावर प्रदीर्घ चर्चा करणे शक्य होत होते. माझ्या राष्ट्रपतिपदाच्या कार्यकाळात बारा राज्यांच्या विधिमंडळांमध्ये मी सदस्यांना संबोधून भाषणे दिली. माहिती गोळा करणे, तिचे वर्गीकरण, त्यांतील ठळक मुद्दे, तज्ज्ञांनी सुचविलेले उपाय, हे सर्व गोळा करुन विकासाचे ध्येय गाठण्याची भाषणे तयार करण्यास साधारणपणे पंधरा दिवस ते एक महिना लागत असे. व्हर्च्युअल परिषदा साधारणपणे रात्री आठ वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंतच्या वेळात राष्ट्रपती भवनात संगणकीय सुविधेद्वारे घेतल्या जात असत, कारण त्या वेळात बहुधा ह्या तज्ज्ञ मंडळींना सल्ला द्यायला वेळ उपलब्ध असे. आम्ही जी राज्ये निवडली होती, ती होती – जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, मिझोराम, मेघालय, सिक्कीम आणि पुडुचेरी.

कुठल्याही राज्याच्या उत्कर्षासाठी विशेष कामे सुचवली जाण्यापूर्वी तेथील सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जात असे. ह्या अभ्यासात दरडोई उत्पन्न, साक्षरतेचे प्रमाण, दारिद्र्यरेषेखालील प्रजेची संख्या, बेरोजगारीचे प्रमाण; तसेच राज्याची शेती, उद्योग, व्यवसाय ह्या क्षेत्रांमधील मूलभूत कार्यक्षमता ह्या सर्वांचा समावेश असे. उदाहरणार्थ – बिहारने करावीत अशी जी लक्ष्ये निवडली, ती अशी होती – १. शेती आणि शेतात पिकणाऱ्या पिकांची गुणवत्ता वाढवणे, २. शिक्षण आणि स्वयंरोजगार सुरु करणे, ३. मनुष्यबळाचा योग्य उपयोग करुन घेणे, ४. नालंदामध्ये आंतरराष्ट्रीय विद्यापीठ उभे करणे, ५. आरोग्यसेवेचे काम हाती घेणे, ६. पुराच्या पाण्याचे नियोजन, ७.

पर्यटनव्यवसाय, ८. पायाभूत सुविधा, ९. विशेष आर्थिक विभाग (एस.ई.झेड. – सेझ) आणि १०. ई-गव्हर्नन्स – इंटरनेटवरुन राज्यकारभार चालवणे.

अशी दहा उद्दिष्टे बिहारच्या विकासासाठी तयार केली. त्यानंतर त्यांचा परिणाम म्हणून बिहारचे माणशी उत्पन्न २००५-०६मध्ये ६३०० होते, ते २०१०मध्ये ३५०००पर्यंत वाढले. लोकांनी गुंतवणूक करावी असे वातावरण तयार केल्याने नोकऱ्यांच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आणि ३१ डिसेंबर, २००५ला ज्या एक कोटी लोकांना नोकऱ्या नव्हत्या किंवा चांगल्या नोकऱ्या नव्हत्या, त्यांना नोकरी मिळण्याच्या फार मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. बिहारने २०१५पर्यंत शंभर टक्के साक्षरतेचे व सर्वांना नोकऱ्या मिळवून देण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. बिहार सरकारने बऱ्याच योजना हाती घेतल्या आहेत आणि मला हे बघून आनंद होतो की, आज देशातील सर्वांत झपाट्याने प्रगती करणारे राज्य बिहार आहे. त्यामुळे कामाच्या शोधात राज्य सोडून बाहेर जाणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. ह्यावरुन उघडच दिसते की, मोठ्या प्रमाणात चांगल्या नोकऱ्या मिळण्याचे प्रमाण बिहारमध्ये वाढले आहे.

विधिमंडळाच्या सदस्यांनी ह्या सर्व कामात चांगला सहभाग घेतला. आम्ही जे सादरीकरण केले, त्यामुळे कृतिशील कार्यक्रमांना राज्यात सुरुवात करण्यात आली. विधिमंडळात दिलेल्या भाषणानंतर मी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंना आणि चेम्बर ऑफ कॉमर्सच्या सभासदांनाही याच मुद्द्यावर संबोधित केले.

केरळमध्ये त्या राज्यासाठी निवडलेल्या उद्दिष्टांवरील लिखाणाचा 'मल्याळ मनोरमा'ने मल्याळीमध्ये अनुवाद केला. जिल्हास्तरीय कार्यशाळा घेतल्या आणि ती कामे यशस्वी रीतीने पार कशी पाडता येतील, ह्यावर तज्ज्ञांची मते घेऊन ती विधिमंडळाकडे पाठवली. इतर राज्यांमध्येही प्रसारमाध्यमांनी त्या भाषणांना चांगली प्रसिद्धी दिली आणि राज्यांमधल्या संस्थांकडून मला अपेक्षित असा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

संस्कृती व जीवनमूल्ये ह्यांच्या एका धाग्याने शंभर कोटी लोकांना जोडण्याचे माझे स्वप्न आहे. आपले महान प्राचीन ग्रंथ आपल्या वैभवशाली भूतकाळाची आठवण आपल्याला करुन देतात आणि त्यांच्यामध्येच एका सुंदर भविष्यकाळाची आशाही आहे.

६
इतरांकडून शिकणे

'May I be a protector for those without one,
A guide for all travellers on the way;
May I be a bridge, a boat and a ship
For all who wish to cross (the water)'
– Acharya Shantideva (an 8th century Buddhist Master)

'ज्यांचा कोणी रक्षणकर्ता नसेल,
त्यांचे रक्षण मला करता यावे;
वाटेवरच्या सर्व प्रवाशांचा वाटाड्या मी व्हावे;
ज्यांना पाण्याच्या पलीकडे जायचे असेल, त्यांच्यासाठी
मी पूल, होडी आणि जहाज व्हावे.'
– आचार्य शांतिदेव (आठव्या शतकातील एक बौद्धधर्मीय गुरु)

एकदिलाने काम करुन दाखवणाऱ्यांचे मला नेहमीच खूप कौतुक वाटत आले आहे. तसे करुन दाखवणे सोपे नसते, म्हणूनच ध्येय साध्य न होण्याचे कारण दृष्टिकोनातील मतभेद असल्याचे निदर्शनास येते. अग्निबाण आणि क्षेपणास्त्र विकसाच्या प्रक्रियेत बऱ्याच लोकांना एकत्र काम करायचे असायचे. तेव्हा मी लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतीचे बारकाईने निरीक्षण करायला सुरुवात केली आणि त्यांच्याकडूनच शिकू लागलो. नंतर 'इंडिया २०२०'ची कल्पना सर्वांच्या सहकार्यातून तयार करत होतो, तेव्हा ही सवय खूपच वाढली. राष्ट्रपती असताना आणि नंतरही माझ्या सुदैवाने अनुभवी आणि जरा नवखे अशा दोन्ही प्रकारच्या लोकांच्या कल्पनांचा, मतांचा आणि टीकेचा फायदा मला मिळाला. सर्व तऱ्हेची मते आणि चौकशा व शंका ह्यांनी आपले ज्ञान वाढून त्यातूनच माणसाची प्रगती होते. हजारो माणसांशी झालेल्या संवादातूनही ज्या काही प्रसंगांनी एक व्यक्ती म्हणून माझ्यावर परिणाम केला, त्यांतले काही प्रसंग मी उदाहरण म्हणून इथं सांगणार आहे.

भेटवस्तूंविषयी...

ही घटना मी बऱ्याचदा सांगितली आहे, म्हणून येथे थोडक्यात सांगतो. माझे पिता जनाब अवुल पाकिर जैनुलाब्दीन ह्यांनी मी लहान असताना मला एक खूप मोठा धडा शिकवला. भारत १९४७मध्ये स्वतंत्र झाल्यावर लगेचच घडलेला हा प्रसंग. रामेश्वरमच्या बेटावर ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या आणि माझे वडील सरपंचपदी निवडले गेले. ते अमुक धर्माचे होते किंवा जातीचे होते म्हणून वा आर्थिक स्थिती चांगली होती म्हणून निवडून आले नव्हते. केवळ उदार मनाचे होते आणि एक माणूस म्हणून ते मोठे होते,

त्यामुळे त्यांची निवड झाली होती.

ज्या दिवशी माझे वडील प्रमुख (सरपंच) म्हणून निवडले गेले, त्या दिवशी एक गृहस्थ आमच्या घरी आले. मी अजून शाळकरी मुलगा होतो आणि मोठमोठ्याने धडा वाचत असताना कोणी तरी दरवाजा ठोठावला. त्या काळी रामेश्वरममध्ये आम्ही घरांना कुलूप लावतच नसू. एक गृहस्थ आत आले आणि त्यांनी मला 'वडील कुठे आहेत?' असे विचारले. मी सांगितले की, ते संध्याकाळचा नमाज पढायला गेले आहेत. मग ते म्हणाले की, त्यांनी माझ्या वडिलांसाठी काही तरी आणले आहे आणि ते ती वस्तू इथं ठेवून गेले तर चालेल का? मी म्हटले, ती वस्तू तिकडे कॉटवर ठेवा आणि मी माझा अभ्यास करत राहिलो.

माझे वडील जेव्हा परत आले, तेव्हा त्यांनी कॉटवर ठेवलेले चांदीचे ताट आणि त्यातील भेटवस्तू बघितल्या. त्यांनी मला विचारले की, ह्या कोणी दिल्या? तेव्हा मी सांगितले की, कोणी तरी गृहस्थ आले होते आणि तुमच्यासाठी ह्या वस्तू ठेवून गेले. त्यांनी त्या भेटवस्तू उघडल्या... तर आत भारी कपडे, काही चांदीचे कप, फळे आणि मिठाया होत्या. ते सगळे बघून ते अस्वस्थ झाले आणि खूप रागावले. मी भावंडांमध्ये सर्वांत लहान होतो आणि माझ्या वडिलांचा खूप लाडका होतो. मलाही ते खूप आवडायचे. मी प्रथमच त्यांना इतके रागावलेले बघितले आणि प्रथमच त्यांच्या हातचा खूप मारही खाल्ला. मी घाबरुन रडू लागलो. नंतर मग माझ्या वडिलांनी ते का रागावले, ते सांगितले. ते म्हणाले की, त्यांच्या परवानगीशिवाय कुठलीही भेटवस्तू कधीही स्वीकारायची नाही. त्यांनी मग मुहम्मद पैगंबरांनी सांगितलेली इस्लामची एक परंपरा सांगितली, जी अशी आहे – 'जेव्हा अल्ला एखाद्या माणसाची नेमणूक एखाद्या पदावर करतो, तेव्हा त्याच्या अन्नपाण्याची व्यवस्था तो करतो. त्याव्यतिरिक्त जर त्या माणसाने काही घेतले, तर ती बेकायदा मिळकत झाली.'

मग ते मला म्हणाले की, भेट किंवा देणग्या घेणे ही चांगली सवय नाही. भेटवस्तू देण्यामागे नेहमी मनात काही हेतू असतो, म्हणून ती धोकादायक बाब आहे. हे म्हणजे सापाला हात लावून बदल्यात त्याचे विष घेणे आहे. आज मी ऐंशी वर्षांचा झालो आहे, तरीही हा धडा माझ्या मनावर कोरलेला आहे. त्या प्रसंगाचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला आणि त्याने माझी जीवनमूल्ये घडवली. अजूनही, एखादा मनुष्य माझ्यासमोर एखादी भेट घेऊन येतो, तेव्हा माझे शरीर आणि मनही थरथरते.

पुढील आयुष्यात मी मनस्मृतीचा अभ्यास केला. मनूने घालून दिलेले नियम – जे हिंदू धर्माच्या विचारांचे आधारभूत लेखन समजले जाते – त्यात म्हटले आहे की, भेटवस्तू किंवा देणगी घेण्याने मनुष्याच्या अंतर्यामी जो दिव्य प्रकाश असतो, तो विझून जातो. मनू प्रत्येक मानवाला भेटवस्तू घेण्यातला धोका सांगताना म्हणतो की, त्यामुळे भेट घेणाऱ्यावर देणाऱ्याच्या उपकाराचे ओझे येते आणि शेवटी घेणाऱ्या मनुष्याकडून अनैतिक किंवा बेकायदा कामे करण्यात त्याचा परिणाम होतो.

जीवनमूल्ये जोपासण्याची पद्धती

काही महिन्यांपूर्वी माझ्या वडीलभावाचा – जो तेव्हा तो पंचाण्णव वर्षांचा होता – रामेश्वरमहून फोन आला. अमेरिकेत राहणारा माझा एक भारतीय मित्र त्याला भेटायला गेला होता, त्याबद्दल सांगण्याने त्याने संभाषणाची सुरुवात केली. गप्पा मारता-मारता माझ्या मित्रने माझ्या भावाला विचारले, "हे तुमचे घर किती जुने आहे?" भावाने त्याला सांगितले की, घर आमच्या वडिलांनी शंभराहून जास्त वर्षांपूर्वी बांधले होते. माझा धाकटा भाऊ आणि त्याची मिळवती झालेली नातवंडे ह्यांनी आता हे घर पाडून त्याच जागी नवे बांधायचा बेत केला होता. माझा मित्र म्हणाला की, इतके ऐतिहासिक घर पाडलेले बघायला त्याला आवडणार नाही. तो अशी व्यवस्था करायला तयार होता की, एक ट्रस्ट स्थापून त्या घरामध्ये संग्रहालय व ग्रंथालय करुन माझा भाऊ आणि त्याच्या कुटुंबाला राहाण्यासाठी दुसऱ्या जागेची व्यवस्था करेल. माझ्या थोरल्या भावाने असे सांगायला फोन केला होता की, तो माझ्या मित्राच्या सूचनेच्या विरोधात होता. तो म्हणाला, "मी ज्या घरात मोठा झालो आणि पंचाण्णव वर्षे राहिलो, तिथंच राहायला मला आवडेल. मला ह्याच जागेवर माझ्या कुटुंबीयांसाठी त्यांच्याच मिळकतीतून नवं घर बांधायला आवडेल. मला ह्याखेरीज दुसरी काही व्यवस्था केलेली आवडणार नाही. तू तुझ्या मित्राचे छान, चांगल्या शब्दांत आभार मानायचे काम कर." माझ्या मनात आले – 'हा मनुष्य असा आहे, त्याला जसे जगायचे आहे तसे जगेल आणि चांगल्या हेतूने दिलेली असली, तरी कुठलीही मदत त्याला नको आहे.' माझ्यासाठी यात शिकण्यासारखे षुष्कळ होते आणि माझ्या भावामध्ये मला माझ्या वडिलांचे प्रतिबिंब दिसले, जे एकशे-तीन वर्षे जगले आणि अशी परंपरा आमच्या मनांवर ठसवून गेले.

हज यात्रा

तो दिवस खूप धावपळीचा होता. बऱ्याच जणांना भेटायचे होते, बरेच निर्णय घ्यायचे होते, बऱ्याच फाइल्स पुन्हा एकदा बघायच्या होत्या. अशा वेळी मक्केहून माझ्या भावाच्या नातवाचा फोन आला. माझ्या आयुष्यातला एक सर्वांत मोठा बेत पार पाडायची जबाबदारी त्याने घेतली होती. माझ्या कुटुंबातील तिघं जण विशेष महत्त्वाच्या अशा पवित्र यात्रेला निघाले होते. माझ्या कुटुंबातल्या तीन पिढ्यांचे ते प्रतिनिधी होते – तेव्हा नव्वद वर्षांचा असलेला माझा मोठा भाऊ, माझ्या भावाची मुलगी आणि भावाचा नातू. हे तिघं चेन्नईहून २००५च्या डिसेंबर अखेरीस हज यात्रेसाठी निघाले होते.

ही यात्रा व्हावी, असे माझ्या मनात फार होते; कारण माझा भाऊ आता बराच वृद्ध झाला होता. त्याच्या श्रद्धेच्या बळावरच त्या तिघांना आम्ही ह्या यात्रेला पाठवले होते. सौदी अरेबियातल्या आपल्या राजदूतांना त्यांच्या ह्या प्रवासाबद्दल कळले आणि त्यांनी मला राष्ट्रपती भवनमध्ये फोन केला. जरुर असेल ती सर्व मदत देण्याची इच्छा व्यक्त केली. मी त्यांना सांगितले, "राजदूतमहाशय, माझी एक विनंती आहे. कुठल्याही सरकारी मदतीशिवाय, एक सामान्य नागरिक म्हणून यात्रेला जाण्याची माझ्या भावाची इच्छा आहे. ही त्याची वैयक्तिक इच्छा आहे." माझ्या भावाने आग्रह धरला की, ह्या यात्रेसाठी

निवड करणारी जी हज कमिटी असते; त्यांच्या निवडपद्धतीतूनच ते जातील. त्याच्या नातवाने स्वत: जाऊन सगळे देतात त्या पद्धतीने अर्ज दिला आणि ठरलेल्या पद्धतीतून अल्लाच्या कृपेने त्यांचा अर्ज कमिटीने निवडला.

प्रवास पन्नास दिवसांचा होता आणि यात्रेच्या ठरलेल्या मार्गाप्रमाणे वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देत जायचे होते. त्याचबरोबर यात्रेच्या काळातील विविध कर्तव्ये, विधी पार पाडायचे होते.

माझ्या भावाला यात्रेमध्ये आधार असावा, म्हणून मीच त्याच्याबरोबर त्याची मुलगी आणि नातवाला जायला सांगितले होते. पण माझ्या भावाने सर्व गैरसोई आणि अनिश्चिततांना तोंड देण्यात खूपच लवचिकपणा आणि काटकपणा दाखवला. त्याच्या नातवाला त्याने सारे निर्णय घेऊ दिले आणि त्यामध्ये काहीही बदल न सुचवता, तो सांगेल तसे वागत राहिला. परंतु दुर्दैवाने त्याच्या नातवालाच यात्रा चालू असताना खूप ताप चढला. माझ्या भावानंच मग परिस्थितीचा ताबा घेतला – जसा कुटुंबात काहीही प्रश्न उभा राहिला की, तो नेहमीच घेत आला आहे! मशिदीत जाऊन येणे, जेवणाची व्यवस्था करणे – सगळ्याची स्वत:च व्यवस्था करुन जरुर पडली, तेव्हा डॉक्टरांनाही बोलावले. त्याच्या नातवाने मला सांगितले की, त्याला आठवत होते त्याप्रमाणे रात्री माझा भाऊ त्याच्या अंथरुणापाशी प्रार्थना करत किमान तीन तास उभा होता! आणि नातू बरा झाल्यावर तो पुन्हा नेहमीप्रमाणे शांतपणे प्रार्थना करु लागला.

त्याच्या नातवाने मला गेल्या काही दिवसांत घडलेले प्रसंग सांगितले. 'मिना' येथे तंबूमध्ये राहिल्यानंतर ते अराफतला जायला निघाले. अराफत ह्या जागी सुमारे पन्नास लाख यात्रेकरु जमतात. हात जोडून ते आकाशाकडे उंच करुन प्रार्थना करत असलेला माझा भाऊ माझ्या डोळ्यांपुढे मला दिसला!

एक दिवस त्याचा नातू त्या भव्य मशिदीच्या वरच्या मजल्यावर नमाज पढून खाली उतरत होता. यात्रेकरुंना जिन्यावरुन खाली उतरावे लागत होते, कारण अपघात टाळण्यासाठी यांत्रिक जिने बंद करण्यात आले होते. पण लोकांची गर्दी खूप असल्याने सगळे एकमेकांना खेटून चालले होते, त्यामुळे जिन्याने उतरणे सोपे नव्हते. भावाचा नातू गर्दीच्या धक्काबुक्कीत भिंतीकडे ढकलला गेला. त्याला धड श्वास घेता येईना आणि तो श्वासासाठी धडपडत होता. तेवढ्यात एकाएकी त्याला दाब कमी झाल्यासारखा वाटला आणि त्याच्या भोवती थोडी मोकळी जागाही तयार झाली! त्याला धडपडताना बघून आफ्रिकेचा एक मजबूत बांध्याचा यात्रेकरु त्याच्या पुढे येऊन उभा राहिला होता आणि त्याचे त्या अलोट गर्दीपासून रक्षण करत होता. ते खाली तळमजल्यावर पोहोचले, तोपर्यंत त्याचे आभार मानण्याची संधीही न देता तो आफ्रिकन यात्रेकरु निघून गेला होता!

दुसरा प्रसंग ह्याहूनही मनाला जास्त दिलासा देणारा आहे. अराफतमधल्या प्रार्थना झाल्यावर ते मिनाला परत येत होते. सर्व पन्नास लाख यात्रेकरुंना ते १५ किलोमीटरचे

अंतर त्याच दिवशी पार करायचे होते. त्यांच्या वाहनाचा एअरकंडिशनर नादुरुस्त झाला आणि बाहेर वाळवंटातली प्रचंड उष्णता होती. माझ्या भावाने पाणी किंवा अन्न घ्यायचे नाकारले आणि तो फक्त संपूर्ण वेळ प्रार्थना करत राहिला. त्याचे वाहन दर अर्ध्या तासाने इंचा-इंचाने पुढे सरकत होते. असेच आठ तास गेले होते. शेवटी ड्रायव्हरने सुचवले की, मुक्कामी पोहोचण्यासाठी उरलेले अंतर त्यांनी चालत जाऊन पार करावे, कारण त्यासाठी सुमारे अर्धाच तास लागला असता. माझ्या भावाने ह्या सूचनेप्रमाणे चालत जायचे ठरवले. त्याच्या नातवाने माझ्या भावाला त्याच्या मनाविरुद्ध व्हीलचेअरमध्ये बसवले आणि तो त्याला घेऊन निघाला. ते अशा जागी येऊन पोहोचले, जेथे रस्त्यात एक मोठा खड्डा होता. माझ्या भावाला व्हीलचेअरमधून उतरावे लागणार होते आणि तो मोठा खड्डा ओलांडावा लागणार होता. दोन यात्रेकरुंनी माझ्या भावाला व्हीलचेअरवर बसलेले बघितले आणि त्याला 'बसून राहा' अशी खूण केली. त्याचा नातू काही म्हणणार एवढ्यात त्या आलेल्या दोघांनी व्हीलचेअरसकट माझ्या भावाला उचलून खड्ड्याच्या पलीकडे ठेवले. ह्याही वेळी कोणी आभार मानण्याची वाट बघत ते थांबले नाहीत.

'मुझदालिफा' नावाच्या जागी त्यांना उघड्यावर रात्र काढावी लागली. वाळवंटातली खूप गारठा असणारी ती रात्र होती आणि ते सर्व जण जमिनीवर खाली फक्त एक सतरंजी अंथरुन तिच्यावर झोपले. अंगातले कपडेही पातळच होते, त्यामुळे थंडीपासून फारच थोडा बचाव होत होता. उजाडले, तेव्हा स्वच्छतागृहांसमोर प्रचंड रांगा लागल्या. घरी असताना ज्या लोकांनी आपला नंबर लावून घ्यायला मारामाऱ्या केल्या असत्या, ते सगळे लोक शांतपणे गप्प उभे होते. एका रांगेत एक बाई तिचा नंबर येण्याची वाट पाहत जवळजवळ तासभर उभी होती. एक लहान मुलगी त्या रांगेपाशी आली आणि तिने त्या बाईकडे रांग सोडून पुढे जाण्याची परवानगी मागितली. रांगेतल्या इतर सर्वांनी त्या बाईलाच काय ते ठरवू दिले. तिने त्या मुलीला पुढे जाऊ दिले. मग झाले असे की, थोड्या वेळाने एक म्हातारी बाई आली आणि तिनंही पुढे जाऊ देण्याची परवानगी मागितली. ह्या वेळी हे सर्व बघत असणाऱ्यांना वाटले की, इतका वेळ थांबल्यावर ती त्या म्हाताऱ्या बाईला पुढे जायला परवानगी देणार नाही. पण तिने ताबडतोब त्या म्हाताऱ्या बाईला आधी जाऊ दिले, तेव्हा त्या सगळ्यांना आश्चर्य वाटले. लक्षात घेण्याची विशेष गोष्ट ही आहे की, त्यांना कोणालाही एकमेकांची भाषा येत नव्हती आणि खाणाखुणांनीच सर्व संभाषण चालले होते! पण ह्या प्रसंगावरुन समजते की, आपल्या वागणुकीतल्या छोट्या-छोट्या गोष्टींनीही आपली आयुष्ये किती मोठ्या उंचीवर जाऊ शकतात.

संधी दिली, तर इतर माणसांबद्दल आपल्याला वाटणारे प्रेम हे बांध न घातलेल्या नदीसारखे वाहत सगळे भेदभाव धुऊन टाकत जाते, हे माझ्या भावाची मुलगी नझिमा आणि नातू गुलाम के. मोइनुद्दीन ह्यांनी सांगितलेल्या त्या हकिगतींवरुन समजले.

फील्ड मार्शल सॅम माणेकशा

मी एकदा २००६मध्ये मी कोईमतूरला होतो, तेव्हा राष्ट्रपती भवनामध्ये फील्ड मार्शल

माणेकशांचा फोन आला होता, हे मला कळवण्यात आले. मी म्हटले, ''मला वेलिंग्टनच्या आर्मी हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांना भेटलेच पाहिजे.'' त्यांच्या आणि माझ्या पहिल्या भेटीबद्दल आधी सांगतो.

सन १९९०मध्ये एक दिवस मी इंडियन एअरलाइन्सच्या विमानाने प्रवास करत होतो, आणि बघतो तर शेजारच्या सीटवर फील्ड मार्शल एस.एच.एफ.जे. सॅम माणेकशा! मी संरक्षणमंत्र्यांचा शास्त्रीय विषयातील सल्लागार अशी माझी ओळख करुन दिली. त्यांनी विचारले, ''चांगला आहे का तो माणूस?'' मग पुढचा प्रश्न होता, ''वय काय तुमचं?'' मी सांगितले की, मी एकोणसत्तर वर्षांचा आहे. ह्यावर ते म्हणाले, ''बच्चा आहेस अजून!'' मला कधीच वाटले नव्हते की, मी फील्ड मार्शलना लष्कराचा सरसेनापती म्हणून भेटेन. मी त्यांच्या खोलीत गेल्याबरोबर त्यांनी बाकी सगळ्यांना बाहेर जायला सांगितले. मला त्यांनी त्यांच्याजवळ बसवून घेतले आणि म्हणाले, ''किती चांगला राष्ट्रपती आहेस तू! माझ्या हातात आता काहीच सत्ता नसताना तू एका सैनिकाचा मान ठेवतो आहेस!'' मला भेटून त्यांना खूप बरं वाटले. ते वृद्ध होते, अंथरुणाला खिळलेले होते; तरीही त्यांच्या मनात अजूनही आपल्या लष्कराचे महत्त्व ह्याबद्दलच विचार घोळत असत. ''त्यांची ताकद वाढवत राहिले पाहिजे. याचे कारण आपल्याला शत्रु आहेत आणि नवनवी युद्धतंत्रं तयार होत असतात, म्हणून.'' मग त्यांनी मला एक विचारात टाकणारा प्रश्न विचारला, ''कलाम, आणखी दहा वर्षांमध्ये सध्याची सगळीच शस्त्रं निरर्थक होतील आणि इलेक्ट्रॉनिक व सायबर युद्धं चालू होतील का? तुला काय वाटते?'' फील्ड मार्शलचा हा प्रश्न माझ्या मनात घोळत होता आणि नंतर एकदा मी जेव्हा एका मोठ्या आध्यित्मक गुरुंना भेटलो आणि त्यांच्याशी जगभरात अण्वस्त्रांची चढाओढ चालल्याबद्दल, त्यावर जग स्वार झाल्याबद्दल बोलत होतो, तेव्हा मला तो आठवला होता. मी जेव्हा फील्ड मार्शलना विचारले, ''मी तुमच्यासाठी काही करु शकतो का?'' तेव्हा ते म्हणाले, ''माहीत नाही. पण तुला एक गोष्ट सांगायची आहे की, फील्ड मार्शलचा किंवा तत्सम दर्जा ह्या देशात एकमेवाद्वितीय राहिला पाहिजे.'' त्यांचा हा शेरा मी लक्षात ठेवला.

दिल्लीला परत आल्याबरोबर दुसऱ्या काही कामासाठी पंतप्रधानांशी माझी भेट झाली, तेव्हा मी त्यांना सांगितले, ''फील्ड मार्शल माणेकशांनी देशाची फार मोठी सेवा केली आहे, ह्या गोष्टीची दखल घेण्यासाठी आणखी काही तरी त्यांच्यासाठी आपण केले पाहिजे.'' त्याच रात्री परदेशातील काही मोठ्या पाहुण्यांसाठी खाना होता, तेव्हा मला भूसेनाप्रमुख आणि हवाईदलप्रमुखही भेटले. मी त्यांना फील्ड मार्शल माणेकशा आणि 'मार्शल ऑफ द एअर' अर्जनसिंग ह्यांच्या कामगिरीची दखल घेण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे आग्रहपूर्वक सांगितले. मग मी, माझे सचिव पी. एम. नायर ह्यांना ताबडतोब बोलावले आणि पंतप्रधानांना एक पत्र लिहून गतकाळापासून लागू असेल, अशी जरुर ती कार्यवाही करण्यास सांगितले.

सरकारने माझा प्रस्ताव आनंदाने मान्य केला आणि देशाप्रति केलेल्या त्यांच्या

कामगिरीला शोभेल असा वाढीव पगार त्यांना मागील काळापासून दिला. त्यांच्या हयातीतच ही दखल घेतली गेली, ह्याचा मला फार आनंद झाला.

अद्वितीय खुशवंत

आत्ता नव्वदीत असलेल्या खुशवंतसिंगांना भेटणे, हा एक खरोखरच विशेष अनुभव होता. मी त्यांची काही पुस्तके वाचली आहेत आणि 'हिंदुस्तान टाइम्स'मधील त्यांचा स्तंभ आवडीने नियमित वाचत आलो आहे. बऱ्याच लोकांनी मला विचारले की, मी विशेष करुन त्यांना का भेटलो? मी उत्तर दिले की, मला पुस्तके आणि त्यांचे लेखक फार आवडतात. पंचाण्णव्याव्या वर्षीही अथकपणे लिहीत राहणारे खुशवंतसिंग हे एक मोठे लेखक आहेत. त्यांनी त्यांच्या स्तंभामध्ये २००७मध्ये माझ्यावर लेख लिहिला होता. तो संक्षिप्त करुन मी पुढे देत आहे, कारण त्यात देव ह्या संकल्पनेवर त्यांची व माझी स्वत:ची मते मोठ्या रंजक भाषेत लिहिली आहेत, असे मला वाटले.

> ''आणखी काही महिन्यांमध्ये आपल्या प्रजासत्ताक देशाचे अकरावे राष्ट्रपती अब्दुल कलाम हे पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करुन निवृत्त होतील. देशाचे सर्वोच्च पद भूषवणारे ते तिसरे मुस्लिमधर्मीय आहेत. आपण स्वत:ला 'धर्मनिरपेक्ष लोकशाही' असे म्हणवतो, ते सिद्ध करण्यासाठी ही एक चांगली नोंद आहे आणि आपल्या शेजाऱ्यांना धडा शिकवणारीही.
>
> ''येथून पुढे ते शास्त्रीय संशोधनाकडे वळतील, का एखाद्या विद्यापीठात शिकवायला जातील की, मग संन्यास घेतील, ह्याची मला कल्पना नाही. त्यांनी सत्तरी ओलांडली आहे. त्यांच्याबरोबर अर्धा तास घालवण्याचा विशेष सन्मान मला मिळाला होता, जेव्हा त्यांनी माझ्या अपार्टमेंटमध्ये मला भेटायला येऊन माझा मान वाढवला. राष्ट्रपतींनी एखाद्या सामान्य लेखकाला भेट देणे, ह्यात त्यांची विनम्रता दिसते.
>
> ''आम्हा दोघांमध्ये समान अशा फारच थोड्या गोष्टी आहेत. ते 'तमिळ' आहेत. मला तमिळ भाषेचे फक्त दोन शब्द येतात – 'वणक्कम' आणि 'अय्यय्यो'. शास्त्रज्ञ असूनही कलाम हे अगदी मनापासून धार्मिक आहेत. मी अज्ञेयवादी आहे आणि मला वाटते की, शास्त्र आणि धर्म एकत्र नांदू शकत नाहीत. एक जण तर्कशुद्ध विचारांवर आधारित आहे, दुसरा श्रद्धेवर. त्यांच्याशी बोलल्यावर, त्यांचे लेखन वाचल्यावर मला त्यांचे धर्माबद्दलचे विचार महात्मा गांधींसारखे वाटतात. मी बापूंच्या सर्व मतांशी सहमत होऊ शकत नाही, तरीही मी स्वत:ला 'गांधीवादी' म्हणवतो. कलामांना शास्त्र आणि धर्म ह्यांच्यात काही विरोधाभास दिसत नाही. मी जेव्हा त्यांना विचारले की, 'डे ऑफ जज्मेंट' – ('ईश्वराच्या घरी निकाल होणे.') किंवा 'पुढील जन्मी मिळतील अशी बक्षिसे किंवा भोगाव्या लागतील अशा शिक्षा'

ह्यांवर त्यांचा विश्वास आहे का; तेव्हा त्यांनी स्पष्ट उत्तर देण्याचे टाळत असे उत्तर दिले की, स्वर्ग आणि नरक आपल्या मनातच आहेत....

''तर मग कलामांची देवाबद्दलची कल्पना काय आहे? ती अल्ला विरुद्ध ईश्वर – खुदा विरुद्ध भगवान – अशी नाही. त्याला मशिदीत किंवा मंदिरात शोधायचा नसतो. वेगवेगळ्या धर्मांचे लोक आपल्या देशात देवासाठी लढाया लढून हुतात्मे होतात. ते एकमेकांचे रक्त सांडतात; म्हणजे मग देवासारखी गर्जना ऐकू येते –

Suddenly a sound thundered from light,
'I am none of yours! All ye hear!
Love was my mission and you spent it on hatred,
Killing my delight, stifling life,
Know ye all : Khuda and Ram
Both are one, blossoming in love.'

प्रकाशातून वीज कडाडल्यासारख्या प्रचंड आवाज अचानक आला –
'तुम्ही सगळे ऐका! मी तुमच्यापैकी कोणाचाही नाही!
माझं काम प्रेम वाटणं हे होते आणि द्वेष करुन तुम्ही ते संपवलेत,
माझा आनंद मारुन टाकलात, आयुष्याचाच गळा दाबलात.
तुम्ही सगळे समजून घ्या – खुदा आणि राम
दोघं एकच आहेत – प्रेमभावनेनं उमलणारे.'

''कुठलाही तर्कवादी कलामांची देवाबद्दलची कल्पना नाकारु शकणार नाही. काही जण देवाची व्याख्या 'सत्य' अशी करतात, काही जण 'प्रेम' अशी करतात. कलाम ह्यांची देवाबद्दलची कल्पना सर्वांबद्दल कृपादृष्टी अशी आहे....''

मी त्यांच्या स्तंभातला उतारा अशासाठी दिला आहे की, त्यांच्यासारख्या लेखकाने एवढा वेळ घालवून माझ्या लेखनाचा अभ्यास करावा आणि देवाबद्दलच्या, धर्माबद्दलच्या आणि चांगला मनुष्य कोणाला म्हणावे, ह्याबद्दलच्या माझ्या मतांवर लिहावे, हा मला माझा विशेष गौरव वाटतो.

देण्याने मिळत जाते

तुमच्यापैकी काहींकडे भरपूर संपत्ती नक्कीच असेल. येथे मी अशा एका महान विभूतीची गोष्ट लिहिणार आहे, ज्याने मोकळेपणाने भरपूर दिले आहे आणि जगात खूप जणांना सुखी केले आहे. मला राष्ट्रपती म्हणून नव्हे, तर व्यक्तिगत असे एक निमंत्रण आले. त्यात लिहिले होते की, २००७मध्ये सिद्धगंगा मठ येथे होणार असलेल्या श्री श्री शिवकुमार स्वामीगळूंचा १००वा जन्मदिन उत्सव आहे, त्याचे उद्घाटन करण्यास मी आलेच पाहिजे.'

मी तेथे पोहोचलो, तेव्हा त्या द्रष्ट्या स्वामीजींना अभिवादन करण्यासाठी लाखो भक्तांची अफाट गर्दी जमली होती. व्यासपीठावर बरेच राजकीय नेते आणि धर्मगुरु होते. त्या सगळ्यांची भाषणे झाल्यावर स्वामीजी हातात एकही कागद न घेता उभे राहिले आणि काहीही 'तयारी' न करता त्यांनी त्यांच्या भक्तांना आशीर्वाद देणारे भाषण दिले. मी ते दृश्य बघून थक्क झालो. वयाची शंभर वर्षे पूर्ण केलेला तो तपस्वी ताठ उभा राहून, सुहास्य वदनाने बोलत होता. ते बघून मला प्रश्न पडला की, त्यांनी त्यांची ऊर्जा आणि उत्साह इतका उत्तम रीत्या टिकवून कसा ठेवला असेल? मग मला वाटले की, ते इतक्या मुक्त हस्ते देत राहिले आहेत, म्हणून केवळ ते शक्य आहे. शेकडो शिक्षणसंस्था, अनेक अनाथाश्रम आणि हजारो गरजू लोकांना रोज जेवण देणे – हे सर्व काही. शिवाय सेवेचे अथक काम, निरक्षरता आणि भेदभाव दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न ह्यामुळे त्या भागातील अनेक लोकांचा उद्धार झाला आहे. भारावून जाऊन माझ्या हातून लिहिले गेले –

WHAT CAN I GIVE?
O my fellow citizens,
In giving, you receive happiness,
in body and soul.
You have everything to give.
If you have knowledge, share it.
If you have resources, share them with the needy.
Use your mind and heart,
To remove the pain of the suffering,
And cheer the sad hearts.
In giving, you receive happiness.
Almighty will bless all your actions.

'हे माझ्या देशबांधवांनो,
देण्याने तुम्हाला आनंद मिळेल,
तुमच्या शरीराला आणि आत्म्यालाही.
तुमच्याकडे देण्यासारखे खूप आहे.
तुमच्याकडे ज्ञान असेल, तर ते इतरांना द्या.
तुमच्याकडे संपत्ती असेल, तर ती गरजूंना द्या.
अंतरीचे दु:ख दूर करण्यासाठी,
तुमचे मन अन् काळीज वापरा
आणि दु:खी लोकांना आनंदित करा.
देण्याने तुम्हाला आनंद मिळेल,
परमेश्वर तुमच्या सर्व कामांना आशीर्वाद देईल.'

पंतप्रधानांबरोबर संवाद

डीआरडीएलचा संचालक म्हणून, संरक्षणमंत्र्यांचा शास्त्रीय विषयांचा सल्लागार म्हणून, भारत सरकारचा शास्त्रीय विषयांसाठीचा प्रमुख सल्लागार म्हणून आणि राष्ट्रपती

म्हणून माझा बऱ्याच महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांशी संबंध आला. उदाहरणार्थ : डॉ. सतीश धवन, डॉ. राजा रामण्णा, डॉ. व्ही. एस. अरुणाचलम, आर. वेंकटरमण, पी. व्ही. नरसिंह राव, एच. डी. देवेगौडा, आय. के. गुजराल, अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग. ह्या सर्वांबरोबर आलेले संबंध अतिशय फलदायी झाले आणि त्यांनी माझ्यावर अमीट छाप सोडली.

डॉ. सतीश धवन हे माझे वरिष्ठ आणि इस्रोचे अध्यक्ष होते. त्यांच्याकडून मी शिकलो की, गुंतागुंतीची ध्येये पार पाडताना नेहमीच आव्हाने आणि प्रश्न उभे राहतात. ते म्हणायचे की, प्रश्नांना तुमच्यावर स्वार होऊ द्यायचे नाही; तुम्ही त्यांच्यावर स्वार होऊन, त्यांचा पराभव करुन यश मिळवायचे. गुंतागुंतीचे कठीण ध्येय गाठण्याचा प्रयत्न करणाऱ्याला हा फार मोठा धडा आहे. डॉ. राजा रामण्णा व डॉ. अरुणाचलम ह्यांच्यात मनुष्याच्या अंगातले कर्तृत्व, गुण ओळखण्याचे कसब होते आणि अवघड कामासाठी योग्य माणूस शोधून काढण्यासाठी ते खूप धडपड करायचे. आर. वेंकटरमण संरक्षणमंत्री असताना त्यांनी आपल्या देशाला लष्करासाठी 'लार्ज फोर्स मल्टिप्लायर सिस्टिम्स'ची गरज भासेल, हे आधीच ओळखले होते आणि तसे कार्यक्रम तयार करण्याचा त्यांनी तेव्हा निर्णय घेतला; ज्याचा आज खूप फायदा होत आहे.

नरसिंह राव ही चटकन समजून घेणारी आणि स्वच्छ मनाची व्यक्ती होती. त्यांना देशाच्या विकासासाठी आवश्यक असा कुठलाही विषय लगेच समजायचा. एकदा त्यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण सल्लागार समितीचे काम चालले होते आणि लष्कराच्या पुरवठा व वाहतूक विभागाचे महासंचालक हे डेअरी फार्मच्या कामाविषयी आणि त्यांच्या आधुनिकीकरणाच्या योजनांविषयी सादरीकरण करत होते. महासंचालक म्हणाले की, हळूहळू आम्ही म्हशींऐवजी जर्सी गाई आणत आहोत. राव ह्यांच्या ताबडतोब लक्षात आले की, म्हैस हा आपल्या देशातील खास प्राणी आहे – जी आपल्या प्रदेशातील साध्या तुरळक चाऱ्यावर व अन्नावर जगू शकते आणि खूप प्रोटिन्स असलेले दूध देते. ही आपल्या देशातील संपत्ती घालवून बसणे, आपल्याला परवडणारे नाही. तेव्हा ह्या प्रस्तावाचा पुनर्विचार करा आणि लष्कराच्या डेअरी फार्म्सची ही चूक ताबडतोब सुधारा, अशा त्यांनी सूचना दिल्या.

आणखी एकदा १९९५मध्ये कधी तरी संरक्षणासंबंधी कामांमध्ये स्वयंपूर्ण होण्यावर मी अहवाल देत होतो; तेव्हा राव ताबडतोब म्हणाले की, आपण असे धरुन चालतो आहोत की, संरक्षणावरील खर्च हा GDPच्या तीन टक्क्यांहून कमीच असला पाहिजे. ते म्हणाले, आपण अशी मर्यादा घालू नये. राष्ट्राच्या मजबूत संरक्षणासाठी काय करण्याची जरुर आहे, ते बघून खर्चाचे प्रमाण ठरवावे. GDP सतत बदलत राहू शकतो. हा खर्च त्यावर अवलंबून आपण कमी-जास्त करु शकत नाही.

मला आणखी एक उदाहरण आठवते. लष्कराच्या उपयोगी पडेल असा, तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकाच्या पुढे जाऊन 'अग्नी' क्षेपणास्त्रांचा पुढील कार्यक्रम डी.आर.डी.ओ.ने हाती घेणे आवश्यक होते. ही गरज श्री. राव यांच्या ताबडतोब लक्षात आली आणि काहीही प्रश्न

न विचारता माझा ८०० कोटी रुपयांचा एकपानी प्रस्ताव त्यांनी ताबडतोब मंजूर केला. गरजेनुसार त्यांचे आराखडे तयार करुन जरुर असेल तेव्हा लष्कराला क्षेपणास्त्रे पुरविण्याचे काम वेळेवर सुरु करण्याची संधी दिली. त्याच अनुषंगाने हा कार्यक्रम अर्थमंत्री डॉ.मनमोहनसिंग ह्यांनी मंजूर केला. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे प्रथम तो प्रस्ताव त्यांच्याकडे व नंतर पंतप्रधानांकडे जातो. नंतर ती फाइल कार्यक्रम अमलात आणण्याचे काम करणारे जे भारत सरकारमधील सचिव असतात, त्यांच्याकडे जाते. एखादे काम करण्याचे ठरवणे, त्याला परवानगी देणे व मग ते अमलात आणणे ह्यात जी 'वरुन खाली' (टॉप-डाउन) ही पद्धत असते, त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

पुढे २००४मध्ये मला डॉ. मनमोहनसिंगांच्या समीप राहून काम करण्याची संधी मिळाली. पंतप्रधान म्हणून काम करताना त्यांचे आर्थिक बाबींमधील सर्व कौशल्य त्यांनी देशाची प्रगती व्हावी म्हणून वापरले आणि अलीकडच्या काळात विकासदर नऊ टक्क्यांपर्यंत वाढला. पंतप्रधान म्हणून काम करताना त्यांचे वागणे विशेष मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे असते. अटलबिहारी वाजपेयींच्या निर्णय घेण्याच्या पद्धतीत मला नेहमी कोणतेही काम शक्य तितक्या लवकर पार पाडण्याची निकड जाणवत असे. ते १९९८मध्ये पंतप्रधान झाल्याबरोबर त्यांनी मला अणुचाचण्या घेण्याचे काम दिले. एकूण मला असे दिसले की, वाजपेयी कुठल्याही राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्व प्रश्नांवर त्वरित व ठाम निर्णय घेत असत. ऑगस्ट २००२मध्ये लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणात 'भारत २०२०पर्यंत विकसित राष्ट्र होणाच्या मार्गावर वाटचाल करेल', असे जाहीर सभेत सांगणारे तेच होते, हे मी पूर्वी सांगितलेच आहे. राष्ट्राचा भावी कार्यक्रम म्हणून 'भारत २०२०'चा १९९८मध्ये स्वीकार करणारे एच. डी. देवेगौडा हे पहिले पंतप्रधान होते.

चांगल्या लोकांना भेटण्याचा अनुभव, हेच एक प्रकारे शिक्षण असते. मी भाग्यवान आहे की, मला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर साधारणपणे भेटतात, त्याहून खूपच जास्त चांगली माणसे भेटली.

७
स्पर्धक राष्ट्र होण्याचा मार्ग...

'National economic development is powered by competition.
Competition is powered by knowledge.
Knowledge is powered by technology and innovation.'

'स्पर्धा असेल तरच देशाचा आर्थिक विकास होतो.
ज्ञान असेल, तर स्पर्धा करणे शक्य असते.
तंत्रज्ञान आणि नव्या कल्पना, नवी पद्धत ह्यांनी ज्ञान वाढते.'

देशातील बहुसंख्य जनता खेड्यांमध्ये राहते आणि तेथे राहणाऱ्या पंचाहत्तर कोटी लोकांचे जीवन जास्त चांगले व्हावे; ह्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे, हेच वैज्ञानिकांसमोरचे खरे आव्हान आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या क्षेत्रांमध्ये पन्नास वर्षे काम करत असताना मला नेहमीच असे वाटत आले आहे की, विकसनशील देशासाठी विकसित होण्याचा एकच मार्ग आहे – तो म्हणजे, ह्या दोन क्षेत्रांमध्ये आघाडीवर करत राहणे. ज्या तीन क्षेत्रांकडे आपण विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे, ती आहेत – 'नॅनोटेक्नॉलॉजी' (अत्यंत सूक्ष्मकामांचे तंत्रज्ञान) 'ई-गव्हर्नन्स' आणि 'बायोडिझेल' (जैवइंधन). तंत्रज्ञान वापरण्याच्या नव्या पद्धती विकसित करण्यासंबंधी विचार करताना मला असे वाटले की, राष्ट्रपती भवनापासूनच सुरुवात का करु नये?

गुंतागुंतीच्या आणि नव्याने सुरु करण्याच्या कामांसाठी बऱ्याच विशेषज्ञांनी एकत्र येऊन विचार केला पाहिजे, वेगवेगळी मते विचारात घेतली पाहिजेत आणि योजना व कृती प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे. ह्यासाठी राष्ट्रपती भवन व सिकंदराबादमधील राष्ट्रपतींचे विश्रामगृह राष्ट्रपती निलयम येथे तीन वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम पार पडले. ते म्हणजे – नॅनोटेक्नॉलॉजी परिषद, ई-गव्हर्नन्स कॉन्फरन्स आणि बायो-डिझेल कॉन्फरन्स. देशाच्या भविष्यकाळावर खूप चांगला परिणाम करु शकतील, असे हे कार्यक्रम खूपच महत्त्वाचे होते.

बेंगळुरु येथील 'जवाहरलाल नेहरु सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च'चे मानद अध्यक्ष प्रो. सी. एन. राव ह्यांच्याशी आणि भारतातील व परदेशातील इतर अनेक विशेषज्ञांशी मी गेली बरीच वर्षे भावी दिशेसंदर्भात चर्चा करत होतो. चर्चेचा विषय होता, नॅनोटेक्नॉलॉजीमध्ये संशोधन व विकास आणि त्याचा उपयोग शेती, वैद्यकशास्त्र, अवकाश व ऊर्जा ह्या क्षेत्रांमध्ये होऊ शकण्याच्या शक्यता. ह्या चर्चांनंतर मी राष्ट्रपती भवनामध्ये एक पूर्ण दिवसाची परिषद घेतली. तेथे झालेल्या चर्चा व सुचवल्या गेलेल्या कल्पना, ह्यांमधून संयुक्तपणे एक योजना तयार झाली; जिचा अपेक्षित खर्च १००० कोटींचा होता.

ह्या योजनेतून किती तरी महत्त्वाच्या सुधारणा आणि नव्या कल्पना प्रत्यक्षात उतरल्या. उदाहरणार्थ : बनारस हिंदू विद्यापीठाने एक सुधारित नॅनो-ट्यूब कार्बन फिल्टर बनवण्याची पद्धत शोधली; ज्यातून पाण्यातून व खनिज तेलातून लहान व मोठ्याही आकाराचे दूषित करणारे घटक गाळून परिणामकारकरीत्या काढून टाकता येतात. मला हे समजल्यावर खूप आनंद झाला. दिल्ली विद्यापीठाने त्यांचे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ आणि 'डाबर' ह्या खासगी कंपनीच्या साह्याने ट्यूमरच्या पेशींपर्यंत औषध थेट पोहोचवणारी पद्धत शोधली व ती यशस्वी झाली.

कार्यक्षम, परिणामकारक आणि पारदर्शक कारभार ही विकसित भारतासाठी आणि एक ज्ञाननिष्ठ समाज म्हणून आपली प्रगती होण्यासाठी प्राथमिक गरजेची गोष्ट आहे. ह्यासाठी खेडी, जिल्हे, राज्ये – अशा प्रत्येक स्तरावर विकेंद्रीकरण असूनही एकूण एकत्रित कार्यपद्धती असलेली अशी प्रक्रिया असणे, आवश्यक आहे. ह्या सर्व योजना करणे आणि त्या अमलात आणणे, ह्यासाठी सर्व राज्य सरकारे, केंद्र सरकार, तसेच खासगी आणि सार्वजनिक उद्योगांच्या सहभागांचा एकत्रित प्रयत्न होणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन ह्या सर्वांच्या प्रतिनिधींची ई-गव्हर्नन्स परिषद बोलावण्यात आली. आम्ही राष्ट्रपती भवनामध्येही ई-गव्हर्नन्सची पद्धत सुरु केली. ह्या विषयावर मी न्यायसंस्था, जमाखर्चाचे हिशोब तपासणाऱ्या संस्था आणि इतर अनेक क्षेत्रांतील संस्थांसमोर भाषणे दिली. राष्ट्रकुल परिषदेसमोरही मी बोललो, ते तेथे आलेल्या सर्वांना खूप आवडले. मला आशा आहे की, ई-गव्हर्नन्स पद्धती अमलात आणली आणि प्रत्येक नागरिकाला 'स्मार्ट ओळखपत्र' दिले गेले, तर जास्त सक्षम कार्यपद्धती तर होईलच; पण अतिरेकी आणि दहशतवादी ह्यांच्या विरुद्धच्या लढाईतही त्यांचा फायदा होईल.

मला असे वाटते की, भविष्यकाळात संघर्ष होण्यासाठी दोन महत्त्वाची कारणे असतील – पाणी आणि ऊर्जा. पाण्याचे साठे (तलाव, विहिरी इत्यादी) व्यवस्थित ठेवणे, हे साठे व त्यांचे स्त्रोत टिकवून ठेवणे आणि राज्यांमधील व देशातील नद्या जोडणे ह्यांचा विचार राज्यपालांच्या एका परिषदेत करण्यात आला. ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रचलित ऊर्जासाधनांपेक्षा वेगळे मार्ग शोधणे, ही आज काळाची गरज आहे, असे मी सातत्याने सांगत आलो आहे. वनस्पतीतून तेल काढणे हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. ते सांगण्यासाठी आणि त्याचा सर्वांगाने विचार करण्यासाठी आम्ही राष्ट्रपती निलयममध्ये एक परिषद बोलावली. इतर उपस्थितांबरोबर शेतीचा अनुभव असलेले शेतकरी होते आणि भावी ग्राहकही होतेच. शेतकी विद्यापीठांच्या कुलगुरुंनी जैवइंधन ज्यांमधून मिळू शकेल, अशा झाडांच्या बियांची वेगवेगळी वैशिष्ट्ये आणि त्या झाडांना कसे पाणी द्यावे लागते, ह्यासंबंधी झालेल्या संशोधनाबद्दल सांगितले. सरकारी अधिकाऱ्यांनी पडीक जमिनी वितरीत करण्यासंबंधीच्या प्रश्नांबद्दल सांगितले. ऑटोमोबाइल डिझाइनर्सनी इंजिनांमध्ये बदल न करता डिझेल आणि जैवइंधनाचे किती प्रमाणातले मिश्रण वापरता येईल, हे सांगितले आणि जैवइंधनाचे प्रमाण बदलायचे तर इंजिनमध्ये काय बदल करावे लागतील, हेही सांगितले. ह्या कामात किती पैसे गुंतवावे लागतील व खर्चाइतकी

उत्पन्नाची बरोबरी होण्यास (ब्रेक-ईव्हन पॉइंट) किती दिवस लागतील, ह्याबद्दल उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी बोलले. माझे जैवइंधनाच्या बाबतीतले विचार मी मांडले. परिषदेच्या शेवटी सर्व शिफारशी एकत्र करुन सर्वांना त्याच्या प्रती देण्यात आल्या. अशा रीतीने जैवइंधनाच्या धोरणाचा विकास झाला ह्याचा मला आनंद झाला.

ह्या तीन परिषदांव्यतिरिक्त तंत्रज्ञान ह्या विषयावर एक कार्यक्रम झाला, ज्याचे बीजारोपण राष्ट्रपती भवनामध्ये झाले.

इस्त्रोच्या तत्कालीन अध्यक्षांनी मला त्यांच्या भविष्यकाळातील 'अवकाशविषयक' कार्यक्रमांबद्दल २००६मध्ये सांगितले होते, त्यात चंद्रावर संशोधन करण्यासाठीच्या 'चांद्रयान'प्रकल्पाविषयीही सांगितले होते. माझी खातरी आहे की, इतर ग्रहांविषयींचे संशोधन आणि अवकाशयानातून मनुष्य पाठवण्याचा कार्यक्रम या पुढील ध्येयांकडे जाण्यासाठीचे हे फक्त पहिले पाऊल आहे. ह्या चांद्रयान पाठविण्याच्या कार्यक्रमाविषयीही ते म्हणाले की, अवकाशयान चंद्राच्या भोवती फिरत राहील आणि तेथील रासायनिक द्रव्ये, खनिजे आणि भूस्तर ह्यांच्या वैशिष्ट्यांची माहिती पाठवत राहील. त्यांनी असेही सांगितले की, अशी बरीच शास्त्रीय उपकरणे त्या यानात असतील, जी इस्त्रो निर्मिती करीत आहे अन् ती अंतिम टप्प्यात आहेत. मी असे सुचवले की, चंद्रावर खाली पाठवता येईल आणि तेथील घनता किंवा दाब मोजणे किंवा ध्वनीची पोहोच मापण्याचे काम करेल आणि ती माहिती नोंद करुन रेडिओ सिग्नल्सने यानात पाठवेल, असे निदान एक 'टेलिमेट्री चॅनेल' त्या यानात असावे. असे उपकरण पाठवल्याने आपल्याला चंद्राच्या पृष्ठभागावरुनच प्रत्यक्ष ही माहिती मिळेल. इस्त्रोच्या अध्यक्षांनी तसे उपकरण चांद्रयानात बसविण्याचे वचन दिले. ह्यामुळे चांद्रयान मिशनमध्ये 'मून इम्पॅक्ट प्रोब'चा प्रवेश झाला. दि. १४ नोव्हेंबर, २००८ला तो प्रोब चंद्रावर अगदी नेमक्या ठरवलेल्या जागी उतरला, ह्याचा मला खूप आनंद झाला. इस्त्रोच्या ह्या उत्तम कामगिरीबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले.

उच्च तंत्रज्ञान लागणारी ही दोन कामे राष्ट्रपती भवनातून पुढाकार घेतला गेल्यामुळे झाली. अशा खूप आशा जागवणाऱ्या उपक्रमांमध्ये मी सहभागी होतो, ह्याचा मला खूपच आनंद वाटला.

मी २०११चा 'नव्या कल्पना, नव्या पद्धती' संदर्भातील जागतिक अहवाल बघत होतो; तेव्हा मला आढळले की, जागतिक नव्या कल्पनांच्या निर्देशांकामध्ये स्वित्झर्लंडचा नंबर पहिला आहे, स्वीडनचा दुसरा, सिंगापूरचा तिसरा, हाँगकाँगचा चौथा... आणि भारत बासष्टावा! सुधारणा, नव्या कल्पना (इनोव्हेशन) निर्देशांक आणि स्पर्धावृत्ती एकमेकांशी संलग्न आहेत. ह्या निर्देशांकात भारत बासष्टाव्या नंबरावर असला, तरी जागतिक स्पर्धावृत्तीच्या जागतिक सूचीमध्ये २०१०-२०११मध्ये आपला नंबर छप्पन्नावा होता.

भारताला छप्पन्नाव्या नंबरावरुन वर येऊन पहिल्या दहा विकसित राष्ट्रांच्या बरोबरीला यायचे असेल, तर आपल्याला स्वत:च्या कल्पनांमधून योजना आणि रचना

तयार करण्याचे सामर्थ्य विकसित करुन जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या जी वाढ झालेली आहे, ती मुख्यत: दुसरीकडे लागलेले शास्त्रीय शोध आणि त्यांनी दहा ते पंधरा वर्षांपूर्वी घेतलेल्या पेटंट्सच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने झालेली आहे. शास्त्रीय प्रगतीतून निर्माण झालेले आधुनिक वर्तमान तंत्रज्ञान विकसित देशांकडून भारताला पहिली दहा वर्षे तरी उपलब्ध होत नाही! म्हणून, जागतिक स्पर्धेत वर येण्यासाठी भारताने पायाभूत शास्त्रांमध्ये संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताने स्वत: विकसित केलेल्या जरुर त्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन केलेल्या प्रयासाच्या परिणामाबद्दल पुढे लिहिले आहे.

अलीकडेच आपण एक महत्त्वाचा टप्पा पार केला. दि. १९ एप्रिल, २०१२ला ओडिशाच्या किना-याजवळील 'व्हीलर'बेटाच्या ज्या जागेवरुन क्षेपणास्त्र सोडले जाणार होते, त्या भागात मानसिक तणाव जाणवत होता. पन्नास टन वजनाचे, साडे-सतरा मीटर उंचीचे ते प्रचंड 'अग्नी ५' क्षेपणास्त्र उभे करुन प्रक्षेपण स्थितीत आणले आणि प्रक्षेपण होण्याच्या आधीच्या तपासणीस सुरुवात झाली. सकाळी ८.०७ वाजता उलटगणती करण्यास सुरुवात झाली आणि प्रक्षेपणाच्या पहिल्या पायरीची सुरुवात होऊन एक आगीचा प्रचंड लोळ बाहेर पडला. आपल्या नियोजित स्थानावरुन 'अग्नी ५' सुरळीतपणे वर उडाले. त्यातील सर्व यंत्रणा बरोबर चालत आहेत ना, हे ध्वनिक्षेपकावरुन शास्त्रज्ञ ऐकत होते. त्यांचे आवाज शांत होते, जमलेल्या प्रेक्षकांच्या मनावर मात्र तणाव होता! ९० सेकंदांनंतर पहिला टप्पा प्रज्वलित झाला आणि अलग झाला. क्षेपणास्त्र ज्या गतीने जायला हवे, त्याच गतीने जात होते. मग बरोबर ठरल्या वेळेला, अगदी नव्याने एकत्र बसवून केलेला दुसरा टप्पाही जळून गेला आणि वेगळा झाला. काही मिनिटांतच क्षेपणास्त्र अवकाशात पोहोचले होते, २००० कि.मी. दूर दक्षिणेला जात त्याने विषुववृत्त ओलांडले, मग ३००० कि.मी आणखी पुढे जात त्याने पुन्हा पृथ्वीच्या वातावरणात मकरवृत्तावरुन प्रवेश केला अन् आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्यांच्या दक्षिण टोकांच्यामध्ये समुद्रात पडले. क्षेपणास्त्र सोडल्यापासून समुद्रात पडेपर्यंत त्याला फक्त २० मिनिटे लागली होती. भारताच्या नौदलाच्या जहाजांनी त्याच्या प्रवासाचा संपूर्ण मार्गावर शेवटपर्यंत माग घेतला होता. आधी ठरवलेल्या नेमक्या जागी जे लक्ष्य होते, त्यावर ते अचूकपणे जाऊन पडले.

आय.जी.एम.डी.पी.ने १९८३मध्ये ४०० कोटी मंजूर केले होते; त्या योजनेत चार क्षेपणास्त्र पद्धतींचा विकास, उत्पादन आणि अवकाशात सोडणे, हे सर्व समाविष्ट होते. ती क्षेपणास्त्रो अशी – जमिनीवरुन जमिनीवर जाणारे 'पृथ्वी', मध्यम अंतराचे जमिनीवरुन हवेत जाऊ शकणारे 'आकाश', कमी अंतरावर जमिनीवरुन हवेत खूप लवकर जाऊ शकणारे 'त्रिशूल' आणि रणगाडाभेदी 'नाग.' ह्याखेरीज, तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक देणारे 'अग्नी' हेही योजनेचा भाग होते. दूर अंतरावर पाठवलेल्या क्षेपणास्त्राची पुनर्प्रवेशाची वैशिष्ट्ये दाखवणे, हा त्याचा हेतू होता. ह्या तंत्रज्ञानाचे पहिले प्रत्यक्षिक मे १९८९मध्ये ओडिशाच्या समुद्रकिना-यावर झाले होते. नंतर मग जास्त पल्ला असणारी अग्नी १, २, ३ आणि ४ ह्यांचीही प्रात्यक्षिके गेल्या दोन दशकांत दाखवली गेली होती आणि शेवटी

डी.आर.डी.ओ.च्या शास्त्रज्ञांनी व इंजिनीअर्सनी 'अग्नी ५' ह्या ५००० कि.मी. पल्ला गाठणाऱ्या क्षेपणास्त्राचे प्रात्यक्षिक दिले. ही सर्व क्षेपणास्त्रो एम.टी.सी.आर. (मिसाइल टेक्नॉलॉजी कंट्रोल रेजाइम) ह्या आणि इतर मंजुरीच्या श्रेणीत येतात. म्हणून, क्षेपणास्त्राची कार्यपद्धती किंवा त्या पद्धतीसाठी आवश्यक ते तंत्रज्ञान पैसे देऊन विकत मिळणार नाही. ही पद्धती दीर्घ परिश्रमांनीच पद्धतशीर संशोधन आणि विकास करुनच मिळवावी लागते.

यासाठीच ह्या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण हे अशा खास तंत्रज्ञानामध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीतून विशेष महत्त्वाचे आहे आणि ते देशाला स्वत:चे स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण अनुसरण्याचा अधिकार मिळवून देते.

माझे स्नेही डॉ. व्ही. के. सारस्वत आणि त्यांचे सहकारी ह्यांनी मला 'अग्नी ५'च्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल सविस्तर माहिती दिली.

ह्यामागचा थोडा इतिहास सांगण्याची मुभा मी घेतो. मी १९८४मधले एक संभाषण आणि १९९१मध्ये झालेले दुसरे संभाषण ह्यांच्याबद्दल सांगत आहे. मी हैदराबादला डी.आर.डी.एल.चा संचालक होतो. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी आय.जी.एम.डी.पी.ला १९८३मध्ये त्यांच्या मंत्रिमंडळाच्या अनुमतीने मंजुरी दिल्यानंतर, पुढच्या वर्षी प्रकल्पाची प्रगती किती झाली आहे, हे बघायला त्या डी.आर.डी.एल.मध्ये आल्या. आम्ही त्या कामाच्या प्रगतीचे सादरीकरण करत होतो, तेव्हा मिसेस गांधींना कॉन्फरन्स हॉलमधला जगाचा नकाशा दिसला. त्यांनी आम्हाला सादरीकरण थांबवायला सांगितले आणि आमचे लक्ष त्या नकाशाकडे वेधले. त्या म्हणाल्या, "कलाम, ह्या नकाशाकडे बघा आणि तिथे दाखवलेली अंतरे बघा. तशीच परिस्थिती उद्भवली तर, इतके दूर (त्यांनी भारतापासून ५००० कि.मी. दूर असलेल्या एका ठिकाणावर बोट दाखवले.) जाऊ शकेल असे क्षेपणास्त्र तुमची प्रयोगशाळा केव्हा बनवू शकेल?" आणि अर्थातच, आमच्या डी.आर.डी.ओ.च्या शास्त्रज्ञांनी त्या थोर मुत्सद्दी बाईंनी मनात आणलेले लक्ष्य आता साध्य करुन दाखवले आहे.

पुढे मग जेव्हा 'पृथ्वी'चे यशस्वी प्रक्षेपण करुन दाखवण्यात आले, तेव्हा लष्कर दुसरी एक महत्त्वाची गरज घेऊन आले. त्यांना जमिनीवरील क्षेपणास्त्राची 'लक्ष्याच्या गोलाकार भागात आदळण्याची बिनचूकता किंवा चूक होण्याच्या टक्क्यांची शक्यताची'(सर्क्युलर एरर प्रॉबेबिलिटी – सी.ई.पी.) चाचणी एकदा खातरी करुन घेण्यासाठी बघायची होती. भौगोलिक आणि राजकीय प्रश्न, प्रक्षेपणाच्या पल्ल्याचा प्रश्न, ह्यांमुळे आपल्या वाळवंटातील प्रदेशात ही चाचणी आम्हाला करता आली नाही. ह्यातून मार्ग काढण्यासाठी आम्ही पूर्व किनाऱ्यावरील एखाद्या निर्मनुष्य बेटाच्या शोधात होतो. नौदलाकडून समुद्रातील जागांच्या मिळालेल्या नकाशावर बंगालच्या उपसागरात ओडिशाच्या किनाऱ्यावरील धाम्रा गावाजवळ आम्हाला काही बेटे आहेत, असे दिसले. त्यावरुन तेथे बरीच जमीन असावी, असे वाटत होते. आमच्या सहकाऱ्यांपैकी प्रक्षेपणाच्या पल्ल्याचे काम बघणारे डॉ. एस. के. साल्वन व डॉ. व्ही. के. सारस्वत ह्यांनी धाम्रामध्ये एक बोट

भाड्याने घेतली आणि ते त्या बेटाच्या शोधार्थ निघाले. नौदलाच्या नकाशात ह्या बेटांना 'लाँग व्हीलर', 'कोकोनट व्हीलर' आणि 'स्मॉल व्हीलर' अशी नावे दिलेली होती. दिशा दाखवणारे एक होकायंत्र बरोबर घेऊन आमचे सहकारी शोधप्रवासाला निघाले. ते वाट चुकले आणि त्यांना व्हीलर बेटे सापडेनात! सुदैवाने त्यांना मच्छीमारांच्या थोड्या बोटी दिसल्या, त्यांना त्यांनी मार्ग विचारला. त्यांना व्हीलर बेटे माहीत नव्हती; पण त्यांनी सांगितले की, 'चंद्रचूड' नावाचे एक बेट तिथे आहे. त्यांनी विचार केला, आपण शोधत असलेल्या बेटांपैकीच ते एक असावे. त्यांनी सांगितलेल्या दिशेने जाऊन आमचे सहकारी 'चंद्रचूड' बेटावर पोहोचले. नंतर समजले की, तेच 'स्मॉल व्हीलर'बेट होते आणि त्यांच्या कामाला आवश्यक तेवढी त्याची पुरेशी लांबी व रुंदी होती.

त्या बेटापर्यंत पोहोचायला आम्हाला ओडिशाच्या नोकरशाहीतल्या (Bureaucracy) अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. मुख्यमंत्र्यांनी राजकीय निर्णय घेण्याची गरज (सन १९९३) उभी राहिली. तेव्हा देशातले एक शक्तिशाली वरिष्ठ नेते बिजू पटनायक ओडिशाचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या कार्यालयातून असे सुचविण्यात आले की, ते बेट अनेक कारणांमुळे देता येणार नव्हते. तरीही, आमच्या विनंतीवरुन पटनायकांची वेळ निश्चित करुन त्यांच्याशी एक चर्चेची बैठक ठरविण्यात आली. आम्ही त्यांच्या कार्यालयात पोहोचलो, तेव्हा त्या सर्व कागदपत्रांची फाइल त्यांच्यासमोरच होती. मुख्यमंत्री म्हणाले, "कलाम, ही सर्व पाच बेटे कोणतेही मूल्य न आकारता मी तुम्हाला (डीआरडीओ) देण्याचा निर्णय घेतला आहे; परंतु तुम्ही मला एक वचन दिलेत, तरच मी ह्या संमतिपत्राच्या फाइलवर स्वाक्षरी करेन." त्यांनी माझा हात हातात घेतला आणि ते म्हणाले, "तुम्ही असे क्षेपणास्त्र तयार केले पाहिजे, जे अगदी दूर अंतरावरुन येणाऱ्या धोक्यापासूनही आपले रक्षण करेल." मी म्हणालो, "सर, आम्ही त्यासाठी अगदी नक्की काम करु." मी ताबडतोब आपल्या संरक्षणमंत्र्यांना कळवले. मुख्यमंत्र्यांनी फाइलवर स्वाक्षरी केली आणि आम्हाला 'स्मॉल व्हीलर'बेट मिळाले.

वाचकहो, तुम्हाला माहीत असेलच की, २६ एप्रिल, २०१२ला इस्त्रोने भारताच्या पहिल्या 'रडार इमेजिंग उपग्रह'चे (रिसॅट-१) यशस्वी प्रक्षेपण केले. प्रक्षेपकावर 'पोलर सॅटेलाइट लाँच व्हेइकल' (पी.एस.एल.व्ही सी-१) उपग्रह होता आणि श्री हरिकोटा येथील 'सतीश धवन अवकाश केंद्रा'वरुन प्रक्षेपण करण्यात आले. उपग्रह त्याच्या कक्षेत पोहोचल्यावर रिसॅट-१ वरील 'सी बॅन्ड' सिन्थेटिक अॅपार्चर रडारवरील सोलर पॅनेल्स आणि अॅन्टेना पॅनेल्स यशस्वीरीत्या त्यांच्या कामाला लागली. नंतर हा उपग्रह यशस्वीरीत्या त्याच्या सुनिश्चित कक्षेत स्थिर करण्यासाठी चार वेळा काळजीपूर्वक हलवण्यात आला आणि सूर्याभोवती पृथ्वीच्याच गतीने फिरु लागला. उच्च दर्जाच्या प्रतिमा थेट गंगोत्रीपासून ते भोपाळ पार करुन उत्तर कर्नाटकापर्यंतच्या मिळाल्या आणि त्यांची छायाचित्रेही तयार करण्यात आली. हे काम १ मे, २०१२ला झाले.

ह्या महत्त्वाच्या प्रकल्पात काही महत्त्वाची तंत्रज्ञाने वापरली गेली, त्यांतील काहींची

माहिती थोडक्यात देत आहे –

दूरनियंत्रित काचतंतू नियंत्रकाद्वारे (ऑप्टिकल रिमोट सेन्सिंग) सूचना दिल्या जाणाऱ्या उपग्रहापेक्षा ह्यांचे वेगळेपण असे की, रिसॅट-१मधील सिंथेटिक अॅपार्चर रडार हे स्वत:च्या रेडिओ लहरींद्वारे पृथ्वीवरील पृष्ठभागांची चित्रे पाठवण्याचे काम करते. त्यामुळे ढगांना भेदून वा त्यांच्यामधून किंवा सूर्यप्रकाश नसतानाही चित्रे पाठवणे शक्य होते. त्यामुळे हवा आणि सूर्यप्रकाशाची परिस्थिती विरोधी असली, तरी हव्या असलेल्या भागाचे चित्र पाठवता येते. रिसॅट-१मध्ये अनेक पद्धतींनी व दिशांनी चित्रे पाठवता येण्याची क्षमता आहे. तसेच एक ते पन्नास मीटर अंतरापर्यंतच्या अगदी सूक्ष्म गोष्टी दाखवणारी आणि दहा ते दोनशे तेवीस कि.मी. अंतरापर्यंतची चित्रे घेण्याची त्याची क्षमता आहे. रिसॅट-१ ज्या महत्त्वाच्या कामांसाठी वापरता येतो – त्यात शेतकी क्षेत्रात भाताच्या पिकाची खरीप मोसमातील क्षेत्र नेमके ओळखण्यासाठी, वर्गवारी करण्यासाठी आणि किती एकर शेती ह्या पिकाखाली आहे हे जाणून घेण्यासाठी; तसेच पुराच्या परिस्थितीत पाण्याखाली गेलेल्या भागाची चित्रे घेण्यास आणि चक्रीवादळ आल्यास आपत्कालीन व्यवस्थापनाला मदत म्हणून – ही सर्व कामे येतात. ह्याखेरीज इतर अनेक क्षेत्रांमध्येही त्याची मदत होते.

आमचा आत्मविश्वास किती आहे आणि अवकाशातील आमच्या कार्याच्या विविधतेची फक्त कल्पना येण्यासाठी ही माहिती दिली आहे. ह्याखेरीज अनेक दुसऱ्या यशस्वी कामांबद्दल सांगता येईल. उदाहरणार्थ – हलक्या लढाऊ विमानाची म्हणजे 'लाइट कॉम्बॅट एअरक्राफ्ट'सारख्या (एल. सी. ए.) नौदलासाठी बनवलेल्या विमानाची बेंगळुरुला आभाळ ढगाळलेले असताना झालेली उड्डाणाची चाचणी. ह्या यशस्वी उड्डाणाने भारताने उत्तम दर्जाच्या देशांच्या संघात प्रवेश केला आहे. हे चौथ्या पिढीतील विमान असून त्याची सामान वा अस्त्रे वाहून नेण्याची व ती डागण्याची मोठी क्षमता आहे, तरीही ते जागच्या जागी उड्डाण करु शकते व उतरु शकते. हे सर्व देश अशा विमानाची रचना व कार्यपद्धती, विकसन, उत्पादन आणि चाचणी सर्व काही करु शकतात. हे आपण संपूर्णपणे स्वत: बनवलेले विमान आहे. २१व्या शतकातील भारतीय नौदलासाठी संपूर्ण 'मरिन फोर्स मल्टिप्लायर', जो नौदलाला फार महत्त्वाचे युद्धसामर्थ्य देईल, ते पुरे पाडण्यासाठीच्या कामातला हा पहिला प्रयत्न आहे. हे नौदलासाठीचे विविधोपयागी लढाऊ विमान बनवताना आम्हाला त्याच्या रचनेसाठी जी अनेक आव्हाने पेलावी लागली, त्यांवर मात करणे, हे त्या यशाचे निदर्शक आहे.

माहिती तंत्रज्ञान व संदेश तंत्रज्ञान हे एकत्र होऊन आता 'माहिती व संदेशसंपर्क तंत्रज्ञान' असे झाले आहे. माहिती तंत्रज्ञान आणि बायोटेक्नॉलॉजी मिळून 'बायो-इन्फर्मेटिक्स' झाले आहे, तसेच फोटॉनिक्सचे शास्त्र प्रयोगशाळांमधून बाहेर पडून इलेक्ट्रॉनिक्स व मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स बरोबर मिसळले आणि सामान्य ग्राहकांसाठी बनवल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्ये त्यांनी जास्त गतीने चालणाऱ्या उत्पादनांचा पर्याय

दिला आहे. सेल्युलॉइडचा अगदी पातळ थर पारदर्शक पॉलिमरवर लावून केलेले न तुटणारे पण वाकवता व वळवता येणारे प्रक्षेपक प्रदर्शित होऊन ती आता करमणुकीच्या क्षेत्रातली आणि प्रसारमाध्यमांतली नवी प्रतिके झाली आहेत. आता आली आहे, 'नॅनोटेक्नॉलॉजी.' हे भावी क्षेत्र आहे आणि ते मायक्रोइलेक्ट्रॉनिक्सची जागा घेईल. तसंच औषधशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि मटेरियल सायन्सच्या क्षेत्रांमध्ये त्याच्या वापराला प्रचंड वाव असेल.

नॅनोटेक्नॉलॉजी आणि इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी मिळून सिलिकॉन इलेक्ट्रॉनिक्स, फोटॉनिक्स ह्यांचा जन्म होतो आणि असे म्हणता येईल की, द्रव्यपदार्थातच आमूलाग्र रुपांतर होईल. हा पदार्थातील बदल बायोटेक्नॉलॉजीला जोडला जाईल, तेव्हा 'इंटेलिजंट बायोसायन्स' नावाचे एक नवे शास्त्र जन्माला येईल; ज्यामुळे रोगमुक्त, दीर्घायुषी आणि उच्चक्षमतेचा समाज निर्माण होईल.

पदार्थांचे रुपांतराचे शास्त्र परस्परांना पूरक असते. मी एक उदाहरण देतो. अलीकडेच मी हार्वर्ड विद्यापीठात गेलो होतो, तेव्हा 'हार्वर्ड स्कूल ऑफ इंजिनीअरिंग आणि सैद्धांतिक शास्त्रे' ह्या विषयांच्या प्रयोगशाळेतील बऱ्याच विख्यात प्रोफेसरांना भेटलो. तेथे मला प्रो. हाँगकुन पार्क ह्यांनी मला त्यांचा अतिसूक्ष्म सुयांचा (नॅनो नीडल्स) शोध दाखवला. जी पेशी लक्ष्य असेल, त्या पेशीला ही सुई टोचते आणि तिच्या आतमधले औषध त्याच पेशीत जाते. अशा तऱ्हेने 'नॅनोपार्टिकल शास्त्र' हे बायोसायन्स क्षेत्राला आकार देत आहे. नंतर मी प्रो. विनोद मनोहरनना भेटलो; ज्यांनी मला ह्याच्या उलट बायोसायन्स, नॅनोमटेरियल सायन्सला कसा आकार देत आहे, ते दाखवले. स्व-रचित कणाची रचना करण्यासाठी ते डीएनएचा वापर करीत आहेत. जेव्हा एखादा विशिष्ट डी.एन.ए. अणूच्या पातळीवरील एखाद्या कणाला वापरला गेला, तर तो आधीच ठरविल्याप्रमाणे वर्तन व स्वयंचलित जुळणी करु शकतो. ह्या पद्धतीने कदाचित, डॉ. के. एरिक ड्रेक्सलर ह्यांच्या कल्पनेप्रमाणे मनुष्याचा हस्तक्षेप न होता नव्या साधनांच्या भागांची आपली-आपली जुळणी होऊ शकेल, दूर अंतराळात वसाहती होऊ शकतील. अशा तऱ्हेने, एकाच संशोधन-संस्थेत मी दोन वेगवेगळी शास्त्रे एकमेकांना आकार देताना बघितली. शास्त्रीय विषयांनी अशी परस्परांना मदत करण्याने आपल्या भविष्यकाळाला वेगळा आकार येणार आहे आणि औद्योगिक क्षेत्राने त्यासाठी तयार असले पाहिजे. वेगवेगळ्या तंत्रज्ञानांच्या शाखांमध्ये सध्या जी कुंपणे आहेत, ती काढून टाकणे गरजेचे आहे. त्यांच्यामुळे संशोधनात अडथळे येतात.

शेवटी, सर्व जगातच तांत्रिकदृष्ट्या श्रेष्ठ अशा, टिकवून ठेवता येईल, असे काम करण्याच्या पद्धतींचा विकास करण्याची मागणी होऊ लागली आहे. एकविसाव्या शतकातील ज्ञानाधिष्ठित समाजाचा हा नवा पैलू आहे; जेथे शास्त्र, तंत्रज्ञान आणि पर्यावरण ह्यांना एकत्र काम करावे लागेल. अशा तऱ्हेने चार बाजू असलेला, 'बायो-नॅनो-इन्फो-इको'वर आधारित नव्या युगाचा आदर्श नमुना असेल; ज्याच्या शक्यता उत्साहवर्धक

असतील.

मला तुम्हाला विचारावेसे वाटते की, तुमची आठवण कशासाठी राहिलेली तुम्हाला आवडेल? तुम्ही ते लिहून ठेवा. ते तुम्ही केलेले एखादे महत्त्वाचे योगदान असू शकेल किंवा लावलेला शोध, तुमची एखादी नवी कल्पना, समाजात तुम्ही घडवून आणलेला एखादा बदल – ज्यामुळे देशाला तुमची आठवण राहील.

८
मेणबत्ती आणि पतंग

'The lamps are different
But the light is same.
Worldly joys you returned to the world,
You remain in my innermost soul.'

'दीप वेगवेगळे असले, तरी प्रकाश एकसारखाच असतो.
जगातली सुखं तुम्ही जगालाच परत दिलीत,
पण माझ्या अंतरात्म्यामध्ये तुम्ही आहातच.'

दि. १९ जानेवारी, १९९९ला हवेतून जात-जात देखरेख करता येईल, अशी जागा म्हणजे 'एअरबोर्न सर्व्हेलन्स प्लॅटफॉर्म'ला झालेल्या दुर्घटनेच्या दु:खाने मी उद्ध्वस्त झालो. शास्त्रीय प्रयोगांची अत्यंत दु:खदायी होऊ शकणारी ही दुसरी बाजू मला अनुभवावी लागली. माझे मित्र प्रो. अरुण तिवारी हांच्याशी झालेल्या संवादामध्ये योजनेप्रमाणे यशस्वी न झालेल्या त्या प्रयोगाबद्दलच्या माझ्या भावना मी व्यक्त केल्या आहेत आणि त्या प्रयोगात जे सहभागी झाले होते, त्यांना माझी ही श्रद्धांजलीही आहे.

अरुण तिवारी (ए.टी.) : फार मोठी स्थित्यंतरं होतात किंवा दारुण प्रसंगांनी भावना तीव्र होतात, तेव्हा जीवनाविषयीचे मूलभूत विचार स्वाभाविकपणे मनात येतात. आपल्या अंतरात्म्याशी संवाद साधण्यानेही ते येतात. आपला आत्मा अगदी खोल विचार करुन आत्मभानातून वा अहंकारातून बाहेर येण्यास शिकतो, तेव्हा हे विचार येतात. फ्रांझ काफ्कांनी त्यांच्या 'मेटामॉर्फोसिस' ह्या सुप्रसिद्ध उत्तम ग्रंथात ह्या विषयावर लिहिले आहे.

ए.पी.जे. : मलाही तसंच वाटते. 'एस.एल.व्ही.-३'च्या पहिल्या उड्डाणाचे अपयश आणि अग्नीच्या प्रथम उड्डाणाच्या चाचणीपूर्व क्षेपणामध्ये आलेल्या अडचणी यातून त्यानंतरच्या दिवसांमध्ये मी खूपच विशेष प्रयत्न करुन आत्मशोध घेतला. पण १९९९मधल्या आर्कोणमच्या दुर्घटनेचा अनुभव मन विदीर्ण करणारे दु:ख देणारा होता आणि माझ्या आत्मविश्वासाला प्रचंड धक्का देणारा होता.

ए.टी : तुम्ही त्याबद्दल कधी चर्चा केली नाहीत. कामाच्या समुद्रात तुम्ही स्वत:ला नेहमी बुडवून ठेवलेले असते, त्याच्याबाहेर दिसणारे तुमच्या प्रचंड दु:खाच्या हिमनगाचे नुसते टोकच मी बघू शकलो. तुम्हाला ते दु:ख वाटून घ्यावेसे वाटतेय का?

ए.पी.जे. : वाटून घेण्यापेक्षा एका शास्त्रीय प्रयोगात आपल्या आयुष्याचे बलिदान

देणाऱ्या आठ तरुणांबद्दल मला माझी कृतज्ञताही व्यक्त करायची आहे. ज्यांचा कोणीही गौरव केला नाही, अशा त्या शूर वीरांबद्दल देशाला समजलेच पाहिजे. त्यांच्या कुटुंबांना जे दु:ख सहन करावे लागले, त्यात सहभागी झाले पाहिजे.

ए.टी. : सर, ११ जानेवारी १९९९ला झालेल्या एअरबोर्न सर्व्हेलन्स प्लॅटफॉर्मच्या (ए.एस.पी.) दुर्घटनेबद्दल तुम्ही बोलत आहात का?

ए.पी.जे : होय. आर्कोणमजवळच्या दाट जंगलात ए.एस.पी. कोसळले.

ए.टी. : मी ह्या दुर्घटनेबद्दल एकदा के. रामचंदशी बोललो होतो. ते 'सिस्टिम्स इंजिनीअर' होते. त्यांनी मला सांगितले की, 'एअरबोर्न सर्व्हेलन्स सिस्टिम' अॅव्हरो विमानाच्या वर फिरत्या छपरासारखी बसवलेली होती. विमान दुपारी दोनच्या सुमारास निघाले, दहा हजार फुट वर गेले आणि चेन्नईच्या किनाऱ्याच्या दिशेने जाऊ लागले. आर्कोणम-चेन्नईच्या किनारपट्टीवरुन जाताना रडार चाचणी करण्यात आली. ह्या प्रयोगाच्या चाचणीसाठी 'एएन-३२' विमान हे 'लक्ष्य' ठरवले होते, ते अॅव्हरोच्या आधी पंधरा मिनिटं उडाले होते. रडारच्या कार्यक्षमतेची खातरी जमीन व समुद्र दोन्हींवर करण्यात आली होती आणि विमानात असणाऱ्या ह्या कामावरच्या लोकांनी व्ही.एच.एफ.द्वारा (अत्युच्च संदेश लहरी) रडारचे काम खूपच छान असल्याचा संदेश पाठवला होता. दीड तास उड्डाण चाचणी केल्यानंतर जे विमान 'लक्ष्य' होते, ते सुमारे चार वाजता आर्कोणमला उतरले. त्यानंतर ए.एस.पी. विमान चेन्नईहून आर्कोणमला यायला निघाले आणि आर्कोणमच्या विमानतळाजवळ आल्यावर दहा हजार फुटांवरुन पाच हजार फुटांपर्यंत खाली आले. विमानतळापासून सुमारे पाच नॉटिकल मैल (एक नॉटिकल मैल = ६०८० फूट) दूर आणि ३००० ते ५००० फुटांच्या मधल्या उंचीवर होते, तेव्हा विमानाच्या वर बसवलेले फिरते छप्पर एकाएकी तुटून दूर जाऊन पडले. विमान अस्थिर झाले आणि खाली कोसळले. आत बसलेले आठही जण मृत्यू पावले.

ए.पी.जे. : मी साउथ ब्लॉकमधील माझ्या ऑफिसमध्ये संरक्षण संशोधन परिषदेच्या बैठकीत होतो, तेव्हा मला अपघाताविषयी सांगण्यात आले. प्रचंड दु:खात बुडालेल्या कुटुंबांच्या बरोबर असण्यासाठी मी ताबडतोब बेंगळुरुला गेलो. एअर चीफ मार्शल ए.वाय. टिपणीसही तेथे होते. मृतांच्या तरुण पत्नींना प्रचंड हताश होऊन आक्रोश करताना आणि दगडासारखे निश्चल उभे असलेल्या माता-पित्यांना बघणे, ही माझ्यासाठी अत्यंत कठीण वेळ होती. एका स्त्रीने तिचे तान्हं बाळ माझ्या मांडीवर धपदिशी ठेवले आणि म्हणाली, "कोण सांभाळ करेल आता ह्या लहान जीवाचा?" दुसरी एक स्त्री रडत-रडत ओरडली, "का आमचे हे असे केलेत तुम्ही मिस्टर कलाम?"

ए.टी. : ज्या अधिकाऱ्यांनी प्राण गमावले, त्यांची यादी के. रामचंदनी मला दिली होती. स्क्वाड्रन लीडर पी. वेंकटरामन हे विमानाचे पायलट होते. पी. इलांगो हे इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनीअर आणि के. पी. शाजू – रडार सिस्टिम इंजिनीअर. हे दोघे 'सेंटर फॉर एअरबोर्न

सिस्टिम्स' (सी.ए.बी.एस.)मधील होते. डी. नरसिंह स्वामी – रडार प्रोसेसिंग शास्त्रज्ञ आणि आय. जयकुमार – सिग्नल प्रोसेसिंग शास्त्रज्ञ, हे दोघे 'इलेक्ट्रॉनिक्स रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट' (ई.आर.डी.ई.)मधले होते; तर स्क्वाड्रन लीडर एन. व्ही. सेशु, आर. भटनागर आणि एस. रवी हेही हवाईदलातील अधिकारी होते.

ए.पी.जे. : जवळजवळ काहीच अवशेष राहिले नव्हते. कुटुंबीयांच्या समाधानासाठी तेथील अधिकाऱ्यांनी शवपेटिका तयार केल्या आणि तेथील सार्वजनिक सभागृहामध्ये ठेवल्या.

ए.टी. : अरे देवा!

ए.पी.जे. : माझ्या आत्यंतिक दु:खाच्या मन:स्थितीत मी अंतिम निरोपाचे चार शब्द कसेबसे पुटपुटलो.

ए.टी. : नागरी युद्धात ज्या आईने तिचे पाच पुत्र गमावले होते, तिला अब्राहम लिंकननी जे पत्र लिहिले होते, त्याची मला आठवण झाली.

> 'तुमच्या प्रचंड हानीच्या दु:खात तुम्हाला सांत्वनाचे काहीही शब्द मी लिहिले, तरी ते किती निरर्थक आहेत – निष्फळ आहेत, हे मला समजते; पण तरीही एवढी तरी सांत्वना तुम्हाला दिल्याशिवाय मला राहावत नाही की, ज्या संघराज्याला वाचवताना ते मरण पावले, त्यांच्यावतीने धन्यवाद देत आहे.
>
> 'स्वर्गातील आपला पिता तुमच्या हानीचे तुमचे दु:ख कमी करेल आणि तुम्ही ज्यांच्यावर प्रेम केलेत व गमावलेत, त्यांच्या सुखद आठवणी आणि स्वातंत्र्याच्या वेदीवर तुम्ही जी अमूल्य त्यागाची आहुती दिलीत; त्याचा उदात्त अभिमान तो तुम्हाला प्रदान करेल, अशी मी प्रार्थना करतो.'

ए.पी.जे. : राष्ट्रपती भवनामध्ये बसलेला असतो; तेव्हा त्या आक्रोश करणाऱ्या विधवा, बधिर झालेले मातापिता, माझ्या मांडीवरचे ते निष्पाप लहान अर्भक आणि त्या प्रतीकात्मक शवपेट्यांना दिलेला अग्नी – ह्यांची आठवण मला छळत राहते. तेथे अवतीभोवती असणाऱ्या, राजकारणाच्या आणि इतर औपचारिक चालीरीती सांभाळत बसणाऱ्या लोकांना त्यांच्यापासून दूर प्रयोगशाळांमध्ये व प्रत्यक्ष युद्धभूमीवर राबणारे लोक जी दु:खं, ज्या यातना सहन करतात; ती कळू तरी शकतात?

ए.टी. : तुमचा संदेश काय आहे?

ए.पी.जे. : मेणबत्ती असल्यासारखं वागू नका, पतंग व्हा! सेवा करण्यातील गर्भित शक्ती

जाणून घ्या. राजकारणाच्या बाह्य आचारांमध्येच आपण गुंतून पडलो आहोत, असे दिसते आणि तेच आचार राष्ट्राला उभं करण्याचे काम समजण्याची चूक करत आहोत. त्याग, श्रम आणि पराक्रम ह्या ज्या गोष्टी क्वचितच दाखवल्या जातात किंवा बघितल्या जातात; त्याच खरोखर राष्ट्र उभं करतात.

'एअरबोर्न सर्व्हेलन्स प्लॅटफॉर्म' दुर्घटना, ही माझ्या आयुष्यातली अत्यंत दु:खद घटनांपैकी एक होती. मला ते दु:ख किती जाणवते हे लक्षात यावं, म्हणून हा संवाद मी उद्धृत केला आहे. अवघड योजना हाती घेणे, हा प्रदीर्घ कठीण प्रवास असतो; परंतु अशी अपयशे आम्हाला जास्त कणखर बनवण्यासाठी मदत करतात, हेही तुमच्यापर्यंत पोहोचविण्याचा माझा हेतू आहे.

९
माझी गुजरात भेट

'Angel is free because of his knowledge,
The beast because of his ignorance,
Between the two remains the son of man to struggle.'
– Rumi

'देवदूत स्वतंत्र असतो त्याच्या ज्ञानामुळं,
पशू स्वतंत्र असतो त्याच्या अज्ञानामुळं,
ह्या दोघांच्यामध्ये धडपड करत राहतो, पुत्र मानवाचा!'
– रुमी

राष्ट्राच्या विकासाबद्दल खूप विचार करताना मला जो विकासाचा स्तंभ खूप महत्त्वाचा वाटतो; तो म्हणजे, आपण अशा राष्ट्राचे निर्माण केले पाहिजे, जेथे संपूर्णपणे दारिद्र्यनिर्मूलन आणि निरक्षरतानिर्मूलन झाले असेल. त्याचबरोबर अशा समाजाची उभारणी झाली पाहिजे; जेथे स्त्रिया आणि मुले ह्यांच्यावरील अत्याचार बंद झाले असतील आणि समाजातील कोणालाही वाळीत टाकल्यासारखे वाटत नसेल. ऑगस्ट, २००२मध्ये मी गुजरात भेटीला गेलो, तेव्हा माझ्या मनात प्रामुख्याने हे विचार होते. राष्ट्रपती झाल्यानंतर मी हाती घेतलेले, हे पहिले मुख्य काम होते. काही महिन्यांपूर्वी ह्या राज्यात मोठ्या प्रमाणात दंगे झाले होते आणि त्यांच्या दुष्परिणामाने हजारो आयुष्ये विस्कटून गेली होती. काम महत्त्वाचे होते. ते संवेदनशील तसेच हळुवारतेने हाताळण्याचे होते; कारण राजकारणाने तप्त झालेल्या विशेष अवघड परिस्थितीत ते पार पाडायचे होते. मी असे ठरवले की, मी हाती घेतलेले हे काम काय घडले त्याची चर्चा करण्यासाठी नव्हते, काय घडत होते ते पाहण्यासाठीही नव्हते; परंतु काय केले पाहिजे, ह्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी होते. जे घडले होते, त्यावर न्यायालयात व संसदेत चर्चा-विचारणा सुरु झाली होती आणि ती चर्चा अजूनही चालू आहे.

कुठल्याही राष्ट्रपतींनी देशाच्या एखाद्या भागात अशा परिस्थितीत कधीच भेट दिली नव्हती, त्यामुळे त्या वेळच्या परस्थितीत मी त्या राज्याला भेट देण्याची गरज काय, असा प्रश्न अनेकांनी विचारला. मंत्री आणि नोकरशाही ह्यांच्या स्तरावरुन असे सुचवले गेले की, अशा वेळी या परिस्थितीत मी गुजरातमध्ये जाण्याचे धाडस करु नये. त्याचे अनेकांपैकी एक मुख्य कारण राजकीय होते. परंतु मी मनाशी निश्चय केला की, मी जाणारच. राष्ट्रपती म्हणून माझ्या पहिल्या भेटीच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रपती भवनामध्ये जोरात तयारी सुरु झाली.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी मला फक्त एक प्रश्न विचारला, "अशा वेळी गुजरातला जाणे तुम्हाला अत्यंत आवश्यक वाटते का?" मी त्यांना उत्तर दिले, "मी ते माझे महत्त्वाचे कर्तव्य समजतो. कारण लोकांचे दु:ख कमी करायला माझा थोडा उपयोग होईल, मदतीच्या कामांना वेगही देता येईल आणि मनोमीलन घडवून आणणे, हे मी माझे विशेष ध्येय ठरवले आहे – जे मी माझ्या शपथग्रहण समारंभाच्या वेळच्या भाषणातही ठळकपणे अधोरेखित केले होते."

बऱ्याच शंका व्यक्त केल्या गेल्या. त्या पैकी एक होती की, मुख्यमंत्री माझ्या भेटीवर बहिष्कार टाकण्याची शक्यता आहे. दुसरी अशी – माझे अगदी थंड स्वागत होईल. आणि तिसरी – बऱ्याच बाजूंनी निषेध व्यक्त केला जाईल. परंतु मी जेव्हा गांधीनगरला विमानातून उतरलो, तेव्हा मला खूप आश्चर्य वाटले की फक्त मुख्यमंत्रीच नव्हे, तर त्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळ आणि बऱ्याच मोठ्या संख्येने आमदार, सरकारी अधिकारी व जनतेचे काही प्रतिनिधी विमानतळावर उपस्थित होते. मी बारा ठिकाणी गेलो – निर्वासितांच्या तीन छावण्या आणि जेथे खूप जास्त हानी झाली होती, अशा नऊ दंगलग्रस्त जागा. मुख्यमंत्री नरेंद्र मोदी माझ्या संपूर्ण भेटीत माझ्याबरोबर होते. एका दृष्टीने ते बरोबर असण्याची मला मदतच झाली; कारण मी जेथे गेलो, त्या सर्व ठिकाणी मला लोकांनी विनंती-अर्ज दिले, लेखी व तोंडी तक्रारी मांडल्या. मोदी माझ्याबरोबरच असल्याने मी त्यांना सुचवू शकलो की, त्या सर्वांच्या तक्रारींवर शक्य तितक्या लवकर कार्यवाही केली जावी.

निर्वासितांच्या एका छावणीत मी गेलो होतो, तेव्हाचे एक दृश्य मला आठवते. एक सहा वर्षांचा मुलगा माझ्याजवळ आला, त्याने माझे दोन्ही हात धरले आणि म्हणाला, "मला माझी आई अन् वडील हवेयत –" माझ्या तोंडून शब्द फुटेना. लगेच तिथल्या तिथेच मी जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो. मुख्यमंत्र्यांनीही मला आश्वासन दिले की, त्या मुलाचे पालन-पोषण आणि शिक्षण ह्याची जबाबदारी सरकार घेईल.

मी अहमदाबाद आणि गांधीनगरमध्ये असताना समाजातल्या सर्व स्तरांमधले लोक येऊन भेटू इच्छित असत. त्यांचे प्रश्न आणि दृष्टिकोन त्यांना प्रत्यक्ष मला भेटून सांगण्याची इच्छा असे. असेच एका ठिकाणी अहमदाबादच्या सुमारे दोन हजार नागरिकांनी मला गराडा घातला. ते गुजरातीत बोलत होते. माझा एक मित्र दुभाष्याचे काम करुन मला ते सांगत होता. मला त्या लोकांनी सुमारे पन्नास प्रश्न विचारले आणि दीडशे विनंती-अर्ज दिले.

मी अहमदाबादमध्ये दोन महत्त्वाच्या स्थळांना भेट दिली, ज्यांचे दंग्यांच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्व होते. अक्षरधाममध्ये मी प्रमुख स्वामीमहाराजांना भेटलो, तिथं त्यांनी माझे स्वागत केले. मनोमीलन घडविण्यासाठी काय करता येईल त्यावर आणि ज्या गुजरातने देशाला महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल व विक्रम साराभाई ह्यांच्यासारख्या महान व्यक्ती दिल्या, त्या गुजरातच्या जखमांवर इलाज करुन त्या बऱ्या

कशा करता येतील, ह्या विषयांवर स्वामीमहाराजांबरोबर मी चर्चा केली.

मी साबरमती आश्रमालाही भेट दिली, जिथे मला बरेच आश्रमवासी भेटले. ते त्यांचे दैनंदिन कार्यक्रम यंत्रवत पार पाडत होते, तरी त्यांच्या मनांमधील तीव्र वेदना-दु:ख त्यांच्या चेहऱ्यांवर मला उघड दिसत होते. याच भावना मला अक्षरधाममध्येही अनुभवास आल्या. ह्याबद्दल विचार करताना माझ्या असे लक्षात आले की, ह्या दोन्ही संस्थांचे मूलभूत उद्दिष्ट मनुष्यमात्रांवर प्रेम करणे, सर्वांना मानाने वागवणे, हे असल्याने आणि त्यांच्या संस्थांमधल्या आध्यित्मक वातावरणानं, समाजात सुख-शांती नांदून प्रगती व्हावी, ह्या हेतूने त्या काम करत होत्या. त्यामुळे टाळता येणाऱ्या यातना देणारी परिस्थिती त्यांना स्वीकारता येत नव्हती. मी असे म्हणतो, कारण उच्च दर्जाच्या विकसित संस्कृतीची परंपरा असलेल्या ह्या आपल्या देशात जिथे महान व्यक्ती जन्माला आल्या आणि संपूर्ण जगाच्या उच्च आदर्श झाल्या, तिथे जातीय दंगे व त्यांबरोबर येणाऱ्या शोकांतिका ह्यांसारख्या बुद्धिभ्रष्ट घटना कधीही होऊ नयेत.

माझ्या भेटीच्या सर्व कालावधीत एकच विचार सदैव माझ्या मनात घोळत होता. आपल्याला जनतेची स्थिती सुधारण्यासाठी आणि विकासाची गती वाढवण्यासाठी बरीच महत्त्वाची कामे हाती घ्यायची आहेत; तेव्हा विकास हे एकच ध्येय आपण ठेवायला नको का? कुठल्याही धर्माचा असो; प्रत्येक नागरिकाला सुखाने जगण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. आपला देश खरोखर वैशिष्ट्यपूर्ण असण्याचे कारण 'मानसिक ऐक्य' आहे, जे आपल्या जीवनप्रणालीचे अधिष्ठान आहे. ते धोक्यात आणण्याचा कोणालाही अधिकार नाही. शेवटी 'न्याय' म्हणजे काय? 'लोकशाही' म्हणजे काय? आत्मसन्मानाने जगण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. प्रगती करुन विशेष यश मिळवण्याचीमहत्त्वाकांक्षा बाळगण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. आत्मसन्मान आणि विशेष यश मिळवण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या अनेक संधींचा पाठपुरावा योग्य आणि न्याय्य पद्धतीने करता येणे, ही खरी लोकशाही. आपल्या राज्यघटनेचाही मुख्य पाया हाच आहे आणि त्यामुळेच खऱ्या चैतन्यपूर्ण व बलवान लोकशाहीत प्रत्येकाला सुखाने परिपूर्ण आयुष्य जगावे, असे वाटते. सर्व लोकांची श्रद्धास्थाने आणि जीवनशैली ह्यांबद्दल आदर बाळगणे, हा अशालोकशाहीचा खरा अर्थ आहे.

'मानसिक ऐक्य' साधण्यासाठी आपण सर्वांनी काम करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. इतरांच्या मतांबद्दलची वाढती असहिष्णुता आणि इतरांच्या धर्माबद्दल, जीवनपद्धतीबद्दल वाढता तिरस्कार किंवा मतभेद हे लोकांविरुद्ध केलेल्या अवैध हिंसेने व्यक्त करणे, ह्याचे कधीही समर्थन होऊच शकत नाही.प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांना संरक्षण देण्यासाठी आपण सर्वांनी नेटाने प्रयत्न केले पाहिजेत. लोकशाही मूल्यांचा तोच पाया आहे आणि ती मूल्यं हा आपला सांस्कृतिक वारसा अन् आपल्या देशाचा आत्मा आहे, यावर माझा विश्वास आहे.

माझा दोन दिवसांचा दौरा संपल्यानंतर प्रसारमाध्यमांना माझ्याकडून काही संदेश

अपेक्षित होता, त्यासाठी पत्रकार परिषद बोलावली गेली. मी एका लेखी निवेदनातून माझे विचार व्यक्त केले. जातीय किंवा इतर कुठल्याही प्रकारचेकलह पूर्णपणे थांबविण्याची चळवळ जोरात सुरु केली पाहिजे आणि सर्वांनी मनाने एकत्र आले पाहिजे, अशी तीव्र इच्छा त्यामध्ये मी व्यक्त केली.

> प्रत्येक व्यक्तीला आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक श्रद्धेप्रमाणे वागण्याचा मूलभूत अधिकार आहे. त्याला धक्का पोहोचेल, असे काहीही आपण करु नये.

१०
परदेशात घरचा अनुभव

'I am a world citizen,
Every citizen is my own kith and kin.'

'मी संपूर्ण जगाचाच नागरिक आहे.
प्रत्येक नागरिक हा माझ्या आपल्या माणसांसारखाच आहे.'

माझ्या व्यावसायिक कारकिर्दीच्या सर्व वर्षांमध्ये मी राष्ट्रासाठीच्या कामांमध्ये नेहमी ठरलेल्या वेळात काम पूर्ण करण्यात सतत गुंतलेला असल्याने परदेशात विशेष जास्त प्रवास केलेला नाही. अर्थात, देशाचा 'प्रथम नागरिक' झाल्यावर इतर राष्ट्रांच्या प्रमुखांचे भारतात आगत-स्वागत करणे आणि आपल्या देशातर्फे इतर देशांना ठरवल्या गेलेल्या भेटी देणे, हा माझ्या कामाचा जरुरीचा भाग झाला. परराष्ट्रीय शिष्टमंडळे जेव्हा भेट देत असत, तेव्हा राष्ट्रपती भवनातली उत्साही मदतनीसमंडळी खूप मेहनत घेऊन त्यांचे उत्तम आदरातिथ्य करीत असत आणि आपल्या देशाने केलेली कामगिरी, आपल्या कलाकारांचे कसब त्यांना दाखवत असत. माझ्या दृष्टीने ह्या भेटींमधल्या सर्वांत महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे, आपल्या देशाचे मूलभूत सामर्थ्य असलेल्या गोष्टी त्यांच्यासमोर परिणामकरक रीतीने कशा मांडाव्यात व त्यांच्याकडे होत असलेल्या कामांमधून आपल्या फायद्यासाठी काय व कसे शिकावे – ह्या होत्या. ह्या विचारांमधूनच मी अनेक विशेषज्ञ आणि मान्यवर परकीय पाहुणे हांच्याशी चर्चा केल्या व त्यातून 'जागतिक ज्ञान व्यासपीठ' ह्या कल्पनेचा जन्म झाला. पर्यावरणाच्या होत असलेल्या हानीची काळजी आणि ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होण्याची गरज ह्या दोन विषयांवर आमच्या चर्चा होत असत. आपल्या पाहुण्यांना आम्ही माहिती-तंत्रज्ञान, ई-गव्हर्नस आणि औषध-उद्योग ह्या तीन क्षेत्रांमध्ये भारताने केलेली प्रगती दाखवत असू. प्रत्येक बैठक किंवा भेट ह्याचा उपयोग परस्परांना देवघेवीचे किंवा अनेक स्तरांवरचे फायद्याचे कार्यक्रम अमलात आणण्यासाठी होत असे.

माझी प्रत्येक परदेशभेट आपापल्या परीने महत्त्वाची होती. सुदानमधील चर्चांचा केंद्रबिंदू त्यांच्या देशाच्या दक्षिण भागातून राजधानी खार्टुमपर्यंत तेलाची पाइप-लाइन घालण्याच्या कामाबद्दल होता. ह्यासाठी सुमारे एक कोटी डॉलर्स खर्च येणार होता. ह्या कामासाठी भारत सरकार सहकार्य देईल, असे ठरले. आज सुदानहून भारताला तेल येत आहे. युक्रेनमध्ये खूपच भरगच्च कार्यक्रम होता. ह्या भेटीतून अंतराळ संशोधनक्षेत्रात सहकार्य मिळण्यात प्रगती झाली. परंतु मी ह्या भेटींमधील फक्त काही थोड्याच महत्त्वाच्या घटनांची नोंद करत आहे. दक्षिण आफ्रिकेला मी सप्टेंबर, २००४मध्ये गेलो. राष्ट्राध्यक्ष थाबो एम्बेकी ह्यांनी विनंती केली की, मी जोहान्सबर्ग येथे पॅन आफ्रिकन संसदेसमोर भाषण द्यावे, ज्यामध्ये त्रेपन्न आफ्रिकी देशांचे प्रतिनिधी आहेत. मी त्यांची

विनंती आनंदाने मान्य केली आणि भाषण तयार करत असताना माझ्या सहकाऱ्यांनी व मी ह्याचा विचार केला की; त्यांना काय देऊ केले, तर भारताचे महत्त्वाचे सामर्थ्य-कौशल्य ज्यांमध्ये आहे, अशा गोष्टींबाबत आफ्रिकी देशांना आपल्याशी जोडता येईल? ह्या विचारातून पॅन आफ्रिकन ई-नेटवर्कची कल्पना जन्माला आली. ह्या नेटवर्कमुळे शिक्षण, आरोग्यसेवा आणि ई-गव्हर्नन्स ह्यांसाठी भारतामधील बारा विद्यापीठे व सतरा स्पेशालिटी रुग्णालये सेवा देतील आणि सर्व पॅन आफ्रिकी देशांचे प्रमुखही ई-गव्हर्नन्सने एकमेकांशी जोडले जातील, ज्यामुळे आपसातील वैचारिक देवाण-घेवाण सोपी होईल. तज्ज्ञांनी काढलेल्या प्राथमिक अंदाजाप्रमाणे ह्या नेटवर्कसाठी पन्नास लाख ते एक कोटी डॉलर्स खर्च येणार होता. पॅन आफ्रिकन संसदेसमोर हा विचार मांडण्यापूर्वी मी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्याशी ह्याबद्दल बोललो. त्यांनाही वाटले की, आफ्रिकेवर लक्ष केंद्रित करण्याच्या भारत सरकारच्या विचाराशी ही कल्पना जुळणारी आहे आणि त्यामुळे पॅन आफ्रिकी देश व भारत ह्यांच्यामधील सहकार्य वाढण्यास चांगला उपयोग होईल.

पॅन आफ्रिकी ई-नेटवर्कच्या योजनेने आता बऱ्यापैकी वेग पकडला आहे. त्याचा अधिकृत शुभारंभ भारत सरकारने २६ फेब्रुवारी, २००९ला केला. आज हे नेटवर्क आंतरराष्ट्रीय सामाजिक जबाबदारी पुरी करण्याचे एक चांगले उदाहरण ठरले आहे.

माझ्या आठवणीप्रमाणे २००६मध्ये युरोपीय संसदेचे अध्यक्ष जोसेप बॉरेल फॉन्टेलेस हे राष्ट्रपती भवनामध्ये मला भेटायला आले. आमच्या बोलण्याच्या ओघात माझ्या मनातल्या एका अगदी आवडत्या विषयावर ते बराच वेळ बोलले. 'सुबुद्ध नागरिकत्वाचा विकास' ह्याबद्दल माझ्या वेबसाइटवर त्यांनी वाचले होते. त्या विषयावर त्यांनी मला बरेच प्रश्न विचारले. ते प्रश्न अर्थपूर्ण, हेतूपूर्ण आणि सखोल विचार करुन विचारले होते. आमच्या चर्चेनंतर त्यांनी मला 'युरोपीय संसदेसमोर भाषण द्यायला या,' असे आमंत्रण दिले. ह्या संसदेमध्ये युरोपीय संघामधील सत्तावीस सभासद देशांचे ७८५ प्रतिनिधी आहेत. प्रत्यक्ष निवडणुका घेऊन बनलेली त्या संघाची ही एकच संस्था आहे. त्यांनी अशीही विनंती केली की, डिसेंबरमध्ये त्यांचा कार्यकाल पूर्ण होणार होता, त्यापूर्वी माझे भाषण व्हावे. परंतु आधीच ठरलेल्या २००६मधील माझ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमुळे मी २५ एप्रिल, २००७पर्यंत त्या भाषणासाठी वेळ देऊ शकलो नाही. त्या वेळेपर्यंत हॅन्स-गर्ट पॉटरिंग ह्यांच्याकडे फॉन्टेलेस ह्यांच्याकडून अध्यक्षपद आले होते.

हे भाषण महत्त्वाचे असल्याने माझा दौरा होण्यापूर्वी बरेच दिवस आधी मी त्याची तयारी सुरु केली होती. बरेच मित्र, बुद्धिजीवी विद्वानमंडळी, राजकीय पुढारी, शास्त्रज्ञ आणि तरुण पिढी वगैरे लोकांशी मी प्रदीर्घ चर्चा करुन कल्पना किंवा उपाय मिळवले. 'Message from Mother Earth' (भूमातेचा संदेश) ही कविताही मी खास ह्या प्रसंगासाठी लिहिली. वर्षानुवर्षे एकमेकांशी हिंसक लढाया करत आलेली सर्व युरोपीय राष्ट्रे आता युरोपीय संघ बनून सर्वांसाठी आर्थिक विकास, भरभराट, शांतता आणि सुख मिळवण्यावर लक्ष केंद्रित करुन एकत्र येण्यात कशी यशस्वी झाली आहेत, ह्या विषयावरचे विचार त्या

कवितेत आहेत. एका भूखंडातील सर्व देशांनी पुढाकार घेऊन सहकार्य करण्याचे ठरवणे, हा खरोखर पुरोगामी विचार आहे.

मी २५ एप्रिलच्या सकाळी युरोपीय संसदेत पोहोचलो, तेव्हा अध्यक्ष आणि त्यांचे सहकारी ह्यांनी माझे स्वागत केले. युरोपीय संघाचे ७८५ प्रतिनिधी आणि गच्च भरलेली पाहुण्यांची गॅलरी, हे खरोखरच मनावर ठसणारे दृश्य होते.

माझे त्या प्रसंगासाठीचे भाषण 'राष्ट्रांच्या ऐक्यामधली प्रेरक शक्ती' ह्या विषयावर होते. ते भारताच्या ऐतिहासिक काळापासूनच्या अनुभवांवर आधारित होते. वेगवेगळ्या संस्कृतींनी संघर्ष करण्याऐवजी संगम करुन एकत्र येण्याच्या गरजेवर मी भर दिला होता. माझ्या भाषणात मी 'सुबुद्ध नागरिकत्वाचा विकास' ह्यावरही जोर दिला, ज्यामध्ये तीन घटक येतात : 'मूल्यधिष्ठित शिक्षण', 'धार्मिकतेचे आध्यित्मकतेत परिवर्तन करणे' आणि 'राष्ट्राच्या विकासातून सामाजिक परिवर्तन.' मी भारतामध्ये व युरोपमध्ये ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होण्याच्या गरजेबद्दलही बोललो आणि ती प्रत्यक्षात कशी आणता येईल ह्याची रुपरेषा मांडली. भाषण चालू असताना श्रोते मधून-मधून पसंतीच्या टाळ्या वाजवत होते. भाषण संपल्यावर सर्व सभासदांच्या परवानगीने मी त्या प्रसंगासाठी खास लिहिलेली कविता म्हणून दाखवली.

MESSAGE FROM MOTHER EARTH

Beautiful environment leads
To beautiful minds;
Beautiful minds generate,
Freshness and creativity.

Created explorers of land and sea,
Created minds that innovate,
Created great scientific minds
Created everywhere, why?

Gave birth to many discoveries,
Discovered a continent and unknown lands,
Ventured into unexplored paths,
Created new Highways.

In the minds of the best,
Worst was also born;
Generated seeds of battle and hatred
Hundreds of years of wars and blood.

Millions of my wonderful children,
Lost in the land and sea,
Tears flooded many nations,
Many engulfed in ocean of sadness.
Then, then came the vision of European Union,

Took the oath,
Never to turn human knowledge,
Against ourselves or others.

United in their thinking;
Action emanated,
To make Europe prosperous and peaceful,
Born, the European Union.

Those glad tidings captivated
The people everywhere,
Oh! European Union, let your missions,
Spread everywhere, like the air we breathe.

भूमातेचा संदेश

सुंदर वातावरणात मनंही सुंदर होतात,
सुंदर मनांमध्ये निर्माण होतो
टवटवीतपणा अन् नवनिर्मितीची कल्पकता.
नवी जमीन, नवे समुद्र निर्मिले,
निर्मिली कल्पक मने,
निर्मिले महान शास्त्रज्ञ,
निर्मिती केली सगळीकडे – का?
कितीतरी नवे शोध लावले,
एक खंड अन् अनोळखी भूप्रदेश शोधले,
कोणी गेलं नव्हतं, तिथं जाण्याचे धाडस केलं,
आणि नवे द्रुतगती मार्ग तयार केले.
मग उत्तम लोकांच्या मनात
अत्यंत वाईट विचार आले,
युद्धाची, द्वेषाची बीजं पेरली गेली
आणि शेकडो वर्षं गेली युद्धं अन् रक्तपातात.
त्यांमध्ये माझी लाखो सुंदर चांगली मुलं
मी गमावली जमिनीवर, समुद्रात.
अश्रुंचे महापूर आले कितीतरी देशांमध्ये,
आणि किती जण बुडाले शोकसागरात.
मग आली संकल्पना युरोपियन युनियनची,
घेतल्या शपथा सगळ्यांनी –
कधीही नाही वापरायचं माणसानं आपलं ज्ञान,
आपल्याच किंवा दुसऱ्या माणसांविरुद्ध.
एकत्र विचार केला सर्वांनी
आणि त्यातून कृती घडल्या,

जन्म झाला युरोपीय संसदेचा
युरोप समृद्ध आणि शांत करण्यासाठी.
ह्या छान बातमीनं भारुन टाकलं,
सर्व लोकांना सगळीकडच्या.
हे युरोपियन युनियन, तुमची चांगली लक्ष्यं
पसरोत सर्वदूर, आपण श्वास घेतो त्या हवेसारखी!

माझे कवितावाचन पूर्ण होताच संसदेच्या प्रत्येक सभासदाकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने मी मनातून हेलावून गेलो. सर्वांनी उभे राहून माझ्या भाषणाला वाजवलेल्या टाळ्या, हा खरोखर आपल्या राष्ट्राला मिळालेला सन्मान-आदर होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून मी युरोपीय संघाच्या देशांना भारताच्या शंभर कोटी जनतेच्यावतीने शुभेच्छा दिल्या. माझ्या भाषणानंतर समारोपाच्या भाषणात अध्यक्ष पॉटरिंग म्हणाले. ''राष्ट्रपती श्री. अब्दुल कलाम, युरोपीय संसदेच्यावतीने तुमच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि स्फूर्तिदायक भाषणाबद्दल मी तुमचे आभार मानतो. एका मुत्सद्दी, शास्त्रज्ञ आणि कवी असलेल्या व्यक्तीचे हे आम्ही ऐकलेले एक अप्रतिम सुंदर भाषण होते; असामान्य होते. इंडिया ह्या महान देशाला खूप-खूप शुभेच्छा – महान देश भारत आणि युरोपीय संघ ह्यांच्यामधील सहकार्याला खूप-खूप शुभेच्छा... राष्ट्रपती, खूप-खूप शुभेच्छा!''

माझ्या भाषणानंतर बऱ्याच सभासदांना माझ्या भाषणातल्या काही विशिष्ट मुद्द्यांवर माझ्याशी चर्चा करायची होती. भारत हा एक महान देश आहे आणि मानवी मूल्यांमध्ये संपन्न आहे, असे त्या सर्वांचेच सर्वसाधारण निरीक्षण होते.

माझे युरोपीय संसदेसमोरचे भाषण हे जगभरात मनांच्या ऐक्याचा प्रसार करण्याच्या संदर्भात मी महत्त्वाचे समजतो. अनेक देशांमध्ये ते उद्धृत केले गेले आणि जगभरातल्या श्रोत्यांपर्यंत बऱ्याच वेबसाइट आणि 'यू ट्यूब'द्वारे पोहोचले.

मी भारतात परत आल्यानंतर आपल्या संसदेमध्ये भाषण दिले आणि 'ऊर्जा स्वावलंबन' व 'जागतिक ज्ञान व्यासपीठ' यांसारखी अनेक कामे भारत पुढे नेऊ शकेल, ह्या हेतूने काम करण्याची तयारी युरोपीय संघाच्या सदस्य देशांनी दाखवली असल्याचे सांगितले.

मी ग्रीसला गेलो, तेव्हा मुद्दाम वेगळी वाट करुन सॉक्रेटिसची गुहा बघायला गेलो. लोक क्वचितच त्या गुहेकडे जातात; कारण ती डोंगराळ, दुर्गम भागात आहे. माझ्या विनंतीला मान देऊन माझ्या जाण्याची व्यवस्था करण्यात आली. मी तिथे पोहोचल्यावर मला देण्यात आलेला एक लुकलुकणारा दिवा घेऊन तिथे पाच मिनिटे एकांतात घालवली. मी विचारांमध्ये मग्न होतो की, जगातील सर्वांत मोठ्या तत्त्ववेत्त्यांपैकी एक, अशा सॉक्रेटिसने विषप्राशन करुन प्राणत्याग का केला असेल? मला त्याचे शब्द आठवले – 'त्याच्या आयुष्यापेक्षा जे त्याने सांगितले, त्याची किंमत जास्त होती. आणि मग बुद्धिवादाचा जो वारसा त्याने जगासाठी ठेवला, तो एकदम त्या अंधाऱ्या गुहेत एखाद्या तेजस्वी

प्रकाशासारखा दिसला.'

स्वित्झर्लंडला मी २००५मध्ये गेलो. मी विमानातून उतरलो, तेव्हा एक अनपेक्षित भेट माझी वाट पाहत होती. माझे स्वागत केल्यानंतर उपराष्ट्राध्यक्षांनी सांगितले की, माझ्या भेटीच्या स्मरणार्थ २६ मे, २००५ हा दिवस त्यांच्या देशाने 'शास्त्रदिन' म्हणून जाहीर केला आहे. स्विस सरकारकडून ही मला अनपेक्षित भेट होती. मी राष्ट्राध्यक्षांना भेटलो, तेव्हा मी त्यांचे आभार मानले. त्यांनी मला सांगितले की, त्यांनी माझी दोन पुस्तके वाचली होती – 'Ignited minds' आणि 'India 2020'. त्यांना त्या पुस्तकांनी प्रभावित केले होते आणि त्यांनी अवकाश व संरक्षणशास्त्रामधील माझ्या कामगिरीबद्दल त्यांच्या मंत्रिमंडळाला सांगितले होते. मंत्रिमंडळाने माझ्या भेटीचा आनंद व्यक्त करण्यासाठी तो दिवस 'शास्त्रदिन' म्हणून जाहीर केला होता. तेथे असताना मला शास्त्रीय प्रयोगशाळा बघण्याची आणि संशोधकांना, विद्यार्थ्यांना, तसेच अध्यापकांना भेटण्याची संधी मिळाली. झुरिच येथील 'स्विस फेडरल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' बघायलाही मी गेलो. जर्मनीहून ह्या देशात आल्यावर आइन्स्टाईनने येथे अभ्यास केला होता. तेथे मी 'बोस-आइन्स्टाईन प्रयोगशाळे'त गेलो, जिथे 'बोस-आइन्स्टाईन कॉन्डेन्सेट एक्सपरिमेंट'वर सहा शास्त्रज्ञ काम करत होते. येथेही मला तेथील अध्यापक व विद्यार्थी ह्यांच्यासमोर भाषण देण्याची संधी मिळाली आणि मी 'तंत्रज्ञान व देशाचा विकास' ह्या विषयावर बोललो. माझ्या भाषणाचा शेवट मी सर सी. व्ही. रामननी विद्यार्थ्यांना केलेल्या कळकळीच्या उपदेशाने केला – "आपण जिंकूच, अशी हिंमत आपण बाळगली पाहिजे. त्या हिमतीच्या बळावर सूर्याच्या छत्रछायेखाली पृथ्वीवरील आपल्या हक्काने आपण मिळवलेल्या स्थानापर्यंत आपण पोहोचू. त्या हिमतीने आपल्या लक्षात येईल की, एका महान, स्वभिमानी संस्कृतीचे वारसदार म्हणून आपल्याला जगातील आपल्या हक्काची जागा मिळालीच पाहिजे. ती दुर्दम्य हिंमत जर आपल्यामध्ये जागृत झाली, तर आपल्या हक्काचे अंतिम ध्येय मिळवण्यापासून आपल्याला काहीही रोखू शकणार नाही."

डॉ. नेल्सन मंडेलांबद्दल लिहिणे मी टाळूच शकत नाही. मी त्यांना २००४मध्ये भेटलो. ह्या महान व्यक्तीकडून दोन महत्त्वाचे धडे प्रत्येक जण शिकू शकतो – 'दुर्दम्य इच्छाशक्ती' आणि 'क्षमाशीलता.'

केपटाउन हे तेथील 'टेबल माउंटन'साठी प्रसिद्ध आहे. त्याला तीन शिखरं आहेत – 'टेबल पीक', 'डेव्हिल पीक' आणि 'फेक पीक.' संबंध दिवसभर काळे-पांढरे ढग त्या शिखरांवर तरंगत असतात, तर कधी शिखरांची टोकं झाकोळून टाकतात. ते दृश्य अत्यंत विलोभनीय दिसते. केपटाउनहून 'रॉब्बेन आयलंड'वर आम्ही हेलिकॉप्टरने गेलो. आम्ही बेटावर पोहोचलो, तेव्हा अहमद कथ्राडांनी आमचे स्वागत केले. ते डॉ. मंडेलांबरोबरच कैदेत होते. वर्णभेदाविरोधात लढा देण्याबद्दल सहा फुट उंच डॉ. मंडेलांना २६ वर्षे ज्या खोलीत कैद करुन ठेवले होते, ती अगदी छोटी खोली बघून मला आश्चर्य वाटले. त्यांच्या आयुष्याचा बराचसा काळ ह्या बेटावर गेला. रणरणत्या उन्हात त्यांना तेथील एका

डोंगरावर दगडाच्या खाणीत खडक फोडायला घेऊन जात असत. त्यामुळे त्यांच्या दृष्टीवर विपरीत परिणाम झाला. इतक्या हाल-अपेष्टा-छळ भोगूनही त्यांची इच्छाशक्ती दुर्दम्य राहिली. त्या छोट्याशा खोलीत, बाहेर असलेला वॉर्डन झोपल्यावर ते लिहीत असत – ज्या लेखनातून नंतर त्यांचे 'लाँग वॉक टु फ्रीडम' ह्या नावाचे प्रसिद्ध पुस्तक साकारले.

त्यांच्या जोहान्सबर्गमधल्या घरी त्यांना भेटणे, ही माझ्यासाठी मोठी पर्वणी होती. मी त्यांच्याशी हस्तांदोलन केले; तेव्हा एका अजिंक्य आत्म्याच्या हाताला मी स्पर्श करत आहे, असे वाटले. ते उठून उभे राहिले, तेव्हा त्यांनी हातातली काठी बाजूला टाकली आणि माझा आधार घेतला. त्यांच्याकडून एक मोठा धडा आपण शिकण्यासारखा आहे. ते जे म्हणाले, ते एका 'थिरुक्कुरल'मध्येही लिहिलेले आहे. 'जे तुमचे नुकसान करतात, त्यांना उत्तम शिक्षा म्हणजे त्यांचे भले करणे.' ('थिरुक्कुरल' हे तमिळमधले खूप प्राचीन धार्मिक ग्रंथ आहेत; जे तमिळ भाषाकांसाठी वेद, गीता यांच्याइतकेच पूजनीय व महत्त्वाचे आहेत.)

रेल्वेगाड्यांशी माझा संबंध माझ्या लहानपणी सुरु झाला. वर्तमानपत्रांचे गठ्ठे रामेश्वरमला रेल्वेमधून प्लॅटफार्मवर टाकले जात असत आणि मी ते गठ्ठे उचलून गावात वाटण्यासाठी घेऊन जात असे. रेल्वेप्रवास करणे, हा आपला देश बघण्याचा, आपल्या मातीचा सुगंध अनुभवण्याचा छान मार्ग आहे. कधी-कधी रेल्वेगाडी धुक्यातून जात असते, तेव्हा कडेची शेतं आणि खेडी ह्यांच्याशी जवळीक झाल्यासारखे वाटते. आपल्या मनात असलेले प्रश्न समजून घेऊन त्यांची उत्तरे शोधण्यासाठी प्रवासात जाणाऱ्या वेळाचा उपयोग करता येतो. एकूणच रेल्वेगाडीचा प्रवास सुखद असतो; म्हणून मी ठरवले की, राष्ट्रपतींसाठी असणारी खास रेल्वेगाडी उपयोगात आणायची.

या गाडीत राष्ट्रपतींच्या मोठ्या डब्यामध्ये (सलून) दोन जोडडबे फक्त राष्ट्रपतींच्या वापरासाठी असतात. ह्या डब्यांमध्ये भोजनगृह व बैठकीची एक खोली असते, जी येणाऱ्या लोकांना भेटण्यासाठीही वापरली जाते. एक खोली बैठकी, चर्चा अशा कामांसाठी 'कॉन्फरन्सरुम'सारखी असते आणि तिसरी असते राष्ट्रपतींची झोपण्याची खोली. ह्या खेरीज एक स्वयंपाकघर असते आणि राष्ट्रपतींच्या सचिवांसाठी, मदतनीसांसाठी व राष्ट्रपतींबरोबर प्रवास करणाऱ्या रेल्वेतील मदतनीसांसाठी खोल्या असतात. 'सलून'मध्ये उत्तम सागाचे फर्निचर आणि शाही रेशमी पडदे, कुशन कव्हर्स वापरलेले असतात.

हे 'सलून' १९६०च्या दशकामध्ये आणि १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला थोडेफार वापरले गेले. अशीही परंपरा होती की, राष्ट्रपतींचा कार्यकाल संपल्यावर ते ज्या गावी स्थायिक होणार असतील, त्या गावापर्यंत नवी दिल्लीपासून त्यांना ह्या गाडीने जाता येत असे. ह्या गाडीचा तसा शेवटचा उपयोग नीलम संजीव रेड्डींनी १९७७मध्ये केला होता.

त्यानंतर हे 'सलून' वापरात नव्हते – कदाचित सुरक्षेचा प्रश्न असेल, परंतु देखभाल-दुरुस्ती करुन सलून अगदी व्यवस्थित ठेवलेले असे. हरनौत ते पाटणा ह्या साठ किलोमीटरच्या प्रवासासाठी ३० मे, २००३ला मी ही गाडी वापरली, तेव्हा तिचा वापर

२६ वर्षांनंतर झाला! डब्यांचे नूतनीकरण करण्यात आले आणि सर्व आधुनिक सामग्री – उदाहरणार्थ : उपग्रहाद्वारे मिळणारी संपर्क-संदेश ठेवण्याची सेवा इ. बसवलेली होती. मी त्यांचा करता येईल तितका उपयोग केला – सगळा मिळून तीन वेळा.

मी आणखी दोन प्रवास केले. एक होता, चंदीगड ते दिल्ली २००४मध्ये आणि नंतर २००६मध्ये दिल्लीहून डेहराडूनला जाण्यासाठी. हवामानाची खातरी नसल्याने हे प्रवास रेल्वेगाडीने केले आणि अशासाठीही की, प्रवासातला वेळ बैठकींसाठी वापरता येईल.

हरनौत ते पाटणापर्यंतचा प्रवास हा अनेकोपयोगी झाला. हरनौत येथील नव्या रेल्वे वर्कशॉपच्या पायाभरणीसाठी मला बोलावले होते. नितीशकुमार तेव्हा रेल्वेमंत्री होते, आणि त्यांच्या राज्यात एवढं मोठं रेल्वे वर्कशॉप होणार होते, म्हणून ते खूप आनंदात होते. हरनौतमध्ये भाषण देताना मी श्रोत्यांना सांगितले की, मी नालंदा ह्या प्राचीन विद्यापीठाच्या स्थळाला भेट देऊन तेथून येथे आलो होतो. मी अशा व्यक्त केली की, सध्याच्या काळाला अनुरुप अभ्यासक्रम समाविष्ट करुन बिहार सरकार ते महान विद्यापीठ पुन्हा सुरु करेल आणि या अभ्यासक्रमात जगामध्ये शांतीचा प्रसार करण्यासारखे विषय असतील.

हा प्रवास रेल्वेगाडीने करण्याचा मोठा उपयोग असा झाला की, मी बिहारमधील विद्यापीठांच्या पंधरा कुलगुरुंना माझ्याबरोबर प्रवास करायला निमंत्रित केले आणि त्यांच्या प्रश्नांबद्दल एक तास चर्चा केली.

मी जोर देऊन त्यांना सांगितले की, विद्यापीठांनी राज्याच्या विकासासाठी थेट उपयोगी पडतील, असे अभ्यासक्रम सुरु केले पाहिजेत. बिहारच्या राज्यपालांनी राज्यातल्या विद्यापीठांचा दर्जा सुधारुन देशातील इतर विद्यापीठांच्या बरोबरीला येण्यासाठी त्यांचे प्रश्न सोडवण्यास मदत केली. दोन वर्षांनंतर नियमित ठरलेल्या महिन्यांमध्ये परीक्षा घेण्याचे त्यांचे प्रयत्न यशस्वी झाल्याचे समजून मला आनंद झाला.

ह्या प्रवासाच्या वर्णनात एक आनंददायी तळटीप घालण्यासारखी आहे. पाटणा रेल्वे स्टेशनवर माझ्या स्वागताला आलेले राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालुप्रसाद यादव आणि संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार मला दिसले; पण दोघेही विरुद्ध दिशांकडे तोंडे करुन उभे होते. मी गाडीतून खाली उतरल्याबरोबर ह्या दोन्ही राजकीय प्रतिस्पर्ध्यांना जवळ बोलावले आणि त्यांना हस्तांदोलन करायला लावले. तेथे जमलेल्या गर्दीला ह्या प्रसंगाने खूप हर्ष वाटला!

मी मुलांच्या विज्ञान परिषदेचे उद्घाटन करण्यासाठी आणि शिवाय शास्त्रज्ञमंडळींना भेटण्यासाठी ५ जानेवारी, २००४ला चंदीगडला गेलो. दुसऱ्या काही महत्त्वाच्या कामासाठी मला दिल्लीला ६ जानेवारीला परत यायचे होते. उजाडता पडणाऱ्या धुक्यामुळे येणारी वेळेची अनिश्चितता टाळण्यासाठी, दिल्लीला वेळेवर परत येता यावे,

म्हणून मी रेल्वेने आलो. मुलांच्या विज्ञान परिषदेचे उद्घाटन करण्यात मला विशेष आनंद झाला. संपूर्ण देशभरातून एक हजारांहून जास्त विद्यार्थी आपापल्या तयार केलेल्या शास्त्रीय प्रकल्पांच्या प्रतिकृती घेऊन आलेहोते.

रेल्वेने तिसरा प्रवास, मी २००६मध्ये केला. इंडियन मिलिटरी अॅकॅडमीची दीक्षान्त परेड राष्ट्रपतींना सलामी देऊन होते, त्या समारंभासाठी मी गेलो होतो. हिवाळा होता. सकाळी स्पष्ट दिसत नसे, त्यामुळे विमानाने जाऊन वेळेवर पोहोचणे खात्रीचे नव्हते. रात्रीही धुके असे. सफदरजंग स्टेशनहून निघून गाडी वाटेत न थांबता डेहराहूनला पोहोचली. मात्र, सुरक्षित प्रवासासाठी रेल्वे खात्याने वाटेत ठिकठिकाणी तपास-ठाणी उभारली होती.

अभ्यासक्रम संपवून आता बाहेर पडणार असलेल्या तरुण उत्साही अधिकाऱ्यांच्या सहवासात छान वाटत होते. विशेषत: त्यांच्यातल्या बऱ्याच जणांनी मला प्रश्न विचारले की, कशा तऱ्हेच्या देशाचे आम्ही रक्षण करणार आहोत? सीमारेषेच्या अगदी जवळ असलेल्या काही नॉर्दर्न कमांड युनिट्सना मी भेट दिली, तेव्ह्याचा अनुभव ह्या तरुण अधिकाऱ्यांना मी सांगितला. माझ्या भेटीवर सीमेपलीकडून पाकिस्तानी सैनिक बारीक नजर ठेवून होते. तेथे वेगवेगळ्या युनिट्समधल्या सुमारे दोनशे अधिकाऱ्यांना उद्देशून मी भाषण केले. त्यानंतर 'बडा खाना'ला जाण्यापूर्वी मी त्या तरुण अधिकाऱ्यांना एक प्रश्न विचारला. मी म्हटले, "इथून पुढे अजून तीसहूनही जास्त वर्षे तुम्ही लष्करात काम करणार आहात. एक अधिकारी म्हणून कुठले खास ध्येय ह्या वर्षांमध्ये साकारुन दाखवायला तुम्हाला आवडेल?" वरिष्ठ अधिकारी गप्प राहिले, पण तरुण अधिकाऱ्यांपैकी काहींचे हात वर गेले. त्यातल्या एकाला मी उत्तर द्यायला सांगितले. मला सलामी देऊन त्याने सांगितले, "माझे एक स्वप्न आहे सर. दुसऱ्यांनी बळकावलेली माझ्या देशाची सर्व जमीन परत मिळवायची आहे, हे ते स्वप्न आहे." संपूर्ण वातावरणातच त्या वेळी वीज संचारल्यासारखी झाली आणि सर्वांनी त्या तरुण अधिकाऱ्याची वाहवा केली. त्याचे हे उत्तर त्या दिवशी तेथून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणार असणाऱ्या विद्यार्थ्यांना सांगितले, तेव्हा तेही सर्व जण तसेच म्हणाले, "आम्हीही तसेच करु सर."

अशा सगळ्या कारणांसाठी ते रेल्वेगाडीतले प्रवास माझ्यासाठी संस्मरणीय आहेत.

मी बघितलेल्या अत्यंत सुंदर दृश्यांपैकी 'ब्ल्यू नाइल' व 'व्हाइट नाइल' या दोन नद्यांच्या संगमातून एक वेगळीच अन् वेगळ्या रंगाची नदी झाली आहे, हे सुदानमधील एक दृश्य बरंचसे आपल्याकडील (त्रिवेणी) संगमासारखे आहे. लोकांना भेटल्यावर आपल्यातही बदल घडतो; मुळातून मात्र आपण जे असतो, ते कायमच राहतो.

११
भारताच्या गाभ्याला नवजीवन देणे

'The village movement is an attempt to establish healthy contact with the villages, by inducing those who are fired with the spirit of service, to settle in them, and find self-expression in the service of villagers....'

– Mahatma Gandhi

' 'खेड्यांकडे चला' ह्या चळवळीचा प्रयत्न हा आहे की, खेड्यांशी चांगला, सक्षम संपर्क कायम दृढ करण्यासाठी ज्यांना सेवा करण्याची इच्छा आहे, त्यांना तेथे जाऊन राहण्यास उद्युक्त करावे आणि खेड्यातील लोकांची सेवा करण्यात त्यांनी स्वत:चे सुख शोधावे.'

– महात्मा गांधी

खरा भारत खेड्यांमध्ये आहे. आपली संस्कृती, वारसागत ज्ञान व परंपरा, चालीरीती आणि जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान हे तेथूनच येते. मी खेड्यात जन्मलो आणि वाढलो; तिथल्या आयुष्याचे लय-ताल मला कळू शकतात. अलीकडे काही वर्षांमध्ये खेड्यांतून शहरांत येऊन राहण्याचे प्रमाण नाट्यमयरीत्या प्रचंड वाढले आहे. अशा स्थलांतर करुन येणाऱ्या लोकांच्या वाट्याला झोपडपट्टीतले, दारिद्र्यातले तणावपूर्ण आयुष्य येते आणि केवळ पोट भरण्यापुरते पैसे मिळवण्यासाठी धडपडत राहावे लागते. त्यांचे सर्वस्व हिरावले जाते. प्रेम आणि आपुलकी ह्या गोष्टींना ते दुरावतात. मला असे वाटते की – खेड्यांचा विकास केला; तेथेच कमावण्याच्या संधी उभ्या राहिल्या आणि तेथे सुविधा उपलब्ध झाल्या; तर भारताचा चेहरामोहाराच बदलेल. तसे झाले तर शहरांत स्थलांतर होणेच बंद होऊन स्थलांतरित मजूरलोकांची दु:खंच नाहीशी होतील. ह्या विचारांतून 'प्युरा' (Providing Urban Amenities to Rural Areas) –ग्रामीण भागात शहरासारख्या सुविधा उपलब्ध करुन देणे – ही कल्पना प्रसवली.

कुठल्याही राज्याचा विकास होण्यासाठी त्या राज्यातील खेड्यांचा विकास होणे आवश्यक असते. याचा स्वत: प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी म्हणून २००२मध्ये मी पहिल्यांदा भोपाळला गेलो, तेव्हा एखाद्या ग्रामीण भागाला भेट देण्याचे ठरवले. आम्ही 'तोरणी' येथे जायचे ठरवले, जिथे धड रस्ताही नव्हता आणि वीजही नव्हती. मी या गावात जाण्याचा विचार बोलून दाखवल्याबरोबर मध्य प्रदेश सरकारने बरीच कामे तातडीने हाती घेतली. पहिली गोष्ट म्हणजे, किती तरी किलोमीटर लांबीचा पक्का रस्ता बांधला गेला आणि जेट विमानाच्या गतीने तिथे वीजही जाऊन पोहोचली!

माझ्या भेटीदरम्यान त्या खेड्यातल्या लोकांनी वाहून जाणारे पाणी अडवून साठवण्याची केलेली पद्धत, सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर, ही त्यांनी स्वत: यशस्वीरीत्या पार पाडलेली कामे आनंदाने दाखवली. तोरणीच्या लोकांनी केलेल्या ह्या यशस्वी प्रयोगांबद्दल आसपासच्या इतर खेड्यांमध्ये सांगा, असे मी जिल्हा अधिकाऱ्यांना सांगितले; म्हणजे त्यांनाही या अनुभवाचा फायदा मिळावा. राज्य सरकारला मी हेही सुचवले की, खेड्यांचे गट तयार करुन तिथे रस्ते व रहदारीची साधने उभी करुन त्यांच्यातील दळणवळण सोपे करावे. म्हणजे त्यांतून त्यांचा केवळ व्यक्तिगत संपर्कच वाढणार नाही; तर आरोग्यसेवा, फळे व भाजीपाल्याची साठवण करण्याची सुविधा, शैक्षणिक संस्था, अन्नप्रक्रियेचे व इतर उद्योग सुरु होऊन तेथेच नोकऱ्या मिळण्याच्या संधी उभ्या होण्यासारख्या सर्वसामान्य सुविधाही उपलब्ध होतील. अलीकडे पिके आणि लाकडांवर आधारित उद्योग वाढले आहेत, त्यांमध्ये बरीच उत्पादने तयार होतात – ज्यांना खूप मागणीही असते.

मी मुख्यमंत्र्यांना आणि जिल्हा अधिकाऱ्यांना हेही सुचवले की, मध्य प्रदेशातील सर्व खेड्यांमधील पाण्याच्या साठ्यांची (तलाव, विहिरी, नद्या इत्यादी) उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या चित्रांनी पाहणी करुन, त्यांतील गाळ काढून त्यामध्ये पाणी भरण्यासाठी व जाण्यासाठी योग्य त्या जोडण्या कराव्यात.

तोरणीच्या आसपासच्या खेड्यांमधल्या तरुणमंडळींनी विनंती केली की, तेथील शाळा माध्यमिक-उच्च माध्यमिक स्तरापर्यंत वाढवाव्यात, जे करण्याचे राज्य सरकारने कबूल केले.

तोरणीला भेट दिल्याने मला विकासासाठी आवश्यक असे वेगवेगळे पैलू लक्षात आले – विशेषत: ग्रामीण व शहरी भागांमधील दरी दूर करण्यासाठी हे दोन्ही भाग जोडले पाहिजेत.

मी रामेश्वरमला जन्मलो आणि वाढलो. माझ्या तेथील अनुभवांवरुन खेड्यांचा विकास कसा केला, तर तेथेच रोजगाराचे मार्ग उपलब्ध होतील, ह्यावर मी बऱ्याचदा विचार करत असतो. माझी व्यावसायिक कारकीर्द मोठ्या शहरांमध्ये घडली, परंतु दूरदूरच्या खेड्यांमध्ये जाण्याच्या अनेक संधी मला मिळाल्या. आम्ही 'इंडिया २०२०'च्या कार्यक्रमाची रुपरेषा आखत होतो, तेव्हा त्यातील सर्वांत महत्त्वाच्या घटकांपैकी एक होता, देशाच्या सहा लाख खेड्यांचा विकास करणे. माझे मित्र प्रो. पी. व्ही. इंदिरेसन ह्यांनी 'प्युरा'ची कल्पना सुचवली आणि आमची विचारांची तार छान जुळली. मी त्यांच्याशी आणि त्या क्षेत्रातल्या समान विचार असणाऱ्या अन्य बऱ्याच तज्ज्ञांशी तपशीलवार चर्चा सुरु केल्या.

हे माझे भाग्यच की, मध्य प्रदेशातील चित्रकूट 'प्युरा'चे नानाजी देशमुख, तामिळनाडूतील वल्लममधील पेरियार 'प्युरा' आणि एका वैद्यकीय क्षेत्रातील गटाने उभा

केलेला महाराष्ट्रातील लोणी 'प्युरा' – ह्या सर्वांच्या संपर्कात मी आलो. महाराष्ट्रातील विशेष पुढाकार घेऊन काम करणाऱ्या तात्यासाहेब कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आकार घेत असलेला वारणा येथील 'प्युरा' हा खरोखर विशेष होता. सर्व देशभर 'प्युरा' संकल्पाची प्रगती व्हावी, ह्यासाठी ग्रामीण विकासाचे हे अनुभव पायाभूत ठरले. राष्ट्रपती ह्या नात्याने मी शहरांपेक्षा जास्त खेड्यांमध्ये गेलो. ह्या दौऱ्यामध्ये निरीक्षणात आलेल्या गोष्टींची 'प्युरा'चे समूह बनवण्यास आणखी मदत झाली.

शहरातल्या लोकांशी आपण बोलतो, तेव्हा ते सध्याच्या परिस्थितीत वाढलेले प्रदूषण, धावपळीचं आयुष्य, सर्वत्र असणारी गर्दी आणि इतर गैरसोयींबद्दल हटकून सांगतात; तरीपण ते त्यांच्या स्वत:च्याही मूळ गावी परत जाण्याचे धाडस करत नाहीत! उलट; खेड्यातील लोकांना त्यांच्या गावातले वातावरण आवडत असतानाही जास्त चांगले आयुष्य मिळेल, ह्या आशेने जगायला ते गाव सोडून शहरात येण्याचे धाडस करतात. आपल्याला ह्यासाठी असा उपाय शोधता येईल का की, ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना – विशेषत: तरुण वर्गाला – खेड्यातील वातावरणातच त्यांची कमाईची क्षमता जास्त वाढवता येईल? तसेच, शहरी लोकांसाठी फक्त सुटीसाठी किंवा कामासाठी नव्हे, तर स्थलांतर करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भाग जास्त आकर्षक करता येईल का? 'प्युरा'चा पाया या विचारांवर आधारभूत होता.

ग्रामीण विकासाचे काम काही प्रमाणात आपल्या देशातील सरकार, खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे हाती घेत आले आहेत. उदाहरणार्थ : एखादी शिक्षणसंस्था उभी करणे किंवा आरोग्य केंद्र सुरु करणे, रस्ते तयार करणे, घरे बांधणे किंवा एखाद्या ग्रामीण भागात संपर्क-संदेश यंत्रणा सुरु करणे, अशी कामे वैयक्तिक पातळीवरही केली गेली आहेत. गेल्या काही दशकांमध्ये आम्हाला असा अनुभव आला आहे की, अशा कामांची सुरुवात चांगली होते – जसे खूप पाऊस पडला की, पाण्याचे काही ओहोळ व प्रवाह काही वेळापुरते तयार होतात. तसेच पाऊस थांबला की, सर्व ओहोळ कोरडे पडतात, कारण अतिरिक्त पाणी साठवण्यासाठी तिथे तळी नसतात. 'प्युरा'ने प्रथमच परिपूर्ण आणि शाश्वत विकास सुरु केला. त्याचा मुख्य उद्देश नोकऱ्यांच्या संधी वा रोजगार निर्माण करणे असेल आणि त्या अनुषंगाने घरे, आरोग्यसेवा, शिक्षण, स्थानिक कौशल्यांचा विकास, प्रत्यक्ष व इलेक्ट्रॉनिक दळणवळण आणि विक्रीव्यवस्था ह्यांचा विचारही केला जाईल. शाश्वत अशा कार्यपद्धती – ज्या सामर्थ्य देणाऱ्या आणि सर्वंकष वृद्धी करणाऱ्या ठरतील – अशांचा विकास, ही आजच्या काळाची गरज आहे.

आपण सर्व हे जाणतो की, विकसित भारतासाठी खेड्यांचा विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. खेड्यांचा विकास म्हणजे काय? म्हणजे असे की –

1. खेडी चांगल्या रस्त्यांनी आणि जरुर तेथे रेल्वेने जोडलेली असली पाहिजेत. इतर पायाभूत सुविधा – उदाहरणार्थ : शाळा, महाविद्यालये, रुग्णालये इत्यादी सर्व सोई – तेथील रहिवाशांना आणि पर्यटकांना उपलब्ध असल्या पाहिजेत. ह्याला 'प्रत्यक्ष

जोडले जाणे' म्हणू या.

2. येऊ घातलेल्या ज्ञानयुगात पूर्वापार असलेले स्थानिक ज्ञान-कौशल्य टिकवून ठेवून आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण व संशोधन ह्यांच्या साह्याने ते वाढवले पाहिजे. खेड्यांमध्ये – ती कुठल्याही भागात असली तरी – उत्तम शिक्षकांकडून चांगल्या शिक्षणाची सुविधा हवी. उत्तम वैद्यकीय मदत आणि तेथील लोक ज्या क्षेत्रात काम करत असतील – मग शेती, मत्स्योद्योग, फुलांची शेती, अन्नप्रक्रिया इत्यादी असो – त्या क्षेत्रातील अगदी आधुनिक माहितीचा त्यांना लाभ मिळाला पाहिजे. ह्याचा अर्थ खेडी इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जोडली गेली पाहिजेत.
3. प्रत्यक्ष दळणवळण सुरु झाले व इलेक्ट्रॉनिक संपर्कही मिळू लागले, म्हणजे ज्ञान-संपर्क आपोआपच होतो. त्यामुळे उत्पादनक्षमता वाढवू शकणे, उत्पादनांसाठी बाजारपेठ शोधणे, गुणवत्ता सुधारण्यात जागरुकता येणे, एकाच कामात गुंतलेल्या सर्वांचे एकमेकांशी संबंध सुरु होणे, जरुर ती यंत्रसामग्री उत्तम दर्जाची मिळण्यास मदत मिळणे, व्यवहारात पारदर्शकता येणे, जीवनशैली उंचावणे आणि मिळेल, त्या फुरसतीच्या वेळाचा उपयोग करणे – हे सर्व होऊ शकते. ह्याला 'ज्ञानाच्या देवाण-घेवाणीने जोडले जाणे' वा 'ज्ञान-संपर्क' म्हणता येईल.
4. ह्या तीन प्रकारांनी जोडले गेल्यावर कमावण्याची क्षमता वाढते. 'प्युरा'चे काम ध्येय म्हणून हाती घेतल्याने आपण खेड्यांचा विकास संपन्न 'ज्ञान-केंद्रे' म्हणून करु शकतो आणि ग्रामीण भागातील लोकांना उद्योजक झालेले बघू शकू.

'पेरियार मणिअम्माइ कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी फॉर विमेन' ह्या संस्थेच्या पुढाकाराने पेरियार 'प्युरा' समूह वा संकुल झाले. ह्या संकुलाचे उद्घाटन मी २० डिसेंबर, २००३ला केले आणि २४ सप्टेंबर, २००६ला मी परत तेथे गेलो. ह्या 'प्युरा'मध्ये २००३मध्ये ६५ खेड्यांचा समूह होता, ज्यांची एकूण लोकसंख्या एक लाखाच्या वर होती. तो समूह वर दिलेल्या तीन प्रकारांनी तो जोडला गेला असल्याने आर्थिक दृष्टीनेही जोडणीही झाली आहे. प्रत्येक वेळी मी तेथे जातो, तेव्हा स्थानिक लोकांचा उत्साह बघून चकित होतो. तेथील तरुण पिढीने सर्व समूहाचा एकत्रित विकास शक्य करुन दाखविला आहे. हे तरुण ह्या संकुलाच्या विकासासाठीच्या त्यांच्या योजना आणि त्यांची नव्या कल्पनांमधील कौशल्येही प्रदर्शित करतात. ह्या पुढाकारांमुळे मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत आणि १८०० स्वयंसहायता गटांच्या मदतीने उद्योजकांची संख्या किती तरी वाढली आहे. नव्या कल्पनांद्वारे पाण्याचे व्यवस्थापन करुन दोनशे एकर पडीक जमीन लागवडीखाली आणली गेली आहे. पेरियार मणिअम्माइ कॉलेज, हे पेरियार मणिअम्माइ विद्यापीठाचा भाग झाले आहे आणि त्यांनी 'प्युरा'च्या विकासासाठी तंत्रज्ञान देण्यास आणि स्थानिक नागरिकांची कौशल्ये सुधारण्यास त्यांचे विद्यार्थी व कॉलेजमधील अध्यापकांची मदत दिली आहे. त्यांनी 'एक गाव-एक उत्पादन' अशी योजना अमलात आणली, ज्यातून या खेड्यांतून उत्पादित होणाऱ्या ४५ उत्पादनांना जागतिक स्तरावर मागणी आहे. शिक्षणक्षेत्रातील लोकांनी तळागाळातील स्तरावर काम केल्याने ह्या ६५ खेड्यांमध्ये खूपच जलद गतीने विकास झाला आहे आणि तेथील लोकांची जीवनशैली

सुधारली आहे.

'दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूट' (डी.आर.आय.)चे नानाजी देशमुख आणि त्यांच्या सहका-यांनी मध्य प्रदेशात चित्रकूट 'प्युरा'ची निर्मिती केली आहे. भारतासाठी अत्यंत योग्य असा ग्रामीण विकासाचा नमुना तयार करुन तो कार्यान्वित करणारी डी.आर.आय.ही एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे.

ह्या संस्थेने हे ओळखले आहे की, राजकीय शक्तीपेक्षा लोकांची शक्ती जास्त सामर्थ्यवान, स्थिर आणि शाश्वत असते. ज्यांच्यावर जुलूम होत आला आहे व जे दडपले गेलेले आहेत; त्यांना बरोबर घेऊन काम केले, तर व्यवस्थापन व अंमलबजावणीमधले कौशल्य शिकता येते. सामाजिक प्रगती आणि समृद्धी हा गोष्टी तेव्हाच शक्य होतात, जेव्हा स्वावलंबन आणि काम उत्तम करणे ह्या चेतना नव्या पिढीत प्रज्वलित होतात. ह्या तत्त्वाचा उपयोग करुन डी.आर.आय.ने पाच-पाच खेड्यांचा एक असे शंभर समूह चित्रकूटच्या आसपास विकसित करण्याची योजना आखली आहे. त्यांतील एकूण लोकसंख्या सुमारे ५०,००० होईल, असे ऐंशी खेड्यांचे मिळून सोळा समूह आत्ताच विकसित केले आहेत.

तिथे पटणी नावाचे एक खेडे आहे. तिथे स्थानिक व पारंपरिक तंत्रज्ञान तसेच ज्ञान आणि स्थानिक कौशल्य ह्यांवर आधारित शाश्वत विकासाला डीआरआयने प्राधान्य दिले आहे. प्रत्यक्ष जागेवरच संशोधन करण्याच्या उपलब्ध सुविधेने संस्थेने केलेल्या संशोधनातून प्रत्यक्ष उदाहरणाने व पुननिर्मिती शक्य असलेले विकसित आणि स्वावलंबी खेडे उभारुन अशा खेड्यांचा विकास शक्य करुन दाखवला आहे. गुणवत्ता वाढवून उत्पन्न मिळवणे, शेतीच्या सुधारित पद्धती शिकवणे, खेड्यातील लोकांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन बाणवणे, आरोग्य व स्वच्छता सुधारणे आणि शंभर टक्के साक्षरता मिळवणे, हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. विकासाच्या कार्यक्रमांखेरीज एकजुटीने राहणारा संघर्षमुक्त समाज उभा करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. त्यामुळे चित्रकूटमधील ऐंशी खेडी जवळजवळ खटलेमुक्त आहेत. सर्व खेड्यांमधील लोकांनी एकमताने ठरवले आहे की, कोणताही वाद न्यायालयात न्यायचाच नाही. जे काही मतभेद होतील, ते त्या खेड्यातील लोक आपसात समंजसपणाने सोडवतील. नानाजी देशमुख ह्याबद्दल असा युक्तिवाद करतात की, लोक एकमेकांशी भांडतच राहिले तर विकासाची कामे करायला वेळच राहाणार नाही! ना ते स्वत:चा विकास साधू शकणार, ना समाजाचा. हा त्यांचा संदेश तेथील लोकांना मनापासून पटला आहे.

मला वाटते की, चित्रकूट प्रकल्प हा ग्रामीण भारताच्या विकासासाठी घडवलेला योग्य नमुना आहे. कौटुंबिक व सामाजिक संबंध सलोख्याचे राहावेत, भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान असावा, आधुनिक शिक्षणाला जोड असलेली पारंपरिक भारतीय अशी उमज असावी, सामाजिक ताणतणाव निवळावेत, सर्वांना – विशेषत: स्त्रियांना – आर्थिक सामर्थ्य मिळावे, सर्वांना आरोग्यसेवा मिळावी, स्वच्छता व पर्यावरणाविषयी जागरुकता शिकवावी आणि समाजातील सर्व घटकांमध्ये संपत्तीची न्याय्य वाटणी व्हावी, असे ह्या

योजनेचे लक्ष्य असेल. विकसित भारत म्हणजे काय, ह्या माझ्या विचारांशी ही संकल्पना तंतोतत जुळणारी आहे. 'विकसित भारत' म्हणजे केवळ आर्थिक विकास नाही; तर त्याचबरोबर कला व साहित्याचा सर्वांगीण विकास होणे, सर्वांमध्ये माणुसकी असणे, वैचारिक औदार्य असणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपला पाच हजारांहून जास्त वर्षांचा समृद्ध सांस्कृतिक वारसा टिकवून ठेवणे.

'प्युरा' समजून घेण्यासाठी एक स्वागतार्ह चळवळ सुरु झाली आहे आणि देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये खासगी व सार्वजनिक भागीदारीतून ते एक विशेष ध्येय म्हणून हाती घेतले जाणार आहे. मला खातरी आहे की, असे घडण्याचे संकेत खूपच तीव्र आहेत. असे घडेल, तेव्हा भारतात नजीकच्या भविष्यकाळात जवळजवळ सात हजार 'प्युरा' संकुले तयार झालेली असतील, ज्यात भारतातली सर्व खेडी समाविष्ट असतील.

> गांधीजी म्हणत असत की, 'खरा भारत खेड्यांमध्ये आहे. हा माणुसकी असलेला प्रचंड समुदायच भारताला जगासाठी महत्त्वाचे असे योगदान पूर्णत्वाने देण्यास मदत करेल.'

१२
उद्यानामध्ये...

'I build no walls to confine joy or sorrow;
To sarifice or achieve, gain or lose,
I just grow flowers on all open spaces,
And float lillies on ponds and rivers.

'मी सीमा घालत नाही आनंदाला किंवा दु:खाला, त्यागाला किंवा सिद्धीला, लाभाला किंवा तोट्याला, मी फक्त सर्व मोकळ्या जगांमध्ये फुलझाडं फुलवतो आणि तळयांमध्ये, नद्यांमध्ये लिलीची फुलं सोडतो.'

मला १९९७मध्ये 'भारतरत्न' पुरस्कार देण्यात आला, तेव्हा माजी राष्ट्रपती के. आर. नारायणन यांची कन्या चित्रा नारायणन मला, माझ्या भावाला आणि त्याच्या नातवंडांना 'मुघल गार्डन' दाखवायला घेऊन गेली. तो अनुभव इतका छान होता की, पौर्णिमेच्या रात्री त्या बागेची शोभा बघायला आवडेल, असे मी म्हणालो. राष्ट्रपती आणि त्यांच्या पत्नी उषा नारायणन यांच्या कानांवर हे गेले. तेव्हापासून जेव्हा-जेव्हा मी 'सरकारी खाना'साठी गेलो, तेव्हा-तेव्हा राष्ट्रपती व त्यांच्या पत्नी मला राष्ट्रपती भवनामध्ये राहण्यास बोलावत असत. त्या वेळी मला कधीही वाटले नव्हते की, मी राष्ट्रपती भवनामध्ये साठहून जास्त पौर्णिमा बघणार होतो!

मी राष्ट्रपती भवनामध्ये राहत असताना 'मुघल गार्डन' ही माझ्यासाठी श्रेष्ठ अनुभवाचे व्यासपीठ असलेली एक जागा झाली. मी, निसर्ग आणि देशाचे नागरिक ह्यांच्यामध्ये संवाद साधण्याचे ते एक मोठं माध्यम होऊन गेले. तिथं मला वेगवेगळ्या पेशांची माणसे भेटायची. त्यांत औषधी वनस्पतींचे जाणकारही असायचे. आवारात ह्या वनस्पतींचा एक विभाग होता. बागेत येणारे पक्षी आणि प्राणी माझे खूप चांगले सोबती होऊन गेले. बागेचे सुव्यवस्थित, प्रसन्न वातावरण आणि तिथले भव्य वृक्ष बघून मनाला शांत वाटायचं.

किती तरी प्रसंगी मी भारत-भेटीला आलेल्या वेगवेगळ्या राष्ट्रप्रमुखांबरोबर, मुख्यमंत्र्यांबरोबर त्या बागेत हिंडलो आहे. विशेष आठवणीत राहिलेला एक प्रसंग होता, सार्क देशांच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर २००७मध्ये ह्या बागेत हिंडतानाचा. मला आठवते की, पाकिस्तानचे पंतप्रधान शौकत अझीझ म्हणाले होते की, 'आपल्या द्विपक्षीय बैठका जर आपण मुघल गार्डनमध्ये घेतल्या, तर आपल्या देशांमधले मतभेद हवेत विरुन जातील.' श्रीलंकेचे पंतप्रधान म्हणाले की, 'चहासाठी एक तासभर सर्वांना बोलावण्यापेक्षा मी त्यांना सुंदर हिरवळीवर आपल्या सर्व देशांच्या विकासांबद्दल चर्चा करायला बोलवावे.'

त्या बागेत मी दोन झोपड्या बनवून घेतल्या. त्या वातावरणात शोभतील अशा तऱ्हेच्या आणि फक्त नैसर्गिक साधनांचाच उपयोग करुन, त्रिपुराहून बोलावलेल्या कारागिरांनी एक झोपडी बांधली, तिचे नाव ठेवले 'दि थिंकिंग हट'. माझ्या बऱ्याच निकटच्या स्नेह्यांना मी ह्या झोपडीत शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांमध्ये चर्चा करायला घेऊन जात असे. माझे एक पुस्तक 'इनडॉमिटेबल स्पिरिट' हेही बहुतेक सगळे त्या झोपडीतच लिहून झाले. दुसऱ्या झोपडीचे नाव होते – 'दि इम्मॉर्टल हट'. तिच्याभोवती सोळा वृक्षांची वाटिका होती, चौतीस प्रकारच्या औषधी वनस्पती असलेली बाग होती, एक संगीत-उद्यान होते आणि जैववैविध्य असलेली बाग होती. 'गाइडिंग सोल' हे माझे एक महत्त्वाचे पुस्तक – ज्यात माणसाच्या आयुष्याच्या हेतूबद्दलचे माझे विचार व्यक्त झाले आहेत – ते ह्या झोपडीत मी माझे मित्र प्रो. अरुण तिवारी ह्यांच्याबरोबर बसून केलेल्या चर्चांमधून तयार झाले. जेव्हा एखादा गुंतागुंतीचा राष्ट्रीय पातळीवरचा निर्णय घ्यायचा असेल, तेव्हा ह्या दोन झोपड्यांपैकी एकीत बसून मी विचार करत असे आणि अर्थातच बऱ्याचशा कविता इथं बसूनच मला स्फुरल्या.

राष्ट्रपती भवनाचे आवार ३४० एकरांचे आहे, त्यांतल्या १५ एकरांमध्ये 'मुघल गार्डन' पसरले आहे. बागेची रचना तीन वेगवेगळ्या आकारांच्या आणि टप्प्याटप्प्यांच्या सपाट पृष्ठभागांमध्ये केलेली आहे. एक लंबचौरस आहे, दुसरा लांबपट्टा आहे आणि तिसरा गोलाकार आहे. लंबचौरस आकार हा मुघल गार्डनचा मुख्य भाग आहे, ज्यामध्ये फार सुरेख अशा रचना केलेल्या आहेत. त्यात चार कालवे आहेत, सहा कारंजी आहेत आणि सत्तर चौरस मीटर्सची मध्यवर्ती हिरवळ आहे. (ऐतिहासिक महत्त्वाच्या राष्ट्रीय बैठका ह्या हिरवळीवर घेतल्या गेल्या. तसेच प्रजासत्ताकदिन आणि स्वातंत्र्यदिन ह्या दोन दिवशी ठेवले जाणारे लोकप्रिय व घरगुती समारंभ येथे होतात.) वरची छत्र्यांची छते केलेली १४४ मौलसरी झाडं, सुंदर गुलाब आणि वेगवेगळ्या आकारांच्या किती तरी हिरवळीही ह्या लंबचौरस आकाराच्या बागेत आहेत. ही बाग लांबपट्ट्याच्या बागेला जोडलेली आहे, जो बागेचा दुसरा भाग आहे. दुसऱ्या ५० मीटर लांब अशा ह्या पट्ट्यामधून चालायला रस्ता आहे आणि मध्यावर एक फुलांनी बहरलेल्या वेलींनी वेढलेली कमान आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गुलाबांचे ताटवे आहेत आणि चायनीज संत्र्यांच्या झाडांची एक रांग आहे. पश्चिमेच्या बाजूने बागेच्या तिसऱ्या भागाला लांबपट्ट्याची बाग जोडलेली आहे. तिसऱ्या भागात वेगवेगळ्या उंचीवर फुलांचे गोलाकार ताटवे आहेत व मध्यभागी कारंजं आहे. गोलाकार ताटव्यांमुळे याचे नाव 'गोल बाग' ठेवले आहे. सर्व फुलांना बहर आलेला असतो आणि मध्यभागी कारंज उडत असते, तेव्हा ह्या बागेचे दृश्य खरोखर वैभवशाली दिसते. ह्या प्रसिद्ध हिरवळीवर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश आणि त्यांच्या पत्नी लॉरा व त्यांच्याबरोबरचे शिष्टमंडळ ह्यांना बडा खाना देण्यात आला होता. त्या वेळी देशातील अनेक सुप्रसिद्ध कलावंत, विद्वान आणि इतर अनेक माननीय व्यक्ती ह्यांनाही निमंत्रणे होती. राष्ट्रपती भवनामध्ये झालेल्या महत्त्वाच्या प्रसंगांपैकी हा प्रसंग संस्मरणीय होता. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष व त्यांची पत्नी ह्या जोडप्याने ह्या समारंभाचे विशेष कौतुक केले.

मुघल गार्डनचे हे तीनही भाग आणि इतर बागा फेब्रुवारीच्या मध्यापासून मार्चच्या मध्यापर्यंत अत्यंत सुंदर बहरात असतात. हिवाळ्यात फुलणारी तऱ्हेतऱ्हेची फुलं, गुलाब, वेगवेगळे वेल, झुडपं आणि फुलणारी झाडं मिळून थक्क करणाऱ्या सौंदर्याचे दृश्य बघायला मिळते.

फुलांच्या बागांचे निष्णात डॉ. ब्रह्मासिंग हे ह्या बागेच्या कामावरील विशेष अधिकारी होते. त्यांना वेगवेगळ्या झाडांची नावं सांगायला खूप आवडत असे. त्यांत अॅक्रोक्लिनियम, ॲन्टिऱ्हायनम, ब्रॅकिकोम, बिगोनिया, कॅलेन्ड्युला, कॅम्पानुला, कँडीटफ्ट, कार्नेशन, क्रिसॅन्थिमम, सेलोसिया, चायना अॅस्टर, डेझी, सिनेरारिआ, कॅलिओप्सिस, कॉसमॉस, क्लार्किया, कॉर्नफ्लॉवर, डेल्फिनियम, डायन्थस, डेलिया इत्यादी अनेकानेक फुलझाडं होती.

ह्या बागेचे सौंदर्य बघायला हजारोंच्या संख्येने लोक येतात. लोकांना बाग बघायला येण्यासाठी शुल्क द्याव लागत नाही. खास ठरलेल्या दिवशी खास वेगवेगळ्या लोकांसाठी बाग बघण्याची व्यवस्था केली जाते. उदाहरणार्थ : शेतकरी, लष्करातील लोक, ज्येष्ठ नागरिक, अपंग आणि दृष्टिहीन.

डॉ. ब्रह्मासिंग ह्यांनी राष्ट्रपती भवनामधील झाडांवर सुरेख चित्रं असलेले एक पुस्तक लिहिले आहे.

राष्ट्रपती भवनाच्या ह्या बागेचे मोल व हिरवाई वाढविण्यासाठी काय करता येईल, ह्यावर मी २००२मध्ये बराच विचार केला. डी.आर.डी.ओ.मध्ये उंचावरच्या जमिनीत शेती आणि दगडधोंड्यांनी भरलेल्या जागांमध्ये भाज्या व फुलांच्या बागा करण्याच्या माझ्या अनुभवाचा इथं उपयोग झाला. मी डी.आर.डी.ओ.मधील शेतीशास्त्रातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला, तसेच 'इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्च' आणि 'कौन्सिल ऑफ सायंटिफिक अॅन्ड इंडिस्ट्रयल रिसर्च' येथील शेतीतज्ज्ञांचाही सल्ला घेतला. डॉ. ब्रह्मासिंगांनी मला मदत केली आणि आमच्या प्रयत्नांमधून बारा नव्या बागा साकारल्या.

झाडांना स्पर्श करुन अनुभव घ्यायचा (टॅक्टाइल गार्डन) अशा बागा भारतात किंवा परदेशातही खूप कमी आहेत. लखनौच्या सी.एस.आय.आर. संस्थेतील 'नॅशनल बोटॅनिकल रिसर्च इन्स्टिट्यूट'मध्ये अशी 'टॅक्टाइल बाग' आहे. त्यांच्या विशेष तज्ज्ञांच्या सहकार्याने २००४मध्ये राष्ट्रपती भवनामध्ये तशी बाग केली. ह्या बागेचा आकार लंबगोल आहे, त्यात एक कारंजे आहे आणि मधल्या पायवाटेच्या दोन्ही कडांना दगड बसवलेले आहेत. बागेत सुगंधी झाडे, औषधी झाडे, मसाल्याची झाडे, फळझाडे आणि शोभेची फुले असलेले ३४ ताटवे आहेत. प्रत्येक ताटव्याजवळ त्या ताटव्यातील झाडांचे वर्णन करणारी पाटी ब्रेलमध्ये हिंदी व इंग्रजी भाषेत लिहिलेली आहे.

अंध लोक ही बाग बघायला येत असत, तेव्हा त्या पाट्यांमुळे त्यांना खूप आनंद होत

असे, जो त्यांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत असे. दर वर्षी 'टॅक्टाइल गार्डन' दृष्टिहीनांसाठी जेव्हा उघडे ठेवले जायचे, तेव्हा मी नेहमी त्यांच्याबरोबर तेथेच असे.

एक दिवस 'इम्मॉर्टल हट'मध्ये बसून डॉ. ब्रह्मासिंग आणि माझे मित्र डॉ. वाय. एस. राजन ह्यांच्याशी मी काही तरी चर्चा करत असताना तेथील वटवृक्ष, जैवविविधतेचे उद्यान आणि औषधी वनस्पतींचे उद्यान ह्यांच्या पार्श्वभूमीवर एक संगीत-उद्यान असले पाहिजे, असे आम्हाला वाटले. 'सांगीतिक कारंजी' २००६मध्ये इथं बसवण्यात आली. ह्या कारंज्यांसाठी मानवी कल्पक सर्जनशीलतेबरोबर अनेक तंत्राज्ञानांचा खूप छान एकत्र उपयोग करण्यात आला – जसे डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, हायड्रोडायनॅमिक्स, हायड्रोस्टॅटिक्स. ह्या विलोभनीय कारंज्यांमुळे अत्यंत प्रेक्षणीय, सुंदर दृश्य दिसते. त्यात चमचम करणारा प्रकाश अन् पाण्याच्या उडणाऱ्या छोट्या-छोट्या धारांचे सुंदर मेळ असलेले नृत्यच दिसत असते – जणू ते शास्त्रीय संगीताच्या तालाशी जुळत असते. हे संगीत ध्वनिमुद्रित असे किंवा प्रत्यक्ष बैठकीतून तिथं सादर होत असे. पौर्णिमेच्या रात्री राष्ट्रपती भवनाच्या घुमटाच्या पार्श्वभूमीवर पवित्र प्रकाशात, मनोहारी दिमाखात ती दोन कारंजी जणू आपल्या देशाचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान ह्यांच्या प्रतीकांसारखी दिसतात.

ह्या संगीत-उद्यानाचा अत्यंत सुंदर अनुभव एका पौर्णिमेच्या रात्री पाचशे लोकांच्या श्रोतृवृंदासमोर पंडित शिवकुमार शर्मा यांनी साकारलेल्या संतूरवादनाचा होता.

जैवविविधता असलेले उद्यान दर वर्षी थोडे-थोडे जास्त विकसित करत गेलो. किती तरी तऱ्हेचे पक्षी व प्राणी, एक धबधबा, वेगवेगळ्या तऱ्हांच्या दगडांची रचना, माशांचे तळे, सशांचे घर, बदकांचे घर, एका कोपऱ्यात आजारी प्राण्यांसाठी जागा – असे सगळे एकेक करुन वाढत गेले. निसर्गाबद्दलचे प्रेम अन् आपुलकीच व्यक्त करण्यासाठी ती बाग साकारली नव्हती; तर मनाला शांतता, स्वस्थपणा मिळण्याचा तो स्त्रोत होता.

एके दिवशी सकाळी बागेत फिरत असताना आईने टाकून दिलेले एक हरणाचे पाडस दिसले. माझ्याबरोबर डॉ. सुधीर होते. आमच्या दोघांच्या लक्षात आले की, जन्म झाला तेव्हा तिच्या दोन पायांना इजा झाली असणार, त्यामुळे तिला उठता येत नव्हते. डॉ. सुधीर यांनी तिच्या पायांवर इलाज करायला सुरुवात केली आणि आम्ही त्या पाडसाला तिच्या आईजवळ नेऊन ठेवायचा खूप प्रयत्न केला, पण तो यशस्वी होईना. मी त्या पाडसाला रोज बाटलीने दूध पाजत होतो. आठवड्याभरात तिचे पाय बरे झाले आणि तिला चालता यायला लागले. मी दिसलो रे दिसलो की, ती दुधाच्या आशेने पळत माझ्याकडे यायची. काही आठवडे गेले. मग तिच्या आईने जेव्हा तिला स्वीकारले, तेव्हा माझे मन भरुन आले.

व इतर बागांच्या आठवणींनी मी भावुक होतो. तिथले आनंद मी इतरांबरोबर वाटून घेण्याचे प्रयत्न केले. उदाहरणार्थ : मोठमोठ्या कलावंतांच्या संगीताचे तिथे झालेले कार्यक्रम. परमेश्वराने निसर्गाचे सौंदर्य अनुभवण्याची मला ही जी संधी दिली, त्या कृपेबद्दल मी त्याला कृतज्ञतेने वंदन करतो.

१३
विवादास्पद निर्णय

'Conscience is the light of the soul.'

'सदसद्विवेकबुद्धी हा आत्म्याचा प्रकाश असतो.'

राष्ट्रपती असतानाच्या, आधीच्या किंवा नंतरच्या माझ्या विचारांना आणि कृतींना वेगवेगळे करणे अवघड आहे. काही म्हटले तरी व्यक्ती तर तीच असते आणि व्यक्तीचे अनुभव हे एखाद्या साखळीसारखे असतात. मी तर्काधिष्ठित व विचारपूर्वक निर्णय घेतलेले असे तीन प्रसंग घडले, ज्यांनी माझ्या व्यक्तिगत भावनांवर खोलवर परिणाम केला. पहिला होता, बिहार विधिमंडळाच्या बरखास्तीचा. मी ह्याची चर्चा बऱ्याचदा केलेली आहे, परंतु पुन्हा एकदा त्याबद्दल लिहितो.

माझ्या राष्ट्रपतिपदाच्या कार्यकाळात माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुष्कळ प्रगती झाली. राष्ट्रपती भवनात पूर्णतया इलेक्ट्रॉनिक पद्धती कार्यान्वित झाली. मी जगात कोठेही असलो, तरी दिल्लीतील यंत्रणेत साठवलेल्या फाइल्समधून माहिती घेऊन जरुर त्या विषयावर चर्चा करु शकत असे. ई-मेल्समुळे ताबडतोब संपर्क साधता येत असे. जेव्हा पंतप्रधान मनमोहनसिंग यांचा मला फोन आला की, बिहारच्या विधिमंडळामधील सत्ताधाऱ्यांच्या सामर्थ्याबद्दल राज्यपालांना भरवसा वाटत नाही, म्हणून ते बरखास्त करण्याची शिफारस करावी, असा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे; तेव्हा मला आश्चर्य हाचे वाटले की, बिहार मंत्रिमंडळ तर गेले सहा महिने काम करतच नव्हते! म्हणून मी पंतप्रधानांना विचारले की, असा निर्णय एकाएकी का घेतला? ते म्हणाले की, ते थोड्या वेळाने फोन करतील. दुसऱ्यांदा फोन आला, तेव्हा मॉस्कोमध्ये रात्रीचा एक वाजला होता. मी माझे मुद्दे मांडले आणि पंतप्रधानांना त्याबद्दल प्रश्न विचारले. सर्व चर्चेनंतर माझी खातरी झाली की, मी मंत्रिमंडळाचा ठराव परत पाठवला तरी फरक पडणार नव्हता, कारण काहीही करुन मंत्रिमंडळ तो मंजूर करणारच होते. म्हणून मग मी त्याला संमती देण्याचे ठरवले.

कोर्टाच्या म्हणण्याप्रमाणे, कायदेशीर भाषेत सांगायचे तर – 'बिहारच्या राज्यपालांनी भारताच्या राष्ट्रपतींना दोन अहवाल पाठवले होते. एक २७ एप्रिल, २००५ला आणि दुसरा २१ मे, २००५ला. ह्या अहवालांचा विचार केल्यावर, आर्टिकल १७४चा कलम नं. २, उपकलम (बी); आणि ७ मार्च, २००५चे आर्टिकल ३५६प्रमाणे काढलेले सूचनापत्र जी.एस.आर. १६(ई) (ए), ह्यांनी दिलेल्या अधिकारांचा वापर करुन २३ मे, २००५ला सूचनापत्र जारी करुन बिहार राज्याचे विधिमंडळ त्वरित प्रभावाने बरखास्त करण्यात येत आहे....'

आता सर्वोच्च न्यायालयाने ह्या प्रश्नावर चर्चा सुरु केली आणि चर्चेदरम्यान बरीच मते समोर आली.

सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना निर्देशित केले की, २३ मे, २००५चे सूचनापत्र हे एक एकमेव उदाहरण आहे. ह्यापूर्वी या न्यायालयासमोर आलेल्या अशा उदाहरणांमध्ये सत्तेवर असलेल्या पक्षाने विधिमंडळाचा विश्वास गमावला होता, म्हणून विधिमंडळे बरखास्त झाली होती. प्रस्तुत उदाहरण अत्यंत वेगळे व एकमेव आहे, जेथे विधिमंडळाची एकही बैठक झालेली नसताना, अशी कारणे देऊन बरखास्तीचा हुकूम काढण्यात आला आहे की – अवैध पद्धतीने बहुमत गोळा करुन सरकार स्थापण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि असे प्रयत्न चालू राहिले, तर घटनेतील तरतुदींमध्ये फेरफार केल्यासारखे होईल.

कोर्टाने चार प्रश्न विचारले –

1. घटनेतील आर्टिकल १७४ (२) (ब) प्रमाणे, एकदाही बैठक झालेली नसताना विधिमंडळ बरखास्त करता येते का?
2. दि. २३ मे २००५चे बिहारचे विधिमंडळ बरखास्त करणारे सूचनापत्र बेकायदा आणि राज्यघटनाविरोधी आहे का?
3. वरील प्रश्नाचे उत्तर जर होकारार्थी असेल, तर ७ मार्च, २००५ किंवा ४ मार्च, २००५ला जी स्थिती होती, त्या मूळ स्थितीला परत जावे – असे आदेश दिले पाहिजेत का?
4. आर्टिकल-३६१प्रमाणे राज्यपालांना मिळणाऱ्या अभयाच्या मर्यादा काय आहेत?

सर्वोच्च न्यायालयामध्ये ह्या प्रश्नावर चर्चा सुरु झाल्यावर बरीच मते व्यक्त केली गेली. मी पंतप्रधानांना सांगितले की, ज्या प्रक्रियेतून मी निर्णय घेतला, ती न्यायालयात व्यवस्थित सांगण्यात आलेली नाही. ही गोष्ट मी त्यांना एकदा फोनवर व एकदा प्रत्यक्ष भेटीत सांगितली. ते म्हणाले की, ते त्या संदर्भात वकिलांशी बोलतील आणि मॉस्कोमध्ये घडलेल्या घटनांचा क्रम व आमच्या अनेकदा झालेल्या चर्चांनंतर राष्ट्रपतींनी घेतलेला निर्णय, ह्या सर्वांबद्दल न्यायालयाला स्पष्टीकरण देतील. अखेरीस माझी खातरी झाली की, वकिलांनी माझी बाजू मला अपेक्षा होती, तशी मांडली नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काही मतभेद असताना झाला. अर्थातच न्यायाधीशांचा निर्णय अंतिम असतो आणि त्यांनी राज्यपालांना जबाबदार धरले होते, त्याचबरोबर काही अंशी सरकारलाही. अखेर मंत्रिमंडळ मी बनवलेले असते, म्हणजे जबाबदारी मलाच स्वीकारायला हवी होती.

सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्याबरोबर मी राजीनाम्याचे पत्र लिहिले, त्यावर स्वाक्षरी केली आणि ते उपराष्ट्रपती अनुभवी राजकारणी भैरोसिंह शेखावत ह्यांच्याकडे पाठवण्यासाठी तयार ठेवले. त्यांच्याशी बोलून त्यांना ते पत्र देण्याची माझी इच्छा होती, परंतु उपराष्ट्रपती दिल्लीत नव्हते. दरम्यान, पंतप्रधानांना मला दुसऱ्या काही तरी कामासाठी भेटायचे होते. आम्ही माझ्या ऑफिसमध्ये दुपारी भेटलो. त्या कामाचे बोलणे

झाल्यावर मी सांगितले की, मी राष्ट्रपतिपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे आणि माझे पत्र त्यांना दाखवून सांगितले की, मी उपराष्ट्रपती परत येण्याची वाट पाहत आहे. पंतप्रधान चपापले.

तो प्रसंग मनाला भिडणारा होता आणि मी त्याचे वर्णन करु इच्छित नाही. पंतप्रधानांनी मला कळकळीची विनंती केली की, सध्याच्या कठीण परिस्थितीत मी असे करु नये. ते म्हणाले, ह्या निर्णयाने जे निकराचे पडसाद उमटतील, त्यामुळे सरकार कोसळणेही शक्य होते. फक्त एकाच ठिकाणी मला सल्ला मिळणे शक्य होते – माझी सदसद्विवेकबुद्धी. 'सदसद्विवेकबुद्धी' हा आत्म्याचा आपल्या हृदयात पडणारा प्रकाश आहे. त्या रात्री मी झोपलो नाही. मी स्वत:ला विचारत राहिलो की, माझी सदसद्विवेकबुद्धी काय सांगते हे महत्त्वाचे आहे की, राष्ट्र महत्त्वाचे आहे? दुस़ऱ्या दिवशी पहाटे मी नेहमीप्रमाणे 'नमाज' अदा केला आणि नंतर माझा राजीनामा परत घेण्याचा व सरकार डळमळीत न करण्याचा निर्णय घेतला. कुठलाही पक्ष सत्तेवर असता, तरी मी हेच केले असते.

देशातले फारच कमी लोक 'ई-गव्हर्नन्स' वापरत आहेत. माझ्या मते, सीमाविरहित जगासाठीचे ते एक साधन आहे. मी देशात व परदेशात 'ई-गव्हर्नन्स'चा भरपूर वापर करतो. जे फक्त प्रत्यक्ष कागदाच्या फाइल्सद्वारेच कामे करतात, त्यांना ई-गव्हर्नन्सची शक्ती कळणे अवघड आहे. बिहारचे जे विधिमंडळ प्रत्यक्ष काम करतच नव्हते, ते बरखास्त करुन मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीला योग्य वाटेल त्याप्रमाणे केले – मी कोठे होतो, ह्याचा विचारही न करता.

'मनूने प्रत्येक व्यक्तीला कोणाकडूनही भेट म्हणून काहीही घेऊ नये, अशी ताकीद दिली आहे. ती घेणारा त्यामुळे उपकाराच्या ओझ्याखाली येतो आणि अशा माणसाच्या हातून चुकीच्या गोष्टीही घडू शकतात,' असेही तो म्हणतो.

संसदेबद्दलचा कायदा नं.१९५९ (अपात्र ठरविण्यास प्रतिबंध) साधारण असे सांगतो की, काही लाभाची पदे जर सरकारच्या नियंत्रणाखाली असतील, तर त्या पदांवर असणारे संसद-सदस्य म्हणून निवडले जाण्यास किंवा होण्यास अपात्र ठरत नाहीत.

बऱ्याच संसद-सदस्यांनी २००६च्या मध्यावर इतर काही सदस्य लाभाच्या पदावर कामे करत आहेत, अशा तक्रारी माझ्याकडे पाठवल्या; तेव्हा त्यांच्यामध्ये लक्ष घालणे भाग होते. मी त्या तक्रारी प्रमुख निवडणूक आयुक्तांकडे पाठवल्या. अशासाठी की – त्यांनी त्याबद्दल तपास करुन, ज्या बाबतीत जरुर वाटेल त्या बाबतीत चौकशी करावी. आणखी दोन सदस्या श्रीमती जया बच्चन आणि श्रीमती सोनिया गांधी ह्यांच्याबद्दल अशा तक्रारी आल्या, तेव्हा बऱ्याच सदस्यांनी विचारले की, राष्ट्रपतींनी ह्या सदस्यांबद्दल चौकशी करण्यासाठी पुढाकार घेतलाच का? दरम्यान, 'लाभाची पदे'बद्दलच्या विधेयकाचा मसुदा संसदेकडून माझ्याकडे संमतीसाठी आला.

मी त्या विधेयकाचा अभ्यास केला आणि मला असे आढळून आले की, त्यात नियमांमध्ये न बसणाऱ्या बऱ्याच गोष्टी होत्या. विधेयकाचा जो मसुदा माझ्याकडे आला होता, त्यामध्ये लाभाचे पद कशाला म्हणायचे, हे ठरवण्यासाठी पद्धतशीर स्पष्टीकरण नव्हते. त्याऐवजी सध्या ज्या लाभाच्या पदांवर संसद-सदस्य कामे करतच होते, त्यांनाच सूट देण्यात आली होती! मी ह्या नियमबाह्य गोष्टी आणि माझ्या शंका व हरकतींची सर्वोच्च न्यायालयाच्या तीन निवृत्त सरन्यायाधीशांशीही चर्चा केली. मग ते तिघे व माझे सहकारी ह्या सर्वांचा सल्ला घेऊन मी एक पत्र तयार केले. मी असे सुचवले की, विधेयकाच्या मसुद्यामध्ये कुठल्या पदासाठी सूट देता येईल, हाचे स्पष्ट निकष असावेत. ते न्याय्य व वाजवी असावेत आणि स्वच्छ, पारदर्शक पद्धतीने हा कायदा राज्ये, केंद्रशासित प्रदेशांनाही लागू व्हावा. मी उपस्थित केलेला दुसरा मुद्दा – अशा कुठल्या जागा ह्या कायद्याने सूट देण्यास पात्र ठरवायच्या, ते जाणून घेणे, हा होता. तीनही सरन्यायाधीश म्हणाले की, माझ्या शंका योग्य आहेत आणि कोणत्या पदाला लाभाचे पद म्हणावे, हे ठरवण्यासाठी व्यवस्थित दिशादर्शक नियम असणे आवश्यक होते.

मग प्रश्न असा उभा राहिला की, 'लाभाची पदे' विधेयकाबद्दल मी लिहिलेले पत्र मंत्रिमंडळाला पाठवायचे का संसदेला? राज्यघटनेचा अभ्यास केल्यावर मला आढळले की, आर्टिकल-१११ प्रमाणे मी ते विधेयक पुनर्विचारासाठी संसदेला परत पाठवायचे असते, कारण माझ्या संमतीसाठी मला ते संसदेने पाठवले होते; मंत्रिमंडळाने नाही. म्हणून मी ते लोकसभा व राज्यसभा यांच्या मुख्य सचिवांकडे, दोन्ही गृहांच्या फेरविचारासाठी पाठवले. संसद किंवा राष्ट्रपती भवन ह्यांच्या इतिहासात ही पहिलीच वेळ होती की, राष्ट्रपतींनी फेरविचारासाठी एखादा मसुदा परत पाठवला – हा प्रसारमाध्यमांचा दुसऱ्या दिवशीचा मुख्य मथळा झाला! त्यावर तीव्र प्रतिसाद, अखंड चर्चाही सुरु झाल्या. मी त्या विधेयकावर स्वाक्षरी करुन टाकावी म्हणून सर्वच पक्षांकडून माझ्यावर प्रचंड दबाव आणण्यात आला.

'लाभ' किंवा 'भेट' ह्या शब्दांचा मनुस्मृतीत दिलेला अर्थच फक्त मला समजत होता – 'कोणाकडूनही भेट घेण्याने मनुष्याच्या आत्म्यातील दिव्य प्रकाश विझून जातो.' मुहम्मद पैगंबरांनी एका 'हदिथ'मध्ये सांगितले आहे की, 'जेव्हा अल्ला एखाद्या माणसाची नेमणूक एखाद्या जागेवर करतो, तेव्हा तो त्याच्या उदरनिर्वाहाची काळजी घेतो; त्या उपर जर त्या माणसाने काही घेतले, तर तो अवैध लाभ झाला.'

मी ते विधेयक परत पाठवण्यामागे माझे कारण व हरकत यासाठीच होती. विधेयकाच्या मसुद्याचा फेरविचार झाला आणि तो माझ्या संमतीसाठी परत पाठवण्यात आला. पंतप्रधान मला भेटले आणि त्यांना आश्चर्य वाटले, कारण सामान्यत: मी मंजूर केलेली विधेयके दुसऱ्याच दिवशी परत पाठवत असे. मग काहीच कृती न करता इतके आठवडे का गेले, असा त्यांना प्रश्न पडला होता. मी सांगितले की, संसदेत या संदर्भात काही कृती होणे आवश्यक होते आणि त्याबद्दल मला अजून काहीच कळवण्यात आले नव्हते.

पंतप्रधान म्हणाले की, संसदेने संयुक्त संसदीय समिती (जे.पी.सी. –Joint Parliamentary Committee) बनवून 'लाभाचे पद' विधेयकाच्या मसुद्यासंदर्भात माझ्या सूचनांप्रमाणे सर्व बाजूंचा अभ्यास करण्याचे ठरवले होते. दरम्यान, मसुदा परत पाठवण्यास उशीर करण्याबद्दल टीका वाढत चालली होती. मी ठाम होतो की, कमीत कमी जे करणे आवश्यक आहे, ते झाल्याशिवाय मी विधेयक मंजूर करणार नाही.

बऱ्याच पक्षांची बरीच शिष्टमंडळे ह्या मुद्द्यासंदर्भात मला भेटायला आली. मी उत्तर-पूर्व भारताच्या दौऱ्यावर होतो आणि कोहिमाहून गुवाहाटीला जाणाऱ्या विमानात होतो; तेव्हा मला संदेश पाठवण्यात आला की, 'लाभाचे पद'संबंधीच्या विधेयकाच्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी जे.पी.सी. स्थापनेस संसदेने मंजुरी दिली आहे. मला संसदेने केलेल्या ह्या कृतीची खातरी झाल्याबरोबर मी त्या विधेयकावर स्वाक्षरी केली.

नंतर काही महिन्यांनी जे.पी.सी.ने सादर केलेला अहवाल संसदेने मंजूर केला. तो परिपूर्णही नव्हता आणि जो खरा प्रश्न मी उपस्थित केला होता, त्याचा विचारही केला गेला नव्हता. संसदेने असले प्रश्न जास्त काळजीपूर्वक हाताळले पाहिजेत; नाही तर असा समज होऊ शकतो की, देशाची सर्वोच्च संस्था चुकीचे पायंडे प्रस्थापित करत आहे – परिणामी, सरकारच्या भिन्न-भिन्न पातळयांमध्येही त्याच पद्धती अवलंबिल्या जाऊन तो राष्ट्रीय स्तरावर पायंडाच पडेल.

लाभाच्या पदाच्या विधेयकाचा मसुदा परत पाठविण्याच्या घटनेवरुन हे अगदी स्पष्ट होते की, संसदेच्या पातळीवरही जनतेसमोर प्रामाणिकतेचे आदर्श ठरु शकत नाहीत, अशा कृतींवर चर्चा होत नाही आणि ज्या गांभीर्याने त्यांचा पुनर्विचार झाला पाहिजे, तो होत नाही. चुकीचे पायंडे पाडण्याची ही सुरुवात म्हणता येईल आणि त्यामुळे राष्ट्रीय आदर्श तयार करण्यात व त्याप्रमाणे वागण्यात तडजोडी होऊ लागतील.

अलीकडेच आपण भ्रष्टाचाराविरोधात उपोषणाच्या दोन चळवळी बघितल्या आणि अशा आणखी बऱ्याच चळवळींना प्रोत्साहन मिळेल. 'लोकशाही' असलेल्या आपल्या देशात अशा चळवळी का होऊ लागल्या आहेत? असा प्रश्न मी स्वत:लाच विचारत होतो. संसदेच्याच आदर्शांची पातळी खाली जाणे, हे ह्याचे मुख्य कारण आहे. म्हणून मला असे सुचवावेसे वाटते की, संसदेमध्ये कमीत कमी दोन आठवडे, एकदाही 'सभात्याग' न करता भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे आणि एका ठराविक मुदतीत सार्वजनिक जीवनातून या राक्षसाचे निर्मूलन करण्यासाठी योजना तयार केली पाहिजे. याचाच एक भाग म्हणून लोकप्रतिनिधींसाठी एक आचारसंहिता तयार केली पाहिजे. जनतेचे प्रतिनिधी जर त्यांना सोपवलेले काम करुन दाखवण्यात अयशस्वी ठरले; तर ज्या लोकांनी त्यांना निवडून दिले, ते आपला विरोध आणि निराशा बऱ्याचपद्धतींनी व्यक्त करतील. प्रत्येक राजकीय पक्षाने त्यांच्याकडून भ्रष्टाचार-निर्मूलनासाठी आणि भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी काय प्रयत्न केले, ह्याचा आढावा संसदेच्या माध्यमातून घेतला पाहिजे. आज वेळ आली आहे की, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी भ्रष्टाचारावर

विचारविनिमय करुन हे दूषण नष्ट करण्यासाठी कालबद्ध व सनदशीर उपाय शोधून काढले पाहिजेत. ह्यामध्ये परदेशातील खात्यांमध्ये ठेवलेले पैसे परत मिळवणेही आले. संसदेने वेळीच अशा कृती केल्या, तर नागरिकांचा विश्वास वाढेल आणि समाजात शांतता, सुसंवाद, ऐक्य वाढेल – जे देशाच्या जलद विकासासाठी अत्यंत गरजेचे आहे.

राष्ट्रपती ह्या नात्याने पार पाडण्याच्या माझ्यासाठी जास्त अवघड कामांपैकी एक होते – अपिले करण्याचे सर्व मार्ग संपल्यावर मृत्युदंडाची शिक्षा कायम करण्यावर निर्णय घेणे. बरीच वर्षे बरेच खटले राष्ट्रपती भवनामध्ये पडून असल्यामुळे वारसागत आलेल्या ह्या कामाबद्दल कुठल्याही राष्ट्रपतीला उत्साह वाटत नाही. मला असे वाटले की, ह्या सर्व खटल्यांचा सामान्य नागरिकांच्या दृष्टिकोनातून गुन्हा, तसेच तो किती भयंकर आहे, ह्याचा आणि ज्यांच्यावर आरोप निश्चित होऊन मृत्युदंडाची शिक्षा झाली असेल, त्या व्यक्तींचा सामाजिक व आर्थिक दर्जा कोणता आहे, ह्याचा तपास केला पाहिजे. अशा अभ्यासातून जे निष्पन्न झाले त्याचे मला आश्चर्य वाटले की, पडून राहिलेल्या जवळजवळ सर्व खटल्यांमध्ये सामाजिक आणि आर्थिक पक्षपात होता. तो बघून मला असे वाटले की, ज्याचा शत्रुत्वाशी संबंध कमीत कमी होता आणि तो गुन्हा करण्यासाठी ज्याचा उघड काही हेतूच दिसत नव्हता, अशा माणसांना आपण शिक्षा ठोठावल्या होत्या. अर्थात एक खटला होता, ज्यामध्ये माझ्या लक्षात आले की, एका लिफ्टचालकाने एका मुलीवर बलात्कार करुन नि:संशय तिचा खून केला होता. त्या खटल्यात मी मृत्युदंडाची शिक्षा कायम केली.

माझ्या मते, न्यायालयामध्ये मृत्युदंडाचे खटले चालू असतात, तेव्हा त्यांनी ज्याला शिक्षा होणार असते त्याची व त्याच्या कुटुंबाची गुजराण कशावर होते, हे पोलिसांना अक्कलहुशारीने शोधून काढण्यास सांगावे. अशा तऱ्हेने शोध घेतल्यास खरा गुन्हेगार आणि गुन्ह्याचा हेतू सापडू शकेल.

आपल्याला सर्वांना हा जन्म परमेश्वराने दिला आहे. कृत्रिम आणि बनावटी पुराव्याच्या आधारे एक आयुष्य नष्ट करण्याचा अधिकार माणसाने तयार केलेल्या पद्धतीला किंवा मनुष्याला स्वत:ला आहे, असे मला वाटत नाही.

प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर किंवा जर मधेच पंतप्रधान बदलण्याची वेळ आली, तर तेव्हा देशासाठी पंतप्रधान नियुक्त करणे, ही राष्ट्रपतींची एक जबाबदारी असते. अशा वेळी राष्ट्रपतींनी स्वत:ची खातरी करुन घ्यायची असते की, स्थिर सरकार बनवण्यास एखाद्या पक्षाकडे किंवा संयुक्त आघाडीकडे आवश्यक तेवढ्या संख्येने निर्वाचित सदस्य आहेत. कुठल्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नसले आणि एकाहून जास्त स्पर्धक पक्ष सरकार स्थापन करु शकण्याइतके सामर्थ्य असल्याचा दावा करतात, तेव्हा निवड करणे आणखी गुंतागुंतीचे काम होते. ह्या संदर्भात २००४च्या निवडणुका हा औत्सुक्यपूर्ण प्रसंग होता. निवडणुका झाल्या होत्या, निकाल जाहीर झाले होते आणि एकाही पक्षाकडे स्वबळावर सरकार बनवण्याइतके पुरेसे सदस्य नव्हते.

काँग्रेस पक्षाची निवडून आलेल्या उमेदवारांची संख्या सर्वांत जास्त होती. तरीही, तीन दिवस उलटून गेले, तरी सरकार बनवण्यासाठी कुठलाच पक्ष किंवा आघाडी पुढे आली नाही. मला आश्चर्य वाटले. मला काळजी वाटण्याचे ते कारणही होते. मी माझ्या सचिवांना सांगून सर्वांत मोठ्या पक्षाच्या नेत्याला – हा संदर्भात काँग्रेसला – तातडीने पत्र पाठवले की, त्यांनी पुढे येऊन सरकार स्थापन करण्याचा दावा करावा.

मला सांगण्यात आले की, सोनिया गांधी मला १८ मेच्या दुपारी १२.१५ वाजता भेटायला येणार आहेत. त्या वेळेवर आल्या, परंतु एकट्या येण्याऐवजी त्या डॉ. मनमोहनसिंगांना बरोबर घेऊन आल्या आणि त्यांनी माझ्याशी चर्चा केली. त्या म्हणाल्या की, त्यांच्याकडे पुरेशा संख्येने निवडून आलेले सदस्य होते; परंतु इतर पक्षांच्या नेत्यांनी पाठिंबा देऊन स्वाक्षरी केलेली पत्रे त्यांनी आणली नव्हती. त्या म्हणाल्या की, तशी पत्रे घेऊन त्या १९ तारखेला येतील. ‘‘तुम्ही हे काम पुढे कशाला ढकलता आहात? आपण आज दुपारीही ते करुन टाकू शकतो.’’ असे मी त्यांना म्हटले. त्या परत गेल्या. नंतर त्यांचा निरोप आला की, त्याच दिवशी संध्याकाळी ८.१५ला त्या मला भेटतील.

ही बोलणी चालू असतानाच मला बऱ्याच व्यक्ती, संस्था व पक्ष ह्यांच्याकडून ई-मेल्स व पत्रे आली की, मी सोनिया गांधींना देशाच्या पंतप्रधान होण्यास परवानगी देऊ नये. मी त्या ई-मेल्स व पत्रे काहीही शेरा न लिहिता, सरकारच्या वेगवेगळ्या संबंधित कार्यालयांना त्यांच्या माहितीसाठी पाठवून दिली. मधल्या वेळात बऱ्याचशा राजकीय नेत्यांनी मला भेटून अशी विनंती केली की, मी कुठल्याही दबावाला बळी पडून सोनिया गांधींना पंतप्रधान नेमू नये. ही विनंती राज्यघटनेप्रमाणे मला मानता आली नसती. त्यांनी स्वत: नेत्या म्हणून सरकार बनवण्याचा दावा केला असता, तर मला त्यांची नेमणूक करण्याखेरीज दुसरा पर्यायच नव्हता.

ठरवलेल्या वेळी संध्याकाळी ८.१५ला सोनिया गांधी राष्ट्रपती भवनामध्ये डॉ. मनमोहनसिंगांना घेऊन आल्या. चार शब्द इकडचे-तिकडचे बोलून झाल्यावर त्यांनी मला त्यांना पाठिंबा देत असल्याची वेगवेगळ्या पक्षांची पत्रे दाखवली. मी म्हणालो की, ही चांगली गोष्ट आहे. राष्ट्रपती भवन तुमच्या सोईच्या वेळेला शपथग्रहण समारंभ करण्यास तयार आहे. तेव्हा मग त्या म्हणाल्या की, त्यांची इच्छा डॉ. मनमोहनसिंगांचे नाव सुचवायची होती – ते १९९१च्या आर्थिक सुधारणांचे शिल्पकार होते आणि काँग्रेस पक्षाचे विश्वासू नेते. ही नक्कीच मला चकित करणारी बाब होती, आणि मग राष्ट्रपती भवनाच्या सचिवालयाला पुन्हा डॉ. मनमोहनसिंगांची पंतप्रधानपदी नेमणूक करणारे आणि त्यांना लवकरात लवकर सरकार बनवण्यास आमंत्रण देणारे वेगळे पत्र तयार करावे लागले.

शेवटी शपथ-ग्रहण विधी २२ मे, रोजी भव्य, आलिशान ‘अशोक हॉल’मध्ये पार पडला आणि डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान झाले आणि ६७ जण मंत्री झाले.

एक महत्त्वाचे काम शेवटी पार पडले म्हणून मी सुटकेचा नि:श्वास टाकला. परंतु,

कुठल्याच पक्षाने सरकार बनवू शकण्याचा दावा पहिल्या तीन दिवसांत का केला नाही, ह्याचे कोडे मला पडलेलेच होते.

माझ्या कार्यकाळात मला बरेच अवघड निर्णय घ्यावे लागले. कायदे आणि राज्यघटनेतील निष्णातांचे सल्ले घेऊन मग पूर्णपणे नि:पक्षपातीपणाने निर्णय घेण्याचे काम मी पार पाडीत असे. आपल्या राज्यघटनेचे रक्षण करुन घटनेचे पावित्र्य व मजबूत बांधणी सांभाळणे, हे सर्व निर्णयांचे मुख्य उद्दिष्ट होते.

१४
राष्ट्रपतिपदानंतर...

'See the flower, how freely it gives of its perfume and honey. But when its work is done, it falls away quietly.'

– Bhagavad Gita

'फुलाकडे बघा, किती मुक्तपणे ते आपला सुगंध आणि मध देते; परंतु त्याचे काम संपले की, ते शांतपणे गळून जाते.'

– भगवद्गीता

'राष्ट्रपती' म्हणून माझा कार्यकाळ खूप व्यग्र राहिला. आपल्या ह्या सुंदर देशात सर्वत्र हिंडणे, सर्व राज्यांमध्ये जाणे आणि तेथील लोक कसे राहतात, तेथील पर्यावरण कसे आहे, त्यांचे प्रश्न काय आहेत ते बघणे, तसेच ते किती सुखी आहेत; ह्याचा प्रत्यक्ष बघून अंदाज घेणे – हे पहिल्याच वर्षीचे माझे एक ध्येय होते. केरळच्या किनाऱ्यापासून जवळ असलेला 'लक्षद्वीप' हा बेटांचा समूह, ह्या प्रदेशात तेवढा मी जाऊ शकलो नाही, याची मला खंत वाटते. बाकी सगळीकडे मी एकदा किंवा जास्त वेळाही गेलो. प्रत्येक प्रदेशाचे वेगळे असे आकर्षण असते आणि त्या आवरणाखाली प्रत्येक ठिकाणी एक मूलभूत साधेपणा आणि आपुलकी होती, जी भारतीयांचे वैशिष्ट्य आहे.

ह्या प्रवासांबद्दल इतरांचे काय मत झाले, ते बघणे औत्सुक्याचे आहे. 'आउटलुक' ह्या मासिकात आलेला मजकूर येथे देत आहे – 'कलाम हे सतत सर्वत्र हिंडत राहणारे राष्ट्रपती आहेत. राष्ट्रपती झाल्यापासूनच्या १० महिन्यांत त्यांनी २१ राज्यांना भेटी दिल्या आहेत. बहुतेक सर्व राष्ट्रपती पाच वर्षांमध्ये हे शक्य करु शकतात, त्याहूनही हे जास्त असेल. वाऱ्याच्या वेगाने पार पाडल्या जाणाऱ्या अशा प्रत्येक भेटीमध्ये त्यांचे १५ तरी कार्यक्रम असतात. प्रत्येक ठिकाणी ते आदल्या रात्री पोहोचतात, म्हणजे व्यग्र वेळापत्रकातच शक्य तितके जास्त काम करता येईल....'

राष्ट्रपतिपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर मला दोन गोष्टींबद्दल संतोष वाटला. मी कार्यभार सांभाळला, तेव्हा विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता आणि निराशा जाणवत असे. मी त्यांना भेटत असे आणि सांगत असे की, त्यांनी आत्मविश्वासू व्हावे आणि प्रयत्न करीत राहावे, असे सांगून त्यांना प्रोत्साहित करीत असे. "भविष्यकाळाची भीती एकाही तरुणाने बाळगण्याची जरुरी नाही." मी त्यांना सांगत असे, 'कारण भारत चांगली प्रगती करत आहे. भारत प्रगती करेल आणि तुम्हीही कराल." आणि खरोखरीच गेल्या काही वर्षांमध्ये प्रगतीचा वेग वाढला आहे. माझा कार्यकाळ संपेपर्यंत तरुणांची मन:स्थिती

बदललेली होती. त्यांना प्रगत भारतात राहायचे होते आणि त्यासाठी काम करायला ते तयार होते.

लोकांना प्रश्न पडायचा की, राष्ट्रपती म्हणून व्यग्र कार्यांच्या जीवनातून बाहेर पडल्यावरच्या आयुष्याशी मी कसा जुळवून घेईन? परंतु राष्ट्रपती होण्याआधी मी माझे लेखन, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शाळा आणि विद्यापीठे येथे अध्यापन करता-करता विद्यार्थ्यांना स्फूर्ती देण्याचे काम, तसेच चर्चासत्रे व परिषदांमध्ये सहभागी होणे, हे सर्व करण्यात खूप मग्न होतोच. पुन्हा त्याच दिनक्रमात झोकून देण्याचे मी ठरवले होते. मला पुढील शिक्षणसंस्थांनी अध्यापनाचे काम देऊ केले होते : अण्णा विद्यापीठ – चेन्नई, आय.आय.टी. – हैदराबाद, जी.बी. पंत शेतकी व तंत्रज्ञान विद्यापीठ – पंतनगर, दिल्ली विद्यापीठ, आय.आय.एम. – अहमदाबाद, आय.आय.एम. – इंदूर, आय.आय.टी. – खरगपूर, बनारस हिंदू विद्यापीठ आणि इतर काही.

मला असे दिसून येते आहे की, २६ जुलै २००७पासून ते आजतागायत माझ्या आयुष्यात मी जे काम करण्याचे ठरवले होते, ते जास्त विस्तारलेच आहे. पंत विद्यापीठातील माझे अध्यापन व संशोधनाची घडी व्यवस्थित बसली आहे. भारताच्या दुसऱ्या हरित क्रांतीसाठी तेथील विद्यार्थी हेच मध्यवर्ती केंद्र कसे बनू शकतील, हे माझे तेथील अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट असते. 'पंत विद्यापीठ' हे देशातील पहिले कृषी विद्यापीठ आहे. त्याचे आवार खूप मोठे आहे. त्यामुळे प्रायोगिक शेतीसाठी खूप मोठी जागा उपलब्ध आहे. भारतातील पहिल्या आय.आय.टी.मध्ये (खरगपूर) सन्माननीय प्रोफेसर म्हणून मी 'नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तन' हा विषय शिकवला. हैदराबादमधील आय.आय.टी.मध्ये 'इंडिया २०२०'च्या कामात ज्याचे खूप महत्त्वाचे स्थान आहे, असा 'माहिती तंत्रज्ञान आणि ज्ञानाधिष्ठित उत्पादने' हा विषय शिकवू लागलो. बनारस हिंदू विद्यापीठ आणि अण्णा विद्यापीठ येथे मी 'ग्रामीण अर्थव्यवस्था बदलण्यासाठी तंत्रज्ञान व त्याच्या मर्यादामुक्त पैलूंचा उपयोग कसा होईल', हे शिकवत आहे. आय.आय.एम. अहमदाबाद आणि अमेरिकेतील लेक्झिंग्टन येथील 'गॅटन कॉलेज ऑफ बिझनेस अॅन्ड इकॉनॉमिक्स' ह्या दोन संस्थांमध्ये व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्थिक विकासातील आव्हानांचा परिचय करुन देण्यासाठी भरगच्च अभ्यासक्रम तयार केला. भारत हा स्पर्धक देश होण्यासाठी २०२०पूर्वी विकास आणि प्रगतीचे जे दहा मुद्दे यशस्वी व्हायला हवेत, त्यासाठी विकासाच्या सुचलेल्या कल्पना आणि योजना विद्यार्थ्यांनी सादर केल्या. उदाहरणार्थ : विद्यार्थ्यांचा एक गट खासगी-सार्वजनिक सहकार्याने 'प्युरा'चा कार्यक्रम सुरु करण्याचे काम करत आहे.

परदेशातून मला बरीच निमंत्रणे येतात. राष्ट्रपतिपदाचा काम संपल्यानंतर आजतागायत शैक्षणिक, राजकीय आणि औद्योगिक संस्थांच्या खास निमंत्रणावरुन मी अमेरिका, इंग्लंड, इंडोनेशिया, नेदरलॅन्ड्स, इस्त्राइल, प्रजासत्ताक कोरिया, कॅनडा, फिनलंड, नेपाळ, आयर्लंड, तैवान, रशिया, अरब अमिराती आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशांना

भेटी दिल्या आहेत. ह्या दौऱ्यांमध्ये मी विद्यापीठे व संशोधन संस्थांना भेटी दिल्या, औद्योगिक परिषदा व जागतिक युवा परिषदांना उपस्थित राहिलो, विकसित भारताच्या कल्पनेबद्दल त्यांना सांगितले आणि आर्थिक प्रगता व मूल्यनिष्ठ शिक्षणासाठी इतर देशांशी सहकार्य करण्याच्या महत्त्वाबद्दल बोललो. आत्तापर्यंत मी १२००हून जास्त कार्यक्रमांना उपस्थित राहिलो आहे, दीड कोटी लोकांना – विशेषत: तरुण पिढीला – भेटलो आहे. विकासाच्या महान ध्येयासाठी, कुठल्याही आव्हानांचा सामना करण्याची त्यांची इच्छाशक्ती व उत्साह आणि त्यांना कोणी तरी विशेष कसे व्हायचे आहे, ह्या तरुण पिढीच्या स्वप्नांमध्ये मी सहभागी झालो आहे. ही संकल्पना आता 'वर्ल्ड व्हिजन २०३०' अशी विकसित झाली आहे.

ह्यातील प्रत्येक प्रसंगाने माझ्या आयुष्याला नवी दिशी दिली आहे. मागे वळून बघताना ह्या सर्व प्रसंगांनी बदललेल्या दिशेमुळे मी काय शिकलो, ह्याचा मी मनाशी विचार करतो. प्रत्येक घटनेत निर्णय घेणे गुंतागुंतीचे होते आणि सर्व प्रसंगांमध्ये बराच अंतराय होता. तरीही मला वाटते की, नवी आव्हाने पेलण्याची आकांक्षा हा सर्व निर्णयांचा पाया होता. अशा आव्हानांनीच आयुष्य समृद्ध होते.

एखाद्याला करायच्या असलेल्या सर्व गोष्टी करण्यास वेळ मिळणे अवघड असते. खरे तर माझ्या दिनक्रमाला जणू त्याचे आपले वेगळे आयुष्य आहे. म्हैसूरहून शुक्रवारी परत आल्यावर सोमवारी मला मोरादाबादला आणि रामपूरला जायचे होते – हे कसे काय? त्या दोन ठिकाणी मला चार कामे होती आणि रात्री उशिरा मोटारीने दिल्लीला परतायचे होते. बुधवारी पॅन आफ्रिकन ई-नेटवर्कला संबोधित करायचे होते आणि गुरुवारी गुवाहाटीला जायचे होते, शुक्रवारी रात्री दिल्लीला परत येऊन शनिवारी सकाळी विमानाने लखनौला एका चर्चासत्रासाठी जायचे होते. अलीकडचेच, मे महिन्याच्या कार्यक्रमांचे वेळापत्रक पुढे देत आहे. रोजच्या बारीक-सारीक गाठी-भेटी बऱ्याच असतात, त्या वगळल्या आहेत.

मे २०१२चे कार्यक्रम:

मंगळवार, १ मे

• बोकारो स्टील प्रकल्पाला भेट देणे आणि तेथील इंजिनीअर्ससमोर भाषण देणे. चिन्मय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना संबोधित करणे. रांची येथे 'व्हॉट कॅन आय गिव्ह?' (मी काय देऊ शकतो?) ह्या योजनेच्या शुभारंभात भाग घेणे.

शनिवार व रविवार, ५ व ६ मे

• चेन्नई, त्रिची आणि कराइकुडीला भेटी देणे.

सोमवार, ७ मे

• छत्तीसगड येथील सरकारी सीनिअर सेकंडरी स्कूलच्या ३० विद्यार्थ्यांना व शिक्षकांना भेटणे.

बुधवार, ९ मे

• मथुरा येथे संस्कृती ग्रुपच्या संस्थांना भेट देऊन 'व्हॉट कॅन आय गिव्ह' योजनेचा शुभारंभ करणे.

• वृंदावन येथील 'पागल बावा आश्रमा'च्या विधवाश्रमाला भेट देणे.

शुक्रवार, ११ मे

• डिपार्टमेंट ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी'च्या 'तंत्रज्ञानदिन' ह्या उत्सवाचे उद्घाटन करणे.

शनिवार, १२ मे

• उत्तर प्रदेशातील आझमगड येथे वेदांत हॉस्पिटलचे उद्घाटन करणे आणि आझमगडच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण देणे.

मंगळवार, १५ मे

• 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'च्या 'सहकारी संस्थांचे आंतरराष्ट्रीय वर्ष २०१२'चे उद्घाटन करणे.

गुरुवार आणि शुक्रवार, १७ व १८ मे

• 'सी.एम.आर. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या दीक्षान्त समारोहाचे प्रमुख पाहुणे.

• म्हैसूर येथील डिफेन्स फूड रिसर्च लॅबोरेटरीच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी भाषण.

• 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अॅन्ड हिअरिंग'ला भेट देणे. जे.एस.एस. विद्यापीठाला भेट देणे व विद्यार्थ्यांना संबोधित करणे.

सोमवार, २१ मे

• मोरादाबाद येथील 'तीर्थंकर महावीर विद्यापीठा'च्या प्रथम दीक्षांत समारोहाचे

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे.

• रामपूरला भेट देणे, रामपूर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना संबोधित करणे.

• सी. एल. गुप्ता आय इन्स्टिट्यूट'ला भेट देणे आणि तेथील डॉक्टर्स व मदतनीस ह्यांना संबोधित करणे.

• 'मोरादाबाद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'ला भेट देणे व विद्यार्थ्यांना संबोधित करणे.

बुधवार, २३ मे

• 'पॅन आफ्रिकन ई-नेटवर्क'वर आफ्रिकी देशांना संबोधित करणे.

गुरुवार, २४ मे

• गुवाहाटीला भेट देणे आणि आय.आय.टी. गुवाहाटीच्या दीक्षान्त समारोहात भाषण देणे.

शनिवार, २६ मे

• लखनौ येथे 'हिंदुस्तान टाइम्स – हिंदुस्तान यु. पी. डेव्हलपमेंट'च्या चर्चासत्रात भाषण देणे.

समारंभांमधली विविधता बघून हे लक्षात येईल की, प्रत्येक भाषण वेगळ्या विषयावर द्यायचे आहे आणि ही सर्व भाषणे तयार करणे, हेही एक मोठे कामच असते.

दि. २६ मे, रोजी लखनौचे चर्चासत्र उत्तर प्रदेशाच्या विकासासाठी नव्या कल्पनांवर विचार करण्यासाठी होते. नेहमीप्रमाणे मी माझ्या भाषणाची व सादरीकरणाची तयारी पुरेसा वेळ देऊन केली होती. मी मांडलेले मुद्दे तेथे जमलेल्या तज्ज्ञ मंडळींना आणि नवे मुख्यमंत्री अखिलेश यादव ह्यांना ते चांगले वाटले, ह्याचा मला आनंद झाला. केवळ ३८ वर्षांचे अखिलेश यादव हे देशातील सर्वांत तरुण मुख्यमंत्री आहेत.

उत्तर प्रदेशाची अर्थव्यवस्था देशात दुसरी मोठी अर्थव्यवस्था आहे आणि हा प्रदेश नैसर्गिक संपत्तीने व मनुष्यबळाने समृद्ध आहे. दहा कोटी तरुण असलेल्या ह्या प्रदेशात देशातील एक-पंचमांश तरुणवर्ग आहे. माझे तज्ज्ञ स्नेही म्हणतात की, इ. स. २०१६पर्यंत जगातील शिक्षण आणि कौशल्य असण्याची जरुर असलेल्या अशा १०० नोक-यांपैकी ८ तरी ह्या प्रदेशातच उपलब्ध असतील.

उत्तर प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचा मी अभ्यास केला, तेव्हा असे दिसून आले की, येथील

एकूण लोकसंख्येपैकी ७३ टक्के लोक शेती व शेतीसंबंधित कामांमध्ये आहेत आणि राज्याच्या उत्पन्नाच्या ४६ टक्के महसूल शेतीतून मिळतो. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या राज्याचा 'दरडोई ढोबळ उत्पन्न निर्देशांक'(ग्रॉस स्टेट डोमेस्टिक प्रॉडक्ट) ७.३ टक्के नोंदला गेला आहे, जो अपेक्षित ६.१ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा जास्त आहे. राज्यात २३ लाख लघुउद्योग आहेत. सध्या बेरोजगार तरुणांची संख्या २५ लाख आहे, ज्यांपैकी ९०,००० तरुण पस्तिशी ओलांडलेले आहेत.

ह्या सर्व बाबी लक्षात घेऊन मी भाषण केले. त्यात प्रगतीची संधी देणाऱ्या चांगल्या नोकऱ्या निर्माण करुन दरडोई उत्पन्न २६,०५१ रुपयांवरुन १,००,००० रुपयांपर्यंत कसे वाढवता येईल ह्यावर, तसेच साक्षरता १०० टक्के कशी आणता येईल, बालमृत्यूंचे प्रमाण दहाच्या खाली कसे आणता येईल आणि रक्तपिती, काला आजार, मलेरिया, चिकनगुनिया, डेंग्यू व क्षयरोग ह्या रोगांचे राज्यातून उच्चाटन कसे करता येईल, ह्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासंबंधी विचार व्यक्त केले.

राज्यातील २० कोटी लोक सक्षम होण्यासाठी ही लक्ष्ये कशी पूर्ण करता येतील, ह्याबद्दल मी रुपरेषा दिल्या.

एक सूचना अशी होता की, उत्तर प्रदेशाच्या उपलब्ध कौशल्यांचा एक आराखडा तयार करावा. ह्याचा अर्थ असा की, राज्याच्या प्रत्येक जिल्ह्याचे कला, संगीत, हस्तकला, शेतीतून मिळणारी उत्पादने, खाद्यपदार्थ आणि इतर गोष्टी – ह्या सगळ्यांपैकी कोणत्या क्षेत्रात कौशल्य आहे, ते बघावे आणि मग त्या-त्या जिल्ह्याची त्या क्षेत्रातील क्षमता विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करावे.

इतरही बरीच ठोस, उचलण्यासारखी पावलेही मी सुचवली. माझी इच्छा आहे की, जलद विकास होण्यासाठी धाडसी योजना देशभरात सुरु कराव्यात; म्हणजे त्या एकमेकांना पूरक होऊन फलद्रूप होतील.

अमेरिका व भारत ह्यांच्यामध्ये झालेला 'करार १२३', हा 'भारत-अमेरिका आण्विक करार' म्हणून ओळखला जातो. ह्या कराराप्रमाणे भारताने आपले नागरी व लष्करी आण्विक प्रकल्प वेगवेगळे करण्याचे कबूल केले आणि आपले नागरी आण्विक प्रकल्प 'आंतरराष्ट्रीय अणुऊर्जाप्रबंधक समिती' (आयएईए)च्या देखरेखीखाली ठेवण्याचे मान्य केले. ह्याच्या बदल्यात अमेरिकेने नागरी आण्विक कामांसाठी (ऊर्जानिर्मिती) भारताला संपूर्ण सहकार्य देण्यासाठी काम करण्याचे कबूल केले. वाटाघाटी बरेच दिवस लांबल्या व त्यानंतर यु.पी.ए.च्या सरकारला २२ जुलै, २००८ला ह्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यापूर्वी संसदेत 'विश्वासदर्शक ठरावा'चा सामना करावा लागला.

ह्या 'विश्वासदर्शक ठरावा'मध्ये सरकारला बाहेरुन पाठिंबा देणाऱ्या डाव्या पक्षांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी करारात सामील होण्यास नकार दिला. समाजवादी

पक्षाचे अध्यक्ष मुलायमसिंह यादव आणि त्यांचे ज्येष्ठ सहकारी अमरसिंह यांची कराराला पाठिंबा द्यावा की नाही, ह्याबद्दल द्विधा मन:स्थिती होती. ह्या कराराचा भारताला फायदा होईल ह्याची त्यांना खातरी वाटत नव्हती. पाश्चिमात्य देश – विशेषत: अमेरिका – त्यांच्या व्यावसायिक हितासाठीच हा करार करत होते की काय, अशी त्यांना शंका होती. त्याबाबत स्पष्टीकरण मिळवण्यासाठी मुलायमसिंह आणि अमरसिंह ह्यांना करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी भारताला असलेल्या फायद्यांवर व तोट्यांवर बोलण्यासाठी १०, राजाजी मार्ग' ह्या माझ्या घरी येऊन मला भेटायचे होते. मी त्यांना सांगितले की, 'आज ना उद्या भारताला थोरियमवर चालणाऱ्या अणुभट्ट्यांच्या बाबतीत स्वावलंबी व्हावेच लागेल. तसे होईल तेव्हा आपल्याला प्रदूषणरहित व मुबलक ऊर्जा आपल्या सर्व विकासाच्या कामांसाठी मिळेल आणि मग काही बंधनांच्या अटी नसतील. युरेनियमच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे सध्या ऊर्जेची जी कमतरता आहे, ती भरुन निघण्यास 'करार १२३'मुळे मदत होईल.'

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आला, तो अणुभट्ट्यांचा वापर चालू ठेवण्याच्या विरुद्ध चाललेल्या आंदोलनाचा होता – विशेषत: मार्च २०११मध्ये फुकुशिमा येथे त्सुनामीमुळे झालेल्या उत्पातानंतर तामिळनाडूमध्ये कूदनकुळम येथे तयार होत असलेल्या अणुभट्टीबद्दल. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बिनसरकारी संस्थांच्या (एन.जी.ओ.) पाठिंब्याने स्थानिक ग्रामीण जनतेतील आंदोलन करणारे लोक म्हणत होते की, कूदनकुळममधील काम ताबडतोब बंद झाले पाहिजे. ते लोक इंजिनीअर्सना काम करु देत नव्हते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मी भारतातील अणुशक्ती केंद्रांच्या सुरक्षापद्धतींचा आणि हे काम पुढे न्यावे की कसे, ह्याचाही बारकाईने अभ्यास केला. त्यानंतर इंग्रजी व प्रादेशिक वर्तमानपत्रांमध्ये लेख लिहून, हे तंत्रज्ञान भारताच्या विकासासाठी किती आवश्यक होते, हे स्पष्ट केले.

त्याचबरोबर माझ्या सहकाऱ्यांबरोबर कूदनकुळमला जाऊन २००० मेगावॉटच्या, तेथील तिसऱ्या पिढीपेक्षा आधुनिक भट्टीच्या कामाचा अभ्यास केला. भट्टीची सुरक्षा वैशिष्ट्ये मला समजून घ्यायची होती आणि फुकुशिमा दुर्घटनेमुळे जनतेच्या तीव्र झालेल्या चिंतांबद्दल काय उपाय योजण्यात येत होते, हेही बघायचे होते. मी तेथील शास्त्रज्ञ व तज्ज्ञ, तसेच स्थानिक लोक ह्यांना भेटण्यात एक संपूर्ण दिवस घालवला आणि स्वत: प्रत्यक्ष त्या भट्टीच्या वेगवेगळ्या उपलब्धतांचा अभ्यासही केला. जेथे म्हणून सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवतो, तेथे ह्या भट्टीत अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरत आहेत, हे बघून मला मनापासून बरे वाटले. अणुभट्टीच्या सुरक्षिततेच्या बाबतीत चार महत्त्वाच्या गोष्टी असतात – गुंतागुंतीच्या भागांच्या व्यवस्थित जोडणीची वा उभारणीची सुरक्षितता, किरणोत्सर्ग सुरक्षितता, औष्णिक जल सुरक्षितता आणि न्यूट्रॉनिक सुरक्षितता.

नंतर मी असे सुचवले की, भट्टीच्या आसपासच्या खेड्यांसाठी एक खास वेगळे असे 'प्युरा' संकुल करावे; ज्यामुळे शिक्षण-प्रशिक्षणाच्या सोई आणि प्रगतीच्या भरपूर संधी

असलेल्या चांगल्या नोकऱ्या स्थानिक लोकांना मिळू शकतील.

मला हे बघून आनंद झाला की, ह्या सर्व सूचना अमलात येत आहेत आणि अणुशक्ती केंद्रातून मिळणाऱ्या नफ्याचा दोन टक्के हिस्सा कुंडकुलम भागात समाजकल्याण, ग्रामीण सुधारणा व नागरिकांची क्षमता वाढवण्यासाठी खर्च केला जाईल, असे सरकारने जाहीर केले आहे. हे अणुशक्ती केंद्र सुरु होण्याने ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होण्याच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचे काम काही अंशी पूर्ण होईल.

गेल्या पाच वर्षांमध्ये मला लाखो मुलांना भेटण्याची संधी मिळाली, शिक्षण व संशोधन क्षेत्रांत वेगवेगळ्या विद्यापीठांतून भारतात व परदेशात काम करण्याची संधी दिली. सामाजिक परिवर्तनासाठी व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांचा अध्यापक झालो आणि राष्ट्रीय मुद्द्यांवर भर देताना माझे दृष्टिकोन व मते यांचा सहभाग देता आला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अचानक संकटे उभे राहिल्यास होणाऱ्या शारीरिक किंवा मानसिक आघात झालेल्यांची काळजी घेऊन जीवनदायी पद्धतीसाठीचे कार्यक्रम (इमर्जन्सी ट्रॉमा मॅनेजमेंट प्रोग्राम) मी आठहून जास्त राज्यांमध्ये सुरु करुन घेऊ शकलो.

उपसंहार

'Oh! Parliamentarians, the sculptors of Mother India,
Lead us to light, enrich our lives.
Your honest toil is our guiding light,
If you work hard, we all can prosper.'

'हे संसद-सदस्य हो! – भारतमातेचे शिल्पकार तुम्ही आहात,
आम्हाला उज्ज्वल भविष्याकडे न्या, आमची आयुष्ये समृद्ध करा.
तुमची प्रामाणिक मेहनत हा आमचा मार्गदर्शक दीप आहे,
तुम्ही खूप कष्ट घेतलेत, तर आपली सर्वांची भरभराट होऊ शकेल.'

राष्ट्रपतिपदावरुन २००७मध्ये निवृत्त होताना मी संसद-सदस्यांसमोर एक भाषण दिले. मी मागील पानांवर जे म्हटले आहे, त्याच्याशी याचा खूप सखोल संबंध आहे आणि लक्षात ठेवणे गरजेचे आहे, असे काही मुद्दे मी त्यात सांगितले आहेत. एक स्वतंत्र देश म्हणून भारताचा लोकशाहीचा अनुभव, हे प्रचंड श्रद्धेवर केलेले काम आहे. 'सार्वत्रिक मताधिकारा'चे सूत्र आपण १९५१मध्ये स्वीकारले, तेव्हा निरक्षर आणि मालमत्ताविहीन लाखो लोकांना एका रात्रीत मताधिकार दिला गेल्याचे उदाहरण ह्यापूर्वी जगात कोठेही घडले नव्हते. ही कृती या आशेवर केली गेली होती की, ह्यातून शांततापूर्ण व स्थैर्य असलेली सामाजिक क्रांती घडून येईल, राज्यघटनेने वचन दिलेले भरपूर अधिकार सर्व नागरिकांना मिळतील, राष्ट्रीय ऐक्याची भावना बळकट होईल. आत्तापर्यंतच्या अनेक शतकांच्या चिरडून टाकणाऱ्या परकीय सत्तेच्या इतिहासानंतर राष्ट्रीय सुरक्षा, स्वास्थ्य आणि समृद्धीची खातरी, आता तर नक्कीच मिळेल.

विशेषत: अलीकडच्या वर्षांमध्ये ऐतिहासिक भूतकाळाच्या तुलनेत एक राष्ट्र म्हणून आपल्या आर्थिक कामगिरीत आपण लक्षणीय प्रगती नक्कीच केली आहे. परंतु आपली यशस्वी कामगिरी संमिश्र आहे, कारण मानवी स्तरावरचा विकास आणि अनुशासनपद्धतीचे निदर्शक ह्याबद्दलची आपली कामगिरी अजून बरीच सुधारण्यासाठी मोठ्या काळाची मार्गक्रमणा आवश्यक आहे. एका नव्या संकल्पनेची आणि दूरदृष्टी असलेल्या, उत्साह पुन्हा निर्माण करु शकणाऱ्या, आपल्या लोकांसाठी लढू शकणाऱ्या, अशा ध्येयवादी नेत्यांची

गरज आहे; कारण तसे केल्यास आपण जगाच्या कल्याणासाठी लढा देणारे होऊ शकू.

'संसद' ही देशातील नि:संशय सर्वश्रेष्ठ संस्था आहे, प्रातिनिधिक लोकशाहीचे मूर्तिमंत रुप आहे. अनुशासनाची व राष्ट्रीय राजकारणाची पद्धत म्हणून भारतीय समाजातील ऐतिहासिक सत्तापद्धती शिथिल करण्यात, स्वतंत्र संस्था कार्यरत ठेवण्यात आणि लोकशाहीपद्धतीतील सहभाग विस्तारण्यात संसदीय लोकशाहीचे कार्य मोठे आहे. परंतु ह्यात शंकाच नाही की, एकविसाव्या शतकाच्या ह्या आरंभाच्या काळात एक संस्था म्हणून १९५१मध्ये निर्मिती झाल्यापासून संसदेसमोर पूर्वी कधी नव्हती इतकी आव्हाने; विशेषत: मानवी विकास आणि अनुशासनाशी संबंधित प्रश्नांमध्ये आहेत.

परंतु आपण आज स्पष्टपणे बघत आहोत की, अनुशासनाचे साधन म्हणून संसदेची कार्यक्षमता, चर्चा-विचारणा करण्याची संसदेची कुवत, कायदे बनवणे व सरकारला तसेच देशाला दूरदृष्टी असलेले नेतृत्व देणे, ह्या गोष्टी संसद ह्या संस्थेवरच अवलंबून राहण्याऐवजी अनेक राजकीय पक्षांच्या कामाची पद्धत, त्यांची कुवत आणि हिशोबी कारभार ह्यांच्यावर दिवसेंदिवस अवलंबून राहू लागल्या आहेत. संसद एक संस्था म्हणून तसेच देशापुढील आव्हानांचा आपण विचार करुन, भारताला २०२०पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवण्यासाठी पुढे जाण्याचे मार्ग सुचवावेत – या कारणांसाठी मला या गोष्टी तुमच्याशी बोलाव्याशा वाटतात.

भारताच्या अनुशासनपद्धतीच्या आतील व बाहेरील वातावरणात, विशेषत: गेल्या दोन दशकांमध्ये खूप वेगाने आणि पुन्हा बदलता न येणारा बदल घडून आला आहे, अशी एक सार्वत्रिक भावना व समजूत आहे. परिस्थितीतील ह्या बदलांमुळे आपल्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाला, अबाधित एकतेला आणि आर्थिक वाढीला आव्हान देणारे जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांच्याकडे त्वरित आणि संपूर्ण लक्ष दिले पाहिजे. सामाजिक संस्थांची स्थिती कालांतराने त्यांचा विस्तार व गुंतागुंत वाढेल तशी खालावते आणि त्या संकटग्रस्त दशेला येतात; अशा वेळी पुनरुत्थान आणि बदल घडवून आणण्यासाठी त्वरित काम करणे निकडीचे होते. सामाजिक व्यक्तिमत्त्व वा

संस्था म्हणून भारताच्या अनुशासनपद्धतीने याच टप्प्यावर प्रवेश केला आहे.

भारताचे हे सुदैव आहे की, अत्यंत उच्च कर्तृत्व, कार्यक्षमता आणि दूरदृष्टी असलेले नेते सरकारमध्ये व संसदेत आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात आपण आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात जी नेत्रदीपक कामगिरी केली आहे, ती निश्चितच अभिमानास्पद आहे. बऱ्याच लोकांना असे खात्रीने वाटते की, २०५०पर्यंत भारत ही जगातली एक प्रबळ अर्थसत्ता होईल. परंतु, लोकशाही आणि आर्थिक पुनरुत्थान ह्या दोन्हीपैंकी काहीच गृहीत धरुन चालता येत नाही. स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी सदैव जागरुक राहण्याचे मोल आहे. म्हणून, लोकशाहीतील आत्ता अस्तित्वात असलेल्या पद्धती आणि कारभार वरकरणी कितीही समाधानकारक दिसला, तरी तो कायम टिकणारा नसतो आणि असू नये, ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपल्याला भूतकाळातील कामगिरीवर वा यशावर संतुष्ट राहून नुकत्या घडलेल्या घटनांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. ह्या घटनांमुळे आपण आपल्या समाजाचे आणि राष्ट्राचे संचालन जसे करत आहोत, त्यात बदल करणे अगत्याचे झाले आहे. उदारीकरणाच्या धोरणानंतर आर्थिक पुनर्निर्माण आणि खरी वाढ होत असल्याची लक्षणे जास्त करुन सरकारी व सार्वजनिक उद्योगांच्या बाहेरच्या क्षेत्रांमध्येच दिसत आहेत. म्हणून आपल्या सार्वजनिक संस्थांना पुन्हा प्रोत्साहन देऊन नवजीवन देणे, हे आपल्यापुढील सर्वांत मोठे आव्हान आहे.

सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रात सर्वच स्तरांवर केवळ उत्पादकता, नफा व बचत योजनांमध्येच नव्हे; तर अत्यंत महत्त्वाच्या शिक्षण, आरोग्य, पाणी आणि वाहतूक ह्या सार्वजनिक क्षेत्रातील सेवा परिपूर्ण पुरवण्यामध्येही विशेष सुधारणा होण्याची जरुर आहे. बऱ्याच नामवंत विद्वानांनीही संसदेचे काम कसे चालते त्याचा अभ्यास केला आहे आणि भारतीय संसदेपुढे एक संस्था म्हणून आज उभी असलेली बरीच वेगवेगळी आव्हाने नोंदली आहेत. मी त्यांचा बारकाईने व्यवस्थित अभ्यास केला आहे आणि त्यांतील काही महत्त्वाची निरीक्षणे व चिंता सांगतो.

देशात पसरलेली एक सार्वत्रिक भावना अशी आहे की, जनतेला जबाबदार असणारी आणि एक पर्यवेक्षक संस्था म्हणून संसदेचे काम प्रभावीपणे

होण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याची वेळ आली आहे. सरकारी कामकाज पूर्ण जबाबदारीने पार पाडले जात आहे, ह्याची खातरी करुन घेण्याचे काम संसद अनेक पद्धतींनी करु शकते. उदाहरणार्थ : सभागृहात ठराव मांडणे, पर्यवेक्षणाच्या अधिकाराचा उपयोग करणे आणि समिती नेमणे. परंतु ह्या पद्धतींमध्ये नव्याने चैतन्य आणण्याची गरज प्रकर्षाने भासत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचे उदारीकरण होत असल्याने अर्थव्यवस्था जास्त मजबूत झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्राची सांपत्तिक स्थिती सुधारली आहे, परंतु संसदेचे अधिकार दोन बाबतींत वाढवण्यासाठी खूपच जागरुक राहणे आवश्यक आहे. बरेचसे आर्थिक निर्णय घेण्याचे काम आता आंतरराष्ट्रीय करारांच्या कलमांनुसार व्हावे लागते आणि भारतीय संसद ही जगातील फार थोड्या संसदांपैकी एक आहे, जेथे ह्या करारांवर परिणामकारक देखरेख वा लक्ष ठेवण्याच्या कामाची पद्धतच लागू नाही! हे करार संसदेत पोहोचेपर्यंत ते जवळजवळ पक्के झालेलेच असतात. म्हणून परकीय देशांशी होणाऱ्या करार-मदारांवर देखरेख ठेवण्याचा आणि त्याबद्दल कायदे करण्याचा अधिकार संसदेला मिळणे आवश्यक आहे.

इतर अनेक देशांप्रमाणे भारतही त्याच्या नियामक चौकटींचे पुनर्घटन करुन निवडून न आलेल्या संस्थांकडे जास्त अधिकार सोपवत आहे. ही काम सोपवण्याची पद्धत काही वर्षे – विशेषत: उदारीकरणानंतर – चांगली चालू आहे आणि त्यामुळे पारदर्शकता व जबाबदारी स्वीकारण्याची पद्धत वाढू शकते; तशी ती वाढली आहेही. म्हणून झपाट्याने प्रगती चालू ठेवण्यासाठी संसदेने जबाबदार राहण्याचे काम करुन ह्या संस्थांवर देखरेख करण्याचे संसदेचे अधिकार जास्त मजबूत करण्याची गरज पूर्वीपेक्षाही जास्त आहे. अंमलबजावणी करणाऱ्यांनी काम पार पाडण्यासाठी वटहुकूम काढण्याचे वाढते प्रमाण कमी केले पाहिजे. हे वटहुकूम कायद्यांऐवजी आणि आर्थिक बाबतीत पुरेशी देखरेख नसल्याने वापरले जातात.

आर्थिक बाबतींमध्ये अंमलबजावणी करणाऱ्यांचे रोजचे काम संसदेने तपासणे हे एक क्षेत्र असे आहे, जेथे जास्त महत्त्व देऊन व विशेष लक्ष घालून काम केले; तर संसदेच्या कामगिरीचे महत्त्व वाढेल आणि वाढत्या संख्येतील तरुण व नवख्या अधिकाऱ्यांना आवश्यक असलेला अनुभव त्यांना मिळेल. आपल्या संसदीय लोकशाहीचे चैतन्य जागृत असल्यामुळे राजकारणात प्रत्यक्ष

भाग घेणाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे. पहिल्या लोकसभेत पाचच राजकीय पक्ष होते, चौदाव्या लोकसभेत जवळजवळ पन्नास आहेत! एवढे राजकीय पक्ष संसदेत असण्याचा फायदा घ्यायला हवा आणि संसदेच्या कामात त्यांचा असा उपयोग करुन घेतला पाहिजे, ज्यामुळे संसद आणि ते पक्ष दोन्ही मजबूत होतील. शिवाय, एकत्र काम करण्यातील अडसर दूर होतील. असे केले तर संसद-सदस्यांकडून आधुनिक विधिमंडळामध्ये ज्या गुंतागुंतीच्या अपेक्षा असतात त्या आणि सदस्यांची कुवत, तसेच विधिमंडळात उपस्थित राहण्याची इच्छा, ह्यांमधील वाढती दरी लवकरच कमी होईल.

संसदेत चांगले काम करणाऱ्या सदस्यांना डोळसपणे ओळखले पाहिजे आणि त्यांच्या मतदारसंघात, तसेच त्यांच्या राजकीय पक्षांमध्ये किंवा संयुक्त आघाडीत त्यांना त्यांच्या राजकीय कामाबद्दल शाबासकी मिळाली पाहिजे. असे झाले तर संसदेत चांगले काम करुन दाखवण्याची इच्छा वाढेल. आर्थिक व्यवस्थापन, अर्थव्यवस्था, सामाजिक धोरण आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये कुठल्या शर्तींवर भारत भाग घेत आहे – ह्या सर्वांवर स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या दिवसांप्रमाणे संसदेचे मत परिणामकारक तऱ्हेने व्यक्त होत आहे. असे कुठलेही अनियंत्रित असे बाहेरील घटक संसदेचा आवाज जास्त मजबूत करण्याच्या आड येतील, असे नाहीत. सकारात्मक दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाला प्रोत्साहन मिळाले, तर संसद-सदस्यांना जबाबदार व उत्तम अनुशासन देण्याच्या दृष्टीने चांगल्या व्यवस्थापनाच्या नव्या व आव्हानात्मक जबाबदाऱ्या खांद्यावर घेण्यास उत्तेजन मिळेल.

नामवंत व्यक्तींनी संसदेच्या कामाचे बरीच वर्षे बारकाईने निरीक्षण करुन सूचना दिल्या आहेत. त्यांतील काही सूचना अमलात आणण्याचा गंभीरपणे, खोल विचार केला पाहिजे.

अ) राजकीय पातळीवर –

१. संयुक्त आघाडीचे सरकार एखाद्या लहान पक्षाने डळमळीत करण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी – जसे एखाद्या पक्षाचे एका किंवा जास्त सदस्यांना पक्ष सोडून जाता येऊ नये म्हणून प्रतिबंध असतात – तशी व्यवस्था करावी. लोकसभेच्या सदस्यांपैकी १० किंवा १५ टक्क्यांहून कमी सदस्य असलेला लहान पक्ष, जो प्रथम आघाडीला मिळतो व नंतर सोडून जातो, त्यांच्या सदस्यांचे सभासदत्व रद्द करण्याची तरतूद करावी.

२. संयुक्त आघाडीतील सर्व पक्षांनी संसदेच्या कामापुरते, संसदेत एक संसदीय पक्ष म्हणून काम करावे.
३. मंत्रालयांनी वार्षिक लक्ष्ये ठरवावीत आणि संसदेत कुठलेही काम पूर्ण करण्याचे जे लक्ष्य म्हणून सांगितले जाईल, त्या प्रमाणात प्रत्यक्षात काम किती पार पडले, याबद्दल मंत्र्यांना व्यक्तिश: जबाबदार धरावे.
४. राज्यघटनेत दुरुस्ती-बदल करुन, संसदेत बहुमत असलेल्या सरकारची इच्छा असेल तर, संसदेच्या बाहेरच्या २५ टक्क्यांपर्यंत लोकांना मंत्रिमंडळात घेता येण्याची तरतूद करावी.
५. जनतेच्या निधीतून निवडणुका, असा कायदा करावा.
६. असा कायदा करावा की, लोकसभा किंवा राज्यसभा – कुठल्याही सभेतील कामकाज आठवड्यातून दोनहून जास्त वेळा तहकूब करता येणार नाही; अपवाद म्हणून जर यादीतील कामे संपली असतील, तर करता येईल.
७. विधेयक किंवा कायदा मंजुर करुन घेण्यासाठी ध्वनिमताची परवानगी नसावी. मतांची मोजणीच सक्तीची करावी.
८. सभेच्या कामात वरचेवर व्यत्यय आणणाऱ्या सदस्यांना तात्पुरते निलंबित करण्याचा किंवा सभागृहातून बाहेर काढण्याचा अधिकार सभापतींना/सभाध्यक्षांना दिला जावा.

ब) व्यवस्थापनाच्या पातळीवर –

१. केंद्रीकरण : अंतर्गत सुरक्षेचे अधिकार राज्यांकडून काढून घेऊन केंद्र सरकारकडे द्यावेत.
२. विकेंद्रीकरण : विकास कार्यक्रमांच्या खर्चाचे अधिकार व जबाबदारी केंद्र सरकारकडून काढून राज्यांकडे द्यावेत.
३. दारिद्र्यनिर्मूलनासाठीच्या संमती मिळालेल्या कार्यक्रमांसाठी दिली जाणारी सर्व प्रकारची मदत रद्द करावी किंवा नाही, हे ठरवण्यासाठी केंद्रीय समिती स्थापन करावी आणि प्रत्यक्ष किती काम केले गेले आहे, हे बघून रद्द करण्याचा निर्णय घ्यावा.
४. स्वायत्त संस्थांमधील, तसेच नियामक समित्या, सार्वजनिक उद्योग, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांमधील सर्व नेमणुकांसाठी यु.पी.एस.सी.सारख्या विशेष जाणकार समित्या नेमाव्यात.
५. सरकारच्या कामात जास्त झपाट्याने सुधारणा व्हाव्यात, कारण खासगी उद्योगधंद्यांतील पुनरुत्थानामुळे एकूण प्रगतीच्या वाढीचा निर्देशांक वर आला आहे.
६. सार्वजनिक सेवा-वितरण सुव्यवस्थित होण्याची जबाबदारी मंत्रिपदावरील व्यक्तीची असणे बंधनकारक करण्यासाठी संस्थांनी नव्याने पुढाकार घेण्याची तातडीची गरज आहे.
७. ठरवलेली वार्षिक ध्येये प्रत्यक्षात किती साध्य केली, ह्याचा अहवाल संसदेसमोर ठेवण्याची जबाबदारी नियोजन आयोगाची असावी.
८. भ्रष्टाचाराच्या पातळीची मर्यादा निदान मंत्र्यांच्या पातळीपर्यंत कुठे असावी, हे निश्चित करावे.

९. शेवटी न्यायालयांच्या पातळीवर कायदाव्यवस्थेतील सुधारणा जास्त दिवस पुढे ढकलता येणार नाहीत.

मी आधी म्हटल्याप्रमाणे, बहुपक्षीय आघाड्यांचे सरकार बनण्याची पद्धत नव्याने रुढ होणे, ह्याचे भारताच्या लोकशाही संस्थांच्या कामकाजावर नोंद घेण्यासारखे परिणाम होतात. संसदीय कार्यपद्धतीचे महत्त्व आणि प्रभाव ह्यामुळे काही प्रमाणात कमी झाला आहे. संसदेच्या कामाचे श्रेष्ठत्व वाढवणे आवश्यक आहे, कारण त्यामुळे या पद्धतीत कार्यकारी खात्याने त्याचे काम पार पाडणे, जास्त अर्थपूर्ण होते. देखरेख ठेवण्याचे काम खांद्यावर घेतल्याने संसद जास्त मोठ्या जबाबदाऱ्या उचलते. म्हणून संसदीय पद्धती जास्त चांगली व स्थिर होण्यासाठी अशा सुधारणा केल्यामुळे देशाच्या राज्यघटनेने आपल्याकडून ज्या उच्च अपेक्षा ठेवल्या आहेत, त्या पूर्ण करता येतील. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, अंतर्गत सुरक्षा बळकट करणे, जागतिक दहशतवाद आणि बेकायदा पुंडाई ह्यांना तोंड देण्याची जी अत्यंत निकडीची गरज आहे, त्यावर ह्या चिंतांचे सावट पडले आहे.

सध्याच्या प्रचंड वाढ होत असलेल्या काळात समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधील आर्थिक तफावत जास्त वाढली आहे. अनुशासनामध्ये मंत्र्यांचे काम वाढले आहे; त्यामुळे हे आवश्यक आहे की, त्यांच्या कामगिरीबद्दल मुख्यत: त्यांना जबाबदार धरले गेले पाहिजे. त्यांना व्यावहारिक बाबतीत आणि कायद्याने मिळणाऱ्या इतर बाबतींत असणाऱ्या अधिकाराचा दुरुपयोग होऊन उपलब्ध सार्वजनिक निधी दुसरीकडेच वळवला जात नाही किंवा त्याचा गैरवापर होत नाही ना, ह्याची काळजी घेतली पाहिजे. अनुशासनाची रुढ असलेली पद्धत बदलून नवी पद्धत तयार केली पाहिजे. कारण त्यामुळे उच्च राजकीयपदांसाठी असलेली मागणी-पुरवठा ह्यांचा समतोल राहील, आणि पुरेशा योग्य व्यक्ती उपलब्ध नसल्याने असलेल्यांची किंमत तुटवड्यामुळे वाढणार नाही.

संसद-सदस्यांना सामाजिक-आर्थिक कामांचे आयोजन व अंमलबजावणी ह्यात जास्त सक्रिय भाग घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे; म्हणजे राजकीय नेत्यांची एक मोठी फळी उभी राहील आणि एकसूत्री (एकहाती) सत्ता आहे म्हणून त्या सत्तेचा वापर करुन फायदा लाटणाऱ्यांचे वर्चस्व कमी होईल.

ह्याचा परिणाम असाही होईल की, गुन्हेगारीची किंवा कायदे मोडण्याची पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना राजकारणात संधी मिळणार नाही. संसद-सदस्यांना ते प्रभावी कामगिरी दाखवू शकतील, अशा तऱ्हेने वेगवेगळ्या संस्थांच्या कामाचा समन्वय साधण्याची जबाबदारी दिली; तर सामाजिक-आर्थिक वाढ खात्रीने जास्त चांगली होईल. एकच काम परस्परविरोधी करण्याची कृती वेगवेगळ्या संस्था व सरकारी खात्यांकडून होणार नाही. तसेच एकमेकांचे दृष्टिकोन आणि धोरणे अमलात आणण्याची पद्धत, त्यांमधील मतभेद योग्य वेळी व योजना अमलात आणण्याच्या आधीच्या योग्य पायरीवर मिटवता येतील, त्यामुळे मतभेद सोडवण्यासाठी निर्णय घेण्याचे काम वरिष्ठ पायऱ्यांवरील व्यक्तींकडे सोपवावे लागणार नाही. परिणामी, सक्षम संसद-सदस्यांना सोडवता न आलेल्या खरोखर महत्त्वाच्या प्रश्नांमध्ये मंत्रिमंडळाच्या समित्या आणि मंत्र्यांचे गट ह्यांना लक्ष घालावे लागेल. वरचेवर होत असलेल्या देश-प्रांत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व पक्षातील पदांचा अल्पकालावधी यामुळे संसद-सदस्यांच्या वाढत्या सहभागाने व्यवस्थापनपद्धती जास्त वेगाने काम करु लागेल. त्यातून याची खातरी करता येईल की, देशाला वरचेवर अनुशासनामधील आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागू नये.

एक नवी दृष्टी आणि नेतृत्व घेऊन संसदेने आता आपला देश जास्त प्रबुद्ध, ऐक्य व सुसंवाद असणारा, समृद्ध, संपन्न आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुरक्षित केला पाहिजे – जो हल्ले आणि सरहद्दींपलीकडून होणारी घुसखोरी ह्यांपासून चिरंतन अभेद्य राहील. जर आज संसदेने बलशाली, समृद्ध व सुखी राष्ट्रासाठी 'मिशन इंडिया-२०२०'ची अंमलबजावणी करण्याचा निश्चय केला; तर माझ्या डोळ्यांसमोर २०२०पर्यंतच्या भारताचे असे उठावदार चित्र उभे राहते.

'विकसित भारत-२०२०'अस्तित्वात आणण्यासाठीची आव्हाने, अनुशासनाच्या आणि विधिमंडळाच्या कामांच्या प्रत्येक बाबतीत सुधारणा घडवून आणण्याची संधीही देतात. आपण २१व्या शतकातील अनुशासनपद्धती आणि विधिमंडळाची कार्यपद्धती ह्यांचा पुनर्विचार केला; तर तंत्रज्ञानातील क्रांतीची अंमलबजावणी व फायदे, राष्ट्रीय व जागतिक स्तरांवर प्रस्थापित झालेले दळणवळण, जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय सहकार आणि स्पर्धा ह्या

सर्व गोष्टी त्यासंदर्भात लक्षात घेतल्या पाहिजेत.

संसद-सदस्यांना कदाचित माझ्या ह्या सूचनांवर चर्चा करावीशी वाटेल वा त्यांत सुधारणा हवी असेल आणि त्यातूनच आपली राज्यघटना प्रथम तयार केली गेली; तेव्हा असलेले एकजुटीचे सुसंवादी नेतृत्व व आपल्या देशासाठी एक संकल्पना ते उभी करतील. २१व्या शतकातील संसदेच्या ह्या संकल्पनेकडे बघण्याची आंतरराष्ट्रीय व दीर्घकालासाठीची दूरदृष्टी हवी आणि २०२०पर्यंत भारताला एक विकसित, योग्य 'राष्ट्रीय समृद्धी निर्देशांक' असणारा तसेच २०३०पर्यंत ऊर्जा-स्वावलंबी होईल, अशा देशात परिवर्तन करण्यासाठी त्याला अंमलबजावणीच्या योजना, सुसूत्रित बांधणी आणि प्रत्यक्ष कृतीच्या आखणीचा भक्कम आधार हवा.

ही अशी अद्वितीय संसदेची संकल्पना आणि तिची यशस्वी अंमलबजावणी ह्यांनी आपल्या १०० कोटी जनतेच्या चेहऱ्यांवर हास्य येईल. ऐक्याने आणि सुसंवाद ठेवून एका राष्ट्रीय ध्येयासाठी काम करणे, ही आपल्या संसद-सदस्यांसाठी आजची सर्वांत मोठी गरज आहे. तुम्हाला माझे हे म्हणणे निश्चित पटेल की, आज आपल्या संसदेसमोरील हे सर्वांत महत्त्वाचे ध्येय वा लक्ष्य आहे.

भ्रष्टाचार, अनुशासन आणि इतर प्रश्नांवर राष्ट्राला येऊ लागलेली जागृती, संसदेने दूरदृष्टीने व तातडीने पावले उचलण्याची गरज अधोरेखित करत आहे.

...आणि नंतर

मी आचार्य महाप्रज्ञांना भेटलो, त्या दिवसापर्यंत माझ्या मनात नेहमी अशी एक भावना होती की; मी अण्वस्त्राच्या क्षेत्रात जे काम केले आहे, ते जगात ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्या अंगभूत सुसंस्कृत स्वभावाच्या, जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या आणि त्यांनी केलेल्या महान कार्यांच्या विरुद्ध आहे. आचार्य महाप्रज्ञ हे सर्व ज्ञानांचे उगमस्थान होते. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक आत्म्याला ते शुद्ध करत असत. ऑक्टोबर, १९९९मध्ये मध्यरात्रीच्या सुमारास आचार्यजींनी त्यांच्या संन्याशांबरोबर देशाच्या व जनतेच्या कल्याणासाठी तीन वेळा प्रार्थना केली होती. प्रार्थना संपल्यावर ते माझ्याकडे वळले आणि त्यांनी जे सांगितले, ते शब्द माझ्या मनात अजून गुंजत राहिले आहेत. ते म्हणाले, "कलाम, तू आणि तुझ्या सहकाऱ्यांनी जे काम केले आहे, त्यासाठी देव तुझं कल्याण करो. परंतु परमेश्वराच्या मनात तुला जास्त मोठे लक्षय द्यायचे आहे, म्हणून आज तू येथे येऊन मला भेटलास. मी जाणून आहे की, आपला देश आता अण्वस्त्रसंपन्न असलेला देश आहे; परंतु तू आणि तुझ्या सहकाऱ्यांनी जे केले आहे, त्यापेक्षा तुझं काम आता जास्त मोठं असणार आहे. खरोखर ते आत्तापर्यंत कुठल्याही माणसाने कधीही केलेल्या कामापेक्षा मोठं असणार आहे. जगात अण्वस्त्रे हजारोंच्या संख्येने वाढत आहेत. माझ्याजवळ असलेले सर्व दैवी आशीर्वाद देऊन मी तुला आणि फक्त तुलाच आज्ञा करतो की, शांततेची अशी एक योजना घडव – ज्यामुळे हीच सर्व अण्वस्त्रे निरुपद्रवी, निरर्थक आणि राजकीय दृष्ट्या कुचकामी होऊन जातील."

आचार्यजींचे सांगणे संपले, तेव्हा संपूर्ण हॉलमध्ये शांतता पसरली. मला असे वाटले, जणू संपूर्ण निसर्गही त्या संताच्या संदेशाशी सहमत होता. आयुष्यात प्रथमच मी हादरल्यासारखा झालो. तेव्हापासून आचार्यजींचा संदेश हा माझा दिशादर्शक प्रकाश झाला आहे; एक वास्तव, एक आव्हान झाला आहे – ज्याने माझ्या आयुष्याला नवा अर्थ दिला आहे.

पहिल्या प्रकरणात एका लहान मुलीने लिहिलेल्या पत्राच्या बाबतीत आम्ही जी कार्यवाही केली, त्यातून तिला आश्चर्यकारक आणि आनंददायक मदत देण्यासाठी वळण मिळाले. ज्यांच्याकडे आम्ही ते पत्र पाठवले होते, ते बँकर होते. त्यांनी त्या कुटुंबाशी संपर्क साधला. त्यांच्यासमवेत बसून त्यांनी त्या कुटुंबाचे आर्थिक प्रश्न सोडवण्याचे मार्ग शोधून काढले. नंतर त्या मुलीचे लग्न झाले आणि ती सुखात आहे. आम्ही जी कार्यवाही केली, त्यामुळे निदान तिची काही स्वप्ने साकार होऊ शकली, ह्याचा आम्हाला आनंद होता.

परिशिष्ट – १

मुलाखत

बऱ्याच राज्यांना २००६मध्ये भेटी देऊन आल्यावर मी मिझोराममध्ये होतो, तेव्हा मनोरंजना सिंगने एनईटीव्हीतर्फे माझी मुलाखत घेतली होती. त्यामध्ये बरेच वादग्रस्त विषय, चिंता आणि हाती घेतलेली कामे यांवर मी प्रकाश टाकला होता; तो येथे देत आहे.

१. आपण राज्यांना जे तपशीलवार तयार केलेले विकास कार्यक्रम देता, त्याप्रमाणे ती काम करत आहेत का, हे आपण लक्ष देऊन पाहता का? तशी लक्ष ठेवता येणारी देखरेख यंत्रणा आहे का?

उत्तर : मी जे विकासाचे आराखडे राज्यांना दिले आहेत; ते मी त्या राज्यांना दिलेल्या भेटी, नियोजन आयोग, संबंधित राज्य सरकार आणि केंद्रीय मंत्रालये ह्या सर्वांकडून मिळालेली माहिती, तसेच स्वतंत्रपणे केलेले मूल्यमापन ह्यांमधून अभ्यास करुन दिलेले आहेत. ती सादरीकरणे तयार करताना माझे सहकारी रात्र-रात्र जागून काम करत असत. मी ठामपणे सांगत असे की, राज्यांच्या विकासाचे महत्त्व जास्त आहे, राज्यांचे महत्त्व राजकीय पक्षांपेक्षा जास्त आहे. शिवाय, ह्या कामांत सहभागी होणाऱ्या सर्वांच्या त्या कामाबद्दल चर्चाही करण्याला मी मान्यता दिली होती. माझ्या सादरीकरणानंतर बऱ्याच राज्यांच्या विधिमंडळांनी त्यांना दिलेल्या भावी लक्ष्यांवर चर्चा करुन त्या योजना अमलात आणण्यासाठी अधिवेशनेही बोलावली होती. शिवाय त्यानंतर जेव्हा-जेव्हा मी त्या राज्यांना पुन्हा भेटी दिल्या आणि तेथील विद्यापीठे, चेम्बर्स ऑफ कॉमर्स, इतर औद्योगिक व सेवा संस्थांसमोर व्याख्याने दिली; तेव्हा त्या ध्येयांबद्दल बोलून राज्यांच्या ह्या विशेष कामांशी त्या संस्थांना जोडत असे. उदाहरणार्थ – कर्नाटक, मध्य प्रदेश व बिहारमध्ये ह्या योजनांवर कामे सुरु केली गेली आणि ती राज्ये आता त्या अमलातही आणणार आहेत. केरळमध्ये प्रसारमाध्यमांनीही पुढाकार घेतला आणि राज्य सरकार, विद्वान मंडळी व इतर भागीदार मंडळी ह्यांच्यामध्ये चर्चा घडवून आणली. त्यानंतर ही कामे अमलात आणण्यासाठी काय करावे, ह्याचा कृती-आराखडा त्यांनी केला; आणि अशा तऱ्हेने प्रसारमाध्यमे राज्य सरकारच्या सहकाऱ्यांपैकी एक झाली. उत्तर-पूर्व भागांमध्ये मी अशा योजना सिक्कीम, मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि मेघालय या राज्यांना दिल्या. ह्या राज्यांनी जलविद्युत निर्मिती, पाण्याचे साठे एकमेकांना जोडण्याचे काम करणे आणि बांबूच्या झाडांना फुले येण्याच्या मोसमात शेतीच्या पिकांना नुकसान पोहोचू नये ह्यासाठी काम करणे, ह्यात विशेष लक्ष घातले पाहिजे.

२. पंचवार्षिक योजना आणि वार्षिक योजनांचे जे विकासाचे आराखडे तयार होतात,

त्यापेक्षा आपण बनवलेले पथदर्शक आराखडे वेगळे आहेत का? दोन्हींमध्ये काही परस्परविरोधी गोष्टी आहेत का?

उत्तर : आम्ही पथदर्शक आराखडे तयार करत होतो; तेव्हा आम्ही सर्व मंत्रालये, राज्य सरकार आणि नियोजन आयोगाकडून पूर्ण माहिती मागवली. विकासाचे नियोजन आयोगाने बनवलेले संकल्पचित्र आठ मुद्द्यांवर आधारित होते, ते निकष आम्ही घेतले. विकासाच्या त्या संकल्पचित्रात सर्वांगीण सुधारणा करुन, विकासाची सर्व कामे सुसूत्रपणे एकत्रित करुन ध्येय गाठण्याच्या कामाला गती देण्याचा आमचा हेतू होता. आम्ही सुचवलेल्या योजना प्रत्येक राज्याच्या खास वैशिष्ट्यांवर आधारित होत्या आणि त्या राज्याची योजना व नियोजन आयोगाची पंचवार्षिक योजना ह्यांना पूरकच होत्या. आम्ही ज्या योजना दिल्या, त्या दीर्घ मुदतीच्या म्हणजे २०१५पर्यंत ही राज्ये विकसित स्तरावर नेण्यासाठीच्या होत्या, कारण विकसित राज्येच भारताला २०२०पूर्वी विकसित करु शकतील.

३. आपली बौद्धिक झेप, कल्पनाशक्ती आणि विज्ञान व तंत्रज्ञानातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव, ह्यांचा हे पथदर्शक आराखडे तयार करण्यात महत्त्वाचा वाटा आहे. परंतु आपण हे महान पद ज्या वैशिष्ट्यपूर्ण कामाने भूषवीत आहात, ते ध्येय आपल्या उत्तराधिकाऱ्यांसाठी एक आव्हानच नाही का?

उत्तर : माझा व्यक्तिगरीत्या असा विश्वास आहे की, पदावर कोणीही असले, तरी चांगली पद्धती टिकून राहते. गेल्या चार वर्षांमध्ये मला असे दिसून आले आहे की, देशामध्ये एकंदरीत आर्थिक विकासाच्या बाबतीत जागृती झाली आहे. काही चांगली कामेही यशस्वी झाली आहेत. मला वाटते की, त्यामुळेच बऱ्याच राज्यांच्या विधिमंडळांनी त्यांच्या विकासाच्या कामांबद्दल चर्चा करण्याची मला संधी दिली. मी जेव्हा एक-दोन राज्यांच्या विधिमंडळांपासून सुरुवात केली, तेव्हा इतर राज्यांच्या विधिमंडळांनी त्यांच्यासमोरही मी व्याख्यान द्यावे, असे सांगितले. त्यामुळे मला असे दिसते की, भारतातील लोक व भारतातील राजकीय प्रणाली दोघांचाही राष्ट्रीय विकासासाठी ध्येय वा लक्ष्य ठरवून त्या दिशेने विकास कार्यक्रम आखणे, ह्या कल्पनेवर विश्वास बसू लागला आहे. त्यासाठी पथदर्शक आराखडा करण्याची कृती-योजना आखण्याची गरज असते आणि योजनेचे काम चालू असताना मधून-मधून सिंहावलोकन केलेले चांगले असते.

मला असेही वाटते की, राष्ट्रपतींच्या कार्यालयात काही औद्योगिक, व्यावसायिक इत्यादी क्षेत्रांमधील जाणकार मंडळी असण्याची आवश्यकता आहे. ही मंडळी जरुर त्या विषयावरच्या माहितीचे अहवाल तयार करुन संबंधित मंडळींना देतील. अर्थात तुम्ही म्हणालात ते बरोबर आहे की, अशा तऱ्हेचा पुढाकार राष्ट्रपतींकडून नव्यानेच घेतला गेला आणि हे राष्ट्रासाठी विशेष हेतूने केलेले काम आहे. शिवाय यातून राष्ट्रपतींना नागरिकांच्या गरजांकडे सदैव लक्ष ठेवता येते.

४. राज्यघटनेने जरी राष्ट्रपतींचे अधिकार आणि सरकारच्या जबाबदाऱ्या नक्की केलेल्या आहेतच; तरी गेल्या चार वर्षांमध्ये आपल्याला बऱ्याच क्षेत्रांत ही दोन कामे एकमेकांमध्ये गुंतलेली, काही गोष्टी अस्पष्ट असल्यामुळे राष्ट्रपती व पंतप्रधानांमध्ये मतभेद होऊ शकणारी आढळली का?

उत्तर : आपली राज्यपद्धती अतिशय चांगली आणि स्थितिस्थापक आहे, त्यामुळे एकत्र काम करण्याच्या भरपूर संधी असतात. जेव्हा हा विचार लक्षात ठेवून काम केले जाते की, व्यक्तीपेक्षा राज्य श्रेष्ठ आहे; तेव्हा व्यक्तींच्या संबंधांमध्ये काही समस्या येत नाहीत. राज्यपालांच्या घेतल्या गेलेल्या दोन परिषदांमधून राष्ट्रपती आणि पंतप्रधान कसे एकजुटीने व कोणत्या पद्धतीने काम करतात, हे दिसून आले.

५. मतभेद उद्भवणारी एक अशी घटना जनतेसमोर आली – ती म्हणजे 'लाभाचे पद' (Office of Profit**) विषयीचा कायदा. ते विधेयक आपल्याकडे परत पाठवण्यात आले आणि आपल्याला ते योग्य वाटत नसतानाही त्यावर स्वाक्षरी करणे भाग पडले, तेव्हा तुमची प्रतिक्रिया कशी होती?**

उत्तर : 'लाभाचे पद'शी संबंधित मुद्दे अगदी स्पष्ट आहेत. राज्यघटनेतील तरतुदींना धरुनच आम्ही निर्णय घेतला. तुम्ही हे लक्षात घ्यालच की, संसदेच्या दोन्ही सभागृहानी जे. पी. सी. (सर्व पक्षीय संयुक्त संसदीय समिती) तयार करण्याचा जो निर्णय घेतला, त्यामुळे आमची कृती योग्य होती, हे जनतेने व राजकीय पक्षांनी घेतलेल्या भूमिकेतून सिद्ध झाले. 'लाभाचे पद'ची व्याख्या काय, हे नक्की करण्यास संसद-सदस्यांना मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करण्यासाठी जे.पी.सी. नियुक्त करण्यात आल्यावरच मी त्या विधेयकावर स्वाक्षरी केली.

६. तरुणांना विज्ञानविषयक संधींबद्दल जागृत करण्यासाठी आपण सुरु केलेली वैशिष्ट्यपूर्ण मोहीम आणि आपल्या आवडीचे विज्ञान व तंत्रज्ञान हे क्षेत्र ह्यांसाठी सरकारने कोणती नवी पावले उचलावीत, असे आपल्याला वाटते?

उत्तर : (अ) मुलांची सर्जनशील वृत्ती जागृत करण्यासाठी सध्याची प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षणपद्धती रद्द करुन नवी पद्धती तयार केली पाहिजे. अर्थात जे 'राइट टू एज्युकेशन'(शिक्षणाचा हक्क) विधेयक संसदेत मंजूर झाले, ते प्रांतीय विधिमंडळांमध्ये विचाराधीन आहे. ओघानेच 'शिक्षणाचा हक्क' कायदा झाला की, ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळेलच.

(ब) प्राथमिक शिक्षणामध्ये मोठे बदल करण्याची आवश्यकता आहे. शिक्षणक्षेत्रातल्या तज्ज्ञांनी कल्पकतेने सर्जनशील अभ्यासक्रम तयार केला पाहिजे, नव्या कल्पक वर्गाची रचना केली पाहिजे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, नवनिर्मितीची क्षमता असलेले कल्पक व प्रशिक्षित शिक्षक नेमले पाहिजेत.

(क) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कामांची दिशा 'भारत-२०२०'ची ध्येये वा लक्ष्ये प्रत्यक्षात उतरविण्याकडे वळवली पाहिजे.

(ड) संशोधनक्षमता, चौकस बुद्धी, सर्जनशीलता आणि काहीतरी नवीन करणे, सुधारणा करणे, अशा क्षमतांना प्रोत्साहन मिळेल, असे विद्यापीठांचे अभ्यासक्रम असले पाहिजेत. तसेच उद्योजकता, उच्च तंत्रज्ञानाचा वापर, नैतिक नेतृत्व अशा तरुण पिढीच्या गुणांना जोपासले पाहिजे; म्हणजे, 'भारत २०२०'चे ध्येय साध्य करण्यासाठी ते समर्पित भावनेने हातभार लावू शकतील.

(इ) दर वर्षी सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना शुद्ध विज्ञान विषयांमध्ये संशोधन करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य देऊन मार्ग मोकळे करुन दिले पाहिजेत, जे त्यांच्या आयुष्यातील कामाचे ध्येय असले पाहिजे. अशा प्रशिक्षित विद्यार्थ्यांना विज्ञानक्षेत्रात चांगल्या नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत.

७. वैद्यकीय, अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयांमध्ये अर्ज करणाऱ्यांची प्रचंड गर्दी होते, परंतु मूलभूत विज्ञान शिकवणाऱ्या महाविद्यालयांमध्ये अशा शिक्षणक्रमांसाठी विद्यार्थीच नसतात. विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाकडे आणि संशोधनाकडे वळण्यास उत्तेजन मिळावे, ह्यासाठी आपल्या धोरणामध्येच बदल केला पाहिजे का?

उत्तर : तुम्हाला कदाचित ठाऊक असेल की, दोन राज्यांमध्ये सरकारने 'विज्ञान संशोधन शिक्षण संस्था' (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, रिसर्च अॅन्ड एज्युकेशन) स्थापन केल्या आहेत. जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्मिण्यासाठी प्रशिक्षित विद्यार्थी तयार करण्याचे काम क्रमाक्रमाने वाढवले पाहिजे; ज्यामुळे तरुण पिढीला ज्ञान-विज्ञान-संशोधन किंवा आधुनिक वा नव्या कौशल्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाशी स्पर्धा करु शकतील, अशा रोजगार संधींसाठी उच्च शिक्षण मिळू शकेल. आत्ताच्या दहा टक्क्यांच्या तुलनेत क्रमाक्रमाने वाढ होत; २०५०पर्यंत तीस टक्के तरुणवर्ग उच्चशिक्षित होऊ शकेल आणि बाकीचा सत्तर टक्के तरुणवर्ग उद्योगधंदे, सेवाक्षेत्र आणि कृषिक्षेत्र ह्यांमध्ये उच्च दर्जाची कौशल्ये मिळवलेला असेल.

८. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'मध्ये जागतिक दर्जाचे 'संशोधन व विकास' काम आणि शिक्षणसंस्था उभ्या करण्यासाठी १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे, पण बऱ्याच शास्त्रज्ञांनाच एवढ्या मोठ्या कामासाठी तो अत्यंत तुटपुंजा वाटतो. एम.आय.टी. आणि स्टॅनफोर्डकडे ह्याहून कित्येक पटींनी जास्त निधी उपलब्ध असतो. आय.आय.एस.सी.चे (घघ्एण्) लोक म्हणतात की, त्यांच्या संशोधन विभागात पीएच.डी.साठी पुरेसे विद्यार्थी येत नाहीत.

उत्तर : हे सरकारने पुढाकार घेऊन केलेल्या कामांपैकी एक आहे. इतर विद्यापीठे व

महाविद्यालयांमध्येही सरकारने पुढाकार घेऊन सुरुवात केली आहे; शिवाय ह्या कामासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या स्त्रोतांमधूनही निधी येऊ शकतो. मी विज्ञानक्षेत्राबद्दल सुचवलेल्या दिशांनंतर बरेच जास्त विद्यार्थी विज्ञान-संशोधनासाठी येतील, अशी मला खातरी आहे.

९. नॅनोटेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, कार्बन काम्पोझिट्स, मेटलर्जी इत्यादी विषयांतील आघाडीवरच्या स्पर्धात्मक क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे संशोधन केले असल्याचा दावा आपल्या शास्त्रीय प्रयोगशाळा करतात; परंतु गेल्या साठ वर्षांत आत्तापर्यंत देशात झालेल्या कामासाठी एकही नोबेल पारितोषिक आपल्याला मिळालेले नाही. मग असा प्रश्न उभा राहतो की, आपले काम खरोखर जागतिक दर्जाचे आहे का? का मग इतर काही कारणांनी आपल्या कामाची दखल घेतली जात नाही? आपल्याला काय वाटते?

उत्तर : बरेचसे नोबेल पुरस्कार मूलभूत संशोधनाला दिले जातात. सध्या आपल्याकडे तशा मूलभूत संशोधनासाठी दिला जाणारा बराचसा निधी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये विभागला जातो. आपल्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांना अगदी अनवट क्षेत्रांमध्ये शास्त्रीय संशोधन करु दिले पाहिजे आणि अनेक भिन्न-भिन्न दिशांमध्ये काम करण्याऐवजी मोजक्या, निवडक क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मी असे सुचवेन की, नॅनोटेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी आणि माहिती तंत्रज्ञान ह्यांच्या एकत्रित क्षेत्रात संशोधन करण्यावर लक्ष केंद्रित करावे. मोठा प्रभाव पाडू शकेल, अशी क्षमता भारतामध्ये आहे. विद्यापीठे आणि उच्च तंत्रज्ञान शिकवणाऱ्या संस्था ह्यांच्याकडे विशिष्ट क्षेत्रातील संशोधनासाठी मूलभूत दर्जा व निधी असले पाहिजेत. विद्यापीठाच्या वातावरणात जितके जास्त संशोधक-प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ ह्यांना उत्तेजन व साह्या मिळेल, तितके जास्त विद्यार्थीही संशोधनासाठी येतील. ह्यातून अगदी नवे परिणाम घडवणारे संशोधन होईल आणि आपल्या देशातील तंत्रज्ञानावर त्याचा प्रभाव पडेल. ह्यातील काही संशोधने पुरस्कारप्राप्तही ठरु शकतील. विज्ञानक्षेत्रातील मनाचा मोठेपणा हा संशोधनक्षेत्रात किती महत्त्वाच्या घटक आहे, हे दाखवणारा माझा एक अनुभव सांगतो –

विज्ञानक्षेत्रातील मनाचा मोठेपणा : नोबेल पारितोषिक विजेते प्रोफेसर नॉर्मन ई. बोरलॉग हे विख्यात कृषिशास्त्रज्ञ आणि भारताच्या पहिल्या हरित क्रांतीच्या यशाचे भागीदार आहेत. त्यांना १५ मार्च, २००५ला नवी दिल्ली येथील विज्ञान भवनामध्ये 'एम. एस. स्वामिनाथन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ९१ वर्षांचे प्रोफेसर बोरलॉग यांच्यावर तेथे जमलेले सर्व जण स्तुतिसुमनांचा वर्षाव करत होते. ते बोलायला उभे राहिले, तेव्हा त्यांनी भारताने कृषिशास्त्र व शेती उत्पादनात केलेल्या प्रगतीचा गौरव केला आणि सांगितले की, राजकीय दूरदृष्टी असलेले सी. सुब्रह्मण्यम आणि डॉ. एम. एस. स्वामिनाथन हे भारतातील पहिल्या हरित क्रांतीचे मुख्य शिल्पकार होते. भारतात 'श्वेतक्रांती' घडवून आणणारे डॉ. वर्गिस कुरियनचाही त्यांनी अभिमानाने उल्लेख केला. त्यानंतर आश्चर्य वाटण्यासारखा प्रसंग घडला. ते प्रेक्षकांमधील तिसऱ्या, पाचव्या व

आठव्या रांगेत बसलेल्या शास्त्रज्ञांकडे वळले आणि गव्हाच्या संशोधनातील विशेषज्ञ डॉ. राजा राम, मक्याच्या संशोधनातले विशेषज्ञ डॉ. एस. के. वासल, व बियाणे विशेषज्ञ डॉ. बी. आर. बारवाले यांच्याकडे त्यांनी निर्देश केला. ते म्हणाले, ह्या सर्व शास्त्रज्ञांनी भारताच्या आणि आशिया खंडाच्या कृषिशास्त्रामध्ये भरीव कामगिरी केली आहे. डॉ. बोरलॉग ह्यांनी श्रोत्यांना ह्या तिघांची ओळख करुन दिली आणि श्रोत्यांना त्या सर्वांना उभे राहून अभिवादन करावयास लावले. आपल्या देशात असे दृश्य मी यापूर्वी कधी बघितलेले नाही. डॉ. बोरलॉग यांनी जे केले, त्याला मी विज्ञानक्षेत्रातील मनाचा मोठेपणा म्हणतो. माझ्या मित्रांनो, आयुष्यात मोठी कामे करुन दाखवण्याची तुमची महत्त्वाकांक्षा असेल, तर तुमच्याकडे विज्ञानक्षेत्रातील मनाचा मोठेपणा असला पाहिजे. माझा असा अनुभव आहे की, मोठ्या मनाचे लोकच दिलदार असतात. असा मनाचा मोठेपणा विज्ञान समुदायाला स्फूर्ती देईल आणि संघभावनेने काम करण्याची वृत्ती जोपसली जाईल. त्यामुळे नवे शोध लागतील आणि बऱ्याच संशोधनक्षेत्रांमध्ये नवी उत्पादने होतील.

१०. राष्ट्रपतींच्या वेगवेगळ्या मैत्रीपूर्ण परदेश-दौऱ्यांनी काही निश्चित हेतू सफल होतो का; का ते केवळ मर्यादित महत्त्वाचे शिष्टाचार असतात?

उत्तर **:** भारताला ह्या भेटीतून काय साध्य करायचे आहे, त्यावर अशा कुठल्याही दौऱ्याची सिद्धी अवलंबून असते. मी चौदा देशांना भेटी दिल्या आहेत आणि त्यांच्या राष्ट्रीय विधिमंडळासमोर व संसदेसमोर भाषणे दिली आहेत. ह्या भेटींनी परस्परांना जास्त चांगले समजून घेता आले, तसेच संवादासाठी व सहकार्यासाठीजास्त वाटा सापडल्या. हे पुढील नव्या काळासाठी दोघांनाही फायद्याचे होईल.

उदाहरणार्थ – दक्षिण आफ्रिकेत मी पॅन-आफ्रिकन संसदेसमोर भाषण दिले. तेथे मी 'पॅन आफ्रिकन ई-नेटवर्क' उभे करण्यासाठी भारतातर्फे सुरुवातीला ५ कोटी डॉलर्सची मदत देऊ केली. तुम्हाला हे ऐकून आनंद होईल की, ते काम चांगले प्रगती करीत आहे आणि तेथे काम करणारा भारतीय संघ आणि आफ्रिकन युनियनमध्ये सखोल तंत्रज्ञान-सहकार्य होत आहे. माझ्या मते, ही मोठी सिद्धी आहे.

मी सुदानला गेलो, तेव्हा ओ.एन.जी.सी. पाइपलाइन प्रकल्प सुरु होण्याची शक्यता होती. 'ओ.एन.जी.सी. विदेश'ने आज ती योजना पूर्ण केली आहे आणि त्याचा फायदा दोन्ही देशांना होत आहे.

आपले उदाहरण बघून फिलिपाइन्सने 'जॅट्रोफा'ची लागवड करण्याचे ठरवले आहे. त्यांनी त्यांची योजना तयार करण्यासाठी भारतीय निष्णातांना बोलावले होते. तसेच भारतीय आणि फिलिपाइन्सच्या औषध-उद्योगांच्या सक्रिय सहकार्याने तेथील लोकांना परवडतील अशा दराने औषधे मिळू लागली आहेत. फिलिपाइन्सबरोबर आय.टी., आय.टी.ई.एस. आणि बी.पी.ओ. सेवा चालू करण्यासाठी नॅसकॉम (NASSCOM) काम करत आहे.

एक सदिच्छादर्शक काम म्हणून टान्झानियातील काही हृदयरोगाच्या रुग्णांवर – विशेषत: मुलांवर – आपण येथे उपचार करण्याचे कबूल केले. मला सांगायला आनंद वाटतो की, त्या मुलांना भारतात आणून त्यांच्यावरील उपचार पूर्ण होऊन त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्यात आले आहे. त्याबरोबरच, त्याच वेळी बऱ्याच टान्झानियन डॉक्टरांना येथे हृदयरोगांच्या उपचारांसाठी प्रशिक्षणही देण्यात आले.

मी सिंगापूर आणि कोरियाला गेलो, तेव्हा सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या देशांसाठी 'जागतिक ज्ञान व्यासपीठ' (वर्ल्ड नॉलेज प्लॅटफॉर्म) सुरु करण्याचा प्रस्ताव दिला. ह्या कार्यक्रमात सहभागी राष्ट्रांपैकी प्रत्येकाच्या मुख्य कार्यक्षमतेचा बारा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उपयोग करुन, ज्यांची जगात सर्वत्र विक्री करता येईल, अशा अत्याधुनिकतसेच अगदी नव्या उत्पादनांचे डिझाइन, विकास व उत्पादन करण्याचा विचार आहे.हेदेश 'जागतिक ज्ञान व्यासपीठा'ची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासंबंधी योजना आखतआहेत.

११. आपल्या कार्यकाळाचा मोठा भाग आता संपला आहे. ह्या कालावधीत ज्या कार्यक्रमांनी आपल्याला खूप समाधान दिले, अशांबद्दल सांगू शकाल? उदाहरणार्थ – 'प्युरा'सारखे?

उत्तर **:** मला ज्यांनी समाधान दिले, अशा काही कार्यक्रमांबद्दल मी सांगतो.

ग्रामीण विकास *:* ग्रामीण विकास मंत्रालयाने देशभरात सर्वत्र ३३ 'प्युरा' समूह स्थापण्याची योजना आखली आहे. ग्रामीण खेड्यांच्या समूहांचा विकास करण्यासाठी अनेक खासगी शिक्षणसंस्था व सामाजिक संस्था 'प्युरा'चे काम हाती घेत आहेत.

ऊर्जा *:* जैव इंधनाच्या निर्मितीसाठी पाच राज्यांनी 'जॅट्रोफा'ची लागवड सुरु केली आहे. तसेच ऊर्जाविषयक धोरणही जाहीर करण्यात आले आहे.

नॉलेज ग्रिड *(ज्ञानजाळे) :* तब्बल ५००० शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये ह्यांचे १०० स्ंज्चे नेटवर्क करुन देशभरात सर्वत्र 'नॉलेज ग्रिड' उभे करण्याची योजना 'राष्ट्रीय ज्ञान आयोग'(एन.के.सी.) करत आहे.

व्हर्च्युअल युनिव्हर्सिटी *:* १५० वर्षांच्या जुन्या अशा तीन विद्यापीठांनी 'व्हर्च्युअल विद्यापीठ' सुरु केले आहे आणि मी त्याचे उद्घाटन करुन व्हर्च्युअल वर्गांद्वारे २०,००० मुलांना व्याख्याने दिली आहेत.

('व्हर्च्युअल' म्हणजे प्रत्यक्ष समोर असल्याचा भास होतो; असे. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून टीव्हीवर शिक्षण दिले जाते.)

ग्रामीण ज्ञान केंद्र : संफर्व आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने ग्रामीण नागरिकांना प्रगतीची संधी देणारी १,००,००० समाईक सेवा केंद्रे सुरु केली आहेत.

ई-गव्हर्नन्स : राष्ट्रीय 'आय.डी.' स्थापन करुन 'जी२जी' आणि 'जी२सी' सेवांसाठी 'ई-गव्हर्नन्स ग्रिड' तयार करण्याचे काम चालू आहे. भारत सरकारनेजी२सी ई-गव्हर्नन्स सेवा आणि 'स्टेट-वाईड एरिया नेटवर्क' (SWAN)ची स्थापना करुन त्यासाठी २३,००० कोटी रुपये जाहीर केले आहेत.

१२. आपली अलौकिक प्रज्ञाशक्ती, उत्साह आणि श्रेष्ठ समर्पितता आपण पदनिवृत्तीनंतर आपल्या काही आवडत्या कल्पनांसाठी वापरणार आहात का? उदाहरणार्थ : शास्त्रीय विषयांमधील संशोधनात मार्गदर्शन करणे आणि डॉक्टरेटच्या विद्यार्थ्यांना शिकवणे? आपले अण्णा विद्यापीठातले काम आपण पुढे सुरु ठेवणार आहात का?

उत्तर : 'भारत २०२०'ची संकल्पना २०२०च्या आधीच प्रत्यक्षात आणण्यासाठी मी काम करत राहीन. मी शिकवण्याचे आणि संशोधनाचे कामही करत राहीन. माझी विद्यार्थ्यांशी व तरुणांशी वैचारिक देवाण-घेवाण चालूच राहील.

उत्तर-पूर्व प्रदेशांसाठी दर वर्षी बऱ्यापैकी वेळ देण्याचा माझा विचार आहे. सुरु करण्यात आलेली विकास कामे साकार करणे, पूर्वनियोजित कालावधीत तेथील लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारण्यास मदतरुप होतील, अशा योजना आणि त्या प्रदेशातील तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची भरपूर शक्यता असेल, अशा योजनांची अंमलबजावणी करण्यावर माझे लक्ष केंद्रित असेल.

१३. एवढे उच्च पद इतक्या उत्तम तऱ्हेने भूषविल्यानंतरही आपली कोणत्या बाबतीत सर्वांत जास्त निराशा झाली, हे आपण सांगू इच्छिता का?

उत्तर : आपल्या देशाच्या भविष्यकाळाबद्दल मी खूप आशावादी आहे. मला चिंता फक्त विकासाच्या गतीची आहे. आपल्या देशाच्या तरुणांना सामर्थ्य देऊन, सर्व भागीदार लोकांनी जर समान ध्येयासाठी योजनाबद्ध काम केले; तर 'भारत-२०२०'च्या विकासाच्या ध्येयापर्यंत आपण जास्त लवकर पोहोचू. आपण सर्वांनी अशा उमेदीने काम केले पाहिजे की, आपल्यापेक्षा देश महान आहे. माझा राष्ट्राच्या ५४ कोटी तरुणांमध्ये प्रचंड विश्वास आहे.

१४. आपण उत्तर-पूर्व राज्यांना भेटी देऊन त्यांच्या विकासाच्या पथदर्शक आराखड्याबाबत त्यांना मार्गदर्शन केले आहे. परंतु आपल्याला असे वाटत नाही का की, जेथे त्या प्रदेशातील जवळजवळ प्रत्येक राज्यात बंडखोरांच्या टोळया आहेत, त्यांच्या बंडाळयांमुळे गुंतवणुकीच्या ओघाला प्रतिबंध होत आहे? गुंतवणूक नाही म्हणून तरुणवर्ग असंतुष्ट आहे. त्या असंतोषाचा फायदा बंडखोरांच्या टोळया घेतात आणि

त्यामुळे विकास खुंटतो; तेथे असे मार्गदर्शन पुरेसे आहे का? अशा परिस्थितीत उत्तर-पूर्व राज्यांमधील दु:खी, व्यथित लोकांना काही आशा आहे का?

उत्तर : उत्तर-पूर्वेकडील राज्ये आपल्याला बऱ्याच संधी आणि आव्हाने देतात. बंडखोरीचा वाईट परिणाम तरुणवर्गाच्या भविष्यकाळावर होत आहे, हे लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे, असे मी बघितले. उत्तर-पूर्व राज्यांचा विकास जसजसा जास्त झपाट्याने होऊ लागेल, तसे लोकही थोडा त्याग करायला आणि त्यांच्या विकासाच्या आड येणारे कोणतेही आव्हान स्वीकारायला तयार होतील. म्हणून केंद्र आणि राज्यांच्या सरकारांना मला सांगावेसे वाटते की, तरुणांना बळ देऊन विकासाचा वेग झपाट्याने वाढवा. बंडाळया आणि अतिरेकी हिंसा ह्यांना दाद न देता, तरुणांना कौशल्याचे व ज्ञानाचे सामर्थ्य देऊन आणि उद्योजकतेचा विकास करुन आपण त्यांना नोकऱ्या मिळण्याच्या संधी खूप वाढवल्या पाहिजेत.

१५. उत्तर-पूर्व राज्यांमधून पूर्वेकडील देशांशी व्यापार, परस्परसंवाद आणि रस्ते व लोहमार्ग सुरु करण्याबद्दल आपले काय मत आहे? या कृतीतून अर्थव्यवस्थेला चालना मिळून नव्या संधी, नव्या नोकऱ्या मिळू लागतील का?

उत्तर : विकासासाठी ते अत्यंत जरुरीचे आहे. राजकारणातील संबंधित व्यक्तींनी पूर्वेकडील देशांशी व्यापार, परस्परसंवाद, रस्ते व लोहमार्ग शक्य तितक्या लवकर सुरु करुन दिले पाहिजेत. राज्य आणि केंद्राच्या सरकारी अधिकाऱ्यांशी सरहद्दीवरील व्यापाराच्या विकासाबद्दल मी चर्चा केली आहे, तसे केल्याने तरुणांना नोकऱ्या मिळण्याची शक्यता वाढेल.

१६. आपला ऊर्जेचा वापर पारंपरिक साधनांऐवजी अपारंपरिक साधनांद्वारे करण्याचा विचार आपण मध्यंतरी व्यक्त केला होतात, असे ऐकले. राष्ट्रपती भवन आपल्या उदाहरणातून ते दाखवून देणार आहे का?

उत्तर : आत्ताच्या घटकेला आपल्या देशाला सौरऊर्जेच्या साधनांचा अनुभव फक्त किलोवॉट क्षमतेचा आहे. आम्ही राष्ट्रपती भवनात ज्याचा विचार करत आहोत, ती ५ मेगावॉट क्षमतेची सौरऊर्जा यंत्रणा आहे. ऊर्जा मंत्रालय व अपारंपरिक ऊर्जास्त्रोत मंत्रालय ह्या योजनेवर काम करत आहेत आणि शक्य तितक्या लवकर ती कार्यान्वित होईल.

१७. ऊर्जास्थितीबद्दल सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे; तेव्हा आपण देशभरात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, सागरी जलऊर्जा इत्यादींकडे वळण्यास सांगण्यासाठी आपल्या नैतिक बळाचा उपयोग कराल का?

उत्तर : तुम्ही वाचलेच असेल की, माझ्या भाषणांमध्ये मी 'सौर ऊर्जे'मध्ये संशोधन केले पाहिजे, असे सुचवत असतो. 'कार्बन नॅनो ट्यूब'वर आधारित 'सोलर फोटोव्होल्टेक सेल्स'

वापरुन सौर ऊर्जेच्या यंत्रणेची क्षमता अशा संशोधनाने वाढवता येईल. अणुऊर्जा प्रकल्पात थोरियम वापरुन अधिक ऊर्जा मिळवण्याबद्दलही मी सुचवत असतो. दळणवळण क्षेत्रासाठी मी मोठ्या प्रमाणात जॅट्रोफाची लागवड करुन 'जैव इंधन' तयार करण्यास सांगितले आहे. आपले शास्त्रज्ञ ह्या सर्व क्षेत्रांमध्ये काम करत आहेत.

उत्तर-पूर्वेतील तीन राज्यांना भेटी दिल्याने मला त्या राज्यांमधील जैव विविधता आणि फुलाफळांची लागवड, अन्नप्रक्रियेचे उद्योग, वस्त्रोद्योग ह्यांमधील क्षमतेविषयी विश्वास वाटला. ह्या भेटीनंतर आयुष्यात यशस्वी होण्याच्या ह्या राज्यांमधील तरुणांच्या अंत:स्फूर्तीबद्दलही खूप विश्वास वाटला. त्यांना विकासाची सर्वसमावेशक संकल्पना-दृष्टी दिली पाहिजे. त्याचबरोबर संपर्कव्यवस्था आणि दळणवळण वाढवण्याच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, ज्यामुळे बाहेरच्या जगाशी ते जोडलेले राहतील आणि त्या राज्यांचा विकास झपाट्याने होईल.

परिशिष्ट – २

ध्येयसिद्धीसाठी अंमलबजावणी

राष्ट्रपतिपदावरुन निवृत्त होण्यापूर्वी संसदेसमोर दिलेल्या भाषणात मी संसद जास्त मजबूत कशी करता येईल, ह्याची सविस्तर योजना मांडली होती. मी त्यात सांगितले होते की, मी सुचवलेले प्रत्येक दूरच्या पल्ल्याचे ध्येय साध्य करण्याचे किंवा इतर आव्हानांना यशस्वी तोंड देण्याचे काम सरकार आणि संसद ह्यांनी दोघांनी मिळून केले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या मंत्र्यांची कार्यालये, खाती, संस्था ह्यांच्यामधील सीमांचे अडसर दूर करुन, जरुर असेल तेव्हा सार्वजनिक व खासगी संस्थांच्यासहभागाने, वेळ आणि साधने कमीत कमी वापरण्याच्या पद्धतीने हे काम केले पाहिजे. मी अशी आशा व्यक्त केली होती की, ह्या प्रत्येक कामासाठी लागणारे दूरदर्शी नेतृत्व संसदेतल्या बुद्धिवान सदस्यांमधूनच उदयास येईल. अशा तऱ्हेने सर्व सदस्य पक्षांच्या सीमारेषा भेदून, परिणामकारक रीतीने कार्यभार सांभाळण्यासाठी प्रत्यक्ष हातभार लावू शकतील. कुठलेही विशिष्ट काम करण्याचे हाती घेतले, म्हणजे ते पार पाडण्याची जबाबदारीयेतेच.

ध्येयसिद्धीसाठी आखलेल्या व्यवस्थापनाची रचना

प्रगत प्रदेशांमध्ये ध्येयासिद्धीसाठी जी व्यवस्था केली जाते, ती बघून मला असे वाटले की –

१. ह्या कामासाठी निवडलेले संसद-सदस्य कामाचा योग्य समन्वय साधतील आणि मंत्रिमंडळातील त्या संबंधित खात्याचे वरिष्ठ मंत्री त्या कामातील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित कामाचा विस्तार व वाव, ह्यासंबंधी मार्गदर्शनाचे नेतृत्वकरतील.
२. जो विशिष्ट-कार्यमंत्री नेमला जाईल, त्याला त्याच्या कार्याबद्दल जरुर ती साधने वरिष्ठ मंत्री उपलब्ध करुन देतील. विशिष्ट-कार्यमंत्री हे ठरवून देण्यात आलेले वार्षिक प्रत्यक्ष व आर्थिक लक्ष्य गाठण्यासाठी संसदेला उत्तरदायी असतील.

अशी अनेक विशेष लक्ष्ये वा ध्येये 'भारत २०२०'ची संकल्पना पूर्ण करण्यासाठी कशी सोपवता येतील, याची शेवटी दाखवलेल्या चौकटीत कल्पना दिली आहे.

ध्येयसिद्धीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक खात्याच्या किंवा मंत्र्यांच्या कार्यालयाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकातून १५ ते २५ टक्के हिश्श्याची वाटणी त्या लक्ष्यानुसार द्यावी लागेल. प्रत्येक मंत्रालयातील विशिष्ट ध्येय सहसचिव किंवा संचालकपदावरील अधिकाऱ्याकडे सोपवले जाईल. अशा तऱ्हेने विशिष्ट कार्यमंत्र्याकडे अशा बऱ्याच वेगवेगळ्या मंत्रालयांतील अधिकाऱ्यांचा व संचालकांचा गट तयार होईल आणि ते ह्या

गटातील लोकांचे लक्ष ध्येयपूर्तीकडे केंद्रित करतील. ह्या कार्यव्यवस्थापनातील प्रत्येक सदस्य त्याच्या कामाच्या व्यवस्थापनासाठी वरिष्ठ मंत्र्यांना जबाबदार वा उत्तरदायी असेल. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी विशिष्ट कार्यमंत्र्याला उत्तरदायी असेल.

हे सहज लक्षात येण्यासारखे आहे की, संसद-सदस्यांना अशा तऱ्हेने आखलेल्या कामाच्या साच्यात गुंतवले म्हणजे त्या व्यवस्थापनाची आणि उत्तरदायित्वाची तत्त्वे पुढीलप्रमाणे असतील –

१. विशिष्ट कार्यमंत्री म्हणून राज्यमंत्री स्तराचे मंत्री नेमले जाऊ शकतील किंवा संसद-सदस्यांमधून निवडलेले असतील आणि तसे सदस्य सत्ताधारी आघाडीत नसलेल्या पक्षांतीलही असू शकतील.
२. विशिष्ट कार्यमंत्र्यांना सोपवण्याच्या कामासाठी, योजनांसाठी व प्रकल्पांसाठी संबंधित वरिष्ठमंत्री वरपासून खालच्या स्तरापर्यंत येणाऱ्या क्रमाने साधने व अधिकार देऊ शकतील.
३. विशिष्ट कार्यमंत्री खात्यांच्या सीमांपलीकडे जाऊन एखाद्या विशिष्ट कामासाठी आडव्या क्रमाने व्यवस्थापन गटांकरवी एकत्र काम करुन घेऊ शकतील.
४. नियोजन आयोग आणि प्रत्येक मंत्र्याचे कार्यालय किंवा खाते ह्यांना सर्वसमावेशक योजना करण्यासाठी आणि साधने पुरवण्यासाठी 'भारत२०२०' संकल्पना आयोजन गट तयार करावे लागतील.
५. प्रत्येक मंत्र्यालय व विशिष्ट ध्येय गटाबरोबर विशेष लक्षपूर्वक काम करुन एक सर्वसमावेशक 'संकल्पना-२०२०' योजना नियोजन आयोग तयार करेल.
६. अशा कार्यगटांना सुरुवातीपासून काम संपेपर्यंतची आवश्यक ती साधने पुरवली जातील आणि अशा गटांचा कार्यकाळ हा संसद व सरकारच्या कार्यकाळानंतरही चालू राहील.
७. ई-गव्हर्नन्स जाळयाचा जास्तीत जास्त व पुरेपूर वापर केला जाईल.
८. विशिष्ट कार्यमंत्री हे थेट संसदेलाच उत्तरदायी राहतील.
९. कॅबिनेट मंत्री हे मंत्रिमंडळाला आणि मंत्रिमंडळ संसदेला उत्तरदायी असेल.
१० 'भारत-२०२०' संकल्पनेच्या साच्यात विशिष्ट कार्यमंत्री मोठ्या संख्येने कार्यरत असतील, ज्यामुळे संसदेच्या कामात व उत्तरदायित्वात वाढ होईल आणि विशिष्ट कामांसाठी नेमलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संख्याही वाढेल.

वेगवेगळे विशिष्ट कार्यमंत्री कसे काम करतील, ह्याची कल्पना पुढे दिलेल्या चौकटीवरुन येईल.



लोकशाहीचे काम नीट चालण्यासाठी लोकशाही तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांचे महत्त्व नि:संशय आहे; परंतु अशा संस्थांना विकासासाठी केलेली यांत्रिक उपकरणे समजू नये. सामाजिक मूल्यांवर आणि जनतेच्या परिणामकारक सहभागावर त्यांचा परिणामकारक उपयोग अवलंबून असतो, ज्यामुळे राज्यकारभाराच्या उत्तरदायित्वाची खातरी करुन घेता येईल. 'व्यवस्थित व उत्तम बदल घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर चर्चा करण्याची वेळ आता आली आहे.'

राष्ट्रपती कार्यालयाच्या अभ्यासिकेत ए.पी.जे. अब्दुल कलाम



राष्ट्राला उद्देशून भाषण देताना राष्ट्रपती. विषयाच्या अनुषंगाने सखोल,
संशोधन-अभ्यासपूर्ण केलेले विविचेन म्हणजे हे भाषण

कुरीकड-एर्नाकुलम येथील
'आदर्श ट्रस्ट'मध्ये एका
लहान मुलाबरोबर
(सन २००५)

उत्तराखंडमधील 'शिशुचेतना'
ह्या ग्रामीण विद्यालयात डॉ. कलाम

तरुण पिढीच्या इच्छा-आकांक्षा जाणून घेताना
एका प्रसन्नक्षणी डॉ. कलाम



एका तरुण विद्यार्थ्याच्या कलेचे कौतुक करताना डॉ. कलाम

राष्ट्रपती जाणार असलेल्या मार्गावरील गर्दी; डॉ. कलाम यांना
'राष्ट्रपती' म्हणून अपूर्व लोकप्रियता मिळाली.



अरुणाचल प्रदेशातील एक भेट : उत्तर-पूर्व राज्यांमधील साधेपणा, मैत्रीभाव आणि थक्क करणारी हिरवीगार वनराजी डॉ. कलाम यांना नेहमीच आकर्षित करते.



नागालँड विद्यापीठातील पदवीदान समारंभात पदवी प्रदान करताना डॉ. कलाम (सन २००७)

एका व्याख्यानाच्यावेळी विद्वानांचा श्रोतृवृंद

बिहारमधील
लोकनृत्यातील नर्तकांबरोबर
ढोल वाजवून बघताना



झारखंड येथील साराइकेला खेड्यात शेतकऱ्याची पारंपरिक हॅट घालून बघताना

कर्नाटक संगीतातून विरंगुळा!

अरुणाचल प्रदेशातील एका लष्करी ठाण्यावरील जवानांबरोबर राष्ट्रपती डॉ. कलाम

टेहळणी करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज असलेल्या
सीमारेषेजवळील ठाण्याला डॉ. कलाम यांची भेट

राष्ट्रपती भवनामधील मेजवानीच्या
प्रसंगी अमेरिकेचे राष्ट्रपती जॉर्ज
डब्ल्यू. बुश आणि त्यांची पत्नी लॉरा
ह्यांच्यासमवेत राष्ट्रपती डॉ. कलाम व
पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग (सन २००६)

डॉ. कलाम यांचे 'मैलाचा दगड' ठरणारे हे भाषण. भाषणानंतर युरोपीय संसदेचे अध्यक्ष हॅन्स-गर्ट पॉटरिंग ह्यांच्याशी हस्तांदोलन करताना (सन २००७)

क्वाझुलु-नाताळ विद्यापीठात 'समृद्ध समाजांचा विकास' ह्या विषयावर विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना डॉ. कलाम (सन २००४)

आफ्रिकेतील प्रसंग : एका विद्यालयातील विद्यार्थ्यांना भेटताना डॉ. कलाम

नेल्सन मंडेलांशी झालेल्या भेटीचा
डॉ. कलाम यांच्यावर गहिरा
प्रभाव पडला (सन २००४)

डर्बनमध्ये 'फ्युजन' नृत्याचा आनंद
घेताना डॉ. कलाम (सन २००४)

ग्रीसमध्ये 'द ॲक्रोपोलिस'चे साश्चर्य कौतुक करताना
आपल्या सहकाऱ्यांबरोबर डॉ. कलाम (सन २००७)

दक्षिण आफ्रिकेत 'फोनिक्स' येथे
महात्मा गांधीच्या पुतळ्याला
आदरांजली वाहताना डॉ. कलाम
(सन २००४)



सॉक्रेटिसच्या गुहेत
डॉ. कलाम, क्षणिक
काळासाठी त्या महान
तत्त्ववेत्याच्या सहवासाची
अनुभूती घेताना
(सन २००७)

एका धार्मिक सभेमध्ये त्यांच्या विशिष्ट शैलीत भाषण देताना डॉ. कलाम

पंतप्रधानांकडून दूरध्वनी...

चेन्नईतील अण्णा विद्यापीठाच्या आवारातला नेहमीसारखाच एक दिवस. माझे 'संकल्पना ते ध्येय' ह्या विषयावरचे व्याख्यान संपले होते आणि ते एक ऐवजी दोन तास चालले होते. संशोधनाचे काम करत असणाऱ्या काही विद्यार्थ्यांबरोबर मी दुपारचे जेवण घेतले आणि परत वर्गाकडे गेलो. संध्याकाळी माझ्या खोलीवर परत जात होतो, तेव्हा विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रो. ए. कलानिधी बरोबरच आले. ते म्हणाले की, 'कोणी तरी फोनवरून दिवसभर तुमच्याशी तातडीने संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होते.' आणि खरोखरीच; मी खोलीत पाऊल टाकले, तर फोन वाजतच होता. मी फोन उचलला, तेव्हा पलीकडच्या व्यक्तीने सांगितले, ''पंतप्रधानांना आपल्याशी बोलायचे आहे.'' काही महिन्यांपूर्वी 'भारत सरकारचा प्रमुख शास्त्रीय सल्लागार' ह्या केंद्रीय मंत्रिपदाच्या समकक्ष जागेचा राजीनामा देऊन मी अध्यापनाच्या कामावर परत रुजू झालो होतो. आता जेव्हा मी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींशी बोलत होतो, तेव्हा माझे आयुष्य एका अनपेक्षित वळणाच्या टप्प्यावर होते.

'टर्निंग पॉइंट्स'मधील कलाम यांची अशक्य वाटणारी कथा, 'विंग्ज ऑफ फायर' जेथे संपते, तेथून पुढे सुरू होते. ह्या कथेत त्यांच्या कारकिर्दीतल्या आणि राष्ट्रपतिपदाच्या कालावधीतल्या कोणाला फारशा ठाऊक नसलेल्या, काही विवादास्पद घटनांबद्दलच्या अनेक बारीकसारीक गोष्टी प्रथमच समोर येतात. यातून एका असामान्य व्यक्तिमत्त्वाचे अंतरंग तर समजतेच; पण प्रयत्न केले, चिकाटी ठेवली आणि आत्मविश्वास असला, तर अनेक सिद्धी मिळवून, कौशल्ये आणि सामर्थ्ये मिळवून महान वारसा असलेला हा देश पुन्हा महान कसा होऊ शकेल, त्याची संकल्पनाही मिळते. सर्वांत विशेष म्हणजे, ही गाथा आहे एका व्यक्तीने स्वत: आणि इतरांना बरोबर घेऊन केलेल्या प्रवासाची – जो प्रवास भारताला २०२०पर्यंत आणि नंतरही एक 'विकसित राष्ट्र' म्हणून उभे करेल.